पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रितांचा अभ्यास

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग

तात्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला शोध प्रबंध

संशोधक

पाटील मधुकर दिनकर

PRN NO 16114002207

मार्गदर्शक

डॉ.खोत नमिता बाबासाहेब

सप्टेंबर २०१९

संशोधकाचे प्रतिज्ञापत्र

मी, प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, **"पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रितांचा अभ्यास"** हा शोधप्रबंध मी स्वत: पूर्ण केलेला आहे. तो इतर कोणत्याही विद्यापीठातील पदवीकरिता अगर परीक्षेकरिता सादर केलेला नाही.

ठिकाण : कोल्हापूर. **संशोधक**

दिनांक : **(श्री.मधुकर दिनकर पाटील)**

मार्गदर्शकांचे प्रतिज्ञापत्र

प्रमाणित करणेत येते की, **"पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रितांचा अभ्यास"** हा शोधप्रबंध विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरिता ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथे सादर करणेत आला आहे. हा शोधप्रबंध श्री.मधुकर दिनकर पाटील यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले संशोधन कार्य आहे. माझ्या माहिती व विश्वासानुसार संबंधीत संशोधन कार्य हे त्यांनी इतर कोणत्याही विद्यापीठाच्या पदवीकरिता किंवा परीक्षेकरिता वापरले नाही.

ठिकाण : कोल्हापूर. **मार्गदर्शक**

दिनांक : **(डॉ.सौ.नमिता बाबासाहेब खोत)**

ऋणनिर्देश

"पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रितांचा अभ्यास" या विषयाच्या संशोधन कार्यासाठी मार्गदर्शक, इतर व्यक्ती, संघटना, संस्था, विविध क्षेत्रातील तज्ज्ञ यांनी मौलिक माहिती उपलब्ध करून दिली. त्यामुळेच हे संशोधन कार्य पूर्ण होऊ शकले. त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे माझे कर्तव्य समजतो.

सर्वप्रथम ज्यांची प्रेरणा व मार्गदर्शन सतत मला लाभले ते माझे मार्गदर्शक डॉ.नमिता बा. खोत, संचालक बॅ.बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे ऋण व्यक्त करण्यास शब्दच अपुरे वाटत आहेत. या शोध प्रबंधाच्या लिखाणासाठी त्यांनी मला सतत प्रोत्साहन दिले. तसेच अत्यंत आपुलकीने, निरपेक्षवृत्तीने आणि परखडपणे मार्गदर्शन केले. त्यांचे बहुमोल मार्गदर्शन व सहकार्यामुळेच मी आपला प्रबंध पूर्ण करू शकलो. त्यांचे प्रेम व सहकार्य मी आयुष्यभर विसरू शकणार नाही.

प्रस्तुत संशोधनाची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचा तसेच कुलगुरू डॉ.दिपक टिळक साहेब यांचा व ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागाचा मी अत्यंत ऋणी आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या ग्रंथपाल प्रा.सौ.धनिष्ठा खंदारे व ग्रंथालयातील इतर कर्मचारी यांचेही मार्गदर्शन मिळाले. त्यांचाही मी आभारी आहे.

सार्वजनिक ग्रंथालयाचे ग्रंथपाल यांचेकडून प्रश्नावली भरून मिळाल्या. त्यांच्याशी प्रत्यक्ष भेटून संशोधन विषयाच्या अनुषंगाने मौलिक चर्चा करता आली. या माहिती संकलनामुळेच हे संशोधन कार्य पूर्ण करता आले. तसेच माझे मित्र प्रा.चव्हाण वाय.आर. यांचे मौलिक असे मार्गदर्शन मिळाले.

संशोधनाच्या नेहमीच पाठीशी असणारे व प्रेरणा देणारे पंचगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.एस.के. पाटील तसेच महाविद्यालयातील प्रा.डॉ. जे.जी. पाटील, प्रा. पी. आर. पाटील यांनी सहकार्य केले. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

माझे वडील श्री.दिनकर दाजी पाटील, आई सौ.सुशिला दिनकर पाटील तसेच माझी पत्नी सौ.राजश्री पाटील, मुलगा तन्मय तसेच माझे मेहुणे रणजित पाटील, माझे भाऊ सर्जेराव, सदाशिव व चुलते हिंदूराव पाटील यांनी या संशोधन कार्यासाठी मोलाचा वेळ देवून प्रोत्साहन दिले.

या संशोधन कार्यासाठी ज्यांनी ज्यांनी प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष मदत केली, निरपेक्ष भावनेने सहकार्य केले त्या सर्व ज्ञात–अज्ञात व्यक्तींचा मी ऋणी आहे.

ठिकाण : कोल्हापूर. **संशोधक**

दिनांक : **(श्री.पाटील मधुकर दिनकर)**

अनुक्रमणिका

अ.नं.	प्रकरणाचे नांव	पृष्ठ क्रमांक
१.	मुखपृष्ठ	i
२.	संशोधकाचे प्रतिज्ञापत्र	ii
३.	मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र	iii
४.	ऋणनिर्देश	iv
५.	संशोधनाचा सारांश	vi
६.	अनुक्रमणिका	xx
७.	तक्ता यादी	xxiii
८.	आलेखाची यादी	xxiv
	प्रकरण पहिले : प्रस्तावना	**१–११**
१.१	प्रस्तावना	१
१.२	संशोधन विधान	३
१.३	संशोधनाची उद्दिष्ट्ये	६
१.४	संशोधनाची गृहितके	७
१.५	संशोधन अभ्यासाची व्याप्ती	७
१.६	संशोधनाची गरज व महत्व	८
१.७	संशोधन पद्धती	८
१.८	माहिती संकलन	९
१.९	सारांश	१०
	संदर्भसूची	१०
	प्रकरण दुसरे : संशोधन पूर्वाभ्यास व वाचनसाहित्य शोध	**१२–३५**
२.१	प्रस्तावना	१२
२.२	वाचन साहित्याचा आढावा	१२
२.३	नियतकालिकेतील लेख	२२

अ.नं.	प्रकरणाचे नांव	पृष्ठ क्रमांक
२.४	एम.लिब. संशोधन प्रकल्प	२५
२.५	एम.फिल. लघुशोध प्रबंध	२६
२.६	पीएच.डी. शोधप्रबंध	२६
२.७	सारांश	३२
	संदर्भसूची	३२
	प्रकरण तिसरे : दोलामुद्रितांचा अर्थ आणि इतिहास व पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयाची सद्यस्थिती	३६–१२५
३.१	प्रस्तावना	३६
३.२	दोलामुद्रितांची व्याख्या	३७
३.३	दोलामुद्रितांचा इतिहास	३८
३.४	मराठी दोलामुद्रितांचा कालावधी	४०
३.५	मराठी दोलामुद्रितांचा पहिला प्रयत्न	४२
३.६	मराठी दोलामुद्रितांचा दुसरा प्रयत्न	४२
३.७	मराठी दोलामुद्रितांचा तिसरा प्रयत्न	४३
३.८	मराठी दोलामुद्रितांकरिता प्रियोळकरांचे योगदान	४४
३.९	पुणे विद्यापीठातील मराठी दोलामुद्रिते	४५
३.१०	दोलामुद्रितांची सद्य:स्थिती	४६
३.११	मराठी दोलामुद्रितांचे जतन व संवर्धन	४७
३.१२	अंकीकरण (डिझीटायझेशन)	५०
३.१३	भारतातील ग्रंथालयाचा इतिहास	५३
३.१४	महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयाचा इतिहास	५५
३.१५	पश्चिम महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयाचा इतिहास	६०
३.१६	पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयाचा आढावा	६२
३.१७	राष्ट्रीय पाण्डुलिपी संस्थानच्या कार्याचा आढावा	१२१
३.१८	सारांश	१२३
	संदर्भसूची	१२३

अ.नं.	प्रकरणाचे नांव	पृष्ठ क्रमांक
	प्रकरण चौथे : माहितीचे संकलन, विश्लेषण व सादरीकरण	**१२६–२६८**
४.१	माहितीचे संकलन	१२६
४.२	कालानुक्रमे नोंदी	१२९
४.३	वर्णनात्मक नोंदी	१३१
४.४	लेखक सूची	२१२
४.५	ग्रंथशीर्षक सूची	२२०
४.६	प्रचलित दोलामुद्रित सूचीमध्ये समाविष्ट नसलेली दोलामुद्रिते	२२९
४.७	प्रचलित दोलामुद्रित सूचीमध्ये समाविष्ट असलेल्या नोंदींचा तौलनिक अभ्यास.	२४६
४.८	दोलामुद्रितांचे जतन व संवर्धन	२५९
४.९	सारांश	२६८
	प्रकरण पाचवे : निष्कर्ष व शिफारशी	२६९–२८२
५.१	उद्दिष्टांची पूर्तता	२६९
५.२	निष्कर्ष व शिफारशी	२६९
५.३	गृहितकांची पडताळणी	२८०
५.४	पुढील संशोधनाचा भविष्यवेध	२८१
५.५	समारोप	२८२
	संदर्भ सूची	२८३
	परिशिष्ट्ये	

तक्ता यादी

तक्ता क्र.	शीर्षक	पृष्ठ क्रमांक
३.१	दोलामुद्रितांची सद्य:स्थिती	४६
४.१	पश्चिम महाराष्ट्रातील अ वर्ग ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रित ग्रंथसंख्या	१२७
४.२	नोंदीतील सांकेतिक शब्द	१२९
४.३	कालानुक्रमे मराठी दोलामुद्रितांची उपलब्धता	१३०
४.४	लेखक सूची	२१२
४.५	ग्रंथ शीर्षक सूची	२२०
४.६	मोरजे आणि गावस्कर सु.आ. यांच्या यादीत समाविष्ट नसलेली मराठी दोलामुद्रिते	२२९
४.७	मोरजे आणि गावस्कर सु.आ. यांच्या यादीत नसलेल्या नोंदी	२३१
४.८	संबोधित दोलामुद्रितांचा प्रचलित दोलामुद्रित सूचीमधील तपशील	२३१
४.९	मोरजे यांच्या मराठी दोलामुद्रित सूचीशी साम्य	२४५
४.१०	समावेश असलेल्या सारख्याच नोंदीच्या वर्णनांचा तौलनिक अभ्यास	२४६
४.११	गावस्कर यांच्या मराठी दोलामुद्रित सूचीशी साम्य	२५७
४.१२	दोलामुद्रितांचे जतन व संवर्धन	२५९
४.१३	दोलामुद्रितांचे डिजीटायझेशन व प्रशिक्षण कर्मचारी	२६०
४.१४	सार्वजनिक ग्रंथालयीन कर्मचारी	२६२
४.१५	इतर कर्मचारी संख्या	२६३
४.१६	दोलामुद्रितांसाठी विशेष कर्मचारी	२६४
४.१७	ग्रंथालयीन सोपस्कार	२६५
४.१८	ग्रंथालयीन सूचना	२६७

आलेख यादी

तक्ता क्र.	शीर्षक	पृष्ठ क्रमांक
४.१	पश्चिम महाराष्ट्रातील अ वर्ग ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रित ग्रंथसंख्या	१२८
४.२	मोरजे यांच्या मराठी दोलामुद्रित सूचीशी साम्य	२४५
४.३	गावस्कर यांच्या मराठी दोलामुद्रित सूचीशी साम्य	२५८
४.४	दोलामुद्रितांचे जतन व संवर्धन	२५९
४.५	दोलामुद्रितांचे डिजीटायझेशन व प्रशिक्षण कर्मचारी	२६१
४.६	सार्वजनिक ग्रंथालयीन कर्मचारी	२६५
४.७	इतर कर्मचारी संख्या	२६३
४.८	दोलामुद्रितांसाठी विशेष कर्मचारी	२६४
४.९	ग्रंथालयीन सोपस्कार	२६६
४.१०	ग्रंथालयीन सूचना	२६७

पश्चिम महाराष्ट्रातील'अ'वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रितांचाअभ्यास

सारांश

प्रस्तावना

सार्वजनिक ग्रंथालय हे समाजाच्या सांस्कृतिक, शैक्षणिक व वैचारिक परिवर्तनाचे केंद्र आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मुद्रकलेच्या विकासामुळे ग्रंथ सर्व वाचकांपर्यंत पोहोचविणे सोपे झाले. मुद्रणकलेचा उगम प्रामुख्याने चीनमध्ये झाला. मुद्रणकलेच्या आरंभ काळातील पुस्तकांना दोलामुद्रिते असे संबोधले जाते. इ.स. १८०० ते १८६७ हा कालखंड मराठी दोलामुद्रितांची बाल्यावस्था होती. अशा बाल्यावस्थेतील मुद्रित ग्रंथांना मराठी दोलामुद्रिते असे म्हटले जाते. अ.का. प्रियोळकर यांच्या मराठी दोलामुद्रिते या क्षेत्रातील योगदानामुळे त्यांना दोलामुद्रितांचा जनक म्हणून ओळखले जाते. या कालावधीत मुद्रित झालेली अनेक मराठी पुस्तके अद्याप वाचकांपर्यंत पोहोचलेली नाहीत. त्यांचा दोलामुद्रित ग्रंथांच्या सध्या अस्तित्वात असलेल्या यादीत समावेश ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन "पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रितांचा अभ्यास" या संशोधन विषयाच्या निवडीपासून सदर संशोधन कार्यास सुरूवात झाली आहे.

संशोधन विधान

संशोधकाने "पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रितांचा अभ्यास" हा विषय सदर संशोधनासाठी निवडला आहे. मराठी दोलामुद्रित ग्रंथांची सूची परिपूर्ण व अधिक समृध्द बनविण्यासाठी व वाचकांना अनभिज्ञ असणारी मराठी दोलामुद्रिते त्यांना वाचनासाठी उपलब्ध करून देण्यासाठी हा अभ्यास आवश्यक वाटल्याने या संशोधन विषयाची निवड केली आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये

१. 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील दोलामुद्रितांच्या सद्यस्थितीचा शोध घेणे व सूची तयार करणे.

२. 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील ग्रंथपाल, कर्मचारी यांचेकडून दोलामुद्रितांचे जतन व संवर्धन योग्य रितीने होते की नाही याचा शोध घेणे.

३. या दोलामुद्रितांच्या व्यवस्थापनात येणाऱ्या अडचणीचा शोध घेऊन त्यावरील उपाययोजना सुचविणे.

४. 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयात असणाऱ्या दोलामुद्रितांचा गावस्कर व मोरजे यांच्या सूचीत शोध घेऊन त्याचा अभ्यास करणे.

५. पूर्वी प्रकाशित झालेल्या दोलामुद्रितांच्या सूचीमध्ये समाविष्ट नसलेल्या 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील दोलामुद्रितांची वेगळी सूची तयार करणे.

६. संकलित होणाऱ्या दोलामुद्रितांच्या अंकीकरणाच्या सद्यस्थितीची पाहणी करणे व त्याकरिता विस्तारीत योजना सुचविणे.

संशोधनाची गृहितके

१. पश्चिम महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयात दोलामुद्रित ग्रंथ कांही प्रमाणात उपलब्ध आहेत.

२. पश्चिम महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील दोलामुद्रितांचे अंकीकरण करण्यात अडचणी आहेत.

संशोधनाची व्याप्ती

सदरच्या संशोधनात पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयाची निवड करण्यात आली आहे. पश्चिम महाराष्ट्रामध्ये एकूण ९९ 'अ' वर्गातील सार्वजनिक ग्रंथालये आहेत. संशोधनामध्ये मराठी दोलामुद्रितांचा अभ्यास अपेक्षित असून संशोधनाची व्याप्ती 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयापुरती मर्यादित आहे. दोलामुद्रितांचा कालखंड प्रियोळकरांनी जो मान्य केला आहे, तो इ.स. १८०० ते १८६७ हाच ठेवण्यात आलेला आहे.

संशोधनाची गरज व महत्व

गंगाधर मोरजे यांनी प्रकाशित केलेल्या मराठी दोलामुद्रितांच्या तिसऱ्या आवृत्तीमध्ये दोलामुद्रितांची सूची दिलेली आहे. सदरच्या सूचीतील कोणती मराठी दोलामुद्रिते "पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रितांचा अभ्यास" आहेत व ती कोणत्या ग्रंथालयामध्ये आहेत, त्यांचे स्थान सूचीद्वारे निश्चित करण्याचा प्रयत्न संशोधकाने केला आहे. या

दोलामुद्रितांचे जतन व संवर्धन होण्याच्या दृष्टीने संशोधकाने प्रयत्न केले आहेत. त्यामुळे त्यांचे डिजिटायझेशन अथवा पुनर्प्रकाशन करणे या संशोधनामुळे शक्य होईल. प्रियोळकर, गावस्कर व मोरजे यांनी संपादित केलेल्या दोलामुद्रित सूचींची संशोधनासाठी निवडलेल्या 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयामध्ये आढळलेल्या दोलामुद्रितांशी तुलना करून नव्याने मिळालेल्या दोलामुद्रितांच्या नोंदी करण्यात आलेल्या आहेत. या संशोधनामुळे मराठी दोलामुद्रित सूचीमध्ये समाविष्ट असलेल्या १९०० मराठी दोलामुद्रितांच्या नोंदीमध्ये आणखी नवीन ३३ मराठी दोलामुद्रितांची भर पडलेली आहे. सदरच्या संशोधनामुळे ग्रंथालयशास्त्र, मराठी वाङ्मयाचा अभ्यास, वाचक, प्राध्यापक, संशोधक व जुन्या ग्रंथाचे ग्रंथप्रेमी इत्यादींना निश्चितच उपयोग होणार आहे.

संशोधन पद्धती

संशोधनाचा समावेश सामाजिक शास्त्रे या विद्याशाखेतील असून ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयाच्या संशोधनासाठी आवश्यक असणाऱ्या विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर संशोधकाने केला आहे. माहिती संकलन करण्यासाठी प्रश्नावली, मुलाखत, निरीक्षण व सर्वेक्षण या पद्धतीचा अवलंब संशोधकाने केलेला आहे. गरजेनुसार ग्रंथालयाच्या वेबसाईटवरूनही माहितीचे संकलन केले आहे. सदर माहितीचे शास्त्रीय पद्धतीने सादरीकरण विश्लेषणा करून निष्कर्ष काढले आहेत. या संशोधनातील प्रकरणनिहाय संशोधन सारांश पुढीलप्रमाणे.

प्रकरण १ : प्रस्तावना

संशोधक संशोधकाकडे कसा वळला याची माहिती दिली आहे. संशोधन समस्येची निवड, महत्व व संशोधनाची उद्दिष्ट्ये दिली आहेत. ही उद्दिष्ट्ये 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रितांची सद्यस्थिती, त्यांचे जतन व संवर्धन, व्यवस्थापनात येणाऱ्या अडचणी गावस्कर व मोरजे यांच्या सूचीचा शोध घेऊन व सूचीमध्ये समाविष्ट नसलेल्या दोलामुद्रितांची वेगळी सूची तयार करण्यास उपयुक्त ठरलेली आहे. संशोधनाच्या निष्कर्षाप्रत जाण्यासाठी गृहितकाची मदत घेतलेली आहे.

प्रकरण २ : संशोधन पूर्वाभ्यास व वाचनसाहित्य शोध

या प्रकरणामध्ये संशोधकाने पुस्तके, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, संशोधन विषयासंबंधीत एम.लिब., एम.फिल. व पीएच.डी. यांचे अवलोकन केले.

प्रकरण ३ : दोलामुद्रितांचा अर्थ आणि इतिहास व पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयाची सद्यस्थिती

या प्रकरणात दोलामुद्रितांची व्याख्या, दोलामुद्रितांचा इतिहास, मराठी दोलामुद्रितांचा कालावधी, मराठी दोलामुद्रितांचा पहिला प्रयत्न, मराठी दोलामुद्रितांचा दुसरा प्रयत्न, मराठी दोलामुद्रितांचा तिसरा प्रयत्न, मराठी दोलामुद्रिताकरिता प्रियोळकरांचे योगदान, पुणे विद्यापीठातील मराठी दोलामुद्रिते, दोलामुद्रितांची सद्यस्थिती, मराठी दोलामुद्रितांचे जतन व संवर्धन, अंकीकरण, भारतातील ग्रंथालयाचा इतिहास, महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयाचा इतिहास, पश्चिम महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयांचा इतिहास, पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयाचा आढावा, राष्ट्रीय पाण्डुलिपी संस्थांचा आढावा यांचे विस्तारपूर्वक विवेचन केले आहे.

प्रकरण ४ : माहिती संकलन, विश्लेषण व सादरीकरण

संशोधकाने सदर प्रकरणात प्रश्नावली, मुलाखती व निरीक्षण तसेच ऑनलाईन उपलब्ध माहितीचे संकलन करून त्यांचे शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण केले आहे. यामध्ये कालानुक्रमे नोंदी, वर्णनात्मक नोंदी, लेखक सूची, ग्रंथ सूचक नोंदी, समाविष्ट नसलेली दोलामुद्रिते, समाविष्ट असलेली दोलामुद्रिते इत्यादीचे विवेचन आढळते. संकलित माहितीचे गुणात्मक व संख्यात्मक सादरीकरण, आवश्यकतेनुसार तक्ते व आलेख यांच्या सहाय्याने केले आहे.

प्रकरण ५ : निष्कर्ष व शिफारशी

या प्रकरणात संकलित केलेल्या माहितीच्या व तथ्यांच्या शास्त्रीय विश्लेषणातून व अर्थनिर्वचनातून सदर संशोधकाने निष्कर्ष वस्तुनिष्ठपणे मांडले आहेत व त्यावर आधारित शिफारशी केलेल्या आहेत. संशोधन कार्य सुरू राहणेसाठी व मराठी दोलामुद्रितांची सूची परिपूर्ण व समृद्ध होण्यासाठी नवीन संशोधकांना संशोधन विषयाचा भविष्यवेध मांडला आहे.

संदर्भ सूची :

संशोधनात संपूर्ण ग्रंथांचा, नियतकालिकांचा, संशोधन प्रबंध, लघुशोध प्रबंध, वेबसाईटचा उल्लेख सदर संदर्भ सूचीमध्ये केला आहे. संदर्भ सूचीसाठी अमेरिकन सायकॉलॉजिकल असोसिएशन (A.P.A.) स्टाईलचा वापर केला आहे.

परिशिष्टे :

संशोधकास संशोधनाअंती आलेल्या अनुभवावरून ग्रंथालयाची प्रश्नावली, ग्रंथालयाची यादी परिशिष्टामध्ये जोडली आहे. माहिती संकलनासाठी वापरलेल्या ग्रंथपाल व इतर ग्रंथालयातील कर्मचारी यांनी माहिती दिली आहे.

संशोधनाचे निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत संशोधन कार्य यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी संशोधकाने संशोधनाच्या उद्दिष्टांवर आधारित माहितीचे संकलन केले आहे आणि त्या माहितीचे सादरीकरण व विश्लेषणावरून स्पष्ट होते की, पश्चिम महाराष्ट्रातील ९९ 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी फक्त २० सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये १६९ मराठी दोलामुद्रिते आढळली आहेत. त्यापैकी १३६ मराठी दोलामुद्रितांची नोंद गावस्कर आणि मोरजे यांच्या मराठी दोलामुद्रितांच्या सूचीत आढळते. पण उर्वरित ३३ मराठी दोलामुद्रितांची नोंद कोणत्याही सूचीत आढळत नाही. सदरच्या संशोधनामुळे संशोधकाने नवीन ३३ मराठी दोलामुद्रितांचा शोध घेवून ती वाचकांच्या अभ्यासासाठी/वापरासाठी उपलब्ध करून दिली आहेत. त्यामुळे सद्य:स्थितीत संशोधनासाठी संकलित केलेल्या माहितीचे सादरीकरण व शास्त्रीय विश्लेषणाआधारे संशोधकाने खालील निष्कर्ष व शिफारशी मांडल्या आहेत.

उद्दिष्टांची पूर्तता :

उद्दिष्ट क्र.१ 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील दोलामुद्रितांच्या सद्य:स्थितीचा शोध घेणे व सूची तयार करणे.

वरील उद्दिष्ट क्र.१ पूर्ण झाले व त्यानुसार निष्कर्ष व शिफारशी खाली नमूद केल्या आहेत.

निष्कर्ष :

१. संशोधकाने संशोधनासाठी निवडलेल्या पश्चिम महाराष्ट्रातील ९९ 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी ८० (८०.८०%) सार्वजनिक ग्रंथालयांनी प्रतिसाद दिलेला आहे. उर्वरीत १९ (१९.२०%) ग्रंथालयांनी प्रश्नावलीस प्रतिसाद दिलेला नाही.

२. पश्चिम महाराष्ट्रातील संशोधनासाठी निवडलेल्या ८० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी २० (२५%) ग्रंथालयामध्ये १६९ मराठी दोलामुद्रिते आढळली. पण ६० (७५%) ग्रंथालयांमध्ये मराठी दोलामुद्रिते आढळली नाहीत.

शिफारशी :

१. संशोधकाने हाती घेतलेले संशोधनासाठी आवश्यक माहिती संकलित करणेसाठी ९९ 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांना प्रश्नावली पाठविली. परंतु फक्त ८० ग्रंथालयातील ग्रंथालयांमध्ये कार्यरत ग्रंथपालांनी प्रतिसाद दिला. उर्वरीत ग्रंथपालांनी आपली मानसिकता बदलून संशोधकास सहकार्य करणे गरजेचे होते. भविष्यात ग्रंथपालांनी आपली कार्यक्षमता वाढवून संशोधकांना संशोधनासाठी आवश्यक माहिती उपलब्ध करून द्यावी.

२. ६० (७५%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांनीही मराठी दोलामुद्रित ग्रंथांचा शोध घ्यावा व दोलामुद्रितांच्या ग्रंथ संग्रहात भर घालावी, जेणेकरून मराठी दोलामुद्रित ग्रंथ संपदा समृध्द व्हावी.

उद्दिष्ट क.२ 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील ग्रंथपाल, कर्मचारी यांच्याकडून दोलामुद्रितांचे जतन व संवर्धन योग्य रितीने होते की नाही याचा शोध घेणे.

वरील उद्दिष्ट क्र.२ पूर्ण झाले व त्यानुसार निष्कर्ष व शिफारशी खाली नमूद केल्या आहेत.

निष्कर्ष :

१. मराठी दोलामुद्रिते आढळलेल्या २० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील १९ (९५%) ग्रंथालयांमध्ये दोलामुद्रित ग्रंथांच्या जतन व संवर्धनासाठी विभाग आहे. १ (५%) ग्रंथालयामध्ये दोलामुद्रित ग्रंथ जतन व संवर्धन विभाग विषयक माहिती उपलब्ध झाली नाही.

२. मराठी दोलामुद्रिते आढळलेल्या २० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी १३ (६५%) दोलामुद्रित ग्रंथ जतन व संवर्धन विषयक प्रशिक्षित कर्मचारी आहेत, तर ६ (३०%) ग्रंथालयांमध्ये प्रशिक्षित कर्मचारी नाहीत. एका (५%) ग्रंथालयाने ही माहिती उपलब्ध करून दिली नाही.

३. मराठी दोलामुद्रित ग्रंथ आढळलेल्या २० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी १७ (८५%) ग्रंथालयांमध्ये दोलामुद्रित ग्रंथांची बांधणी व दुरूस्ती केली जाते. एका (५%) ग्रंथालयात दोलामुद्रित ग्रंथांची बांधणी व दुरूस्ती केली जात नाही तर २ (१०%) ग्रंथालयांनी याविषयी माहिती दिली नाही.

४. मराठी दोलामुद्रित ग्रंथ आढळलेल्या २० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी७ (३५%) ग्रंथालयांमध्ये दोलामुद्रित ग्रंथ जतन प्रयोगशाळा आहे. ११ (५५%) अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये अशी प्रयोगशाळा नाही. तर २ (१०%) ग्रंथालयांनी याविषयीची माहिती पुरविली नाही.

शिफारशी :

१. दोलामुद्रित ग्रंथ जतन व संवर्धन विभाग नसल्यास १ (५%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयाने असा विभाग सुरू करावा. त्यामुळे दोलामुद्रितांचे जतन व संवर्धन करून हाताळणी सुलभ होईल.

२. दोलामुद्रित ग्रंथ जतन व संवर्धन विषयक प्रशिक्षित कर्मचारी नसलेल्या ६ (३०%) ग्रंथालयांनी ग्रंथ जतन व संवर्धन विषयक प्रशिक्षित कर्मचाऱ्याची नेमणूक करावी.

३. दोलामुद्रित ग्रंथांची बांधणी व दुरूस्तीची सुविधा नसलेल्या १ (५%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयाने ही सुविधा सुरू करावी. या विषयी माहिती उपलब्ध नसलेल्या २ (१०%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये ग्रंथ बांधणी व दुरूस्तीची सुविधा नसेल तर त्यांनीही ही सुविधा सुरू करावी. त्यामुळे दोलामुद्रित ग्रंथ जतन व संवर्धन करणे शक्य होईल.

४. दोलामुद्रित ग्रंथ जतन प्रयोगशाळा नसलेल्या ११ (५५%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांनी अशी प्रयोगशाळा उभारावी. या विषयीची माहिती उपलब्ध होऊ न शकलेल्या २ (१०%) ग्रंथालयांमध्ये अशी प्रयोगशाळा नसेल तर त्यांनीही प्रयोगशाळा उभारावी.

५. मराठी दोलामुद्रित ग्रंथांच्या जतन व संवर्धनासाठी सर्वच २० (१००%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांनी दोलामुद्रित ग्रंथांचे अंकीकरण करुन घ्यावे.

उद्दिष्ट क्र.३ दोलामुद्रितांच्या व्यवस्थापनात येणाऱ्या अडचणींचा शोध घेऊन त्यावरील उपाय योजना सुचविणे.

वरील उद्दिष्ट क्र.३ पूर्ण झाले व त्यानुसार निष्कर्ष व शिफारशी खाली नमूद केल्या आहेत.

निष्कर्ष :

१. पश्चिम महाराष्ट्रातील संशोधकाने संशोधनासाठी निवडलेल्या ८० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी २ (२.५०%) ग्रंथालयांमध्ये हंगामी ग्रंथपाल कार्यरत आहेत, तर १ (१.२५%) ग्रंथालयामध्ये ग्रंथपाल यांची नेमणूक करण्यात आलेली नाही.

२. पश्चिम महाराष्ट्रातील ८० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये कार्यरत असलेल्या ग्रंथपालांपैकी १२ (१५%) ग्रंथपालांना दोलामुद्रिते या संकल्पनेविषयी माहिती नाही. तर ५ (७.५%) ग्रंथालयातील ग्रंथपालांनी याविषयी माहिती दिली नाही.

३. संशोधनासाठी निवडलेल्या ८० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथपालांपैकी २० ग्रंथालयांमध्ये दोलामुद्रिते आढळली. त्यापैकी फक्त ५ (२५%) ग्रंथालयांमध्ये दोलामुद्रितांसाठी विशेष कर्मचारी नेमलेला आहे. उर्वरीत १५ (७५%) दोलामुद्रितासाठी विशेष कर्मचारी नेमलेला नाही.

४. मराठी दोलामुद्रिते आढळलेल्या २० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी १७ (८५%) ग्रंथालयांमध्ये दोलामुद्रितांना दाखल अंक देवून त्यांचे वर्गीकरण केले आहे. तर ३ (१५%) ग्रंथालयांनी दोलामुद्रितांना दाखल अंक देवून त्यांचे वर्गीकरण केलेले नाही. ४ ग्रंथालयांनी दोलामुद्रितांचे तालिकीकरण केले नाही.

५. दोलामुद्रिते आढळलेल्या २० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी ८ (४०%) ग्रंथालयांमध्ये कार्यरत ग्रंथपालांनी अपुऱ्या अनुदान / निधीमुळे दर्जेदार ग्रंथालयीन सेवा पुरविण्यात अडचणी येत असल्याचे म्हटले आहे. तसेच २ (१०%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांना अपुऱ्या निधीमुळे दोलामुद्रितांचे जतन व संवर्धन करण्यात अडचणी येत आहेत.

शिफारशी :

१. पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी हंगामी ग्रंथपाल कार्यरत असलेल्या २ (१०%) ग्रंथालयांनी कायमस्वरूपी ग्रंथपालांची नेमणूक करावी. तर ग्रंथपालाची नेमणूकच केलेली नसलेल्या एका (५%) ग्रंथालयाने लवकरात लवकर ग्रंथपालाची नेमणूक करावी. त्यामुळे वाचकांना चांगल्या ग्रंथालयीन सेवा पुरवणे शक्य होईल.

२. पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये कार्यरत असलेल्या परंतु मराठी दोलामुद्रितांविषयी अनभिज्ञ असलेल्या १२ (१५%) ग्रंथपालांनी मराठी दोलामुद्रितांविषयी सखोल माहिती घ्यावी. त्यामुळे मराठी दोलामुद्रितांचा शोध घेणे, त्यांची नोंद, तांत्रिक सोपस्कार करणे, देवघेव करणे आणि त्यांचे जतन व संवर्धन करणे शक्य होईल.

३. पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी २० ग्रंथालयांमध्ये दोलामुद्रिते आढळली. त्यातील दोलामुद्रितांसाठी विशेष ग्रंथालयीन कर्मचारी कार्यरत नसलेल्या १५ (७५%) ग्रंथालयांनी त्वरीत त्याची नेमणूक करावी. त्यामुळे दोलामुद्रितांचे जतन व संवर्धन करणे सुलभ होईल.

४. मराठी दोलामुद्रितांना दाखल अंक देवून त्यांचे वर्गीकरण केले नसलेल्या ३ (१५%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांनी त्वरीत दोलामुद्रित ग्रंथांवर तांत्रिक सोपस्कार करावेत. त्यामुळे त्यांची देवघेव करणे सोयीचे होईल.

५. शासनाने 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांच्या अनुदानात वाढ करावी. त्याचबरोबर वाचकांना दर्जेदार सेवा पुरविण्यास मदत होईल. तसेच मराठी दोलामुद्रितांचे जतन व संवर्धन चांगल्या प्रकारे करता येईल. सर्वच अ वर्ग सार्वजनिक ग्रंथालयानी दोलामुद्रितासाठी स्वतंत्र बजेट करावे व एनएमएम कडे प्रपोजल पाठवून ग्रँट मिळवाव्यात.

उद्दिष्ट क्र.४ 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयात असणाऱ्या डॉ. मोरजे व गावस्कर यांच्या सुचीत दोलामुद्रितांचा शोध घेऊन त्याचा अभ्यास करणे.

वरील उद्दिष्ट क्र.४ पूर्ण झाले व त्यानुसार निष्कर्ष व शिफारशी खाली नमूद केल्या आहेत.

निष्कर्ष :

१. संशोधकाने संशोधनासाठी निवडलेल्या ८० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी २० (२५%) ग्रंथालयांमध्ये १६९ दोलामुद्रिते आढळली. या दोलामुद्रित ग्रंथाचा मोरजे यांच्या मराठी दोलामुद्रित सूचीशी तुलनात्मक अभ्यास केल्यानंतर, १३६ दोलामुद्रित ग्रंथ सूचीत समाविष्ट होते. परंतु या १३६दोलामुद्रित ग्रंथांपैकी १०५ (७७.२०%) दोलामुद्रित ग्रंथांच्या नोंदी मोरजे यांच्या सूचीमधील नोंदींशी तंतोतंत जुळल्या नाहीत.

२. गंगाधर मोरजे यांच्या मराठी दोलामुद्रितांच्या सूचीमध्ये ८५ (६२.५%) दोलामुद्रित ग्रंथ कोणत्या ग्रंथालयामध्ये उपलब्ध आहेत या विषयी उल्लेख केलेला नाही.

३. कोल्हापूर जिल्ह्यातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयामध्ये आढळलेल्या व मोरजे यांच्या दोलामुद्रित सुचीमध्ये समाविष्ट असलेल्या २८ मराठी दोलामुद्रित ग्रंथ कोणत्या ग्रंथालयात उपलब्ध आहेत, याचा उल्लेख मोरजे यांच्या मराठी दोलामुद्रित ग्रंथ सूचीमध्ये केलेला नाही.

४. सांगली जिल्ह्यातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयामध्ये आढळलेल्या व मोरजे यांच्या मराठी दोलामुद्रित ग्रंथ सुचीमध्ये समाविष्ट असलेले ७ मराठी दोलामुद्रित ग्रंथ कोणत्या ग्रंथालयात उपलब्ध आहेत याचा उल्लेख मोरजे यांच्या मराठी दोलामुद्रित ग्रंथ सूचीमध्ये केलेला नाही.

५. सातारा जिल्ह्यातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयामध्ये आढळलेल्या व मोरजे यांच्या मराठी दोलामुद्रित सुचीमध्ये समाविष्ट असलेल्या ९ मराठी दोलामुद्रित ग्रंथ कोणत्या ग्रंथालयात उपलब्ध आहेत यांची मोरजे यांच्या सुचीमध्ये नोंद केलेली नाही.

६. सोलापूर जिल्ह्यातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयामध्ये आढळलेल्या ४१ मराठी दोलामुद्रित ग्रंथांची डॉ.मोरजे यांच्या मराठी दोलामुद्रिते या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीमध्ये दिलेल्या सुचीमध्ये नोंद करताना सदरची दोलामुद्रिते कोणत्या ग्रंथालयामध्ये उपलब्ध आहेत याचा उल्लेख आढळत नाही.

शिफारशी :

१. प्रस्तुत संशोधनाआधारे संशोधकाने तयार केलेल्या मराठी दोलामुद्रित ग्रंथांच्या सूचीमधील नोंदींची माहिती मोरजे यांच्या सूचीमध्ये नोंदवावी त्यामुळे ती सूची अधिक समृद्ध व परिपूर्ण होईल.

२. ८५ (६२.५%) मराठी दोलामुद्रित ग्रंथ कोणत्या 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयामध्ये उपलब्ध आहेत याचा मराठी दोलामुद्रितांच्या सुचीमध्ये उल्लेख करावा.

३. कोल्हापूर जिल्ह्यातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयात आढळलेल्या २८ मराठी दोलामुद्रित ग्रंथांचा ते कोणत्या ग्रंथालयात उपलब्ध आहेत याचा उल्लेख मोरजे यांच्या मराठी दोलामुद्रित सुचित करावा.

४. सांगली जिल्ह्यातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयात आढळलेल्या ८० मराठी दोलामुद्रित ग्रंथांचा ते कोणत्या ग्रंथालयात उपलब्ध आहेत याचा उल्लेख मोरजे यांच्या मराठी दोलामुद्रित सुचित करावा.

५. सातारा जिल्ह्यातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयात आढळलेल्या ९ मराठी दोलामुद्रित ग्रंथांचा ते कोणत्या ग्रंथालयात उपलब्ध आहेत याचा उल्लेख मोरजे यांच्या मराठी दोलामुद्रित ग्रंथ सुचीमध्ये करण्यात यावा.

६. सोलापूर जिल्ह्यातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयात आढळलेल्या ४१ मराठी दोलामुद्रित ग्रंथ कोणत्या ग्रंथालयात उपलब्ध आहेत याचा उल्लेख मोरजे यांच्या मराठी दोलामुद्रित ग्रंथ सुचीमध्ये करण्यात यावा.

उद्दिष्ट क्र.५ प्रसिध्द झालेल्या दोलामुद्रितांच्या सूचीमध्ये समाविष्ट नसलेल्या 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील दोलामुद्रितांची सूची तयार करणे.

वरील उद्दिष्ट क्र.५ पूर्ण झाले व त्यानुसार निष्कर्ष व शिफारशी खाली नमूद केल्या आहेत.

निष्कर्ष :

१. डॉ. गंगाधर मोरजे यांच्या ''मराठी दोलामुद्रिते'' या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीमध्ये १९०० मराठी दोलामुद्रित ग्रंथांची नोंद आहे. संशोधकाने हाती घेतलेल्या प्रस्तुत संशोधनामुळे या सूचीमध्ये नसलेल्या ३३ मराठी दोलामुद्रितांचा शोध लागला आहे. यांची नोंद मोरजे यांच्या मराठी दोलामुद्रितांच्या सुचीमध्ये केल्यास १९०० + ३३ अशी एकूण १९३३ मराठी दोलामुद्रित ग्रंथांची सुचीमध्ये नोंद होईल.

२. संशोधकाने पूर्वी प्रसिध्द झालेल्या डॉ. मोरजे, दाते व तत्सम सुचीमध्ये समाविष्ट नसलेल्या पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये आढळलेल्या ३३ मराठी दोलामुद्रितांची सूची तयार केली आहे.

शिफारशी :

१. प्रस्तुत संशोधन कार्यातून संशोधकाने शोधून काढलेल्या ३३ मराठी दोलामुद्रितांची नोंद मोरजे यांच्या 'मराठी दोलामुद्रिते' या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीमध्ये दिलेल्या सुचीमध्ये करावी. त्यामुळे सूचीमध्ये एकूण १९३३ मराठी दोलामुद्रित ग्रंथांची नोंद होईल.

२. संशोधकाने प्रस्तुत संशोधनाद्वारे तयार केलेल्या मराठी दोलामुद्रितांच्या सुचीचा समावेश पूर्वी प्रसिध्द झालेल्या डॉ. मोरजे, दाते व तत्सम सुचीमध्ये करावा.

उद्दिष्ट क्र.६ संकलित होणाऱ्या दोलामुद्रितांच्या डिजिटायझेशनच्या सद्य:स्थितीची पाहणी करणे व त्याकरीता विस्तारीत योजना सुचविणे.

वरील उद्दिष्ट क्र.६ पूर्ण झाले व त्यानुसार निष्कर्ष व शिफारशी खाली नमूद केल्या आहेत.

निष्कर्ष :

१. मराठी दोलामुद्रित ग्रंथ आढळलेल्या २० ग्रंथालयांपैकी ८ (४०%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये मराठी दोलामुद्रित ग्रंथांच्या डिजिटायझेशनचे काम (Full Text) १००% पूर्ण झालेले आहे. ५ (२५%) ग्रंथालयामध्ये दोलामुद्रित ग्रंथांच्या डिजिटायझेशनचे काम चालू आहे. उर्वरीत ७ (३५%) ग्रंथालयांनी दोलामुद्रितांचे डिजिटायझेशन केलेले नाही.

२. मराठी दोलामुद्रित ग्रंथांचे डिजिटायझेशन करण्यासाठी ७ (३५%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांनी ग्रंथालयातील कर्मचाऱ्यास डिजिटायझेशनचे प्रशिक्षण दिलेले आहे. १२ (६०%) ग्रंथालयांनी ग्रंथालयीन कर्मचाऱ्यास डिजिटायझेशनचे प्रशिक्षण दिलेले नाही, तर एका ग्रंथालयाने (५०%) या विषयीची माहिती उपलब्ध करून दिलेली नाही.

४. मराठी दोलामुद्रित ग्रंथांचा १५ (७५%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयामध्ये वाचकाकडून वापर केला जातो. ४ (२०%) ग्रंथालयांमध्ये मराठी दोलामुद्रित ग्रंथांचा सभासद/वाचक वापर करत नाहीत. एका (५%) ग्रंथालयाने त्याविषयी माहिती दिली नाही.

शिफारशी :

१. मराठी दोलामुद्रित ग्रंथांचे डिजिटायझेशन करू न शकलेल्या ७ (३५%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांनी मराठी दोलामुद्रित ग्रंथांचे डिजिटायझेशन (Full Text) करून घ्यावे. त्यामुळे या ग्रंथालयांना दोलामुद्रित ग्रंथांचे जतन व संवर्धन करता येऊ शकेल. त्याचबरोबर वाचकांना ऑन लाईन सेवाही पुरवता येतील. ५ (२५%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांनी दोलामुद्रित ग्रंथांच्या डिजिटायझेशनचे चालू असलेले काम त्वरीत पूर्ण करावे. त्यामुळे त्यांना दोलामुद्रित विषयक ऑनलाईन सेवा देता येतील.

२. १२ (६०%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांनी, ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना डिजिटायझेशनचे प्रशिक्षण द्यावे.

४. ४ (२०%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांतील वाचकांनीही मराठी दोलामुद्रित ग्रंथांचा वापर करावा. ग्रंथालयांनी त्यांना दोलामुद्रितांच्या वापरास परवानगी द्यावी.

पुढील संशोधनाचा भविष्यवेध:

संशोधकाने हाती घेतलेले संशोधन कार्य यशस्वीरित्या पूर्ण करताना संशोधनास कांही मर्यादा पडत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे कांही 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांची माहिती संकलित करणे शक्य झाले. त्यामुळे मराठी दोलामुद्रितांची खरी संख्या समोर येण्यास मर्यादा पडतात. या अनुषंगाने मराठी दोलामुद्रित सुचीमधील नोंदी परिपूर्ण होऊ शकत नाहीत. अशा विषयावर संशोधन होऊन मराठी दोलामुद्रितांची परिपूर्ण सूची तयार होण्यासाठी अनेक बाबींवर संशोधन व्हावे असे संशोधकास वाटते. त्यानिमित्त संशोधकाने पुढील विषय संशोधनासाठी सुचविलेले आहेत.

१. महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रितांचा अभ्यास या विषयावर संशोधन होऊ शकते. अशा संशोधनातून मराठी दोलामुद्रितांची वास्तव संख्या समोर येऊ शकते व सूची परिपूर्ण होऊ शकते.

२. महाराष्ट्रातील शतकोत्तरी सार्वजनिक ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रितांचा आढावा.

३. महाराष्ट्रातील शैक्षणिक (शाळा, महाविद्यालय, विद्यापीठ) ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रितांचा अभ्यास या विषयावर संशोधन होऊ शकते.

४. महाराष्ट्रातील वैयक्तीक (पर्सनल लायब्ररी) ग्रंथालये व मराठी दोलामुद्रिते या विषयावर अभ्यास होऊ शकतो.

५. मराठी दोलामुद्रित ग्रंथ सूची परिपूर्ण करण्यासाठी अखिल भारतीय ग्रंथालयातील (सार्वजनिक, शैक्षणिक, विशेष, राष्ट्रीय) मराठी दोलामुद्रितांचा अभ्यास करता येईल.

६. महाराष्ट्रातील इतर भाषेतील दोलामुद्रितांचा अभ्यास या विषयावर महत्त्वपूर्ण संशोधन होऊ शकते.

७. महाराष्ट्रातील सर्व प्रकारच्या ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रितांचा अभ्यास करणे.

उद्दिष्टांची पूर्तता आणि गृहितकांची पडताळणी केलेली आहे.

समारोप :

पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रितांचा अभ्यास या विषयाच्या संशोधनाची सुरूवात संशोधकास मराठी दोलामुद्रिताविषयी असलेल्या आवडीतून व सदर संशोधन समस्येतून झाली. प्रस्तुत संशोधन कार्य संशोधनाच्या उद्दिष्टानुसार पूर्ण करण्याचा सखोल प्रयत्न संशोधकाने केलेला आहे. संशोधकास प्रस्तुत संशोधनाद्वारे ३३ मराठी दोलामुद्रिते नवीन आाढळली आहेत व त्यात त्याला यश आलेले आहे. अशाप्रकारे या संशोधनातील निष्कर्ष आणि शिफारशींचा मराठी दोलामुद्रित ग्रंथसुची व्यापक प्रमाणात परिपूर्ण करणेकामी मदत झाली आहे. त्याचबरोबर पुढील संशोधनाचा भविष्यवेध या सदराखाली सुचविलेल्या संशोधन समस्यांचा दोलामुद्रित विषयामध्ये आवड असणाऱ्या संशोधकांना व अध्यापकांना बहुमुल्य उपयोग होईल.

प्रकरण पहिले

प्रस्तावना

१.१ प्रस्तावना :

पूर्वीच्या काळी आजच्या सारखे ज्ञानाचे संप्रेषण होत नव्हते. गुरूगृही राहून ज्ञान मिळविण्याचे दिवस होते. त्यामुळे ज्ञानाचा प्रसार आणि विकास पूर्वीच्या काळी म्हणावा तसा होऊ शकला नाही. गुरूगृही राहून शिक्षण घेणे ही प्रथा कालबाह्य होऊन बरीच वर्षे झाली आहेत. आज जगामध्ये ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञान यामध्ये प्रचंड प्रमाणात विकास होत असून ज्ञानाचा विस्फोट होत आहे. अशा सद्य परिस्थितीत संचित ज्ञानाचे संप्रेषण मोठ्या प्रमाणात झाल्याशिवाय ज्ञानाचा प्रसार झाला असे म्हणता येणार नाही. मुद्रणकलेचा विकास होऊन अनेक प्रकारचे ज्ञान उदयास येत गेले. भारतात मुद्रणकला ही प्रथम परकीयांच्या धर्मप्रसारणाच्या निमित्ताने झाल्याचे आढळून येते.

या परिस्थितीमध्ये दोलामुद्रिताचा अभ्यास करताना सुरूवातीला दोलामुद्रिते म्हणजे काय ? याचा अर्थ जाणून घ्यायला हवा. ''मुद्रणकलेच्या आरंभ काळातील मुद्रित पुस्तके म्हणजे दोलामुद्रिते होय.'' **(प्रियोळकर, १९६५)** इंग्रजीमध्ये अशा आद्यमुद्रित ग्रंथाना Incunabula अशी संज्ञा आहे. पंधराव्या शतकातील पुस्तकांना युरोपमध्ये Incunabula असे नाव आहे. cunae (क्युनाई) म्हणजे लॅटिन भाषेत पाळणा, पाळण्यातील मुद्रण म्हणजे आद्यमुद्रिते. संस्कृत भाषेत पाळण्याला दोला म्हणतात. त्यावरून Incunabula म्हणजे दोलामुद्रिते असे मराठीकरण करण्यात आले आहे.

मुद्रणकलेचा उगम प्रामुख्याने चीनमध्ये झाला असे म्हणतात. बौध्द धर्माच्या प्रसाराकरीता बुध्दांची चित्रे व त्यांचे लेखन प्रसारित करण्याची गरज त्याकाळी निर्माण झाली. याच कारणाने खऱ्या अर्थाने या कलेचा उगम झाला. एखादा मजकूर लिहिण्यासाठी ते सुईचा वापर करत असत. या सुईच्या सहाय्याने ते कागदावर टोचून चित्रे काढत असत. पुढे लाकडावर बुध्दांच्या मूर्ती कोरून ते ठसे कागदावर उठविण्याची कल्पना निघाली. अशाप्रकारे छापलेला 'हिरकसुत्रे' नावाचा ग्रंथ सर ऑरेल स्टेन यांना चीनमध्ये सहस्त्रबुध्दांची गुहा या ठिकाणी इ.स.१८०७ साली सापडला. हा ग्रंथ सध्या

ब्रिटीश म्युझियममध्ये आहे. त्यामध्ये ४६८ बुध्दांच्या चित्रांचे ठसे आहेत. हे पुस्तक जगातील पहिले पुस्तक मानले जाते. त्याचा कालखंड इ.स.८६८ आहे.

आज जसे बायडींगचे पुस्तक आपल्याला आढळते. या पुस्तकात आणि त्या काळच्या पुस्तकात फार फरक आहे. त्या काळची पुस्तके ही एक फूट रूंद व सोळा फूट लांब असे कागदाचे गुंडाळे असून कागद एकाला एक जोडून ते तयार केलेले आहेत. ''अशा प्रकारच्या पुस्तकाला Xylography असे म्हणतात. त्या काळी ठोकळा छाप ही कला प्रामुख्याने उदयास आली. युरोपमध्ये १५ व्या शतकाच्या मध्याला खिळेछाप मुद्रणाचा शोध लागला. युरोपातील मुद्रित पुस्तक इ.स.१४५७ मध्ये फस्ट आणि श्रोफर यांनी छापले.'' **(लेले, १९७३)**

युरोपात मुद्रणकलेचा शोध लागल्याच्या शंभर वर्षानंतर भारतात या कलेचा प्रवेश झाला तो अपघातानेच. भारतात जे प्रथम छापखाने निघाले त्यांचा हेतू 'धर्म प्रसाराकरीता पुस्तक छापणे' हा होता. ''ब्रिटीशांनी ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यासाठी इ.स.१५५७ मध्ये गोव्यात पहिला छापखाना उदयास आणला. गोव्यात प्रसिध्द झालेला ''दौत्रिन क्रिस्ता'' (ख्रिस्ती धर्मतत्व) हा भारतातील पहिला मुद्रित ग्रंथ होय. इ.स.१८६७ मध्ये भारत सरकारने प्रकाशन नोंदणीचा कायदा केला.'' **(प्रियोळकर, १९५८)** त्यामुळे मुद्रित प्रकाशनाची माहिती मिळणे शक्य झाले. परंतु १८६७ पूर्वी जी पुस्तके मुद्रित झाली, त्याची माहिती मिळणे फार कठीण होत आहे. अशा पुस्तकांचा शोध घेणे वाङ्मयीनदृष्ट्या अगर इतिहासकालीनदृष्ट्या महत्वाचे आहे. १८०० ते १८६७ हा कालखंड म्हणजे मराठी मुद्रणाची बाल्यावस्था होय. अशा बाल्यावस्थेतील मुद्रित ग्रंथाना शोधून ते माहिती करून घेणे हे संशोधकाच्या, इतिहासकारांच्या वाङ्मयीन अभ्यासक व दुर्मिळ ग्रंथप्रेमींच्या दृष्टीने फार महत्वाचे आहे. यामुळेच असे ग्रंथ शोधणे क्रमप्राप्त ठरते. या दोलामुद्रितांचे जतन व संवर्धन करून त्याचा वापर वाचकांना अधिकाधिक कसा होईल. या दृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे आहे. संशोधकाने तसा प्रयत्न केलेला आहे.

''दोलामुद्रिते व अ.का.प्रियोळकर यांचे अतूट नाते आहे. त्यांच्या या क्षेत्रातील योगदानामुळे त्यांना दोलामुद्रितांचा जनक म्हणून ओळखले जाते.'' **(प्रियोळकर, १९५८)** खऱ्या अर्थाने त्यांनीच संशोधनाला सुरूवात केली. त्यांनीच दोलामुद्रितेविषयक संशोधनाला सुरवात केली. त्यांच्या अजोड प्रयत्नाने दोलामुद्रितावरील आतापर्यंत तीन आवृत्या निघालेल्या आहेत. त्यांच्या अथक संशोधनातून

दोलामुद्रितांचा शोध लावण्यात यश आले आहे. ज्या ग्रंथाचा शोध लागला, ती पुस्तके ठराविक ग्रंथालयात त्याचप्रमाणे काही खाजगी ग्रंथालयात आहेत. अशी कितीतरी पुस्तके अद्याप अशा ग्रंथालयात असावीत असा अंदाज आहे. म्हणून ''पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रितांचा शोध'' हा विषय निवडला आहे. तसेच सध्या अस्तित्वात असणाऱ्या दोलामुद्रितांच्या सु.आ.गावस्कर व डॉ.गंगाधर मोरजे, यांनी संपादित केलेल्या सुचींच्या आधारे व सार्वजनिक ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या दोलामुद्रितांची सुची तयार करणे व दोलामुद्रितांच्या सद्यस्थितीचा आढावा घेऊन त्याचा वापर व प्रचार करण्याच्या दृष्टीने संशोधकाने प्रयत्न केलेला आहे.''

१..२. संशोधन विधान :

''पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रितांचा अभ्यास.''

१.२.१ संशोधन विधान कार्यात्मक व्याख्या व स्पष्टीकरण :

१.२.१.१ पश्चिम महाराष्ट्र :

पश्चिम महाराष्ट्रात कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, पुणे या जिल्ह्यांचा समावेश होतो. हा भाग सधन असून काही भाग दुष्काळी आहे. पश्चिम महाराष्ट्र साखर कारखान्यासाठी प्रसिध्द आहे. या भागातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या सधन असून येथील जमीन सुपीक आहे व शेतीसाठी पाणी पुरवठ्याच्या सोयी उपलब्ध आहेत. ''भारतातील महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे, १९६० रोजी करण्यात आली. म्हणून हा दिवस 'महाराष्ट्र दिन' म्हणून साजरा केला जातो.''**(शर्मा, २००५)** सुरूवातीला महाराष्ट्र राज्यामध्ये सव्वीस जिल्हे होते. नंतर आणखी नवीन दहा जिल्ह्यांची निर्मिती करण्यात आली. अशाप्रकारे सध्या महाराष्ट्र राज्यामध्ये छत्तीस जिल्हे आहेत. या छत्तीस जिल्ह्यांचे सहा प्रशासकीय विभाग पाडण्यात आलेले आहेत. कोकण, पुणे, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, नाशिक असे सहा विभाग आहेत.

१.२.१.२ ग्रंथालय :

ग्रंथालय ही प्राचीन सामाजिक संस्था आहे. ग्रंथालय म्हणजे ग्रंथ संग्रहाचे स्थान असे सोप्या भाषेत वर्णन करता येईल. ग्रंथ वाचक व ग्रंथालयातील सेवक यांचा ग्रंथालयातील तीन घटकामध्ये समावेश होतो. पण कालमानानुसार या घटकांच्या स्वरूपात बदल झाल्याचे आढळते. आधुनिक ग्रंथालयामध्ये ग्रंथालयाची इमारत, प्रशासन, आंतर ग्रंथालयीन सहकार्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संघटना इत्यादींचा समावेश होतो. ग्रंथालय हे असे ठिकाण असते की जेथे वाचकांच्या मागणीनुसार वाचन साहित्य मागविले जाते. त्याची नोंदणी, तांत्रिक सोपस्कार, रचना, मांडणी, तालीकीकरण, वाचकांच्या मागणीनुसार ग्रंथांची देवघेव केली जाते. आजच्या आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथालयाची पारंपारिक संकल्पना बदलून डिजीटल ग्रंथालय, इलेक्ट्रॉनिक ग्रंथालय, अभासी ग्रंथालय, भिंत्तीविरहीत ग्रंथालय, कागद विरहीत ग्रंथालय अशा आधुनिक संकल्पना उदयास येत आहेत. यामुळे वाचकांना दर्जेदार सेवा व हवी ती माहिती अचूकपणे व कमी वेळेत देणे शक्य झाले आहे.

१.२.१.३ सार्वजनिक ग्रंथालय :

सार्वजनिक ग्रंथालयातील ग्रंथसंपदा विविध प्रकारचे वाचन साहित्य हे समाजातील सर्व स्तरातील लोकांना त्याची जात–पात, वय, लिंग, भाषा, शैक्षणिक पात्रता, आर्थिक स्थिती, गरीब, श्रीमंत, अपंग, अंध, मूक–बधीर, इत्यादी कोणत्याही प्रकारच्या भेदभावाशिवाय उपलब्ध करून दिले जाते. या ग्रंथालयाच्या वाचक वर्गामध्ये विविधता आढळून येते. यामध्ये सर्वसामान्य माणूस, विद्यार्थी, डॉक्टर, इंजिनियर्स, व्यावसायिक, मजूर, शेतकरी, कामगार, विविध कर्मचारी इत्यादीचा समावेश होतो. या ग्रंथालयामध्ये बहुतांश वाचक केवळ करमणूकीसाठी जातात. अशांची संख्या जास्त असते. त्यामुळे या ग्रंथालयात कथा, कादंबऱ्या, सुबोध पुस्तके, नियतकालिके, स्पर्धा परीक्षा, पुस्तके, वर्तमानपत्रे यांचा संग्रह प्रामुख्याने आढळतो. कल्पित गोष्टी, कादंबऱ्या, विनोदी लेख संग्रह, अशा पुस्तकांना या ग्रंथालयात मागणी असते. स्थानिक समाजातील व्यावसायिकांना त्यांच्या व्यवसायांना उपयुक्त असणारी पुस्तके उपलब्ध करून देण्याचे तसेच स्थानिक माहिती असलेली पुस्तके संग्रहीत करण्याचे काम ग्रंथालयास करावे लागते. कथा, कादंबऱ्या यासारखी पुस्तके वाचकांना उपलब्ध करून

देण्याचे काम ग्रंथालयास करावे लागते. भारतातील राष्ट्रीय ग्रंथालय हे कलकत्ता येथे आहे. मध्यवर्ती सार्वजनिक ग्रंथालये भारतात सर्व राज्यात विभागलेली आहेत. महाराष्ट्र राज्याचे मध्यवर्ती ग्रंथालय मुंबई येथे आहे. त्या खालील स्तरावर जिल्हा, शहरे, लहानगावे अशा ठिकाणी सार्वजनिक ग्रंथालयाचे जाळे पसरलेले आहे. सार्वजनिक ग्रंथालये स्थानिक पातळीवरील वाचकांची सेवा करण्यात गुंतलेली असतात. तसेच ही ग्रंथालये समाजाची सांस्कृतिक व धार्मिक वारसा जपण्यास मदत करतात.

१.२.१.४ 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालय :

''सार्वजनिक ग्रंथालयास 'अ' वर्गामध्ये समाविष्ट होण्यासाठी खालील अटींची पूर्तता करावी लागते. ग्रंथालयाची स्वत:ची इमारत असावी. त्यात १५०० हून अधिक ग्रंथ असावेत. पन्नास नियतकालिकांची त्यांनी दरवर्षी वर्गणी भरली पाहिजे. दररोज कमीत कमी पंधरा वृत्तपत्रे आली पाहिजेत. वाचक म्हणून किमान तीनशे सभासदांची नोंदणी झाली पाहिजे. ग्रंथालयाच्या इमारतीत स्वतंत्र बाल विभाग आणि स्त्रियांच्यासाठी खास वेगळा वाचक कक्ष असला पाहिजे.'' **(नरगुंदे, २००२)**

ग्रंथालयाचे कामकाज सुरळीत व्हावे म्हणून एक तरी पूर्णवेळ ग्रंथपाल असला पाहिजे. ग्रंथालयाची वेळ कमीत कमी सात तास तरी असावी. विस्तारित कार्यक्रम म्हणून निदान दहा तरी सार्वजनिक कार्यक्रमांचे आयोजन दरवर्षी केले पाहिजे.

१.२.१.५ दोलामुद्रिते :

शंभर वर्षामागे मराठी ग्रंथ संग्रहालय कसे होते हे आजचे प्रदर्शन पाहून आपणास ज्ञात होईल. या प्रदर्शनात १८४५ पर्यंत मुद्रित झालेली पुस्तके ठेवण्यात आलेली आहेत. मराठी मुद्रणाचा हा पाळणाच असे म्हणावयास हरकत नाही. ''युरोपमध्ये या आद्यमुद्रितांना Incunabula असे म्हणतात. Cunae म्हणजे लॅटीन भाषेत पाळणा. यावरूनच Incunabula हा शब्द सिध्द झाला आहे. संस्कृत भाषेत पाळण्याला दोला म्हणतात. तेव्हा Incunabula चे दोलामुद्रिते असे मराठीकरण होते.'' **(कर्णिक, २००५)** युरोपमध्ये पंधराव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास मुद्रणकला अस्तित्वात आली. इ.स. पंधराशे वर्षांपूर्वी जी पुस्तके मुद्रित झाली, ती सगळी दोलामुद्रिते असे पाश्चात्यांनी ठरवून टाकले.

अशा युरोपातील जुन्या नव्या निरनिराळ्या भाषेतील एकंदर दोलामुद्रितांची संख्या वीस हजार भरेल असा तज्ञांचा अंदाज आहे. थोडक्यात दोलामुद्रिते म्हणजे मुद्रण कलेच्या आरंभी मुद्रित केलेले मौल्यवान दुर्मिळ ग्रंथ होत.

१.२.१.६ मराठी दोलामुद्रिते :

युरोपातील Incunabula ची कालमर्यादा इ.स.१५०० ठरली आहे. पण ती कालमर्यादा मराठी दोलामुद्रितांना लागू पडत नाही. कारण मराठी मुद्रणाची खरी सुरूवात एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभी देवनागरीचे खिळे तयार झाले तेव्हापासून मानावी लागेल. ''मराठी दोलामुद्रितांचा प्रारंभ काळ १८०० हा स्विकारला जातो. म्हणून मराठी दोलामुद्रितांची कालमर्यादा १८०० ते १८६७ पर्यंत अ.का. प्रियोळकर यांनी ठरवलेली आहे व ती सर्वमान्य झालेली आहे.'' **(कोण्णूर, २००८)**

सदरच्या संशोधनासाठी संशोधकाने मराठी दोलामुद्रिते म्हणजेच इ.स.१८०० ते १८६७ या कालावधीमध्ये मुद्रित झालेले मराठी ग्रंथ असा घेतलेला आहे.

१.२.१.७ अभ्यास :

संकल्पनात्मक व्याख्या :

सोहनी शं.कृ., शैक्षणिक टिपाकोश (१९९३) यांच्या मते ''अभि + आस या संस्कृत शब्दाचा अर्थ भोवती बसून शिकणे. अभ्यास याचा दुसरा एक अर्थ सराव असाही आहे.'' **(सोहनी, १९९३)**

१.३ संशोधनाची उद्दिष्ट्ये :

१. अ वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील दोलामुद्रितांच्या सद्यस्थितीचा शोध घेणे व सूची तयार करणे.

२. अ वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील ग्रंथपाल, कर्मचारी यांचेकडून दोलामुद्रितांचे जतन व संवर्धन योग्य रितीने होते की नाही याचा शोध घेणे.

३. दोलामुद्रितांच्या व्यवस्थापनात येणाऱ्या अडचणीचा शोध घेऊन त्यावरील उपाययोजना सुचविणे.

४. अ वर्ग सार्वजनिक ग्रंथालयात असणाऱ्या दोलामुद्रितांचा गावस्कर व मोरजे यांच्या सुचीत शोध घेऊन त्याचा अभ्यास करणे.

५. पूर्वी प्रकाशित झालेल्या दोलामुद्रितांच्या सूचीमध्ये समाविष्ट नसलेल्या 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील दोलामुद्रितांची वेगळी सूची तयार करणे.

६. संकलित होणाऱ्या दोलामुद्रितांच्या अंकीकरणाच्या सद्य:स्थितीची पाहणी करणे व त्याकरीता विस्तारित योजना सुचविणे.

१.४ संशोधनाची गृहितके :

संशोधकाने संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी पुढील गृहित कृत्याची निवड केलेली आहे.

१. पश्चिम महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयात दोलामुद्रित ग्रंथ काही प्रमाणात उपलब्ध आहेत.

२. पश्चिम महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील दोलामुद्रितांचे अंकीकरण करण्यात अडचणी आहेत.

१.५ संशोधन अभ्यासाची व्याप्ती :

सदरच्या संशोधनात पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयाची निवड करण्यात आली आहे. पश्चिम महाराष्ट्रामध्ये एकूण ९९ 'अ' वर्गातील सार्वजनिक ग्रंथालये आहेत. संशोधनामध्ये मराठी दोलामुद्रितांचा अभ्यास अपेक्षित असून संशोधनाची व्याप्ती 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयापुरती मर्यादित आहे. दोलामुद्रितांचा कालखंड प्रियोळकरांनी जो मान्य केला आहे, तो इ.स. १८०० ते १८६७ हाच ठेवण्यात आलेला आहे.

१.६ संशोधनाची गरज व महत्व :

दोलामुद्रिताविषयी अ. का. प्रियोळकरांनी केलेले संशोधन महत्वाचे आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी दोलामुद्रितांची यादी प्रकाशित झाली आहे. त्यानंतर सु. आ. गावस्कर यांनी दुसरी आवृत्ती प्रकाशित केली, तर तिसरी आवृत्ती गंगाधर मोरजे यांनी प्रकाशित केली.

या तिन्ही संपादकांच्या दोलामुद्रितातील कोणती दोलामुद्रिते पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयात उपलब्ध आहेत ? ही दोलामुद्रिते कोणत्या विषयातील आहेत ? व सदर दोलामुद्रिते कोणत्या ग्रंथालयात आहेत ? त्याचे स्थान सूचीद्वारे निश्चित करण्याचा प्रयत्न संशोधकाने केला आहे. या विषयावर अभ्यास करणाऱ्या संशोधकांना, इतिहासकारांना ही सूची उपयुक्त ठरेल. या दोलामुद्रितांचे जतन व संवर्धन होण्याच्या दृष्टीने संशोधकाने प्रयत्न केले आहेत. तसेच सदर दोलामुद्रितांचे अंकीकरण अथवा पुन:र्प्रकाशन करणे या संशोधनामुळे शक्य होईल. गावस्कर व मोरजे यांची संपादित दोलामुद्रितांची सूची व प्रस्तुत ग्रंथालयातील दोलामुद्रितांची तुलना करून नव्याने मिळणाऱ्या दोलामुद्रितांच्या नोंदी करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे त्यांनी केलेल्या संशोधनात भर पडेल अशा हेतूने संशोधन कार्य घेऊन ते पूर्णत्वास आणले आहे. या संशोधनामुळे ग्रंथालयशास्त्र, मराठी वाङ्मयाचे अभ्यासक, इतिहासकार, वाचक, प्राध्यापक व जुन्या ग्रंथांचे ग्रंथप्रेमी या सर्वांना निश्चितच उपयोग होणार आहे.

१.७ संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनाचा समावेश सामाजिक शास्त्रे विद्याशाखेतील असून ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयाच्या संशोधनासाठी आवश्यक अशा विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर संशोधकाने हाती घेतलेले संशोधन यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी केला आहे. सामाजिक शास्त्रे विषयामध्ये प्रामुख्याने वर्णनात्मक संशोधन पद्धती, ऐतिहासिक संशोधन पद्धती, तौलनिक संशोधन पद्धती, क्षेत्रीय अभ्यास पद्धती, आशय विश्लेषण इत्यादी पद्धतीचा प्रामुख्याने वापर केला जातो.

विश्लेषणात्मक संशोधन पद्धती – ही एक सामान्य प्रक्रिया असून यामध्ये शास्त्रीय पद्धतीची संशोधनात्मक शक्ती आणि इतर औपचारिक संशोधन पद्धतीचे एकत्रीकरण करून कोणत्याही प्रकारच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. यामध्ये खालील नऊ पायऱ्यांचा समावेश होतो. १) संशोधन समस्येची ओळख २) योग्य त्या संशोधन प्रक्रियेची निवड ३) संशोधन पद्धतीची गृहितके, विश्लेषण किंवा समस्या निराकरणासाठीच्या आवश्यक घटकांचा वापर ४) गृहितकांच्या पडताळणीसाठी प्रक्रियेची निवड ५)प्रक्रिया प्रत्यक्ष कृतीत आणणे ६) गृहितकांचा स्विकार फेटाळणे किंवा बदल ७) गृहित कृत्यांचा स्विकार होईपर्यंत पायरी क्रमांक ३, ४, ५ व ६ यांची पुनरावृत्ती ८) समस्या निराकरणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी ९) संधी मिळताच संशोधन प्रक्रियेमध्ये सततची सुधारणा. (https://wwwthwink.org)

विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर प्रामुख्याने संशोधन समस्येला कारणीभूत ठरणाऱ्या मुलभूत घटकांचा शोध घेण्यासाठी केला जातो. त्याच बरोबर प्रायोगिक संशोधन पद्धती ही स्वतंत्र प्रकारची विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचे उत्तम उदाहरण आहे. विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीच्या वापरामध्ये अनेक संबंधीत पद्धतीचा माहिती संकलनासाठी वापर केला आहे. संशोधकाने हाती घेतलेले संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करून माहितीचे संकलन, त्याचे विश्लेषण, सादरीकरण, गृहितकांची पडताळणी, उद्दिष्टांची पूर्तता संशोधन समस्येला अनुरूप अशा प्रकारे केले आहे. त्यावर आधारित निष्कर्ष व शिफारशी मांडलेल्या आहेत.

प्रियोळकर, गावस्कर, मोरजे यांनी संपादित केलेल्या दोलामुद्रितांच्या सूची व प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेल्या 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील दोलामुद्रिते यांचे विश्लेषण करून उपरोक्त सूचीमध्ये कोणत्या दोलामुद्रितांच्या नोंदी नाहीत अशा नव्याने मिळालेल्या दोलामुद्रितांच्या नोंदींसह अद्यावत सूची तयार करण्यासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर संशोधकाने केला आहे.

१.८ माहिती संकलन :

सामाजिक शास्त्राच्या संशोधनामध्ये तथ्य संकलनाला अनन्यसाधारण महत्व आहे. संशोधनासाठी आवश्यक असणाऱ्या तथ्यांचे शास्त्रीय दृष्टीकोनातून संशोधन करण्यासाठी प्रश्नावली,

प्रत्यक्ष मुलाखत, निरीक्षण, सर्वेक्षण या तंत्राचा वापर करून माहिती मिळविली जाते. माहिती गोळा करण्यासाठी आवश्यकतेनुसार वेगवेगळ्या तंत्राचा वापर करणे गरजेचे ठरते. सर्वसाधारणपणे वर्णनात्मक संशोधनात प्रश्नावली हे तंत्र वापरले जाते. त्याचबरोबर मुलाखत व निरीक्षण या तंत्रांनाही महत्व आहे. सर्वच ग्रंथालयांना प्रश्नावली पाठविण्यापूर्वी एखाद्या ग्रंथालयातून प्रश्नावली भरून घेऊन नमुना पाहणी करावी लागते. आणि त्यातील त्रुटीची पूर्तता करून सर्वच ग्रंथालयांना प्रश्नावली पाठविल्या जातात.

प्रस्तुत संशोधन अभ्यासामध्ये संशोधकाने माहितीचे संकलन करण्यासाठी प्रश्नावलीचा वापर केलेला आहे. त्याचबरोबर आवश्यकतेनुसार सार्वजनिक ग्रंथालयातील ग्रंथपाल व इतर कर्मचारी यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन व निरीक्षण पध्दतीचा अवलंब करून प्रस्तुत संशोधन कार्यासाठी संशोधकाने आवश्यक तथ्यांचे माहितीचे संकलन केले आहे.

१.९ सारांश

सदर प्रकरणात संशोधकाने संशोधन आराखडा स्पष्ट केला आहे. यामध्ये संशोधनाची उद्दिष्टये दिलेली आहेत. सदर संशोधनातून जे साध्य करायचे आहे तेच उद्दिष्टांमध्ये मांडले आहे. संशोधनाच्या निष्कर्षाप्रत जाण्यासाठी गृहितके उद्दिष्टांखाली मांडलेली आहेत. त्याची व्याप्ती व मर्यादा त्याचबरोबर विषयाची गरज विशद केली आहे. सदरचे संशोधन सामाजिक शास्त्राअंतर्गत ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयात येत असल्याने संशोधनास पूरक अशा विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा आधार घेऊन माहिती संकलनासाठी प्रश्नावली, मुलाखत व निरीक्षण या तंत्राचा वापर माहिती संकलनासाठी संशोधन कार्य पध्दतीमध्ये केला आहे. या प्रकरणामुळे सदर संशोधन कार्यास निश्चित अशी दिशा मिळालेली आहे.

संदर्भसूची

- औलअरी, झीना (२०१७) संशोधन प्रकल्प कसा करावा, नवी दिल्ली : सेज प्रकाशन.
- कर्णिक, प्रदीप (२००५) ग्रंथ, ग्रंथालये आणि ग्रंथ संस्कृती, मुंबई, नवचैतन्य प्रकाशन, पृ.११४

- कायंदे–पाटील, गंगाधर (२००५) संशोधन पद्धती, नाशिक : चैतन्य पब्लिकेशन्स.
- कोण्णूर एम.बी. (२००८) डायमंड ग्रंथालय व माहितीशास्त्र कोश, पुणे : डायमंड पब्लिकेशन्स, पृ.१४०
- नरगुंदे रेवती (२००२) ग्रंथालये आणि सामाजिक विकास, पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन, पृ.१७९
- निकोसे, सत्यप्रकाश (२००७) ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पद्धती, नागपूर : प्रज्ञा प्रकाशन.
- पाटणकर, जयश्री (२०१०) संशोधनाची क्षेत्रे आणि पद्धती, मुंबई : शब्दालय प्रकाशन.
- प्रियोळकर, अ.का. (१९६५) मराठी दोलामुद्रिते, मुंबई : मराठी संशोधन मंडळ, पृ.१०
- प्रियोळकर, अ.का. (१९५८) द प्रिटींग प्रेस इन इंडिया, मुंबई : मराठी संशोधन मंडळ, पृ.३२
- भांडारकर, पु.ल. (१९७६) सामाजिक संशोधन पद्धती, नागपूर : महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ.
- लेले, रा.के. (१९७३) ग्रंथ वर्णन आणि ग्रंथसूची, पुणे : जोशी–लोखंडे प्रकाशन, पृ.५३
- शर्मा, के.के. (२००५) संदर्भ महाराष्ट्र खंड १, भोपाळ : इंटलेक्चुअल बुक ब्युरो, पृ.१ व २
- सोहनी, शं.कृ. (१९९३) शैक्षणिक टिपा कोश, पुणे : सोहोनी सुधा प्रकाशन, पृ.२०
- https://wwwthwink.org.acc on (25.08.2019)

प्रकरण दुसरे

संशोधन पुर्वाभ्यास व वाचन साहित्य शोध

२.१ प्रस्तावना

संशोधन विषयाशी संबधित माहिती मिळविण्यासाठी संबधित साहित्याचा पूर्वाभ्यास महत्त्वपुर्ण असतो. आपले संशोधन ज्या विषयाशी संबधित आहे त्या विषयावर यापुर्वी संशोधन झाले आहे की नाही हे पाहिल्यामुळे आपल्या संशोधनाला दिशा मिळते. हाती घेतलेल्या संशोधन विषयावर पुर्वी झालेले संशोधन व भविष्यातील संशोधन यामधील वाचन साहित्याचा पुर्वाभ्यास हा दुवा ठरतो यामुळे सदर संशोधन विषयाचे सखोल ज्ञान मिळविण्यास मदत होते. अशा प्रकारच्या अभ्यासामुळे हाती घेतलेले संशोधन यशस्वीरित्या पूर्ण करण्यास कोणत्या संशोधन पद्धतीचा वापर करावा. तथ्य संकलनासाठी कोणत्या पद्धती अवलंबव्यात त्याचे विश्लेषण व सादरीकरण कसे करावे थोडक्यात याविषयी दिशा मिळण्यास मदत होते. संशोधकाने सदर संशोधनासाठी उपयुक्त वाचन साहित्याचा अभ्यास करण्यासाठी पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयावरील लेख, ग्रंथ पीएच. डी. शोधप्रबंध, एम. फिल. लघुशोध प्रबंध, एम. लिब संशोधन प्रकल्प, कार्यशाळा इत्यादींचा आढावा घेतलेला आहे. संशोधकाने मुद्रित साहित्याबरोबर काही ऑनलाईन, वाचन साहित्याचा आढावा घेतला आहे.

२.२ वाचन साहित्याचा आढावा (पूर्वाभ्यास)

२.२.१ संदर्भ ग्रंथ

- **कर्णिक प्रदीप (२००५)** यांनी 'ग्रंथ, ग्रंथालय आणि ग्रंथ संस्कृती' या ग्रंथामध्ये एकूण चार प्रकरणांचा समावेश केलेला आहे. त्यामध्ये सुरवातीला कोश वाङ्मय याविषयी माहिती दिलेली आहे. यात कोश हे शिक्षकाचे मित्र, संदर्भ ग्रंथाचा वापर आणि उपयोग, एक खंडात्मक ज्ञानकोश, राष्ट्रीय सांस्कृतिक प्रकल्प, जिथे ग्रंथ कोंडले जातात, तिथे राष्ट्र कोंडले जाते.

मराठीतील दुर्लक्षित एक महान सूची प्रकल्प, सुचिची सत्यकथा आणि सिअर्स लिस्टचा मराठी अवतार, प्रकल्प आराखडा याविषयी वर्णन केलेले आहे.

'दुर्मिळ ग्रंथ' या दुसऱ्या प्रकरणामध्ये प्रवास पुस्तकाचा, दुर्मिळ ग्रंथाचे विश्व, जुन्या वाचन साहित्याचे रद्दबातल धोरण या मुद्यांवर प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.

'ग्रंथालय' या तिसऱ्या प्रकरणात कर्णिक यांनी राजाबाई टॉवर ग्रंथालय, मराठीचे माहिती केंद्र, स्वरूप व दिशा, ग्रंथालयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, प्रसार माध्यमे आणि ग्रंथालये या चार मुद्यांचे विश्लेषण केलेले आहे. 'ग्रंथ संस्कृती' या चौथ्या आणि शेवटच्या प्रकरणामध्ये स्वत:च्या घराइतकाच स्वत:च पुस्तक ही असायला नको का, ज्ञान तेजाने दिपवून टाकणारे ग्रंथप्रेमी आंबेडकर, वाचन विद्यालय काळाजी गरज, वाचन उत्सुक गोड मुलं आहेत या विषयी वर्णन केलेले आहे.

- **करमरकर द. बा. (१९७५)** यांनी महाराष्ट्रातील ग्रंथालय कायदा समाविष्ट वाचनालय या शीर्षकाखाली लिहिलेल्या पुस्तकामध्ये महाराष्ट्रातील ग्रंथालय कायदा, १९६७ साली संमत झाला. त्या कायद्याविषयी माहिती देणारा लेख पृष्ठ क्रमांक १४ ते २० दरम्यान दिलेला आहे. लेखकाने आपल्या लेखात महाराष्ट्र ग्रंथालय कायद्याची आवश्यकता, उद्दिष्टे, त्यासाठी आवश्यक असणारे निकष व महत्व इत्यादी घटकाविषयी सविस्तर माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. या दृष्टीने सदरचे पुस्तक प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्त ठरते. कारण यामध्ये ग्रंथालयाची वर्गवारी करण्यासाठीचे निकष, नियम, अटी याविषयी माहिती मिळते.

- **कानडे रामचंद्र गोविंद (१९३८)** लिखित ''प्राचीन व अर्वाचीन ग्रंथालये'' या पुस्तकामध्ये लेखकाने प्राचीन व अर्वाचीन परिस्थितीतील ग्रंथालयांची माहिती सांगितलेली आहे. सदरच्या पुस्तकामध्ये या ग्रंथालयाचे वर्णन पृष्ठ क्रमांक १६ ते १८४ पर्यंत केल्याचे आढळते. सदरच्या संशोधनात या पुस्तकाचा संशोधकास उपयोग होतो. प्राचीन व अर्वाचीन ग्रंथालयाची तत्कालीन स्थिती, ग्रंथसंपदा, वाचकवर्ग इ.विषयी चर्चा करण्याचा प्रयत्न केला आहे.

- **काळे, दिनकर बी. (१९६६)** यांनी 'प्रियोळकर अ.का.' या शीर्षकाखाली लिहिलेल्या पुस्तकामध्ये अ.का.प्रियोळकर लिखीत लेख संग्रहाबद्दलची माहिती सविस्तर मांडण्याचा

प्रयत्न केला आहे. त्यामुळे मराठी दोलामुद्रिताविषयी माहिती मिळविण्यासाठी या पुस्तकाचा महत्वपूर्ण उपयोग होतो. प्रियोळकरांच्या मराठी दोलामुद्रिताविषयीच्या लेखनाविषयी माहिती या पुस्तकात सांगितलेली आहे.

- **कुमार गिरिजा आणि कुमार कृष्ण (१९७६)** यांनी लिहिलेल्या 'Bibligraphy' या पुस्तकामध्ये सुचीविषयी वर्णन केलेले आहे. सूची व्याख्या, इतिहास, प्रकार त्याचप्रमाणे निर्देशसार, सेवा, सुचीच्या संकलनाची व रचनेची माहिती या पुस्तकातून मिळते. 'Bibligraphy' या विषयावर नवीन सुधारणा तसेच सुचीकारांचे गुण यात सांगितले आहेत.

- **केंट ॲलन (१९७४)** यांनी संपादित केलेल्या Ency. of Library and Information Science, Vol. II मध्ये दोलामुद्रिताविषयी माहिती दिलेली आहे. त्यामध्ये त्यांनी दोलामुद्रितांच्या व्याख्या दिलेल्या आहेत. यामध्ये लेखकाने प्रसिध्द दोलामुद्रितांची माहिती दिलेली आहे. त्याचबरोबर लेखकाने मुद्रणाविषयी कांही निर्देश दिलेले आहेत. त्यानंतरच्या भागामध्ये दोलामुद्रितांचा विशेष असा संग्रह, युरोपमधील कोणकोणत्या ग्रंथालयात उपलब्ध आहे, याची माहिती दिलेली आहे. यापैकी चार महत्वाचे संग्रह ब्रिटीश म्युझियम ग्रंथालय, लंडन, बिबलॉथीक नॅशनल पॅरीस, स्टॅस्ट बिब्लॉथाक, म्युनिय आणि व्हॅटकीन लायब्ररी यांचा समावेश होतो. यांच्या व्यतिरिक्त बर्लीन, व्हीएन्ना, मँचेस्टर ब्रुसेल्स आणि दहेग या ग्रंथालयातील ग्रंथ संग्रहाचा उल्लेख संपादित केलेला आहे.

- **कोण्णूर एस.बी. (२००८)** कोण्णूर सुजाता आणि माणगांवकर उष:प्रभा यांनी संपादित केलेल्या 'डायमंड ग्रंथालय व माहितीशास्त्र' कोशामध्ये ग्रंथालय शास्त्राच्या पारंपारिक घटक, विषयाशी वर्गीकरण, तालीकीकरण, संदर्भ सेवा, माहितीशास्त्र, ग्रंथालय व्यवस्थापन निगडीत अनेक लेख समाविष्ट करण्यात आलेले आहेत. त्याचबरोबर माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाच्या आणि व्यवस्थापनातील नवीन संकल्पनांचा ग्रंथालयशास्त्रावर जो परिणाम झालेला आहे, तो लक्षात घेऊन त्यावरील लेखही समाविष्ट करण्यात आलेले आहेत. माहितीचे व्यवस्थापन, ज्ञान व्यवस्थापन, सकल गुणवत्ता व्यवस्थापन, शून्याधारित अर्थसंकल्प,

पध्दती विश्लेषण, ई जर्नल्स माहितीचे हस्तांतर चक्र, इंटरनेट, माहिती तंत्रज्ञान, बारकोडिंग इ. उदाहरणे दिलेली आहेत.

या शब्दकोशामध्ये Incunabulum दोलामुद्रित या नोंदीखाली दोलामुद्रितांची उत्पत्ती, त्याचा अर्थ, व्याख्या या संज्ञेचा वापर Incunabula चे दोन प्रकार याविषयी माहिती देण्यात आलेली आहे.

- **गावस्कर सु.आ. (१९६१)** यांनी संपादित केलेल्या मराठी दोलामुद्रिते (दुसरी आवृत्ती) या ग्रंथामध्ये कांही प्रमुख ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रितांची नामावली प्रसिध्द करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ग्रंथालयातील आणि खाजगी संग्रहातील दोलामुद्रितांचा समावेश या नामावलीत केलेला आहे.

  मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयातील दोलामुद्रिते या नामावलीत प्रामुख्याने नोंदवलेली असून अन्य ग्रंथालयातील जी दोलामुद्रिते मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयात नाहीत, त्यांचा समावेश या नामावलीत केलेला आहे. प्रस्तुत नामावलीमध्ये मराठी दोलामुद्रितांच्या नोंदी कालक्रमानुसार नोंदवलेल्या आहेत. एकाच सालात मुद्रित झालेली ग्रंथकार नामाच्या अक्षरक्रमानुसार नोंदविलेली आहेत.

  ग्रंथाचे वर्णन करताना ग्रंथकारनाम, आवृत्ती, प्रकाशन स्थळ, प्रकाशक, मुद्रणालय, मुद्रक, पृष्ठे, चित्रे, नकाशे, बांधणी, आकार, मूल्य या सूची विषयक तपशिलाबरोबर ग्रंथालयातील विषयासंबंधी थोडक्यात माहिती दिलेली आहे. त्याचबरोबर दोलामुद्रिताचा अंतर्भाव कोणत्या सर्वसामान्य विषयामध्ये होतो याचा निर्देश प्रारंभी केलेला आहे.

- **गोगटे शरद (२००८)** मराठी ग्रंथ प्रकाशनाची दोनशे वर्षे या शीर्षकाखाली लिहिलेल्या पुस्तकामध्ये लेखकाने भारतात मुद्रण यंत्राचे आगमन कसे झाले व मुद्रणकलेची सुरूवात कशी झाली याविषयी चर्चा केली आहे. मराठी मुद्रणाचे सुरूवातीचे प्रयत्न मुद्रणाचा नोंदणी कायदा, दोलामुद्रिताचा कालखंड, दोलामुद्रित पुस्तके एक दृष्टीकोन इ. बाबींची सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे.

- **चुनेकर सु. रा. (१९८३)** यांनी लिहिलेल्या 'सूचीशास्त्र' व उपयोग संशोधन स्वरूप आणि पध्दती या पुस्तकामध्ये सूचीशास्त्र विषयी माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. सूचीशास्त्राचा उपयोग याविषयी लेखकाने सविस्तर वर्णन केले आहे. सूचीशास्त्र म्हणजे काय ? त्याची गरज, व्याख्या, संकल्पना, महत्व, उपयोग पध्दती इत्यादी विषयी या पुस्तकातून माहिती मिळते.

- **टॉमलिन्सन, नॉर्मन (१९६३)** यांनी "Target for Careers - Librarianship" या शीर्षकाखाली लिहिलेल्या ग्रंथामध्ये ग्रंथालयाचा थोडक्यात इतिहास मांडण्याचा प्रयत्न केला आहे. या तिसऱ्या प्रकरणात त्यांनी दुर्मिळ आणि बहुमूल्य अशी पुस्तके १५०० पूर्वी मुद्रित केलेली होती आणि अशा पुस्तकांना एकत्रितपणे दोलामुद्रिते संबोधले जाते असा उल्लेख केला आहे. याचबरोबर मुद्रणकलेच्या शोधानंतर ग्रंथालयाच्या यांत्रिकीकरणाचा मार्ग सुखद होत गेला. सामान्यपणे याचे श्रेय जॉन गुटेनबर्ग यांना जाते. कारण त्यांनी मेंझ येथे पहिली प्रिंटींग प्रेस सुरू केली. त्यांनी मुद्रित केलेले पहिले पुस्तक म्हणून बेचाळीस ओळींचे 'बेचाळीस ओळींचे बायबलचा' उल्लेख करता येईल. हे पुस्तक गुटेनबर्ग किंवा माझारिन बायबल म्हणून लोकप्रिय आहे. जॉन फस्ट आणि पीटर्स स्कायफर या दोघांचे इंग्लंडमधील मुद्रणकलेमध्ये योगदान आहे. मुद्रणकलेमुळे जलद पुस्तकांची निर्मिती करणे शक्य झाले आणि त्यामुळे ज्ञानाची मोठ्या प्रमाणात उपलब्धता शक्य झाली. या सर्व बाबींचा उल्लेख या ग्रंथात केलेला आहे.

- **थॉर्नटन जॉन एल् आणि टुली (१९५४)** यांनी त्यांच्या "Scientific Book Libraries & Collectors : A Study of Bibliography and the Book Trade in Relation to Science" या पुस्तकाच्या दुसऱ्या प्रकरणामध्ये शास्त्रीय दोलामुद्रिताविषयी माहिती दिलेली आहे. शास्त्रीय दोलामुद्रिते मोठमोठ्या राष्ट्रीय ग्रंथालयामध्ये, विद्यापीठ ग्रंथालयामध्ये आणि शास्त्रीय ग्रंथालयामध्ये आढळतात. परंतु अशा दोलामुद्रितांच्या वेगळ्या तयार केलेल्या अतिशय दुर्मिळ याद्या आहेत. कित्येक वैद्यकीय ग्रंथालयामध्ये त्यांच्या ग्रंथालयामधील दोलामुद्रितांच्या छापील याद्या आहेत. आणि त्यामधील अनेक दोलामुद्रिते वैद्यकीय

विषयाऐवजी शास्त्रीय विषयाशी निगडीत आहेत. अमेरिकन ग्रंथालयामध्ये असणाऱ्या दोलामुद्रित साहित्याची खालील दहा ग्रंथालयातील दोलामुद्रितांची यादी दिलेली आहे. हंटीगटन ग्रंथालय ६७८, लायब्ररी ऑफ काँग्रेस ५३६, बोस्टन मेडीकल ग्रंथालय ३९८, आर्मी मेडीकल ग्रंथालय ३८८, कॉलेज ऑफ फिजिशियन ३२१, मॉर्गन ग्रंथालय ३०६, हावर्ड युनिव्हर्सिटी २९७, वेपर्रस आर्ट गॅलरी २३६, याले युनिव्हर्सिटी २०२, न्यूयॉर्क ॲकॅडमी मेडीसन ११३, लेखकाने प्रस्तुत पुस्तकात शास्त्रीय दोलामुद्रितांचा विषय मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

- **दाते शंकर गणेश (१९६१)** १८०० ते १८५० यांनी संपादित केलेल्या मराठी ग्रंथसुची खंड १ व २ मध्ये आपल्या मराठी ग्रंथसुचीच्या प्रस्तावनेत सूचीशास्त्र या विषयावर आपले विचार मांडले आहेत. त्याचप्रमाणे सूची म्हणजे काय, त्याची रचना तसेच मराठी वर्णमालेनुसार (आद्य अक्षरानुसार) रचनेबाबत महत्वाची माहिती सांगितलेली आहे.

- **पाटील रविंद्र (२०१४)** यांनी 'महाराष्ट्राची शतायू अक्षर दालने' या ग्रंथामध्ये महाराष्ट्रातील सर्व शतायू ग्रंथालयाची माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याचबरोबर त्या ग्रंथालयाचे फोटो गोळा केलेले आहेत. महाराष्ट्रातील सर्व घटकांसाठी म्हणून सार्वजनिक ग्रंथालयाची सुरूवात सन १९२८ मध्ये रत्नागिरी येथील सार्वजनिक वाचनालयाने झाली. त्यानंतर ही सार्वजनिक ग्रंथालयाची चळवळ महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचली. लेखकाने प्रस्तुत ग्रंथात स्वातंत्र्यपूर्व काळात महाराष्ट्रात सार्वजनिक ग्रंथालय कसे निर्माण झाले, त्यांनी समाज जागृती कशी केली, स्वातंत्र्य लढ्यात या ग्रंथालयाची कशी मदत झाली, जनजागृती व राष्ट्रप्रेम निर्माण करणाऱ्या अशा सार्वजनिक ग्रंथालयावर इंग्रज सरकार कसा दबाव टाकत होते, त्याचबरोबर अशा दबावाला न जुमानता ग्रंथालये कशी कार्यरत होती याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

आजमितीस महाराष्ट्रामध्ये पंच्याऐंशी शतायू सार्वजनिक ग्रंथालये आहेत. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील जनतेसाठी पहिला सार्वजनिक ग्रंथालय कायदा केला. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्वांत जास्त शतायू ग्रंथालये कोल्हापूर जिल्ह्यात आहेत.

प्रस्तुत ग्रंथात लेखकाने शतायू बावीस 'अ' वर्ग जिल्हा ग्रंथालये, त्रेचाळीस 'अ' वर्ग तालुका ग्रंथालये, आठ इतर 'अ' वर्ग ग्रंथालये, अकरा 'ब' वर्ग व तालुका 'क' वर्ग ग्रंथालये यांच्या कार्याचा आढावा घेतलेला आहे. त्याचबरोबर बेळगांवमधील दोन शतायू ग्रंथालयांचा समावेश केलेला आहे.

- **पाटील आर.आर. (२०१४)** यांनी संकलित केलेल्या इचलकरंजीच्या आपटे वाचन मंदिरातील दुर्मिळ ग्रंथांची सूची या ग्रंथामध्ये एकूण सात प्रकरणे असून पहिल्या प्रकरणामध्ये संकलकाने वाचन संस्कृतीविषयी आपले मत स्पष्टपणे मांडले आहे. दुसऱ्या प्रकरणामध्ये इचलकरंजीतील भौगोलिक पार्श्वभूमी या सदराखाली इचलकरंजी विषयी भौगोलिक माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. तिसऱ्या प्रकरणात इचलकरंजीचाइतिहास याविषयी माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे, तर चौथ्या प्रकरणात आपटे वाचन मंदिर याविषयी माहिती दिलेली आहे. पाचव्या प्रकरणात 'दुर्मिळ ग्रंथ' याविषयी माहिती संकलित केली आहे. त्याचा उपयोग अनेक संशोधकांना, विद्यार्थ्यांना, शिक्षकांना व सर्वसामान्य वाचकांना मोठ्या प्रमाणात होतो. सहाव्या प्रकरणात ग्रंथसूचीचा अर्थ व महत्व याविषयी स्पष्टीकरण दिलेले आहे, तर शेवटच्या प्रकरणात संकलकाने ग्रंथसूची दिलेली आहे.

  या पुस्तकात आपटे वाचन मंदिरातील दुर्मिळ ग्रंथांची सूची वाचकांच्या वाचनाची भूक भागविण्याचे कार्य केले आहे. सदरची यादी संगणकाच्या साहाय्याने संकलित केली आहे.

- **पाटील सी. श्री. (२००५)** यांनी विश्व महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालये या शीर्षकाखाली लिहिलेल्या ग्रंथामध्ये महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयाची माहिती दिलेली आहे. लेखकाने या ग्रंथात ग्रंथालयाचे महत्व, सार्वजनिक ग्रंथालयाचे कार्य व ग्रंथालयाची सद्यस्थिती इ. माहिती दिलेली आहे.

- **प्रियोळकर अ. का. (१९६५)** यांच्या ग्रंथ वर्णन व ग्रंथ संरक्षण या मुंबई मराठी ग्रंथ संग्रहातील 'मराठी दोलामुद्रिते' या ग्रंथामध्ये मराठी दोलामुद्रितांविषयी माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. सदरचा ग्रंथ हा दोलामुद्रिताच्या क्रम पुस्तके विषयीचा पहिला प्रयत्न आहे. या क्रम पुस्तिकेमध्ये मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयात समाविष्ट असलेली मराठी दोलामुद्रिते क्रमवार

पध्दतीने दिलेली आहेत. याचबरोबर या ग्रंथामध्ये प्रियोळकरांच्या ग्रंथ वर्णन व ग्रंथ संरक्षण या विषयावरील प्रास्ताविक निबंधाचा समावेश केलेला आहे. अशा पध्दतीने सदरच्या ग्रंथामध्ये मराठी दोलामुद्रिताविषयी माहिती लेखकाने मांडलेली आहे.

- **प्रियोळकर अ. का. आणि इतर (१९४६)** यांनी मराठी ग्रंथालय संघाने प्रकाशित केलेल्या 'पंचारती' या पुस्तकामध्ये एकूण पाच प्रकरणे लिहिलेली आहेत. पहिल्या प्रकरणामध्ये प्रियोळकरांनी मराठी ग्रंथ संग्रहाची तोंड ओळख या शीर्षकाखाली लेखन केले आहे. तर यामध्ये त्यांनी Incunabula या शब्दाची उत्पत्ती, संकल्पना, व्याख्या इत्यादीची माहिती दिलेली आहे. लेखकाने मराठी दोलामुद्रिते या सदराखाली मराठी दोलामुद्रिताची संकल्पना स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. या पुस्तकाच्या दुसऱ्या प्रकरणामध्ये जोशी यांनी 'सुस्वागतम्' या शीर्षकाखाली ग्रंथालयाची माहिती मांडली आहे. तर या पुस्तकाच्या तिसऱ्या प्रकरणामध्ये 'शिक्षणाचे सदावर्ते' या शीर्षकाखाली ग्रंथालय आणि ग्रंथालयशास्त्र या संदर्भात शिक्षणामधील ग्रंथालयाचे महत्व वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे. चौथ्या प्रकरणात र.स. पारखी यांनी आदर्श ग्रंथालय व भावी काळातील त्यांचे कार्य यांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. या पुस्तकाच्या शेवटच्या प्रकरणामध्ये मराठी ग्रंथालयाची सदर स्थिती व ती आदर्श करण्याचे मार्ग या शीर्षकाखाली श.ग. दाते यांनी मराठी ग्रंथालयातील सद्यस्थितीचे वर्णन केलेले आहे. आणि त्यांच्यामध्ये सुधारणा करून ती आदर्श बनविण्याचे मार्ग विशद करण्याचा प्रयत्न केला आहे.

- **पोहनेरकर न. श. (१९६३)** यांनी आपल्या 'मराठी दोलामुद्रिते' या ग्रंथामध्ये सुरेंद्र गावस्कर संपादित मराठी दोलामुद्रिते आवृत्ती दुसरी या पुस्तकाचे परिक्षण केलेले आहे. १८०५ ते १८६७ पर्यंत मुद्रित झालेल्या मराठी मुद्रित पुस्तकाची क्रम पुस्तिका या ग्रंथात दिलेली आहे. सुरूवातीला १ ते २३ पृष्ठांची प्रस्तावना लिहून मराठी मुद्रण कलेचा सुरूवातीपासून परिचय करून दिलेला आहे.

- **बुशा सी.एच. आणि हार्टर, एस.पी. (१९८०)** यांच्या "Research Methods in Librarianship" या पुस्तकामध्ये ग्रंथालय शास्त्रातील संशोधन पध्दतीविषयी सविस्तर

माहिती दिलेली आहे. विषयाचे आकलन होण्यासाठी ग्रंथालयशास्त्राशी संबंधित उदाहरणे दिलेली आहेत. तसेच विविध संशोधन तंत्रे, निरीक्षणे, पेपर रिसर्च याची माहिती या ग्रंथात नमूद केलेली आहे.

- **भांडारकर पु.ल. (१९७६)** यांनी 'सामाजिक संशोधन पध्दती' या पुस्तकामध्ये एकूण २१ (एकवीस) प्रकरणांमध्ये मांडणी केलेली आहे. पहिल्या प्रकरणामध्ये शास्त्रीय सामाजिक संशोधन, सामाजिक संशोधनातील वस्तुनिष्ठतेच्या समस्या, समस्येचे सुसूत्रीकरणे, संशोधनातील महत्व, संशोधन आराखडा, कागदोपत्री मिळणारी सामग्री, निरीक्षण, मुलाखत, प्रश्नावली, नमुना निवड, संशोधन अहवाल इ. विषयाची माहिती सविस्तरपणे दिलेली आहे. सामाजिक तथ्ये कशाप्रकारे संकलित करणे शक्य आहे व ती संकलित करण्यात येतात याविषयीची माहिती दिलेली आहे.

- **मालशे, सं. ग. (१९७५)** यांनी 'शोध निबंधाची लेखन पध्दती' या ग्रंथात शोध निबंधाचे बाह्य आराखडे दिलेले आहेत. संशोधन क्षेत्रात नव्याने संशोधन करणाऱ्या अभ्यासकाला नवीन सूचना सुचविलेल्या आहेत. विषयाची निवड, सुचीच्या नोंदी, तळटीपा, अवतरण, ग्रंथविषयक संदर्भ, प्रबंधाची शैलीबद्दल मार्गदर्शन केलेले आहे.

- **मुर्ती ए.टी. (१९७९)** यांच्या Document Bibliography या पुस्तकामध्ये आठव्या प्रकरणात दोलामुद्रिताविषयी माहिती दिली आहे. या प्रकरणात लेखकाने दोलामुद्रिताचा अर्थ, उगम, ग्रंथ सुचीत्मक वर्णन याचे स्पष्टीकरण दिले आहे. या प्रकरणाच्या शेवटच्या भागात भारतीय दोलामुद्रिताविषयी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. भारतामध्ये प्रथम मुद्रण कलेची सुरूवात १५५६ मध्ये पोर्तुगिजांनी गोव्यामध्ये प्रिंटींग प्रेसची स्थापना केली. भारतामध्ये मुद्रित झालेले प्रथम पुस्तक म्हणून १५६१ मध्ये छापलेले "Compendis Spiritual da vida christra" या पुस्तकाचा उल्लेख करावा लागेल. या पुस्तकामध्ये नमूद केले आहे की, प्रियोळकरांनी सुचविल्याप्रमाणे १८६७ ते १९०० या कालावधीमध्ये मुद्रित पुस्तकांचे वर्गीकरण गत दोलामुद्रिते असा केला आहे, तर सन १८०० पर्यंत मुद्रित केलेल्या ग्रंथाचा

पूर्व दोलामुद्रिते तर १८०० ते १८६७ मुद्रित केलेल्या ग्रंथांना 'सद्य दोलामुद्रिते' असे संबोधले आहे.

- **मोरजे गंगाधर (१९९५)** यांनी संपादित केलेल्या 'मराठी दोलामुद्रिते' (तिसरी आवृत्ती) या ग्रंथामध्ये एकूण १०५६ दोलामुद्रितांच्या नोंदीची भर घातली आहे. ही सुधारित आवृत्ती प्रा.अ.का. प्रियोळकर जन्मशताब्दी वर्षात त्यांच्या स्मरणार्थ गोमंतक मराठी अकादमीतर्फे प्रकाशित झाली. या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीमध्ये दोलामुद्रितांच्या २९५ नोंदी, दुसऱ्या आवृत्तीमध्ये ८४४ नोंदी तर तिसऱ्या आवृत्तीमध्ये १९०० नोंदी केलेल्या आहेत. ग्रंथ नामावलीच्या रचनेचा आणि मुद्रणस्थळ यादीचा विस्तार केला आहे. आणि नवे प्रास्ताविकही लिहिले आहे.

  दुसऱ्या आवृत्तीत समाविष्ट न झालेल्या दोलामुद्रित पुस्तकांच्या नोंदी ज्या ग्रंथ संग्रहालयातून, व्यक्तीकडून, अधिकृत कॅटलॉगमधून प्राप्त झाल्या, त्याची तपशिलवार माहिती दिली आहे. सोयीसाठी त्यांचे प्रस्तुत ग्रंथात जे संक्षेप वापरले आहेत, त्याचे स्पष्टीकरण केले आहे.

- **रॉय आर, पॉल मोहन (१९९४)** "Concept of Bibliography Control" या ग्रंथामध्ये दुसऱ्या प्रकरणात हेन यांनी एकूण सोळा हजार दोलामुद्रित ग्रंथांची सूची दिलेली आहे. या सुचीच्या पुरवणीमध्ये W. P. Copinger (1902) यांनी दोलामुद्रितांच्या सहा हजार नवीन नोंदी केलेल्या आहेत. ज्यांच्याकडे हेन यांनी दुर्लक्ष केले होते, पण आजच्या ग्रंथसूचीकाराने एकूण अस्तित्वात असलेल्या दोलामुद्रितांपैकी फक्त एक तृतीयांश दोलामुद्रितांच्या नोंदी केल्याचे म्हटले आहे. या पुस्तकामध्ये दोलामुद्रितांची संपूर्ण सूची अद्याप तयार केली गेली नसल्याचे म्हटले आहे.

- **लेले, रा. के. (१९७३)** यांनी 'ग्रंथवर्णन व ग्रंथ सूची' या शीर्षकाखाली लिहिलेल्या ग्रंथामध्ये ग्रंथाचे घटकावरून, भाषा, लिपी आणि लेखन साहित्य, कागद, मुद्रण कलेचा शोध व प्रसार, अक्षर मुद्रण व चित्र छपाई, ग्रंथवर्धिनी, ग्रंथावलोकन, ग्रंथवर्णन, ग्रंथसूची, ग्रंथसूचीतील ग्रंथनामांची मांडणी, संदर्भसूची आणि वर्णानुक्रम इ. मुद्यांचे सविस्तर वर्णन करण्याचा प्रयत्न

केलेला आहे. या सर्व गोष्टी मराठी दोलामुद्रितांचे व्यवस्थापन, जतन व संवर्धन करण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात.

२.३ नियतकालिकातील लेख

- **कर्वे आर.पी. (१९४९)** यांनी 'सत्यकथा' मासिकामध्ये 'हिंदुस्थानातील ग्रंथालयाची चळवळ' या सदराखाली लिहिलेल्या संशोधनपर लेखामध्ये भारतामधील ग्रंथालयीन चळवळीचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. भारतामध्ये सर्वप्रथम सार्वजनिक ग्रंथालय कायदा कोल्हापूर संस्थानामध्ये १९४५ साली संमत करण्यात आला. त्यानंतर १९४८ साली तामीळनाडू सार्वजनिक ग्रंथालय कायदा संमत झाला. या विषयीची माहिती दिलेली आहे. त्याचबरोबर ग्रंथालय चळवळीतील सयाजी गायकवाड यांचे योगदान वर्णन केले आहे.
- **कर्णिक प्रदीप (२००४)** यांनी 'मराठी संशोधन पत्रिका' या नियतकालीकांमध्ये (ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर, २००४) 'भिवंडीचे वाचन मंदिर आणि त्यांच्या संग्रहालयातील मराठी दोलामुद्रिते' या शीर्षकाखाली लिहिलेल्या संशोधन लेखामध्ये भिवंडी वाचन मंदिराविषयी माहिती दिलेली आहे. वास्तविक हा या संग्रहालयात असलेल्या दोलामुद्रितांचा परिचय करून दिलेला आहे. त्यामुळे हा लेख सदरच्या संशोधन कार्यात महत्वाचा आहे.
- **कर्णिक प्रदीप (२००४)** यांनी 'ज्ञान गंगोत्री' या नियतकालिकेमध्ये लिहिलेल्या '१८६७ चा ग्रंथ संरक्षण कायदा आणि प्राध्यापक अ.का.प्रियोळकरांचे संशोधन' या लेखात ग्रंथ संरक्षणाची माहिती दिलेली आहे. १८६७ चा ग्रंथ संरक्षण कायदा, त्याचे महत्व, आवश्यकता व प्रियोळकर यांनी केलेले संशोधन या विषयीची सविस्तर माहिती दिलेली आहे.
- **कर्णिक प्रदीप (डिसेंबर, २००५ फेब्रुवारी, २००६)** यांच्या ज्ञानगंगोत्री वर्ष ६, अंक ३ या त्रैमासिकातील मराठीतील आद्यमुद्रितांची ग्रंथसुची : स्थिती आणि संरक्षण या संशोधन लेखामध्ये दोलामुद्रितांच्या सद्यस्थिती आणि संरक्षण याचे वर्णन केलेले आहे. आजमितीस १९०० दोलामुद्रितांची (१८०० ते १८६७ या कालखंडातील) नोंद सापडते. अजूनही दोलामुद्रितांचा शोध घ्यायला हवा. शतकोत्तरी पार केलेली सार्वजनिक ग्रंथालये, विद्यापीठ व

महाविद्यालयीन ग्रंथालये, खाजगी संग्रह येथील दोलामुद्रित ग्रंथाचा शोध घेऊन दोलामुद्रितांच्या सूचीची चौथी आवृत्ती काढण्यास वाव आहे. नुसती सूची करून भागणार नाही, तर त्या ग्रंथाच्या संरक्षणाची जतनाची ही सर्व जबाबदारी ग्रंथपाल आणि ग्रंथालयशास्त्रातील सर्व लोकांची आहे. मराठी ग्रंथ मुद्रणाला दोनशे वर्ष होत असताना मराठी ग्रंथाच्या संरक्षणाचे काय करता येईल याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

- **कुंटे दि. रा. (२००४)** यांनी 'सौरभ' आवृत्ती पहिली या नियतकालिकामध्ये लिहिलेल्या 'सार्वजनिक वाचनालय दशा व दिशा' या संशोधन लेखात सार्वजनिक ग्रंथालयाचे आर्थिक बाबींच्या सक्षमीकरणाबाबतचे विचार मांडले आहेत. या सर्व गोष्टींचा विचार करताना लेखकाने सार्वजनिक ग्रंथालयाच्या अनुदानासंबंधी मते मांडली आहेत. एकंदरीत संशोधकाने सार्वजनिक ग्रंथालये, त्याची आर्थिक स्थिती, सक्षमीकरण, अनुदान यांच्यावर प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.

- **कोल्हटकर वा.मु. (१९५६)** यांनी 'मुद्रणप्रकाश' Vol. - 17, अंक १ या नियतकालिकेमध्ये 'महाराष्ट्र ग्रंथालय आणि मराठी दोलामुद्रिते' या शीर्षकाखाली लिहिलेल्या संशोधन लेखामध्ये मराठी दोलामुद्रितांविषयी माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर या लेखात त्यांनी प्रत्येक दोलामुद्रिताची एक प्रत महाराष्ट्र ग्रंथालयाकडे पाठवावी असे आवाहन केलेले आहे. त्यामुळे एकूण दोलामुद्रितांचा आढावा घेण्यास मदत होते. आणि कोणत्या ग्रंथालयात किती दोलामुद्रिते आहेत याची माहिती मिळते.

- **टिकेकर श्री. दा. (१९६९)** यांनी 'साहित्य सहकार' या नियतकालीकाच्या Vol. - 19, अंक ९, पृष्ठ क्रमांक २३ ते २७ मध्ये समाविष्ट केलेल्या मराठी ग्रंथाचे संग्रहालय या संशोधन लेखामध्ये अ.का.प्रियोळकर लिखित पुस्तकाचे परिक्षण केलेले आहे. या परिक्षणामध्ये ग्रंथालयातील मराठी ग्रंथ संग्रहाच्या वाढीसंदर्भात विचार मांडले आहेत.

- **नाईक बापूराव (२००५)** यांनी 'ज्ञानगंगोत्री' वर्ष ६, अंक ३ मधील अजून ताजा वास जुन्याला, अ.का. प्रियोळकर आणि मुद्रण संशोधन लेखामध्ये प्राध्यापक प्रियोळकरांचे मुद्रण विषयक संशोधनाविषयी देशी परदेशी जानकारांनी प्रशंसा केलेली आहे. प्रा.अ.का.प्रियोळकर

आणि मुद्रण संशोधन, प्राध्यापकाचे प्रियोळकर संशोधन, माझे जेष्ठ श्रेयी प्रियोळकर, प्रारंभीचे मुद्रण संशोधन, फादर तोमस स्टिफन्सचे ख्रिस्तीपुराण, संशोधकाने पाळावयाची तथ्ये, भारतातील मुद्रणाचा प्रारंभ, देवनागरी मुद्रणाची रोममध्ये सुरूवात, भारतीय मुद्रणाची विल्कन्सची कामगिरी, श्रीरामपूर येथील मुद्रण उद्योग, मुंबई येथील मुद्रणाचा प्रसार, हिंदुस्थानचा शिळा मुद्रणाचा प्रारंभ, पुण्यातील मुद्रण उद्योग, प्रियोळकरांच्या मुद्रण संशोधनाची व्याप्ती इत्यादी घटकांची माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

- **बेलसरे, व.भि. (१९५८)** यांनी 'साहित्य सहकार' नियतकालिकामध्ये Vol. - 7, अंक १२, पृष्ठ क्रमांक ६ ते ९ मध्ये लिहिलेल्या दुर्मिळ ग्रंथांचे संरक्षण या लेखामध्ये दुर्मिळ ग्रंथाचे जतन कसे करावे, त्याचप्रमाणे त्याचे संवर्धन व संरक्षण कसे करावे, त्यासाठी कोणकोणत्या पध्दतीचा अवलंब करावा या विषयीचे मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. थोडक्यात लेखकाने दुर्मिळ ग्रंथांचे जतन, संवर्धन व संरक्षण या बाबींवर प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.

- **शेकोकार रमेश (२००५)** यांच्या 'ज्ञानगंगोत्री' त्रैमासिकातील 'आधुनिक मुद्रणकलेचा भाष्यकार : मार्शल मॅकलुहॅन' या संशोधनपर लेखामध्ये मार्शल मॅकलुहॅन यांच्या मुद्रणकलेविषयी कार्याबाबत माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. मुद्रणाचा प्रक्षोभक भाष्यकार मार्शल मॅकलुहॅन याने मुद्रण माध्यमाविषयी जे परखड विचार मांडले, तिचा माध्यमासाठी उपयोगिता सिध्द केली त्यावरून संशोधकाने असा निष्कर्ष काढलेला आहे की, या माध्यमास सामाजिक प्रबोधनाची सुनिश्चित बैठक लावली तर एकविसाव्या शतकात भारतीय समाजाचे रूपांतर माहिती समाजात करणे शक्य होणार आहे. तंत्रदृष्ट्या प्रगत व माहितीदृष्ट्या समृध्द असा भारतीय समाज उभा करताना मुद्रण हे माध्यम उपयुक्त ठरू शकते. जगभर नव्या तांत्रिक क्रांतीमुळे समाजाचा चेहरामोहरा बदललेला आहे. या बदलाची दिशा लक्षात घेऊन भारतीय मुद्रण माध्यमांनी आपली कार्यकक्षा बदलण्याची गरज आहे. समाज बदलावा ही प्रत्येकाची अपेक्षा असते. भारतीय मुद्रण माध्यमांनी नवनवीन समस्यांचा वेध घेऊन त्यावर

ठोस उपाय योजण्यासाठी कार्यक्रम हाती घ्यावा, तरच मुद्रणकला खऱ्या अर्थाने एक सामाजिक लेणे ठरू शकेल. मॅकलव्हून हा मुद्रणकलेचा आधुनिक भाष्यकार म्हणता येईल.

२.४ एम.लिब. संशोधन प्रकल्प

- **शिंगाडे चंद्रकांत सुखदेव (२००५–०६)** यांनी एम.लिब. पदवीसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या 'ग्रंथालय आणि माहितीशास्त्र' शिक्षणक्रमासाठी सादर केलेल्या मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे आणि वाचन मंदिर, भिवंडी यांच्या संग्रही असणाऱ्या मराठी दोलामुद्रितांचा शोध या शीर्षकाखाली सादर केलेल्या प्रबंधामध्ये वाचन मंदिर, भिवंडी येथील तेरा दोलामुद्रितांचा शोध लागलेला आहे. तसेच ठाणे शहरातील जुने ग्रंथालय असून देखील तेथे मराठी दोलामुद्रिते उपलब्ध नाहीत. मराठी दोलामुद्रितांचा संग्रह, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर या ग्रंथालयात आहे. परंतु त्यातील चौऱ्याहत्तर पुस्तके मराठी ग्रंथ संग्रहालयात उपलब्ध आहेत. वरील संशोधनामुळे मोरजे यांच्या तिसऱ्या आवृत्तीत नसणाऱ्या नवीन तीस दोलामुद्रितांचा शोध लागलेला आहे.
- **शिंदे संदीप बबनराव (२०१३–१४)** यांनी एम.लिब. पदवीसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या 'ग्रंथालय आणि माहितीशास्त्र निष्णात शिक्षणक्रम' पदवी अभ्यासक्रमासाठी 'कोल्हापूर येथील करवीर नगर वाचनालयातील दुर्मिळ वाचन साहित्याचे जतन व संवर्धन : एक अभ्यास' या शीर्षकाखाली सादर केलेल्या शोध प्रबंधामध्ये करवीर नगर वाचनालय, कोल्हापूर येथील दुर्मिळ वाचन साहित्याची जतन व संवर्धनाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. सदरच्या संशोधनात संशोधकाने करवीर नगर वाचन मंदिर या ग्रंथालयातील दुर्मिळ व स्वतंत्र संरक्षणासाठी स्वतंत्र व प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज आहे. या साहित्याच्या संरक्षणासाठी आधुनिक पध्दतीचा वापर करावा, हे साहित्य डिजीटल स्वरूपात वाचकांना उपलब्ध करून द्यावे इ. शिफारशी केलेल्या आहेत.

२.५ एम.फिल. लघुशोध प्रबंध

- **आडाव, रविंद्र पांडूरंग (२००८–२००९)** यांनी एम.फिल. पदवीसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या 'ग्रंथालय आणि माहितीशास्त्र' पदवी शिक्षणक्रमासाठी सादर केलेल्या ''कोल्हापूर जिल्ह्यांतर्गत येणाऱ्या शतकोत्तरी सार्वजनिक ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रिते'' या शीर्षकाखाली सादर केलेल्या शोध प्रबंधामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील शतकोत्तरी पूर्ण करणाऱ्या आठपैकी पाच सार्वजनिक ग्रंथालयात एकूण एकशे सत्तावीस दोलामुद्रित ग्रंथाचा शोध संशोधनामुळे लागलेला आहे, तर उर्वरीत तीन शतकोत्तरी ग्रंथालयात दोलामुद्रिते आढळून येत नाहीत. या संशोधनामुळे नवीन अकरा दोलामुद्रितांची भर पडलेली आहे. त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रंथालयाचा विचार केल्यास १९०० दोलामुद्रितांची नोंद मोरजे यांच्या तिसऱ्या आवृत्तीत झालेली आहे आणि या नवीन अकरा दोलामुद्रितांची भर पडल्यामुळे मराठी दोलामुद्रितांची संख्या १९११ झालेली आहे.
- **थोरात निलीमा (२०१०–११)** यांनी एम.फिल. पदवीसाठी यशवंत चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पदवी अभ्यासक्रमासाठी सादर केलेल्या 'सातारा जिल्ह्यातील अ वर्ग सार्वजनिक ग्रंथालये व वेदशास्त्र विद्यासंवर्धन मंडळ कराड मधील मराठी दोलामुद्रितांचा अभ्यास' या शीर्षकाखाली लिहिलेल्या प्रबंधामध्ये नवीन मराठी दोलामुद्रितांचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. सदरच्या संशोधनासाठी आठ 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांची निवड केलेली होती. त्यापैकी चार ग्रंथालयामध्ये एकूण दहा मराठी दोलामुद्रिते सापडली. त्यांची भर मोरजे यांच्या दोलामुद्रितांच्या तिसऱ्या आवृत्तीमध्ये पडलेली आहे.

२.६ पीएच.डी. शोधप्रबंध

- **गजबे पी.एम. (१९९५)** – संत गाडगेबाबा अमरावती युनिव्हर्सिटी या विद्यापीठाच्या 'ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागात' – ''महाराष्ट्रातील विदर्भाच्या सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचा इतिहास १८७० ते १९८० एक चिकित्सक अभ्यास'' या शीर्षकाखाली पीएच.डी. साठी सादर केलेल्या शोध प्रबंधात एकूण पंधरा प्रकरणे आहेत. यातील पहिल्या प्रकरणात प्रस्तावना

दिली असून ग्रंथालयाचे राष्ट्रीय महत्व विशद केले आहे. त्याचबरोबर मुंबई लिटररी सोसायटीच्या स्थापनेबरोबर मुद्रित पुस्तकांच्या ग्रंथालयास आरंभ झाला. १८३६ नंतर अनेक ठिकाणी नेटीव्ह जनरल ग्रंथालय स्थापन करण्यात आली. हा सार्वजनिक ग्रंथालयाचा आरंभ होय असे विशद केले आहे. 'जिथे ग्रंथ नाही, तिथे ज्ञान नाही. जिथे ज्ञान नाही, तिथे सौख्य नाही. ग्रंथालयाविना जे गांव राही, तिथे जीवनाचा अर्थ काहीच नाही' अशा शब्दात ग्रंथालयाचे महत्व पटवून दिले आहे. दुसऱ्या प्रकरणामध्ये सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचे महत्व व आवश्यकता विशद केली आहे. तिसऱ्या प्रकरणात, संशोधन विषयी उद्दिष्टे व गृहीत कृत्ये दिली आहेत, तर चौथ्या प्रकरणात संशोधनाची क्षेत्र व्यक्ती व मर्यादा व पाचव्या प्रकरणात भारतातील ग्रंथालय चळवळीचा संक्षिप्त इतिहास दिलेला आहे. सहाव्या प्रकरणात महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळीचा इतिहास दिलेला आहे. सातव्या प्रकरणात महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथ प्रकाराने ऐतिहासिक पार्श्वभूमी इत्यादीचे विवेचन केले आहे. आठव्या प्रकरणात विदर्भातील जुनी वर्तमानपत्रे यांचा इतिहास दिला आहे. नवव्या प्रकरणात महाराष्ट्रातील विदर्भातील नेटीव्ह ग्रंथालयाचा इतिहास मांडलेला आहे. दहाव्या प्रकरणात विदर्भातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळ १८७० ते १९८० विषयी माहिती दिली आहे. अकराव्या प्रकरणात ग्रंथालय चळवळीतील ग्रामोद्धार विकास याची माहिती दिली आहे. बाराव्या प्रकरणात ग्रंथालय कायदा व चळवळ, तर तेराव्या प्रकरणात ग्रंथालय चळवळीची दिशा, निष्कर्ष व शिफारशी दिलेल्या आहेत. चौदाव्या प्रकरणात महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक योजनांविषयी माहिती दिलेली आहे, तर शेवटच्या प्रकरणात सार्वजनिक ग्रंथालयाविषयी सामाजिक जाणीव, उणिवा व उपाय याविषयीचे वर्णन केलेले आहे.

- **फरांडे, सी.पी. (१९९७)** यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र विद्याशाखेअंतर्गत ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागास सादर केलेल्या पीएच.डी. साठी सादर केलेल्या ''भारतातील विशेषत: महाराष्ट्रातील मराठी हस्तलिखितांची रचना आणि व्यवस्थापन'' सदरच्या शोध प्रबंधात संशोधकाने अकरा शैक्षणिक संस्थांचा प्रतिसाद मिळाला असला तरी त्यापैकी तीन महाविद्यालये विद्यापीठापेक्षा ही पूर्वी स्थापन झालेली आहेत. परंतु

त्यांची हस्तलिखिते विद्यापीठापेक्षा कमी आहेत. पण या महाविद्यालयातील हस्तलिखिते बराच काळ दुर्लक्षित राहिली होती. संशोधकाने पुढे नमूद केले आहे की, महाराष्ट्रातील विद्यापीठाने हस्तलिखित संग्रहाचे पध्दतशीरपणे जतन व संरक्षण करायला हवे. यासाठी वडूदरा अर्पण तिरूअनंतपूरम येथील उदाहरणे दिली आहेत. मराठी हस्तलिखितांचा या महाविद्यालयामधील इतर भाषेतील हस्तलिखितांची तुलना करता तिसरा क्रमांक मराठीचा लागतो. त्याचबरोबर संशोधकाने महाराष्ट्रातील विद्यापीठाने त्यांचा हस्तलिखित विभाग यू.जी.सी.आणि राष्ट्रीय दुर्मिळ ग्रंथ विभाग यांनी दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार करावा. तसेच महाविद्यालयामध्ये हस्तलिखित असतील तर त्यांनी स्वत:जवळ फोटो कॉपी ठेवून ओरिजनल हस्तलिखिते एखाद्या प्रसिध्द ग्रंथालयामध्ये किंवा विद्यापीठामध्ये जमा करावीत. कारण अशा महाविद्यालयात निधी आणि सुविधांअभावी त्यांची देखभाल होऊ शकत नाही. शक्यतो हस्तलिखीतांच्या जतन आणि संरक्षणासाठी संगणकाचा वापर करावा. त्याचे डिजीटायझेशन केल्याने असे दुर्मिळ ग्रंथ जगभर कोठेही उपलब्ध होऊ शकतात.

- **बाळकृष्ण पी. (२०१५)** श्री कृष्णदेवरॉय युनिव्हर्सिटीच्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागास 'Preservation and Organization of Manuscripts in the Libraries of Andhra Pradesh : A study' या शीर्षकाखाली सादर केलेल्या पीएच.डी. शोध निबंधामध्ये एकूण चार प्रकरणांचा समावेश केलेला असून पहिल्या प्रकरणात हस्तलिखिताविषयी माहिती दिलेली आहे. आंध्र प्रदेशातील हस्तलिखितांची परंपरा यांचे वर्णन केलेले आहे. त्याचबरोबर संशोधनात वापरण्यात आलेला संशोधन आराखडा दिलेला आहे. दुसऱ्या प्रकरणात संशोधन विषयावर उपलब्ध असलेल्या साहित्याचा आढावा, ऐतिहासिक विकास, त्याचे तालिकीकरण, हस्तलिखितांचे जतन व संरक्षण त्याचबरोबर हस्तलिखितांचे डिझीटायझेशन या विषयीचे विवेचन केलेले आहे. संशोधकाने शेवटच्या पाचव्या प्रकरणात अभ्यासासाठी घेतलेल्या ग्रंथालयामध्ये हस्तलिखितांचे निधी अभावी डिझीटायझेशन केले जात नाही. तरी डिझीटायझेशन करण्यासाठी लागणारी साधनसामुग्री खरेदी करावी व कर्मचाऱ्यांना डिझीटायझेशनचे प्रशिक्षण देण्यात यावे अशी महत्वाची शिफारस सुचविण्यात आलेली आहे.

- **थियाम सत्यवतीदेवी (२०१५)** मणिपूर युनिव्हर्सिटीच्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागास "Manuscripts of Manipur : Study in the Modern Perspective" या शीर्षकाखाली सादर केलेल्या पीएच.डी. च्या शोध प्रबंधामध्ये एकूण पाच प्रकरणांचा समावेश असून पहिल्या प्रकरणात हस्तलिखीताविषयी माहिती देण्यात आलेली आहे. त्याचबरोबर प्रकरणीकरण ही आढळते. संशोधकाने दुसऱ्या प्रकरणात मणिपूरचा सांस्कृतिक इतिहास, विविध माध्यमातून, ज्ञानाची जतन, हस्तलिखीतांचा उगम, काळ, लेखक, इत्यादी विषयी माहिती दिलेली आहे. तर तिसऱ्या प्रकरणात मणिपूरमधील हस्तलिखीतांच्या सद्यस्थितीचे वर्णन केलेले आहे. तर चौथ्या प्रकरणात मणिपूर मधील हस्तलिखीतांचे व्यवस्थापन याविषयी माहिती देण्यात आलेली आहे. पाचव्या व शेवटच्या प्रकरणात मणिपूरमधील हस्तलिखीतांचे जतन करून त्याचे डिजीटायझेशन व संरक्षण करावे अशी महत्वपूर्ण शिफारस केलेली आहे. त्यामुळे हस्तलिखीतांचा हा दुर्मिळ अमूल्य ठेवा भविष्यातही संशोधकांना व वाचकांना उपलब्ध होईल.

- **मुजुमदार एन.आर. (२०१५)** Management of Manuscript collection in Assam in digital era; a Practical approach using I.C.T. tools.

  मुजुमदार यांनी गुहाटी युनिव्हर्सिटी विद्यापीठाच्या कला, विद्या शाखेअंतर्गत ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागास सादर केलेल्या शोध प्रबंधामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, सध्या तरी हस्तलिखितांना पर्याय नाही. एखादे हस्तलिखित वाचकाला हवे असेल तर वाचक हस्तलिखित संग्रहाला भेट देतात. भारतामध्ये तसेच आसाममधील हस्तलिखितांचे जतन करून संग्रहीत केलेले आहेत. अशी हस्तलिखिते हाताळणे खूपच नाजूक काम आहे. हस्तलिखिते खूपच जुनी आणि तकलादू स्वरूपाची असतात. म्हणून अशा हस्तलिखितांचे डीजिटायझेशन करण्यावर भर दिला जात आहे. यामुळे हस्तलिखितांचा ऱ्हास न होता, ती ई स्वरूपात जगभर वाचली जाऊ शकतात. हस्तलिखितांचे डीजिटायझेशन म्हणजेच हस्तलिखितांचे डिजीटल स्वरूपामध्ये रूपांतर करणे असे डिजीटल स्वरूप हे ग्रंथपालास व त्याचबरोबर वाचकासही विविध मार्गांनी उपकारक ठरते. देशभरात वेगवेगळ्या स्वरूपाची

डिजीटायझेशन कार्यक्रम सुरू केले जात आहेत. खास करून यामध्ये गव्हर्मेंट सरकारने निधी दिलेल्या ग्रंथालयांचा समावेश होतो. तसेच संशोधकाने पुढे सांगितले आहे की, भारतामध्ये सुध्दा हस्तलिखितांचे डिजीटायझेशन N.M.M. आणि I.G.N.C.F. यांनी सुरू केले आहे. त्याचबरोबर संशोधकाने हस्तलिखितांचा डेटाबेस तयार करणे आसाममध्ये सुध्दा हस्तलिखितांचा शास्त्रीय व पध्दतशीर अभ्यास करण्यासाठी आवश्यक आहे. पण अद्याप तरी असा डेटाबेस आसाममध्ये तयार करण्यात आलेला नाही.

- **सरस्वती पी. (२०१६)** यांनी युनिव्हर्सिटी ऑफ म्हैसूरच्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागास "Preservation and conservation of Rare Materials in select Libraries in Karnataka a Study" या शीर्षकाखाली सादर केलेल्या पीएच.डी. च्या शोध प्रबंधामध्ये एकूण पाच प्रकरणांचा समावेश केलेला आहे. त्यात त्यांनी दुर्मिळ ग्रंथ संग्रह हा स्थानिक परंपरेचा ठेवाच असतो असे म्हटले आहे आणि यातून सर्वधर्मासाठी संस्कृती आणि परंपरेचा ठेवा उघडला जातो. या संग्रहामध्ये पामलीव्हज हस्तलिखिते कालबाह्य पुस्तके इत्यादींचा समावेश होतो. यामध्ये पुढे नमूद केले आहे की, ओरिएंटल इन्स्टिट्यूट म्हैसूर, ओरिएंटल रिसर्च इन्स्टिटयूट म्हैसूर, डिव्हीजनल आर्कव्हीज ऑफिस म्हैसूर, अकॅडमी आणि संस्कृत रिसर्च ग्रंथालय मिलकोट, कर्नाटक थिऑलॉजिकल ग्रंथालय व आर्कव्हीज मंगलोर, कॅनडा रिसर्च इन्स्टिटयूट लायब्ररीज धारवाड, स्टेट लायब्ररी इत्यादी ग्रंथालयांनी अतिशय महत्वपूर्ण अशा दुर्मिळ ग्रंथांचे संकलन केले आहे.

- **साखरे राजेंद्र रमाकांत (२०१७)** यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागास "Assigning of subject heading to Sanskrit and Marathi Manuscripts " या शीर्षकाखाली सादर केलेल्या पीएच.डी. च्या शोध प्रबंधामध्ये एकूण पाच प्रकरणांचा समावेश केलेला आहे. संशोधकाने पहिल्या प्रकरणात माहिती प्रतिप्राप्तीचे सिध्दांत, त्यांची व्याख्या, इतिहास, हस्तलिखिते याविषयीची माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. दुसऱ्या प्रकरणामध्ये सदरच्या संशोधन कार्यासाठी वापरण्यात आलेली संशोधन पध्दती Content Analyes पध्दतीचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. संशोधकाने तिसऱ्या

प्रकरणामध्ये माहिती विश्लेषण आणि सादरीकरण केलेले आहे. चौथ्या प्रकरणामध्ये खगोलशास्त्र व आर्युवेदातील संज्ञांचा थिसारस बनविण्याचा प्रयत्न केलेला आहे. पाचव्या प्रकरणात निष्कर्ष व शिफारशी दिलेल्या आहेत. या शिफारशीमध्ये AACR ने (Aglo American Catlogue) हस्तलिखीतांचे तालीकीकरण व निर्देशन करण्यासाठी कांही नियम करावेत. कारण हस्तलिखीते ही दुर्मिळ असतात आणि सर्वसामान्यपणे त्यात अंर्तभूत असलेली माहिती वाचकांना अपरिचीत असते.

- **शर्मा आरती (२०११)** 'Conservation and digitization of Manuscripts in University Libraries in India' यांनी कला शाखेअंतर्गत ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागास सादर केलेल्या शोध प्रबंधामध्ये भारतातील विद्यापीठीय ग्रंथालयातील हस्तलिखितांचे जतन आणि डिजिटायझेशन याविषयी माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. सदरच्या संशोधनात संशोधकाने हस्तलिखितांवर चर्चा करताना जरी ग्रंथालय हस्तलिखित संग्रहाचे जतन आणि संरक्षण करण्यासाठी त्यांच्या डिजिटायझेशन आणि मायक्रोफिल्मींगसाठी जोरदार प्रयत्न करीत असले तरी सुध्दा मूळ हस्तलिखितांचे जतन व संरक्षण त्यांच्या मूळ स्वरूपात करणे महत्वाचे आहे या बाबींवर प्रकाशझोत टाकलेला आहे. याकामी ग्रंथालयांना अडचणीमध्ये निधीची कमतरता, संग्रहाबाबत अज्ञान, लिपी आणि भाषेचे अज्ञान, फाटलेली किंवा कमकुवत झालेली हस्तलिखिते जतन करण्याचे योग्य प्रशिक्षण मिळालेल्या कर्मचाऱ्यांचा अभाव इत्यादी बाबींचा समावेश होतो. याकामी संशोधकाने सूचना केलेल्या आहेत. सर्व विद्यापीठ ग्रंथालयांनी हस्तलिखितांच्या संग्रहाकरीता स्वच्छ आणि नीटनेटकी जागा निवडावी, हस्तलिखिते, पाणी, आग, दमटपणा, स्वीच बोर्ड, योग्य प्रकाश, वातानुकुलीत सोय असावी, हस्तलिखिते जमिनीवर ठेवू नयेत. वरचेवर जागेची पहाणी करावी. योग्य कीटकनाशक व बुरशी नाशकांचा वापर करावा, आर्द्रता व तापमान, हस्तलिखित संग्रह, खोलीमधील योग्य प्रमाणात नियंत्रित करावी. कमीत कमी जतन, संरक्षण, प्रशिक्षण केलेल्या एका तरी कर्मचाऱ्याची नेमणूक करावी. हस्तलिखिते हाताळताना दोन्ही हातांचा वापर करावा. हस्तलिखिते एका

ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी घेऊन जाताना ट्रे चा वापर करावा, हात स्वच्छ असावेत. हस्तलिखितांवर पेननी खुणा करू नयेत इत्यादी सूचना केलेल्या आहेत.

२.७ सारांश

सदर प्रकरणात संशोधकाने संशोधन विषयाशी संबंधित उपलब्ध असलेल्या वाचन साहित्याचा आढावा घेतला आहे. यामध्ये पुस्तके नियतकालिकामधील लेख, एम.लिब. संशोधन प्रकल्प, वेगवेगळ्या विद्यापीठामध्ये सादर केलेले एम.फिल. लघु शोधनिबंध, पीएच.डी. शोध प्रबंध यांचा समावेश केला आहे. सदर वाचन साहित्याच्या आढाव्यामुळे संशोधकास हाती घेतलेल्या संशोधनासाठी योग्य दिशा मिळाली.

संदर्भसूची

- आडाव, रविंद्र पांडुरंग (२००८–०९) कोल्हापूर जिल्ह्यांतर्गत येणाऱ्या शतकोत्तरी सार्वजनिक ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रिते : नाशिक यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ.
- करमरकर, द.बा. (१९७५) महाराष्ट्रातील ग्रंथालय कायदा, मुंबई : समाविष्ट वाचनालय.
- कर्वे, आर.पी. (१९४९) हिंदुस्थानातील ग्रंथालयाची चळवळ, मुंबई : सत्यकथा
- कर्णिक,प्रदीप (२००५) ग्रंथ, ग्रंथालये आणि ग्रंथसंस्कृती, मुंबई : नवचैतन्य प्रकाशन.
- कर्णिक, प्रदीप (२००५–०६) मराठीतील आद्यमुद्रितांची ग्रंथसूची: स्थिती आणि संरक्षण, नाशिक यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ.
- कर्णिक, प्रदीप (२००४) भिवंडीचे वाचनमंदिर आणि त्यांच्या संग्रहालयातील मराठी दोलामुद्रिते, नाशिक : यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ.
- कर्णिक, प्रदीप (२००४) १८६७ चा ग्रंथसंरक्षण कायदा आणि प्रियोळकरांचे संशोधन, नाशिक : यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ.
- कानडे, रामचंद्र गोविंद (१९३८) प्राचीन व अर्वाचीन ग्रंथालये, पुणे : समर्थ भारत प्रकाशन.

- काळे, दिनकर बी. (१९६६) प्रियोळकर स.का. लिखीत लेखसंग्रह.
- कुंटे, दि.रा. (२००४) सार्वजनिक वाचनालय दशा व दिशा : सौरभ
- कोण्णूर, एम.बी. इतर (२००८) डायमंड ग्रंथालय व माहितीशास्त्र कोश, पुणे : डायमंड पब्लिकेशन्स.
- कोल्हटकर, वा.मु. (१९५६) महाराष्ट्र ग्रंथालय आणि मराठी दोलामुद्रिते, मुद्रण प्रकाशन.
- गजबे, पी.एम. (१९९५) महाराष्ट्रातील विदर्भाच्या सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचा इतिहास १८७० ते १९८० एक चिकित्सक अभ्यास, अमरावती : संत गाडगेबाबा युनिव्हर्सिटी.
- गावस्कर, सु.आ. (१९६१) मराठी दोलामुद्रिते, मुंबई : मराठी ग्रंथ संग्रहालय.
- गोगटे, शरद (२००८) मराठी प्रकाशनची दोनशे वर्षे, पुणे : राजहंस प्रकाशन.
- चुनेकर, सु.रा. (१९८३) सूचीशास्त्र उपयोग संशोधन स्वरूप आणि पद्धती, संगमनेर : शिक्षण प्रसारक संस्था.
- टिकेकर, श्री.दा. (१९६९) मराठी ग्रंथाचे संग्रहालय, मुंबई : साहित्य सहकार.
- थोरात, निलीमा (२०१०–११) सातारा जिल्ह्यातील अ वर्ग सार्वजनिक ग्रंथालय व वेदशास्त्र विद्यासंवर्धन मंडळ कराड, नाशिक : यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ.
- दाते, शंकर, गणेश (१९६१) मराठी ग्रंथसूची १८०० ते १९५०, मुंबई : शं.गं. दाते प्रकाशन.
- नाईक, बापूराव (२००५) अ.का.प्रियोळकर आणि मुद्रण संशोधन, नाशिक : यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ.
- पाटील, रविंद्र (२०१४) महाराष्ट्राची शतायू दालने, कबनूर : नाग–नालंदा प्रकाशन.
- पाटील, आर.आर. (२०१४) इचलकरंजी आपटे वाचन मंदिरातील दुर्मिळ ग्रंथांची सूची, इचलकरंजी : ज्योती प्रकाशन.

- पाटील सी.श्री. (२००५) विश्व महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालये, देवगड : स्नेहल एजन्सीज्.
- पोहनेरकर, न.शे. (१९६३) मराठी दोलामुद्रिते, मुंबई : मराठी ग्रंथ संग्रहालय.
- प्रियोळकर, अ.का. (१९४६) पंचारती, मुंबई : मराठी ग्रंथालय संघ
- प्रियोळकर, अ.का. (१९४९) मराठी दोलामुद्रिते, मुंबई : मराठी संशोधन मंडळ
- प्रियोळकर, अ.का. (१९५८) द. प्रिटींग प्रेस इन् इंडिया, मुंबई : मराठी संशोधन मंडळ
- प्रियोळकर, अ.का. (१९६९) मराठी ग्रंथाचे आदर्श संग्रहालय, मुंबई : मराठी साहित्य संघ.
- फरांडे, सी.पी. (१९९७) भारतातील विशेषत: महाराष्ट्रातील मराठी हस्तलिखीतांची रचना आणि व्यवस्थापन, पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.
- बेलसरे, व.भि. (१९५८) दुर्मिळ ग्रंथाचे संरक्षण, मुंबई :साहित्य सहकार
- मालशे, स.ग. (१९७५) शोध निबंधाची लेखन पद्धती, पुणे : सुविचार प्रकाशन
- मोरजे, गंगाधर (१९७५) मराठी दोलामुद्रिते, गोवा : गोमंतक मराठी अकादमी.
- लेले, रा.के.(१९७३) ग्रंथ वर्णन व ग्रंथसूची, पुणे : जोशी–लोखंडे प्रकाशन.
- शेकोकार रमेश (२००५) आधुनिक मुद्रणकलेचा भाष्यकार ज्ञानगंगोत्री, नाशिक : यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ.
- शिंदे, संदीप बबनराव (२०१३–१४) कोल्हापूर येथील करवीर नगर वाचनालयातील दुर्मिख वाचन साहित्याचे जतन व संवर्धन एक अभ्यास, नाशिक :यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
- शिंगाडे, चंद्रकांत सुखदेव (२००५–०६) मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे व वाचनमंदिर भिवंडी यांच्या संग्रही असणाऱ्या मराठी दोलामुद्रितांचा शोध, नाशिक एम.लिब. पदवीसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ.
- Busha, C.S. & Harter S.P. (1980) Research Methods in Librarianship, New Delhi : Academic Press.

- Balkrishna P. (2015) Preservation and Organization of Manuscripts in the Libraries of Andhra Pradesh : A Study : Shri Krishna University.
- Kent, Allen (1974), Ency of Library & Information Science Newyork : Marcel Dekker Inc.
- Kumar, Girija (1976): Bibliography, New Delhi : Vikas Publication House, Page 12.
- Murty, A.T. (1979), Document Bibliography, New Delhi : Metropolitan Book Co. Ltd., Page 85.
- Muzumdar N.R. (2015), Management of Manuscript Collection in Assam In Digital era; a Practical Approach using I.C.T. Tools Guvahati : Guvahati University Ph.D. Thesis.
- Roy, R. Paul (1994), Concept of Bibliography, New Delhi : Phoenix Publishing House Pvt. Ltd.
- Saraswati P. (2016), Preservation and Conservation of Rare Materials in Select Libraries in Karnataka Study, Mysore : University Ph.D. Thesis.
- Sakhare, Rajendra Ramakant (2017) Assigning of Subject heading to Sanskrit and Marathi Manuscripts, Pune : Savitribai Fule University, Ph.D. Thesis.
- Sharma Aarti (2011), Conservation & Digitization of Manuscripts in University Libraries in India, Punjab : University Ph.D. Thesis.
- Thiyam Satyati (2015), Manuscripts of Manipur : Study in the Modern Perspective Manipur : University Ph.D. Thesis.
- Thornton John (1954) Scientific Book Libraries & Collectors : A Study of Bibliography & Book Trade in Relation to Science.
- Tomlinson Norman (1963) Target For Careers Librarianship London : Robert Hale Limited.

प्रकरण तिसरे

दोलामुद्रिताचा अर्थ, इतिहास व पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयाची सद्यस्थिती

३.१ प्रस्तावना :

प्राचीन काळी वेगवेगळ्या धर्माचा प्रसार करण्यासाठी त्या त्या धर्मातील लोक प्रयत्नशील होते. उदा. प्राचीन काळी चीनमध्ये बुध्द धर्माचा प्रसार करण्याचे प्रयत्न केले गेले. ख्रिस्ती मिशनऱ्यानी जगभर ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला. अशाप्रकारे धर्मप्रसार सुलभ करण्यासाठी मुद्रणकलेची गरज भासू लागली. यातूनच ''जर्मनी मधील संशोधक जॉन गटेनबर्ग यांनी मुद्रणकलेचा शोध लावला. त्यास मुद्रणकलेचा जनक म्हणतात.'' **(विद्यासागर, २०१३)** त्यांनी लावलेल्या मुद्रणाच्या शोधामुळे ग्रंथमुद्रण करणे सुलभ झाले. नंतरच्या काळात मुद्रणकला जगभर पसरत गेली. असे जे अगदी सुरूवातीला मुद्रित केलेले ग्रंथ होते. ते आद्य म्हणजेच सुरूवातीचे मुद्रित ग्रंथ होते. युरोपात मुद्रण कलेची सुरूवात पंधराव्या शतकात झाली. जे ग्रंथ सुरूवातीच्या काळात मुद्रित झाले. त्यांना 'बाल्यावस्थेतील ग्रंथ' असे संबोधण्यात आले. अशा मुद्रित ग्रंथांना आद्यमुद्रिते असे म्हटले जाते. या आद्य किंवा बाल्यावस्थेतील मुद्रित ग्रंथांना 'दोलामुद्रिते' म्हणजे मुद्रणकलेच्या आरंभ काळातील मुद्रित पुस्तके म्हणतात. इंग्रजीमध्ये त्यांना Incunabula असे म्हटले जाते. इ.स.१५०० पर्यंत मुद्रित झालेल्या ग्रंथांचा समावेश Incunabula मध्ये होतो. परंतु भारतामध्ये इ.स. १५०० पूर्वी मुद्रणकलेचा विकास झालेला नव्हता. त्यामुळे भारतामध्येही कालमर्यादा १८०० ते १८६७ अशी आहे. म्हणजेच भारतात इ.स.१८०० ते इ.स. १८६७ कालावधीमध्ये मुद्रित झालेल्या ग्रंथांना दोलामुद्रिते असे म्हणतात.

भारतामध्ये ग्रंथालयाचे अस्तित्व अगदी प्राचीन नालंदा, तक्षशिला, विक्रमशीला इत्यादी विद्यापीठाच्या ग्रंथालयापासून आढळत असले तरी ग्रंथालय चळवळ खऱ्या अर्थाने आधुनिक काळापासून सुरू झाली. डॉ. एस.आर. रंगनाथन यांनी भारतात ग्रंथालय चळवळ सुरू केली. ग्रंथालय हे सामाजिक व सांस्कृतिक केंद्र असून ते जीवनाचा अविभाज्य घटक आहे.

''ग्रंथालय चळवळीच्या उद्दिष्टामध्ये सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना करणे, ग्रंथालय सेवक व वाचक यामध्ये सुसंवाद घडवून आणणे, ग्रंथालयास चिरस्थाई स्वरूप प्राप्त करून देणे, सामाजिक, सांस्कृतिक, बौध्दीक पातळी वाढविणे इत्यादी जीवनमुल्यांची जोपासना करणे यांचा समावेश होतो. त्यादृष्टीने व्यक्ती, ग्रंथालय संघ, यासारख्या खाजगी संस्था, शासकीय संस्था यांनी केलेल्या कार्याचा इतिहास म्हणजे ग्रंथालय चळवळीचा इतिहास होय.'' **(जोशी, १९७६)**

बडोद्याचे संस्थान श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनी खऱ्या अर्थाने भारतातील ग्रंथालय चळवळीचा प्रारंभ केला. त्यांनी आपल्या संस्थानातील केलेल्या मध्यवर्ती जिल्हावार, तालुकावार व ग्रामवार ग्रंथालयांच्या योजनाबंध स्थापनेने झाला. बडोदा संस्थानात सरकारच्या उत्तेजनाने श्री अमीन मित्र मंडळ, १९०६ ही संस्था स्थापन करून २४८ ग्रंथालयाची स्थापना केली. १९२४ मध्ये ग्रंथालय संघाचे बडोदा येथे कार्य सुरू झाले. ग्रंथालय शास्त्राची सुरवात भारतात बडोदा संस्थानात करण्यात आली. मद्रास, म्हैसूर, बंगाल, पंजाब, मुंबई या प्रांतामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात ग्रंथालय क्षेत्रात मोठी प्रगती झाली. डॉ.एस.आर. रंगनाथन यांच्यासारख्या ग्रंथालय क्षेत्रातील नामवंताबरोबर समाजसेवक, राजकीय नेते व देणगीदार यांचे पाठबळ ग्रंथालय चळवळीस लाभत गेले. १९२८ मध्ये मद्रास ग्रंथालय संघाची स्थापना झाली. या ग्रंथालय संघाने भाषणे, प्रचारदौरे, विद्यार्थी व सार्वजनिक ग्रंथालयांना उपयुक्त ठरेल असे सुची कार्य इत्यादी मार्गाने ग्रंथालय चळवळ वाढविण्याचे कार्य केले.

१९५७ मध्ये डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. देशातील नागरिकांना ग्रंथालय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी निर्माण करण्यात आली. प्रगत राष्ट्रीय सेवा व परस्पर सहकार्य साधण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालय कायदे करण्यात आले. भारतात तामीळनाडू १९४८, आंध्रप्रदेश १९६०, कर्नाटक–अरूणाचल प्रदेश २०१० मंजूर करण्यात आले. स्वतंत्र अशी ग्रंथालय खाती कायद्याने अस्तित्वात आली असून सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना आणि संघटन हे कार्य ग्रंथालय संघटनेच्या सहकार्याने होत आहे.

३.२ व्याख्या :

अ.का. प्रियोळकर यांना 'दोलामुद्रित' या शब्दाचे जनक संबोधले जाते. त्यांनीच सर्वप्रथम दोलामुद्रित या शब्दांचा वापर Incunabula या संज्ञेला पर्यायी शब्द म्हणून योजला. इंग्रजीमध्ये

Cunae म्हणजे लॅटीन भाषेत पाळणा. पाळण्याला संस्कृत भाषेत दोला असे म्हटले जाते. त्यावरून Incunabula म्हणजे 'दोलामुद्रिते' असे मराठीकरण करण्यात आले आहे.

Oxford English Dictionary मध्ये Incunabula या शब्दाचे वर्णन "Books produced in the infancy of printing spec. those printed before 1500" **(Simpson, 1989)** असे केलेले आहे.

३.३ दोलामुद्रिताचा इतिहास :

मुद्रणकलेचा उगम चीनमध्ये बौध्द धर्माच्या प्रसारासाठी करण्यात आला. त्याच्या मुळाशी धर्म भावना होती. बुध्दाची चित्रे, बुध्दाची शिकवण इत्यादी गोष्टींचा प्रसार करण्यासाठी यांच्या अनेक प्रती निर्माण करून त्या मोठ्या प्रमाणात वितरीत करणे गरजेचे होते. या गरजेपोटी चीनमध्ये अनेक प्रयोग केले गेले. कागदाला सुया टोचून टोचून चित्रे काढणे व तो कागद भिंतीवर धरून त्यावर रंग लावणे किंवा शिळेवर चित्र किंवा अक्षरे कोरून त्यावर कागद ठेवून तो रंगाने घासणे. पुढच्या काळात लाकडावर बुध्दाच्या मूर्ती कोरून हे ठसे कागदावर उठविण्याची कल्पना निघाली. मुर्तीच्या खाली मजकूरही लिहिलेला असे. याची सुरवात ''चीनमध्ये इ.स. ६५० मध्ये झाली. अशा प्रकारे छापलेला 'हीरक सूत्रे' नावाचा ग्रंथ सर ऑरेल स्टेन यांना चीनमध्ये 'सहस्त्र बुध्दाची गुहा' नावाच्या ठिकाणी १९०७ साली सापडला. सध्या तो ब्रिटीश म्युझिअममध्ये संग्रहीत असून त्यावर चारशे अडूसष्ट बुध्दाच्या चित्रांचे ठसे आहेत. हे जगातील ज्ञात पहिले पुस्तक मानले जाते. त्याचा काळ इ. स. ८६८ आहे.'' **(प्रियोळकर, १९६३)** हे आजच्या सारखे बायडिंगचे पुस्तक नाही तर एक फूट रूंद व सोळा फूट लांब असे हे कागदाचे गुंडाळे असून सात कागद एकाला एक जोडून तयार केलेले आहेत.

३.३.१ मुद्रणकलेची सुरूवात :

गटेन बर्ग यांनी इ.स. १४५० मध्ये जर्मनी मधील 'मेन्स' या ठिकाणी मुद्रणकलेची सुरूवात केली. इ.स.१४५९ मध्ये जर्मन शहराच्या पतनानंतर गटेन बर्गचे अनेक अनुयायी 'कलोनला' स्थलांतरीत झाले. यामुळे संपूर्ण युरोपभर मुद्रणकलेचा प्रसार झपाट्याने झाला. इ.स.१४७० मध्ये युरोपमध्ये चौदा मुद्रणालये अस्तित्वात होती. पुढील दहा वर्षांच्या काळात (इ.स. १४८०) ही

मुद्रणालयाची संख्या शंभर पर्यंत पोहोचली होती. पुढील काळात ही कला जर्मन, फ्रान्स, इटली येथे पोहोचली. हॉलंडमध्ये या कलेची सुरूवात इ.स. १४७२ मध्ये झाली. तर बेल्जीयम, स्पेन, इंग्लंडमध्ये मुद्रणकलेचे लोण अनुक्रमे १४७३, १४७४, १४७७ साली पोहोचले.

३.३.२ भारतात मुद्रणकलेची सुरूवात :

सर्वसामान्यपणे युरोपमध्ये इ.स.१५०० पर्यंत मुद्रित झालेल्या पुस्तकांना फार महत्व असून त्यांना Incunabula म्हणतात. याचेच 'दोलामुद्रिते' असे मराठीकरण करण्यात आले. युरोपमध्ये Incunabula ची कालमर्यादा इ.स.१५०० निश्चित ठरलेली आहे. परंतु भारतातील दोलामुद्रितांना ही कालमर्यादा लागू पडत नाही. कारण इ.स.१५०० पर्यंत आपल्याकडे मुद्रणकलेचा प्रवेश झालेला नव्हता. वास्तविक पाहता, इ.स.१५५६ मध्ये गोव्यात छापखाना स्थापन झाला होता. स्टीफनचे मराठी ख्रिस्तीपुराण इ.स.१६१६ मध्ये रोमन लिपीमध्ये छापले गेले. त्यानंतर ''इ.स.१६२२ मध्ये गोमंतकी मराठी भाषेतील दौत्रिन ख्रिस्ता (ख्रिस्ती धर्मतत्व) हे पुस्तक मुद्रित केले होते. हा गोव्यातील पहिला मराठी उपलब्ध ग्रंथ होय.'' **(मोरजे, १९९५)**

''अशा प्रकारचे कांही ख्रिस्ती ग्रंथ सतराव्या शतकात गोव्यात छापले गेले. परंतु मुद्रणकलेची खऱ्या अर्थाने भारतातील सुरूवात एकोणीसाव्या शतकाच्या सुरूवातीला देवनागरीचे खिळे तयार झाल्यापासून मानले पाहिजे. डॉ. कॅरे यांचे श्रीरामपूर येथे छापलेले 'मराठी ग्रामर' हे पहिले मुद्रित मराठी पुस्तक होते.'' **(दडकर, १९९८)** हितोपदेश मराठी ग्रंथ तेथे नंतर मोडी लिपीत छापण्यात आले. भारतात दोलामुद्रितांची मर्यादा इ.स. १८५० पर्यंत मानावी असे कांही विचारवंतांचे मत होते. परंतु ही मर्यादा केवळ मराठी ग्रंथाच्या पुरताच विचार करून ठरविता येणार नाही, तर भारतातील इतर भाषाही विचारात घ्याव्या लागतील. गुजरातचा विचार केला तर, इ.स.१८५० पर्यंत फारच थोडे ग्रंथ मुद्रित झाल्याचे आढळते. त्यामुळे कांही विचारवंतांनी इ.स. १९०० ही भारतातील दोलामुद्रितांची कालमर्यादा धरावी असे मत व्यक्त केले. पण हा काळ आधुनिक वाटतो. त्यामुळे दुर्मीळ ग्रंथांच्या महत्वाच्या दृष्टीने इ.स. १८६७ ही कालमर्यादा ठरविण्यात आली.

''भारतातील दोलामुद्रितासाठी इ.स.१८६७ हीच कालमर्यादा ठरविण्यामागील महत्वाचे कारण म्हणजे इ.स.१८६७ साली हिंदुस्थान सरकारचा देशी प्रकाशन नोंदणीचा पंचवीसावा कायदा पास झाला आणि ग्रंथ संरक्षणाच्या दृष्टीने एक नवे पर्व सुरू झाले असे म्हणता येईल. पुर्वीचा इ.स.१८४७ सालचा प्रकाशनाचा विसावा कायदा अस्तित्वात होता. परंतु या कायद्यामध्ये ग्रंथकाराच्या मालकी हक्काच्या रक्षणापलिकडे ग्रंथ संरक्षणाची दृष्टी बिलकूल नव्हती. या बाबीच्या तरतुदी १८६७ च्या कायद्यात आढळतात.''**(गावस्कर, १९६१)** या कायद्याप्रमाणे प्रत्येक प्रकाशनाच्या तीन प्रती मुद्रित झाल्याबरोबर एक महिन्याच्या आत सरकारकडे पाठवाव्यात असे ठरले. या तीन प्रतीचा विनियोग कसा करावा हे पंचवीसाव्या ॲक्टचे अकरावे कलम पाहिल्यास समजते.

अशा प्रकारची तीन प्रतींपैकी पहिली प्रत भारत सरकारकडे नेमलेल्या सचिवाकडे पाठवावी. दुसरी प्रत भारताच्या गर्व्हनर जनरलकडे पाठवावी आणि तिसरी प्रत सार्वजनिक ग्रंथालयामध्ये किंवा स्थानिक सरकारकडे सुपुर्द करावी. या कायद्याचा विचार करता, त्याच्या मुळाशी देशामध्ये मुद्रित झालेल्या ग्रथांच्या संरक्षणाची जबाबदारी दिसून येते. पण या विचारांचा उगम इंग्लंडमध्ये झाला होता. इ.स.१८६३ मध्ये The Royal Asiatic Society of Great Britain and Ireland या संस्थेच्या अधिकाऱ्याने The Secretary of State for India यांना पत्र लिहून हिंदुस्थानात संस्कृत आणि इतर देशी भाषांमध्ये प्रसिध्द झालेल्या ग्रंथांची माहिती युरोपमधील अभ्यासकांना नसते यासाठी हिंदुस्थानात प्रकाशित झालेल्या ग्रंथांची एक शक्य तितकी नामावली तयार करावी. यापुढे प्रसिध्द होणाऱ्या ग्रथांच्या त्रैमासिक याद्या सादर करण्याची विनंती केली होती.

३.४ मराठी दोलामुद्रितांचा कालावधी :

मराठी ग्रंथ प्रकाशनाचा विचार करता इ.स.१८०० ते १८६७ या कालखंडामध्ये जी पुस्तके मुद्रित करण्यात आली, ती सर्व दोलामुद्रिते म्हणून संबोधली जातात. सदरचा दोलामुद्रितांचा कालावधी अ. का. प्रियोळकरांनी मान्य केलेला आहे. अगदी सुरूवातीला युरोपमधील दोलामुद्रितांचा कालावधी इ.स. १५०० पर्यंतचा असल्यामुळे तो मराठी दोलामुद्रितांकरीता १८०० ते १८५० असा मान्य केला होता. पण नंतर तो १८५० वरून १८६७ पर्यंत वाढविला. 'ख्रिस्ती पुराण' सारखा मराठी ग्रंथ

सोळाव्या शतकाच्या प्रारंभी मुद्रित झाला असला तरी तो रोमन लिपीमध्ये असल्यामुळे खऱ्या अर्थाने मराठी मुद्रण होऊ शकत नाही. खऱ्या अर्थाने मराठी मुद्रणाची सुरूवात एकोणीसाव्या शतकाच्या सुरूवातीलाच झाली. त्यामुळे इ.स.१८५० चा कालावधी मराठी दोलामुद्रितासाठी मानावा असे प्रियोळकरांनी आपल्या भाषणामध्ये मत व्यक्त केले होते. पण ही कालमर्यादा निश्चित करताना प्रियोळकरांनी फक्त मराठी ग्रंथांचा विचार केला होता. पण गुजराती दोलामुद्रितांचा अभ्यास केला असता असे दिसून आले की, पारशी लोकांनी सुरूवातीस गुजराती दोलामुद्रिताचे कार्य केले. इ.स. १८५० पर्यंतचे गुजराती मुद्रित ग्रंथ हे प्रामुख्याने पारशी लोकांचे आहेत. हिंदू किंवा मुस्लीम लोकांनी मुद्रित केलेले ग्रंथ फारच कमी असल्यामुळे इ.स. १८५० ही कालमर्यादा सर्वमान्य झाली नाही. काहींच्या मते इ.स.१९०० ही हिंदुस्थानातील दोलामुद्रितांची मर्यादा धरावी. पण १९०० हा काळ अगदी आधुनिक वाटतो. त्यामुळे ही कालमर्यादा मान्य झाली नाही.

या सर्व घडामोडीचा सारासार विचार करून मराठी दोलामुद्रिताचा कालावधी १८५० वरून १८६७ करण्यात आला. इ.स. १८०५ मध्ये 'मराठी भाषेचे व्याकरण' हे पहिले पुस्तक विल्यम कॅरे यांनी प्रसिध्द केले. त्याचबरोबर १८६७ साली हिंदुस्थानचा देशी प्रकाशनाचा पंचविसावा कायदा पास झाला. त्यामुळे मराठी दोलामुद्रितांचा कालावधी १८५० वरून १८६७ असा ठरविण्यात आला. इ.स. १८४७ पूर्वी प्रकाशनाच्या नोंदणीचा विसावा कायदा अस्तित्वात होता. परंतु त्यात ग्रंथकाराच्या मालकी हक्काच्या रक्षणाकडे जास्त लक्ष देण्यात आले होते. ''२२ मार्च, १८६७ रोजी The Press and Registration of Books Act (१८६७ मधील २५ वे कलम) कायदा करण्यात आला. मुद्रणालयाच्या कारभाराला शिस्त लावणे आणि हिंदुस्थानात छापल्या जाणाऱ्या प्रत्येक पुस्तकाची व वृत्तपत्राची नोंद होणे आवश्यक झाल्यामुळे हा कायदा करण्यात येत आहे असा कायद्याचा हेतू स्पष्ट केला.''**(गावस्कर, १९६१)** म्हणजेच या कायद्यामुळे १८६७ नंतर मराठी भाषेत मुद्रित झालेल्या ग्रंथांची नोंद व्यवस्थित होत गेली. त्यामुळे इ.स.१८६७ पूर्वीच्या मुद्रित झालेल्या मराठी ग्रंथांना जास्त महत्वाचे मानून अ. का. प्रियोळकरांनी त्यांना मराठी 'दोलामुद्रिते' म्हणावे असे आपल्या भाषणात जाहीर केले होते. आणि हा कालावधी अनेक लोकांना योग्य वाटला. प्रसिध्द मराठी सुचीकार शं. ग.

दाते यांना हा कालावधी पसंत पडला होता. अशाप्रकारे १८६७ ही कालमर्यादा मराठी दोलामुद्रितासाठी विचाराअंती ठरविण्यात आली.

३.५ मराठी दोलामुद्रितांचा पहिला प्रयत्न :

बऱ्याच विचाराअंती मराठी दोलामुद्रितासाठी ठरविण्यात आलेली. १८०० ते १८६७ ही कालमर्यादा सर्वमान्य झाली. दरम्यानच्या काळात मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाने गुंजीकर व्याख्यानमाला आयोजित केली होती. यामध्ये सुध्दा याच कालावधीवर शिक्कामोर्तब करण्यात आला. मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या सुवर्ण महोत्सव इ.स. १९४९ मध्ये साजरा केला गेला. त्यावेळी ग्रंथ संग्रहालयाचे ग्रंथपाल पु. ह. सहस्त्रबुध्दे यांनी इ.स. १८६७ अखेर मुद्रित मराठी ग्रंथाची वर्णनात्मक नामावली तयार केली होती. या ग्रंथाची प्रस्तावना अ. का. प्रियोळकरांनी ग्रंथ वर्णन व ग्रंथ संरक्षण या विषयावरील प्रास्ताविक निबंध या शीर्षकाखाली लिहिली. सदरच्या प्रस्तावित मराठी दोलामुद्रितांची १८६७ ही अखेरची कालमर्यादा आम्ही ठरविली असा उल्लेख आढळतो. यावरून असे म्हणता येईल की या ग्रंथ रचनेमध्ये प्रियोळकरांचा अप्रत्यक्ष सहभाग होता. असे असले तरी ग्रंथसुची समितीच्या सभासदांची व पदाधिकारी यांची नांवे मराठी दोलामुद्रितांच्या पहिल्या आवृत्तीत आढळतात. त्यामध्ये प्रियोळकरांचे नाव आढळत नाही. अशाप्रकारे मराठी दोलामुद्रितांची सूची करण्याचा पहिला प्रयत्न करण्यात आला. ''या यादीत १९४८ पर्यंतच्या मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयात समाविष्ट असलेल्या ग्रंथांचा समावेश झाला आहे. यामध्ये २९३ नोंदी आढळतात.''**(गोगटे, २००८)**

याच्याही पूर्वी शंकर गणेश दाते यांच्या मराठी ग्रंथ वर्णन सूचीमध्ये २६२ मराठी आद्य मुद्रितांची म्हणजेच दोलामुद्रितांची यादी पहावयाला मिळते. मराठी दोलामुद्रितांच्या सूचीमध्ये दातेच्या सूचीतील ग्रंथ वर्ग क्रमांक दिलेले आढळतात.

३.६ मराठी दोलामुद्रितांचा दुसरा प्रयत्न :

प्रा. सुरेंद्र आ. गावस्कर यांनी संपादित केलेली मराठी दोलामुद्रितांची दुसरी आवृत्ती इ.स.१९६१ मध्ये प्रकाशित करण्यात आली. या दुसऱ्या आवृत्तीमधील ग्रंथ नामावली तयार करण्याचे

काम प्रियोळकरांच्या मार्गदर्शनाखाली झाले असा उल्लेख संपादकीय निवेदनात आढळतो. पण वास्तविक पाहता, दुसऱ्या आवृत्तीमध्ये प्रियोळकरांच्या पध्दतशीरपणाचा प्रयत्न कोठेही येत नाही. पहिल्या आवृत्तीतील ग्रंथनामावलीची रचना हे निवेदन दुसऱ्या आवृत्तीत विस्तृत केलेले असून प्रास्ताविक पूर्णपणे नवे आहे. यामध्ये मुद्रणकलेचा, भारतीय मुद्रणाचा, मराठी मुद्रणाचा इतिहास संक्षेपाने दिलेला आहे. 'The Printing Press in India' या प्रियोळकरांच्या ग्रंथांच्या आधारे वरील सर्व भाग लिहिलेला असावा. दुसरी आवृत्ती प्रियोळकरांच्या मार्गदर्शनाखाली झाली, असा उल्लेख संपादकीय निवेदनात केलेला आहे. पण या ग्रंथाचे बारकाईने निरीक्षण केले असता,पहिल्या आवृत्तीचे मुखपृष्ठ प्रियोळकरांच्या नजरेखालून गेले असावे, पण शीर्षकपृष्ठ मात्र त्यांच्या नजरेखालून गेलेले नसावे असे म्हणावे लागेल.

''मराठी दोलामुद्रितांच्या दुसऱ्या आवृत्तीत पहिल्या आवृत्तीपेक्षा ५५१ नोंदी अधिक आहेत. म्हणजेच दुसऱ्या आवृत्तीत ८४४ नोंदी आढळतात. १९६१ मध्ये म्हणजेच जवळजवळ अकरा वर्षांच्या अंतराने मराठी दोलामुद्रितांच्या सुचीची दुसरी आवृत्ती प्रसिध्द झाली.'' **(गावस्कर, १९६१)** दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत पहिल्या आवृत्तीमधील मूळ पुस्तकातील छायाचित्रे नाहीत. पण नामदर्शिका, विषयदर्शिका, मुद्रणालयेदर्शिका आहेत. यानंतर प्रमुख संदर्भ ग्रंथांची यादी दिलेली आहे.

३.७ दोलामुद्रितांचा तिसरा प्रयत्न :

इतर विषयातील दोलामुद्रिताप्रमाणे मराठी दोलामुद्रितांचा प्रवास हा जलद गतीने घडून आलेला नाही. पहिल्या व दुसऱ्या मराठी दोलामुद्रिताच्या आवृत्तीमध्ये जवळजवळ अकरा वर्षांचे अंतर होते. डॉ. गंगाधर मोरजे यांनी इ.स.१९९५ साली मराठी दोलामुद्रितांची तिसरी आवृत्ती संपादित केली. म्हणजेच दोलामुद्रितांच्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशनानंतर जवळजवळ चौतीस वर्षानंतर तिसरी आवृत्ती १९९५ साली गोमांतक मराठी अकादमीने प्रकाशित केली. तिसऱ्या आवृत्तीचे कार्य पूर्ण करण्यासाठी संपादक गंगाधर मोरजे व संपादक गोविंद काळे यांनी अथक परिश्रम घेतले होते. महाराष्ट्रातील काना–कोपऱ्यातील ग्रंथालयांना भेटी देऊन अनेक व्यक्तींचे खाजगी ग्रंथ तपासून या नोंदी जमवलेल्या आहेत. गंगाधर मोरजे यांनी परदेशातील विविध ग्रंथालयांना भेटी देऊन मराठी

दोलामुद्रितांच्या नोंदी जमविलेल्या आहेत. ''त्यांच्या या अजोड प्रयत्नाने दुसऱ्या आवृत्तीतील दोलामुद्रितांच्या नोंदी ज्ञात करण्यात तिसरी आवृत्ती यशस्वी झाली.'' **(मोरजे, १९९५)** मराठी दोलामुद्रिताची तिसरी आवृत्ती मैलाचा दगड ठरलेली आहे. या तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन अ. का. प्रियोळकरांच्या जन्मशताब्दीचा सांगता समारंभाचा मुहूर्त साधून केले होते. या आवृत्तीमध्ये पहिल्या आवृत्तीतील प्रस्तावना व दुसऱ्या आवृत्तीतील प्रास्ताविक दिले आहे. उदाहरणादाखल मूळ प्रस्तावनेतील पुस्तकांची पानाची छायाचित्रे दिलेली आहेत.

गंगाधर मोरजे यांच्या मराठी दोलामुद्रितांच्या तिसऱ्या आवृत्तीमध्ये दुसऱ्या आवृत्तीपेक्षा १०५६ पुस्तकांची भर घालण्यात आलेली आहे. त्यामुळे तिसऱ्या आवृत्तीत मराठी दोलामुद्रितांची एकूण संख्या १९०० इतकी झालेली आहे. प्रत्येक पुस्तकांच्या नोंदीखाली उपलब्धतेसंबंधी थोडक्यात माहिती दिलेली आहे. तिसऱ्या आवृत्तीत – १) ग्रंथ नामदर्शिका, ग्रंथकार, ग्रंथ सहाय्यक, २) संपादक – नामदर्शिका, ३) ग्रंथ विषयक दर्शिका अशा तीन सूची परिशिष्टात स्वतंत्रपणे दिलेल्या आहेत. दुसऱ्या आवृत्तीत नसलेल्या नोंदी या आवृत्तीमध्ये समाविष्ट करताना अशा नोंदी पुढे पोकळ चौकोनाची खूण दिलेली आहे. आणि ती नोंद कोठून घेतलेली आहे याचा संक्षेप्त शेवटी दिलेला आहे.

मराठी दोलामुद्रिताच्या पहिल्या आवृत्तीमध्ये मराठी दोलामुद्रिताच्या २९३ नोंदी आढळतात. दुसऱ्या आवृत्तीत ८४४ नोंदी आढळतात. तर तिसऱ्या आवृत्तीत त्यामध्ये आणखी १०५६ दोलामुद्रितांची भर घालून एकूण १९०० दोलामुद्रितांच्या नोंदी करण्यात यश मिळालेले आहे. असे असले तरीही दोलामुद्रितांच्या नोंदीची यादी परिपूर्ण असू शकत नाही. त्यामध्ये भविष्यात आणखी भर पडू शकते. कारण महाराष्ट्रातील भारतातील किंवा देशाबाहेरील, परदेशातील ग्रंथसंग्रहालये, व्यक्तीगत ग्रंथालये इत्यादी ठिकाणाहून आणखी दोलामुद्रिते उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

३.८ मराठी दोलामुद्रितांकरीता प्रियोळकरांचे योगदान :

मराठी दोलामुद्रितांच्या संशोधनात अ.का.प्रियोळकरांचे महत्वपूर्ण योगदान आहे. मराठी दोलामुद्रिताची मूळ कल्पना असो किंवा दोलामुद्रिते ही मराठीतील संज्ञा असून ही सर्व प्रियोळकरांची देणगी आहे. त्यामुळे मराठी संशोधक म्हणून साहित्य क्षेत्रात विशेषत: मराठी दोलामुद्रिताविषयी

प्रियोळकरांचे योगदान कधीच दुर्लक्षित करता येणार नाही. त्यांनी मुद्रणकलेपासून ते मराठी 'दोलामुद्रिते' या क्षेत्रातील परिपूर्ण अभ्यास केलेला आहे. इंग्रजी (Incunabula) साठी मराठीमध्ये दोलामुद्रिते ही पर्यायी संज्ञा सर्वप्रथम त्यांनीच वापरली आणि म्हणूनच त्यांना दोलामुद्रिते या संज्ञेचे जनक म्हणून संबोधले जाते. तसेच थोर संशोधक, भाषा शास्त्रज्ञ, साहित्यीक, मुंबई मराठी संशोधन मंडळाचे पहिले संचालक म्हणूनही ते सुपरिचीत आहेत. गोमंतक ही त्यांची जन्मभूमी होती. असे असले तरी त्यांच्या कार्याचा विचार केला असता, मुंबई ही त्यांची कर्मभूमी आहे. अ. का. प्रियोळकर यांच्या मार्गदर्शनाखाली इ.स. १९५० साली मराठी दोलामुद्रिते हा मराठी ग्रंथ प्रकाशित करण्यात आला. त्यांनी या ग्रंथाची प्रस्तावना लिहिली होती. या प्रस्तावनेत त्यांनी ग्रंथाविषयी अभ्यासपूर्ण विवेचन केले आहे. अशा प्रकारचा एखादा ग्रंथ व्हावा अशी त्यांची मनापासून इच्छा होती व त्याच्या पूर्ततेसाठी अथक प्रयत्न केले. 'ग्रंथ वर्णन व ग्रंथ संरक्षण' या शीर्षकाखाली त्यांनी लिहिलेल्या निबंधवजा प्रस्तावनेमध्ये विषयाची व्यापक माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. ही प्रस्तावना दोलामुद्रित संकल्पनेचा लक्षणीय नमुना आहे. त्यांच्या या योगदानासाठी गोमंतक मराठी साहित्यीक अकादमीने ५ सप्टेंबर, १९९४ ते ५ सप्टेंबर, १९९५ या कालावधीत विविध कार्यक्रम, उपक्रमाद्वारे साजऱ्या केलेल्या जन्मशताब्दी वर्षात मराठी दोलामुद्रिते या ग्रंथाची तिसरी सुधारित आवृत्ती त्यांना अर्पण केली आहे.

३.९ पुणे विद्यापीठातील मराठी दोलामुद्रिते :

''पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयाच्या ग्रंथ संग्रहामध्ये समाविष्ट असलेल्या मराठी दोलामुद्रित ग्रंथाची तालिका ग्रंथालयाचे ग्रंथपाल शां.ग.महाजन यांनी संकलित केली होती. ही तालिका पुणे विद्यापीठाने इ.स.१९८९ साली प्रसिध्द केली.''**(महाजन, १९८९)** शां.ग.महाजन यांनी तयार केलेल्या तालिकेत चाळीस पृष्ठे असून त्यापैकी सव्वीस पृष्ठात मराठी दोलामुद्रितांची यादी कालानुक्रमे दिलेली आहे. या वैशिष्ट्यपूर्ण तालिकेत महाजन यांनी प्रत्यक्ष ग्रंथाचे अवलोकन करून प्रस्तुत सूची तयार केली असल्यामुळे दोलामुद्रित ग्रंथाचे काटेकोरपणे वर्णन करण्याकडे भर दिलेला आहे. या सुचीमध्ये एकूण एकशे सात मराठी दोलामुद्रित ग्रंथांचा समावेश आहे.

सदरच्या मराठी दोलामुद्रितांची प्रस्तुत यादी तयार करण्याच्या उपक्रमामुळे संशोधक साहित्यीक, वाचक इत्यादी वर्गाची फार मोठी सोय झालेली आहे. पुणे विद्यापीठाने मराठी दोलामुद्रितांचा

शोध घेवून प्रसिध्द केलेल्या या तालिकेचा समावेश इ.स.१९९५ मध्ये प्रसिध्द झालेल्या मराठी दोलामुद्रिताच्या तिसऱ्या आवृत्तीत झाला नाही. त्यामुळे पुणे विद्यापीठाने प्रसिध्द केलेली मराठी दोलामुद्रितांची तालिका थोडी दुर्लक्षित राहिली असे म्हणावे लागेल. महाजन यांनी इ.स.१९६४–६५ मध्ये सुरूवातीला तयार केलेली ही सूची चक्रमुद्रित स्वरूपात होती. परंतु पुणे विद्यापीठाने ही सूची इ.स.१९८९ मध्ये स्वतंत्र पुस्तकाच्या स्वरूपात प्रकाशित केली. त्यामुळे अभ्यासकांना व वाचकांना ही सूची उपलब्ध झाली आहे.

पुणे विद्यापीठाच्या या उपक्रमाचे अनुकरण इतर विद्यापीठांनीही करावे की जेणेकरून त्यांच्या ग्रंथ संग्रहामध्ये असलेली मराठी दोलामुद्रिते अभ्यासक, संशोधक, विद्यार्थी यांना वाचनासाठी उपयोगी पडतील. मराठी दोलामुद्रित सूची विकासामध्ये अनेक संस्थांचे व व्यक्तींचे योगदान इ.स.१९४९ ते १९९५ या कालावधीत झालेल्या प्रयत्नातून दिसून येते. यामध्ये प्रामुख्याने अ.का. प्रियोळकर, मार्शल, सुरेंद्र गावस्कर, पुणे विद्यापीठ, शां.ग.महाजन, गंगाधर मोरजे, गोमंतक मराठी अकादमी इत्यांदीच्या मराठी दोलामुद्रिताबाबतीत केलेल्या कार्याचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. इ.स.१९६७ पूर्वी प्रकाशित झालेल्या दोलामुद्रितांची माहिती मिळाल्याने अभ्यासकांना व संशोधकांना तत्कालिन परिस्थितीचा अंदाज घेणे शक्य होते, त्याचबरोबर साहित्याचा, वाङ्मयाचा मागोवा घेता येतो. याच कारणामुळे १८६७ पूर्वीच्या मुद्रितांना विशेष मानून त्यांचा शोध घेणे अतिशय आवश्यक आहे.

३.१० दोलामुद्रितांची सद्य:स्थिती :

तक्ता क्र. ३.१

क्र.	आवृत्ती	प्रकाशन	संपादक	दोलामुद्रिते
१.	पहिली	१९४९	प.ह.सहस्त्रबुध्दे	२९३
२.	दुसरी	१९६१	सुरेंद्र गावस्कर	५५१
३.	तिसरी	१९९५	गंगाधर मोरजे	१०५६
	एकूण			**१९००**

मराठी दोलामुद्रिताच्या सद्य:स्थितीचा मागोवा घेण्यासाठी इ.स.१९४९ ते १९९५ या कालखंडात प्रसिध्द झालेल्या मराठी दोलामुद्रित ग्रंथ सूचीच्या तिन्ही आवृत्तींचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते.

वरील तक्त्याचे निरीक्षण केल्यास असे दिसून येते की, इ.स.१९४९ ते १९९५ या कालावधीत म्हणजेच मागील पन्नास वर्षात जसजशी नवनवीन दोलामुद्रिते ज्ञात होत गेली, तसतशी ही संख्या वाढत जाऊन १९०० वर येऊन पोहोचली आहे. महाराष्ट्रातील ग्रंथालयामध्ये जाऊन त्यांच्या ग्रंथसंग्रह दोलामुद्रितांचा गांभीर्याने शोध घेतला तर दोलामुद्रितांची संख्या अजूनही वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. शतकोत्तरी, सार्वजनिक ग्रंथालये, विद्यापीठीय ग्रंथालये, खाजगी ग्रंथसंग्रह, इत्यादी ग्रंथालयांचा अभ्यास केला तर नवीन दोलामुद्रितांचा तपशील समोर येईल आणि मराठी दोलामुद्रितांच्या सुचीची चौथी आवृत्ती प्रसिध्द करणे शक्य होईल यात शंका नाही.

३.११ मराठी दोलामुद्रितांचे जतन व संवर्धन:

''मराठी दोलामुद्रिते ही अतिशय मौल्यवान अशी ग्रंथ संपदा असल्याने त्याचे जतन व संवर्धन करणे महत्वाचे आहे. सर्वप्रथम दोलामुद्रिताचा कागद कोणत्या प्रकारचा आहे हे पाहिले पाहिजे. कागदाचा टिकाऊपणा हा कागद बनविण्याच्या प्रक्रियेत सामावलेला असतो. कागद बनविण्यासाठी जे घटक वापरले जातात, त्यावर कागद नाशवंत होण्याची कारणे समाविष्ट असतात.'' **(करमरकर, २००५)** दोलामुद्रितांचे जतन करण्यासाठी घ्यावयाची काळजी.

३.११.१ आम्ल गुणधर्म नाहीसे करण्याची पध्दत :

आम्ल गुणधर्म नाहीसे करण्यासाठी प्रयोगशाळेची गरज असते. मुंबईत एशियाटीक सोसायटीच्या ग्रंथालयात प्रयोगशाळा आहे. दिल्ली व लखनौ येथे इंटॅक नावाची संस्था असे कार्य करते व प्रशिक्षण देते. अनेक ग्रंथांचे एकाच वेळी आम्ल गुणधर्म नाहिसे करण्यासाठी वे टू सिस्टीम आणि एनकॅपसुलेशन अशा पध्दतींचा वापर करता येतो.

३.११.२ मानवी कारणे :

कागदांचे जे निरनिराळे शत्रू आहेत, त्यात माणसाचा क्रमांक पहिला लागतो. कागदाची हाताळणी, कागद दुमडणे, ग्रंथांमध्ये पेन, पेन्सील, केसांना लावायच्या पिना, दगड अशा वस्तू खूण म्हणून ठेवणे,खाद्यपदार्थ,तेल,पाणी ह्यांच्या सानिध्यात कागद ठेवणे,यामुळे ग्रंथांचे कागद खराब होतात,त्याकरीता कर्मचारी व वाचक वर्ग यांना योग्य प्रशिक्षणाची गरज असते.

३.११.३ तापमान आणि सापेक्ष आर्द्रता :

अधिक तापमान आम्ल घटक वाढविण्यासाठी कारणीभूत ठरते. त्यामुळे कागद ठिसूळ होऊन फाटू लागतो. सापेक्ष आर्द्रताचे प्रमाण ३०% पेक्षा कमी झाल्यास कागदावर विपरीत परिणाम होतो. त्याकरीता तापमान २०° + २° सेल्सिअस तर सापेक्ष आर्द्रतेचे प्रमाण ४७% + २% हे आदर्श मानले आहे. आपला देश विषुववृत्तीय पट्ट्याखाली येत असल्यामुळे तापमान बऱ्याच ठिकाणी ३०° सेल्सिअसच्या वर जाते हे कागदाला घातक ठरते.

३.११.४ सूर्यप्रकाश :

ग्रंथावर थेट सूर्यप्रकाश पोहोचणे ग्रंथांस घातक आहे. विजेचे प्रखर दिवे, कागदामधील आम्ल घटक वृध्दींगत करू शकतात. त्याकरीता आवश्यक उजेड राहील याची काळजी घ्यायला हवी. ग्रंथालयात दिव्यांची योग्य रचना करणे गरजेचे असते.

३.११.५ वातावरणातील हानीकारक घटक :

हवेतील धूर, धूळ, कचरा, पाणी, तेल, औद्योगिकीकरणामुळे हवेत मिसळणारे विविध तऱ्हेचे वायू, अशुध्द घटक, कोळशाच्या भुकटीसारखे पदार्थ अशा घटकाच्या सानिध्यात कागद आल्यास त्यावर एक प्रकारचा थर तयार होतो. त्यामुळे कागदाचे आयुष्य कमी होते. त्यासाठी जास्तीत जास्त दक्षता घेणे आवश्यक ठरते.

३.११.६ विविध कीटक, जीवजंतू व अन्य प्राणी :

सिल्व्हर फिश, उधई, कुंभार, कुंभारीण, निरनिराळे किडे, जंतू, वाळवी, झुरळे, उंदीर, घुशी हे जीवजंतू कागदाला घातक ठरू शकतात. कुंभारीण कागदाच्या थरांमध्ये घर बनविते. पुस्तके चिकटविण्यासाठी खळ लावलेली असते. ती खाण्यासाठी किटक पुस्तकात शिरतात. वाळवीला पुस्तकाचा कॅन्सर समजले जाते. बुरशी कागदाचा शत्रू आहे. ज्यावेळी कागदाला कसर लागते, तेव्हा तो कागद निरूपयोगी ठरतो. त्यामुळे या सर्वांच्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे असते.

३.११.७ दोलामुद्रित पुस्तकांचे संरक्षण करताना घ्यावयाची काळजी :

१. नियमित स्वच्छता करावी. सर्व परिसर झाडून पुसून स्वच्छ ठेवावा.

२. आवश्यकतेनुसार कागदाची डागडुजी करावी.

३. वायुविजन व योग्य तऱ्हेने उजेडाची व्यवस्था ठेवावी.

४. कडूनिंबाचा पाला, डांबर गोळ्यांचा वापर करावा.

५. नियमितपणे औषधाची फवारणी करावी.

६. आवश्यकतेनुसार ग्रंथांची बांधणी करून घ्यावी.

७. आपत्कालीन व्यवस्था सज्ज ठेवावी.

८. वाळूने भरलेल्या बादल्या, फायर इक्स्टिंग्युशर इ. साधने ठेवावीत.

९. ग्रंथालयीन कर्मचारी व वाचकांना ग्रंथ हाताळणीची माहिती द्यावी.

१०. दोलामुद्रित ग्रंथसंग्रह वातानुकुलीत खोलीमध्ये ठेवावा.

अशाप्रकारे मराठी दोलामुद्रित पुस्तकांचे जतन व संवर्धन करता येते. पण सद्य:स्थितीचा विचार करता, डीजिटायझेशन तंत्राचा वापर करणे काळाची गरज ठरत आहे. मराठी दोलामुद्रितांचे डीजिटायझेशन केल्यास त्यांचे जतन व संवर्धन होईल. पण त्याचबरोबर हे ग्रंथ वाचकांना आवश्यकतेनुसार कोठूनही कधीही ऑनलाईन मिळविता येतील व त्यांचा वापर वाढेल.

३.१२ अंकीकरण (डीजिटायझेशन) :

आजच्या या माहिती तंत्रज्ञानाच्या काळामध्ये अंकीकरण हा मराठी दोलामुद्रितांचे जतन व संवर्धन करणेसाठी एक प्रभावी मार्ग आहे. अंकीकरणामुळे मराठी दोलामुद्रितांचे संरक्षण होते. त्याचबरोबर संशोधक, अभ्यासक व विद्यार्थी यांना मराठी दोलामुद्रितांपर्यंत जाण्याचा मार्ग सोपा होतो. दुर्मिळ साहित्यातील माहिती सर्वांसाठी उपलब्ध होणे आवश्यक असते व त्यासाठी जतन करणे आवश्यक असते. या दोन्ही गोष्टी परस्परांना पूरक आहेत. यासाठीच आधुनिक तंत्रज्ञाची कास धरत जुन्या वाचन साहित्याचे डिजिटायझेशन करून एकाच वेळी हे दोन्ही हेतू साध्य करता येतात. डिजिटायझेशन या प्रक्रियेत प्रगत तंत्र आणि तंत्रज्ञानाच्या आधारे मुद्रित माहिती साधनाचे इलेक्ट्रॉनिक किंवा डिजिटल माध्यमात परिवर्तन केले जाते.

३.१२.१ अंकीकरण म्हणजे काय ?

व्याख्या :

३.१२.१.१ "Digitization is the process of converting analog signals or information of any form into a digital format that can be understood by computer systems or electronic devices." (https//www.techopedia.com> definition) (accessed on 26.07.2018)

३.१२.१.२ ''डिजीटायझेशन म्हणजे कोणत्याही दस्तऐवजांचे इलेक्ट्रॉनिक छायाचित्र. ही डिजीटल इमेज अनुक्रम सारणीनुसार शोधून एकाच वेळी अनेक संगणकावर पाहता येऊ शकेल अशी व्यवस्था.''(www.maharashtra times.com. 6th July, 2012)

३.१२.२ डिजिटायझेशन प्रक्रियेसाठी आवश्यक साधनसामुग्री :

डिजिटायझेशन प्रक्रियेसाठी खालील साधनसामुग्री आवश्यक असते. डिजिटायझेशन प्रक्रियेसाठी उपकरणे, साधनसामुग्री निवडताना ती गुणवत्तापूर्वक आणि दोलामुद्रित पुस्तकांचे नुकसान होणार नाही हे लक्षात घ्यावे.

* Hardware -

  Scanner : H. P. Scan Jet, Drum scanner, Slide scanner, Microfiliming scanner, Microbox GmBH - Book 2 Net, Digital Camera.

  Computer : Server, P.C. with multimedia, CD writer, UPS, Air Conditioners.

* Software -

  Server Operating System for server

  Scanner Software

  Software for Editing

  OCR Software

  Software for creation of formats (PDF, TIFF, TXT, RTF)

डिजिटायझेशन ही खर्चिक आणि वेळखाऊ प्रक्रिया आहे. त्यामुळे सर्वच पुस्तकांचे डिजिटायझेशन करायचे की फक्त दोलामुद्रित दुर्मिळ पुस्तकांचे करायचे हे प्रथम ठरवावे लागते. नेमक्याच पुस्तकांचे डिजिटायझेशन करायचे असल्यास विद्वान तज्ज्ञांचे मार्गदर्शन घ्यावे. दोलामुद्रित पुस्तकांची तालिका किंवा सूची असणे महत्वाचे आहे. जर दुर्मिळ पुस्तकांची सविस्तर तालिका केली नसेल तर निदान साधारण सूची तयार करावी. डिजिटायझेशन करताना त्यांची अवस्था लक्षात घेणे आवश्यक आहे. दोलामुद्रिते हाताळताना नाजूक हातानेच हाताळावीत. एखादे दोलामुद्रित जीर्ण झाले असल्यास ते हाताळताना विशेष काळजी घ्यावी. दोलामुद्रितांचे डिजिटायझेशन करण्याबरोबरच त्याच्यावर योग्य उपचार करणे आवश्यक आहे. दोलामुद्रित स्वच्छ करण्यासाठी किंवा त्यावरील धूळ काढण्यासाठी मऊ केसांचा ब्रश (Soft bristled paint brush) वापरावा.

३.१२.३ ग्रंथालय अंकीकरण प्रकल्प :

ग्रंथालयामध्ये अंकीकरण विविध दृष्टीकोनातून, विविध कारणांमुळे केले जाते. जसे – ग्रंथालयापासून भौगोलिक अंतराने दूर असणाऱ्या उपयोजकांना ग्रंथालयामध्ये न येताही माहिती साधनांचा उपयोग व्हावा. आपल्याकडे असणाऱ्या दुर्मिळ दस्तऐवजांचे भावी पिढीसाठी जतन व्हावे. ग्रंथालयामध्ये अंकीकरण प्रकल्प राबविताना खालील टप्पे विचारात घेतले जातात –

१. ग्रंथालयाचा अंकीकरणाचा हेतू निश्चित करणे.

२. अंकीकरणाकरीता माहिती साधने निश्चित करणे.

३. मूल्य निर्धारण आणि बेंच मार्किंग (आदर्श नमूना निश्चित करणे)

४. प्रकल्पाची अंमलबजावणी करणे.

५. अंकीकरण झालेल्या प्रलेखांचे जतन करणे.

३.१२.४ ग्रंथालयाचा अंकीकरणाचा हेतू निश्चित करणे :

ग्रंथालयामध्ये अंकीकरण विविध दृष्टिकोनातून, विविध कारणांमुळे केले जाते. दोलामुद्रितांच्या दृष्टिने विचार करावयाचा झाल्यास आपल्या दुर्मिळ, महत्वाच्या, अमूल्य प्रलेखांचे जतन आणि संरक्षण करणे, जगातील अभ्यासकांपर्यंत दोलामुद्रित पुस्तकांतील माहितीचा स्त्रोत निर्माण करणे इत्यादी हेतू असू शकतात.

३.१२.५ अंकीकरणाकरीता माहिती साधने निश्चित करणे :

अंकीकरण ही खर्चिक आणि वेळखाऊ प्रक्रिया आहे. त्यामुळे सर्वच पुस्तकांचे अंकीकरण करायचे का नेमक्याच दोलामुद्रित पुस्तकांचे करायचे हे प्रथम ठरवावे लागते. दोलामुद्रित पुस्तकांचे अंकीकरण करायचे असल्यास विद्वान, विशेषज्ञ, तज्ज्ञ यांचे मार्गदर्शन घ्यावे. पुस्तकांची तालिका किंवा सूची असणे महत्वाचे आहे. जर पुस्तकांची सविस्तर तालिका केली नसेल तर निदान साधारण सूची तयार करावी. दोलामुद्रितांची निवड करताना त्यांमधील माहिती, त्यांचे सांस्कृतिक मूल्य, त्यांची अवस्था आणि त्यांचा आकार लक्षात घेणे आवश्यक आहे.

२.१२.६ मूल्यनिर्धारण आणि बेंचमार्किंग (आदर्श नमूना निश्चित करणे)

२.१२.७ अंकीकरण :

अंकीकरण झालेल्या दोलामुद्रितांचे जतन करणे, पूर्वी झालेल्या दोलामुद्रितांचे विविध आवश्यक मार्गांचा अवलंब करून जतन करावे, जेणेकरून त्यांचा भावी काळात आवश्यकतेनुसार वापर करता यावा. एकंदरीत अंकीकरण करण्यासाठी घेतलेल्या दोलामुद्रितांची संख्या व त्यासाठी लागणारी

संसाधने यांच्यासाठी येणाऱ्या खर्चाचे मूल्यनिर्धारण करून प्रकल्प हाती घ्यावा. अंकीकरणासाठी आवश्यक तो आदर्श नमुना निश्चित करावा.

३.१२.८ प्रकल्पाची अंमलबजावणी करणे :

अंकीकरणासाठी दोलामुद्रित पुस्तकांची निवड झाल्यानंतर आणि मूल्यनिर्धारण आणि बेंचमार्किंग केल्यानंतर प्रत्यक्ष प्रकल्पास सुरूवात करावी लागते. यासाठी प्रथम अंकीकरण In-house करायचे का ? Outsourcing करायचे ? हे ठरवावे लागते. हे ठरवताना अंकीकरणासाठी निवडलेली माहिती साधने, त्यांची अवस्था, येणारा खर्च, पुरेशी आणि योग्य जागा, आवश्यक असणारी उच्च दर्जाची उपकरणे, प्रशिक्षित मनुष्यबळ, वेळ, तंत्रज्ञान या सर्व मुद्यांचा विचार केला जातो.

३.१३ भारतातील ग्रंथालयाचा इतिहास :

भारतातील ग्रंथालयाचा इतिहास सामान्यपणे तीन कालखंडामध्ये अभ्यासणे जास्त सोईस्कर ठरते. खालील तीन कालावधीमध्ये संशोधकाने भारतातील ग्रंथालयाचा इतिहास मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

३.१३.१ प्राचीन काळ :

भारतामध्ये अगदी प्राचीन काळापासून ग्रंथालये कार्यरत होती. इ.स.६०० मध्ये नालंदा युनिव्हर्सिटी (बिहार) मध्ये अनेक बहुमजली ग्रंथालये होती. यामध्ये बहुसंख्येने हस्तलिखिते असल्याचे पुरावे मिळतात. ग्रंथालयाची ग्रंथसंपदा तीन इमारतीमध्ये ठेवण्यात आलेली होती. प्रत्येक इमारतीला नऊ मजले व तीनशे खोल्या होत्या. हे ग्रंथालय विद्वान व वाचनाचा व्यासंग असणाऱ्या व्यक्तीसाठी खुले होते. सातव्या शतकामध्ये चीन प्रवासी युआन श्वॉग याने या ग्रंथालयास भेट दिली होती आणि शेकडो ग्रंथ जपान व चीनमध्ये घेऊन गेलेत. परंतु ''इ.स.१२०९ मध्ये बक्थीआर थिलजी याने भारतावर आक्रमण केले. त्यावेळी ग्रंथालयाचा विध्वंस केला. त्यांनी हे ग्रंथालय पेटवून दिले. ते सहा महिने जळत होते. तक्षशीला व विक्रमशीला विद्यापीठाची ग्रंथालये अमूल्य होती. विक्रमशीला ग्रंथालयामध्ये तंत्रावरील, हस्तलिखितांचा मोठा संग्रह होता, तर तक्षशीला विद्यापीठचप्रया

ग्रंथालयामध्ये शेती आणि धर्नुविद्या यावरील हस्तलिखीतांचा दुर्मिळ संग्रह होता. इतिहासमध्ये नमूद आहे की, महान संस्कृत कवी बानभट्ट याने त्याचे कादंबरी हे प्रसिध्द काव्य भोजराजाच्या दरबारातील ग्रंथालयामध्ये लिहिले.'' (शर्मा, १९८७)

३.१३.२ मुघलांचा काळ :

मुघल सम्राटाने आपल्या कारकिर्दीमध्ये अनेक ग्रंथालये विकसित केली होती. त्यांच्या मुस्लीम शैक्षणिक संस्था मदरसाना सुध्दा संलग्न ग्रंथालये होती. बाबर हा सुध्दा प्रघाड वाचक, लेखक व हस्तलिखितांचा मोठा चाहता होता. आग्रा किल्ल्यामध्ये ग्रंथालये स्थापन केली होती. त्याचे व्यवस्थापन लालबेग यांच्याकडे होते. अकबराने सुध्दा स्वत:चे ग्रंथालय हुमायुन यांनी स्थापन केले होते. त्यांचे व्यवस्थापन शेखफैजी यांच्याकडे होते. मुघलकाळातील ग्रंथालयांच्या प्रचंड इमारती, दुर्मिळ हस्तलिखिते आणि तज्ज्ञ ग्रंथपाल ही वैशिष्ट्ये होती.

३.१३.३ ब्रिटीश काळ :

ब्रिटीश अंमल कायदा द एशियाटिक सोसायटी ही कलकत्ता येथे १७८४ मध्ये स्थापन झाली. अठराव्या शतकात सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना केली. त्याचबरोबर चेन्नई, मुंबई, कलकत्ता येथे शैक्षणिक ग्रंथालये स्थापन केली. १८६७ मध्ये प्रेस ऑफ रजिस्ट्रेशन ॲक्ट संमत केला. बडोदाचे महाराज श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनी बडोदा संस्थानात जिल्हा, तालुका, ग्राम ग्रंथालयाची अमेरिकन ग्रंथपाल डब्ल्यू.ए. बॉरडन (१९१०) यांच्या मदतीने स्थापना केली. त्यांनी ग्रंथालय वमिसलेनी हे नियतकालीक प्रकाशित केले होते. बंगाल लायब्ररी १९२५, पंजाब लायब्ररी असोसिएशन १९२९, मद्रास लायब्ररी असोसिएशन १९२८ यांची स्थापना या भारतातील ग्रंथालय चळवळीस पोषक होत्या.

डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या नेतृत्वाखाली चेन्नई लायब्ररी असोसिएशनची १९२८ मध्ये स्थापना झाली. महत्वाच्या ग्रंथालयीन सेवा दिली. मन्नरगुडी (१९३१) फिरत्या ग्रंथालयाची स्थापना झाली. ग्रंथालय प्रशिक्षणाचे वर्ग सुरू केले. इंडियन लायब्ररी स्थापनेनंतर (१९३३) दिल्लीला या संघाचे स्थलांतर (१९४७) या संघाची प्रकाशने युनेस्कोच्या मदतीने साऊथ ईस्ट एरियातील युनियन

कॅटलॉग ऑफ सायंटिफिक पिरिऑडिकल्स संकलीत करण्याची योजना दिल्ली पब्लीक लायब्ररी व इन्सीडॉक यांनी कार्यान्वीत करणे या सर्व गोष्टींमुळे रंगनाथन यांच्या अध्यक्षतेखाली चळवळीचे स्वरूप व्यापक झाले.

महाराष्ट्रात ग्रंथालय चळवळीची सुरवात इ.स.१९२१ मध्ये झाली. १९३५ मध्ये पुणे ग्रंथालय संघ स्थापन झाला. मराठीतून ग्रंथालय शास्त्राचे शिक्षण देण्याचा उपक्रम प्रथम या संघाने केला. याचबरोबर मुंबई ग्रंथालय संघ (१९४२) मराठी ग्रंथालय संघ (१९४४) कुलाबा वाचनालय संघ (१९४६) हे कार्यरत होते. पुढे १९४७ मध्ये स्थापन झालेल्या फैजी समितीच्या अहवालानुसार मध्यवर्ती प्रादेशिक, तालुका वाचनालयाची स्थापना होऊ लागली. ग्रंथालय संघाची सरकारी आदेशानुसार संघटना निर्माण करणे हा मुख्य हेतू होता. या आदेशाप्रमाणे महाराष्ट्र ग्रंथालय संघाची स्थापना झाली. साहित्य सहकार हे या संघाचे नियतकालिक होते. याशिवाय मुंबई ग्रंथालय संघ (१९४२), विदर्भ ग्रंथालय संघ (१९४५), मराठी ग्रंथालय संघ (१९५९) असे इतर ही ग्रंथालय संघ कार्यमग्न होते. १९६२ मध्ये महाराष्ट्रातील विभाग ग्रंथालय संघामध्ये सहकार्य वाढावे या हेतूने महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ या राज्य प्रतिनिधीत्व संघाची स्थापना झाल्यामुळे ग्रंथालय चळवळ लोकाभिमुख होत गेली. स्वातंत्र्यानंतर सर्व राज्यात ग्रंथालय संघ स्थापन झाले.

३.१४ महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयाचा इतिहास :

३.१४.१ पार्श्वभूमी :

''महाराष्ट्र हे एक भारतातील प्रमुख राज्य आहे. या राज्याचे क्षेत्रफळ ३,०७,७६२ चौरस किलोमीटर आहे. आणि लोकसंख्या ११,२३,७२,९७२ इतकी आहे. भारताच्या एकूण क्षेत्रफळापैकी ९.३७% भाग महाराष्ट्राने व्यापला आहे. तर या राज्याची लोकसंख्या देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ९.२८ टक्के आहे.''(https://en.wikipedia.org/wiki/2011 Census of India 10-8-2018)

३.१४.२ उत्पत्ती :

''महाराष्ट्र या शब्दाच्या उत्पत्तीबाबत विद्वानामध्ये एकमत नाही. महाराष्ट्र संज्ञेचा वापर पाचव्या व सहाव्या शतकात आढळतो. महाराठी या शब्दाचा वापर सातवाहनाच्या लेखनात आढळतो. महाराठी

या शब्दाचा उल्लेख महावंशच्या बौध्द ग्रंथात आढळतो. जॉन विन्टसन यांनी मोल्सवर्थच्या कोषात महार + राष्ट्र महारांचे राष्ट्र अशी लोकवाचक उत्पत्ती सुचवली. श्री.केतकरांनी महार + हट्ट असा उल्लेख महानुभव ग्रंथकाराच्या आधार महाभाष्यात सापडतो. या प्रदेशाला महाराष्ट्र हे नाव पडण्यापूर्वी याचे विदर्भ, अशक्य, कुनल अपरांन, गोपराष्ट्र, पांडूराष्ट्र असे घटक विभाग असून याचा उल्लेख प्राचीन संस्कृती वाङ्मयात आढळतो. महाद्वैभाषीक मुंबई राज्य १ नोव्हेंबर, १९५६ मध्ये अस्तित्वात आले व महाराष्ट्र राज्य १ मे, १९६० रोजी अस्तित्वात आले. याचे चार भाग असून १ पश्चिम किनारपट्टी, २ कोकण, ३ मध्य महाराष्ट्र, ४. मराठवाडा व विदर्भ असे आहेत.'' (जोशी, १९७६)

प्राचीन काळापासून महाराष्ट्राला ज्ञानाचा व संस्कृतीचा वारसा लाभलेला आहे. प्राचीन व मध्ययुगीन काळातही धार्मिक व सांस्कृतिक अशी चांगली ग्रंथालये अस्तित्वात होती. ग्रंथालयाचा 'विस्तार' दर्शविण्यासाठी 'चळवळ' हा शब्द वापरला आहे. यामध्ये मुद्रणकले आधीचा काळ, स्वातंत्र्यपूर्व काळ आणि स्वातंत्र्योत्तर काळ या कालखंडाचा समावेश होतो.

३.१४.३ मुद्रणकले आधीचा काळ :

यादव काळामध्ये भास्कराचार्यांनी (गणिती व खगोल शास्त्रज्ञ) महाराष्ट्रामध्ये एक संशोधन केंद्र व ग्रंथालयाची स्थापना केली होती. गणित, खगोलशास्त्र, फलज्योतिषी तसेच इतर ज्ञानशाखांच्या अध्ययनासाठी उपयुक्त ताडपत्र व बर्च वृक्षाच्या खोडावर लिहिलेली अनेक हस्तलिखिते या ग्रंथालयात उपलब्ध होती. देशाच्या कानाकोपऱ्यातून लोक या ग्रंथालयात हस्तलिखितांचा उपयोग करण्यासाठी येत असत. सर्वसामान्यपणे १२ व्या व १३ व्या शतकात मराठी हस्तलिखिते लेखनास सुरूवात झाली होती. याचे उदाहरण द्यायचे झाल्यास १२२० सालात ज्ञानेश्वरी लिहिली गेली. मुक्ताबाई, नामदेव, एकनाथ, तुकाराम रामदास आदि संतानी सामान्य जनतेला समजेल अशा मराठी भाषेत काव्यात्मक लिखाण केले.

३.१४.४ प्राचीन काल (सुरूवातीपासून ते १२००) :

अगदी सुरूवातीच्या काळामध्ये ज्ञान मौखीक स्वरूपात जतन केले जात होते. लेखन कला अवगत झाल्यानंतर भूर्जपत्रे, ताडपत्रे यासारख्या साधनावर ज्ञान लिहिले जाऊ लागले. अशा ग्रंथांचा

संग्रह प्रसिध्द गणिती व ज्योतिषी आणि सिध्दान्त शिरोमणी व केणकुतूहल हा ग्रंथ लिहिला. जळगांव जिल्ह्यातील पाटण येथील अशा ग्रंथालयाचा देखभाल भास्कराचार्याचा मुलगा लक्ष्मीधर व नातू चांगदेव करीत असे. यादव काळात ग्रंथरचना खूप झाली. १९ व्या शतकात पाश्चात्य व पौर्वात्य संशोधकानी या काळातील राजेराजवाडे, शास्त्री–पुराणिक यांच्याजवळ असणारी हस्तलिखिते परिश्रमपूर्वक एकत्रित केलीत. त्यातील असंख्य लिखिते पाश्चात्य देशात नेली गेली. उर्वरीत भांडारकर प्राचीन विद्या संशोधन मंदिर, आनंदाश्रम संस्था, प्राज्ञ पाठशाला, भारत इतिहास संशोधन मंडळ, डेक्कन कॉलेज इ. ठिकाणी संग्रहित केलेली आहेत.

३.१४.५ मध्ययुगीन काल (१२०१ ते १८०४) :

या काळात संस्कृत ही ज्ञानभाषा होती. पण सर्वसामान्यांची भाषा मराठी होती. मराठी भाषेचा उगम काल, इ.स. ९८३ मध्ये झाला असला तरी मराठी ग्रंथरचना बाराव्या शतकात झाली. पंडित म्हाइंभट्ट, मुकुंदराज, निवृत्ती, ज्ञानेश्वर, नामदेव इत्यादी संत मंडळींचे अभंग वाङ्मय हे मराठीतील पहिले मराठी वाङ्मय मानले जाते. मराठीतील ज्ञानेश्वरी हा ग्रंथ १२९० मध्ये प्रसिध्द झाला. संत रामदासाने परमार्थकारण, राजकारणाबरोबर ग्रंथकारणही केले. त्यांनी स्थापन केलेल्या चाफळ, बीड, तंजावर, तीसगाव इ. ठिकाणच्या मठांतून उपलब्ध झालेल्या ग्रंथात शके १९४० च्या सुमारास असलेल्या ग्रंथांचा समावेश होतो. याचा संग्रह सत्कार्योत्तेजक धुळे येथे केला आहे. ग्रंथांचा संग्रह जतन व प्रसार या ग्रंथालयाच्या आधुनिक कल्पनेस अनुसरून रामदास स्वामी हे महाराष्ट्राचे पहिले 'ग्रंथपाल' ठरतात. रघुनाथ पेशव्यांनी १९६० च्या सुमारास त्र्यंबकेश्वर व आनंदवल्ली येथे ग्रंथसंग्रह केले होते. पुण्यातील शनिवार वाड्यात पेशव्यांची पुस्तकशाळा होती. प्रामुख्याने धार्मिक ग्रंथ व पोथ्यांचा समावेश होतो.

३.१४.६ अव्वल ब्रिटिश अंमलाचा काल (१८०४ ते १९२१) :

इ.स.१८०४ साली महाराष्ट्रात ग्रंथालयांचा प्रारंभ झाला. जेम्स मॅकिरॉश यांच्या प्रयत्नाने मुंबईत लिटररी सोसायटी स्थापन झाली. एका डॉक्टरकडून ग्रंथसंग्रह खरेदी करून २५ फेब्रुवारी, १८०५ रोजी ग्रंथालयाची स्थापना केली. १८२७ मध्ये लिटररी सोसायटी ग्रेट ब्रिटन आयर्लंडच्या

सोसायटीत विलीन झाली. लिटररी सोसायटी ग्रंथालयाचे नाव बदलून २७ जानेवारी, १८३० रोजी बॉम्बे ब्रँच ऑफ दि रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ ग्रेट ब्रिटन अँड आयर्लंड करण्यात आले. हेच ग्रंथालय केंद्रीय ग्रंथालय म्हणून मानले जाते. १ जुलै, १९९४ पासून ग्रंथालयाचे व्यवस्थापन महाराष्ट्र शासनाने स्वत:कडे घेतले आहे. १८२० ते १८३० दरम्यान मुंबई १८१८, पुणे १८२३, रत्नागिरी १८२८, सोलापूर १८२९ इ. ठिकाणी 'बुक क्लब' ग्रंथालये स्थापन केलीत. त्यावेळी त्यांना स्टेशन लायब्ररीज संबोधले जात होते. ती ग्रंथालये युरोपियांसाठी खुली असत. इ.स.१९३१ ते १९५५ या काळात नेटीव्ह जनरल लायब्ररीज या नावाने जिल्ह्याच्या ठिकाणी कंपनी सरकारने ग्रंथालये स्थापन केली. अहमदनगर १९३८, पुणे १८४८, रत्नागिरी १८५०, ठाणे १८५१, सावंतवाडी १८५२, सातारा १८५२, नाशिक १८५३, सोलापूर १८५३, धुळे १८५४ इ. ठिकाणी ग्रंथालये सुरू केलीत. इ.स. १८९३ साली पहिले मराठी ग्रंथ संग्रहालय स्थापन झाले. त्यानंतर मुंबई ग्रंथ संग्रहालय १८९८, पुणे मराठी ग्रंथ संग्रहालय १९११ या ग्रंथालयाची स्थापना झाली. या मराठी ग्रंथ संग्रहालयांमुळे सार्वजनिक ग्रंथालयांना चालना मिळाली. नेटीव्ह जनरल लायब्ररीमध्ये या ग्रंथाचा संग्रह करण्यास सुरूवात झाली. भाऊसाहेब मोफत वाचनालय, गणेश मोफत वाचनालय, तळेगाव १९१९, पेटिट लायब्ररी, मुंबई १८५९, पीपल्स फ्री रीडींग, रूम ॲण्ड लायब्ररी १८४५ यासारखी वाचनालये स्थापन झाली. एक प्रकारे सार्वजनिक ग्रंथालयाचा पाया घातला.

३.१४.७ आर्वाचीन काल (१९२१ ते १९६०) :

इ.स. १९२१ साली महाराष्ट्र ग्रंथालय संघटनेची सुरूवात झाली. महाराष्ट्र मोफत वाचनालय परिषद दत्तात्रय वामन जोशी यांच्या प्रयत्नाने भरली. महाराष्ट्रातील पहिला ग्रंथालय संघ स्थापन झाला. हा संघ १९२१ ते १९४९ या कालावधीत कार्यरत होता. पुढे पुणे ग्रंथालय संघ १९३५, मुंबई ग्रंथालय संघ १९४४ मराठी ग्रंथालय संघ, ठाणे १९४५ कुलाबा जिल्हा वाचनालय संघ, अलिबाग १९४६, महाराष्ट्र ग्रंथालय संघ, पुणे मुंबई १९४९, विदर्भ ग्रंथालय संघ नागपूर, १९५८ मराठवाडा ग्रंथालय संघ, औरंगाबाद १९५९ या ग्रंथालय संघाचा समावेश होतो.

३.१४.८ फैजी समिती :

बाळासाहेब खेर यांच्या प्रेरणेने १९३९ साली तत्कालीन मुंबई सरकारने मुंबई प्रांतातील ग्रंथालय विकास योजना तयार करण्यासाठी ए.ए.ए. फैजी यांच्या अध्यक्षतेखाली ग्रंथालय विकास समिती नेमली. या समितीने १९४० साली अहवाल सादर केला. **(पाटील, २००५)**

पहिला टप्पा : या टप्प्यामध्ये केंद्रीय ग्रंथालये, पुणे, अहमदाबाद, धारवाड येथे तीन प्रादेशिक ग्रंथालयांची स्थापना केली. केंद्रीय ग्रंथालयांना ३०,००० प्रादेशिक ग्रंथालयांना १०,००० अनुदान सुचविले होते.

दुसरा टप्पा : मुंबई प्रांतातील २० जिल्ह्यामध्ये जिल्हा ग्रंथालये स्थापन करणेबाबत सूचना केली होती.

तिसरा टप्पा : या टप्प्यामध्ये प्रत्येक तालुक्यामध्ये ग्रंथालये स्थापन करण्यात येतील.

चौथा टप्पा : २००० ते ५००० वस्तीच्या गावामध्ये ग्रंथालये स्थापन करण्यात येतील.

पाचवा टप्पा : १००० ते २००० लोकवस्तीच्या गावात ग्रंथालये स्थापन करण्यात येतील.

सहावा टप्पा : १००० पेक्षा कमी लोकवस्तीच्या खेड्यामध्ये ग्रंथालये स्थापन करण्यात येतील.

ग्रंथालयाच्या विकासासाठी रू.३,००,०००/– ची शिफारस केली होती. ग्रंथालयाच्या अनुदानात वाढ करणे, ग्रंथालय संघ स्थापन करणे, केंद्रीय ग्रंथालयांकडे चालविण्यास देणे इ. शिफारशी सुचविल्या होत्या. भारत स्वतंत्र झाल्यावर मुंबई राज्यातील ग्रंथालयाचा विकास झाला आहे.

३.१४.९ सद्य:काल (१९६१ ते आजतागायत) :

१ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. प्रशासनाच्या दृष्टीने मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद असे चार विभाग करण्यात आले. इ.स.१९६२ साली महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ स्थापन झाला. ग्रंथालय परिषदा, अधिवेशने, चर्चासत्रे, प्रदर्शने इत्यादींद्वारे ग्रंथालय चळवळ सुरू झाली. इ.स.१९६७ साली महाराष्ट्र सरकारने ग्रंथालय कायदा केला. महाराष्ट्रामध्ये या कायद्याच्या कार्यवाहीसाठी स्वतंत्र संचालनालय स्थापन झाले. शिक्षणमंत्री आणि उपशिक्षणमंत्री हे या परिषदेचे

अध्यक्ष व उपाध्यक्ष आहेत. ग्रंथालय कायद्याने महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयांना चालना मिळाली. शासकीय विभागामध्ये सहाय्यक अतिरिक्त ग्रंथालयांची कार्यालये स्थापन झाली. त्यामुळे सार्वजनिक ग्रंथालयांना अनुदानाचे वाटप, व्यवस्थापन, हिशोब तपासणी, वर्गवारी इ. कामे सुनियंत्रितपणे होऊ लागली. ''ग्रंथालय चळवळ लोकाभिमुख व्हावी यासाठी इ.स.१९७०, १९७३ ते १९८० इ. ग्रंथालय कायद्यामध्ये दुरूस्त्या केल्या गेल्या व शासनाने अनुदानामध्ये वाढ करण्यात आली. इ.स. १९६८साली महाराष्ट्रामध्ये केवळ ४७४ सार्वजनिक ग्रंथालये होती. आता ती संख्या ७१५२ झाली आहे.'' **(जोशी, १९७६)**

असे असले तरी महाराष्ट्रातील जनतेला सार्वजनिक, शैक्षणिक, संशोधनपर तसेच कृषी विद्यापीठ ग्रंथालये यांच्यामार्फत मिळत असलेल्या ग्रंथालयीन सेवा व सुविधा अद्यापही अपुऱ्या आहेत. लोकसंख्या वाढ, साक्षरतेचा प्रसार, ग्रंथालयाच्या वाढत्या किंमती तसेच शासनाकडून मिळणारे अनुदान या सर्व कारणामुळे ग्रंथालय सेवेत अडचणी निर्माण होत आहेत. परंतु ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते आणि लोकाभिमुख शासन यांच्या सहकार्याने ह्या अडचणी दूर होतील व महाराष्ट्रातील जनतेला समाधानकारक सेवा उपलब्ध करून देता येतील.

३.१५ पश्चिम महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयाचा इतिहास :

पश्चिम महाराष्ट्रामध्ये कोल्हापूर, पूणे, सांगली, सातारा, सोलापूर, या जिल्ह्यांचा समावेश होतो. संशोधकाने पश्चिम महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयाचा अभ्यास करताना या पाच जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालयाच्या इतिहासाचे वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे.

कोल्हापूर जिल्ह्याच्या विकासामध्ये सार्वजनिक ग्रंथालयाच्या योगदानास अनन्य साधारण महत्व आहे. यामध्ये एक 'अ' वर्ग जिल्हा सार्वजनिक ग्रंथालये, आठ 'अ' वर्ग तालुका सार्वजनिक ग्रंथालये, एक 'ब' वर्ग तालुका सार्वजनिक ग्रंथालये, तीन 'अ' वर्ग तालुका सार्वजनिक ग्रंथालये, दहा इतर 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालये, ९२ इतर 'ब' वर्ग सार्वजनिक ग्रंथालये, ३३३ इतर 'क' वर्ग सार्वजनिक ग्रंथालये तसेच २३७ इतर 'ड' वर्ग सार्वजनिक ग्रंथालये यांचा समावेश होतो. अशाप्रकारे कोल्हापूर जिल्ह्यामध्ये एकूण ६८५ सार्वजनिक ग्रंथालये जनतेच्या विकासामध्ये योगदान देत आहेत.

पुणे जिल्ह्याचा विचार करता, या जिल्ह्यामध्ये एक 'अ' वर्ग जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय ज्ञानदानाचे कार्य पार पाडीत आहे. ९ 'अ' वर्ग तालुका ग्रंथालये, २ 'ब' वर्ग तालुका सार्वजनिक ग्रंथालये, २ 'क' वर्ग सार्वजनिक ग्रंथालये, आपआपल्या परीने समाज प्रबोधनाचे कार्य करीत आहेत. या जिल्ह्यामध्ये २२ इतर 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालये,११५ इतर 'ब' वर्ग सार्वजनिक ग्रंथालये, २२७ इतर 'क' वर्ग सार्वजनिक ग्रंथालये आणि १८७ इतर 'ड' वर्ग सार्वजनिक ग्रंथालये ही पुणे जिल्ह्याचा सामाजिक, बौध्दीक, शैक्षणिक, विकासामध्ये योगदान देत आहेत. अशा प्रकारे या जिल्ह्यामध्ये एकूण ५६५ सार्वजनिक ग्रंथालये कार्यरत आहेत.

सांगली जिल्ह्यामध्ये दर्जा किंवा वर्गनिहाय ग्रंथालयाचा विचार केला असता, एक 'अ' वर्ग ग्रंथालय, पाच तालुका 'अ' वर्ग ग्रंथालये, तीन 'ब' वर्ग सार्वजनिक ग्रंथालये, इतर १२ 'अ' वर्ग ग्रंथालये, ९१ इतर 'ब' वर्ग सार्वजनिक ग्रंथालये, १७४, इतर 'क' वर्ग ग्रंथालये, तसेच ९१ इतर ड वर्ग ग्रंथालये अशी एकूण ३७७ सार्वजनिक ग्रंथालये कार्यरत आहेत. सांगली जिल्ह्यातील जनतेचा शैक्षणिक, समाजिक, सांस्कृतिक व बौध्दीक विकास करण्याचा प्रयत्न या सार्वजनिक ग्रंथालयामार्फत सातत्याने केला जात आहे.

सातारा जिल्ह्यामध्ये एक 'अ' वर्ग जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय कार्यरत आहे. त्याचप्रमाणे पाच तालुका 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालये व पाच तालुका 'ब' वर्ग सार्वजनिक ग्रंथालये तसेच एक 'क' वर्ग तालुका ग्रंथालय सातारा जिल्ह्यातील जनतेचा सर्वांगीण विकासाचा प्रयत्न करत आहेत. त्याचप्रमाणे तीन इतर 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालये, ५७ इतर ब वर्ग सार्वजनिक ग्रंथालये व १५८ इतर 'क' वर्ग सार्वजनिक ग्रंथालये आणि १६५ इतर 'ड' वर्ग सार्वजनिक ग्रंथालये असा एकंदरीत विचार करता सातारा जिल्ह्यामध्ये एकूण ३९५ सार्वजनिक ग्रंथालये ज्ञानदानाचे कार्य करीत आहेत.

सोलापूर जिल्ह्यामध्ये एकूण ९४९ सार्वजनिक ग्रंथालये जनतेच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक तसेच बौध्दीक विकासाचे कार्य पार पाडत आहेत. यामध्ये एक जिल्हा 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालये, आठ तालुका 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालये, तीन तालुका 'ब' वर्ग सार्वजनिक ग्रंथालये यांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे अकरा इतर 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालये, २५१ इतर 'ब' वर्ग सार्वजनिक

ग्रंथालये, ४०२ इतर 'क' वर्ग सार्वजनिक ग्रंथालये, आणि २७१ इतर 'ड' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांचा अंतर्भाव होतो.

''अशाप्रकारे एकंदरीत पश्चिम महाराष्ट्राचा विचार केला असता, सांगली जिल्हा ३७७, सातारा जिल्हा ३९५, सोलापूर जिल्हा ९४७, पुणे जिल्हा ५६५ आणि कोल्हापूर जिल्हा ६८५ अशी एकूण २९६९ सार्वजनिक ग्रंथालये या विभागामध्ये ज्ञानदानाचे कार्य पार पाडीत आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यामध्ये सोलापूर जिल्हा ९४७ सार्वजनिक ग्रंथालयासह अग्रस्थानी आहे, तर ६८५ सार्वजनिक ग्रंथालयासह कोल्हापूर जिल्हा द्वितीय स्थानी आहे.'' **(धांडोरे, २०१६)**

३.१६ पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांचा आढावा :

पश्चिम महाराष्ट्रामध्ये कोल्हापूर, पुणे, सांगली, सातारा, व सोलापूर या पाच जिल्ह्यांचा समावेश होतो. या पाच जिल्ह्यामध्ये एकूण ९९ 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालये आहेत. त्यापैकी ८० अ वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांनी, संशोधकाने प्रस्तुत संशोधन कार्य यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी आवश्यक माहिती मिळविण्यासाठी पाठविलेल्या प्रश्नावलीस प्रतिसाद दिला आहे.

त्यापैकी कोल्हापूर जिल्ह्यात १९, पुणे जिल्ह्यात १९, सांगली जिल्ह्यात १७, सातारा जिल्ह्यात ०८, व सोलापूर जिल्ह्यात १७ – 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालये कार्यरत आहेत. संशोधकाने या सर्व ग्रंथालयाचा आढावा घेतलेला आहे.

३.१६.१ कोल्हापूर :

१) आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी :

इचलकरंजी मधील जहांगीरदार–घोरपडे यांच्या प्रेरणेने इचलकरंजीतील प्रसिध्द वकील रामभाऊ आपटे यांनी सन १८७० मध्ये 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' सुरू केली. या ग्रंथालयासाठी घोरपडे–जहागीरदारांनी इचलकरंजीतील मखदूम पीर या देवस्थानातील नगारखात्याची जागा दिली. पुढे ही जागा अपुरी पडू लागल्यामुळे राजवाड्यासमोरच आपटे वकीलांनी स्वत:च्या जागेत या ग्रंथालयासाठी स्वतंत्र वास्तू बांधण्यास सुरूवात केली. तथापि, त्यांच्या हयातीत ही इमारत पूर्ण होऊ शकली नाही. घोरपडे यांनी ते काम पूर्ण केले. शिवाय आपल्याकडील ग्रंथसंपदाही त्यांनी ग्रंथालयाला

दिली. १८९६ मध्ये नव्या इमारतीत ग्रंथालयाचे स्थलांतर झाले. रामभाऊ आपटे वकीलांच्या या ग्रंथालयाच्या उभारणीतील योगदानाबद्दल सन १९१० मध्ये ग्रंथालयाचे नामकरण 'आपटे वाचन मंदिर' असे करण्यात आले.

वाचकांची संख्या झपाट्याने वाढू लागली. साहजिकच ग्रंथालयाच्या जुन्या इमारतीमधील जागा अपुरी पडू लागली. २५ नोव्हेंबर, १९८३ मध्ये नव्या इमारतीची पायाभरणी झाली. इचलकरंजी नगरपालिका विविध सहकारी संस्था वसंत रांजणे क्रिकेट सामना तसेच देणगीदारांच्या देणगीतून इमारत उभारली.

हे ग्रंथालय संपूर्णत: संगणकीकृत आहे. पुस्तकांची संख्या ७५००० इतकी आहे. पुस्तकासोबत साहित्यकांची कथाकथने, भक्तीगीते, नाटके यांच्या ध्वनीफिती ही वाचकांच्या मागणीनुसार खरेदी केल्या आहेत. ग्रंथालयात वृत्तपत्रे, नियतकालिके, पुस्तक देवघेव विभाग, संदर्भ विभाग, अभ्यासिका, बाल विभाग असे स्वतंत्र विभाग आहेत्र सन १९७४ मध्ये इचलकरंजीत झालेल्या सुवर्ण महोत्सवी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी जमलेल्या निधीतून उत्कृष्ट व लक्षणीय गद्य पुरस्कार ग्रंथालयाच्यावतीने दिला जातो. वक्तृत्व स्पर्धांचे नियोजन केले जाते. सन १९७० पासून वसंत व्याख्यानमाला आयोजित केली जाते. महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार मिळालेला आहे. या वाचनालयात महाराष्ट्र शासनाच्या पब्लीक लायब्ररी ॲक्ट, १९६७ या ग्रंथालय कायद्यान्वये तालुका वाचनालयाचा 'अ' वर्ग दर्जा दिलेला आहे. ग्रंथालयाची सभासद संख्या ५००० असून त्यांना ग्रंथालयीन सेवा पुरविण्यासाठी ग्रंथपाल व इतर सात कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. या ग्रंथालयाने आपल्या सभासदांना मुक्तद्वार पध्दतीची सेवा पुरविली असून कांही महत्वाच्या दुर्मिळ पुस्तकांना बंदिस्त देवघेव पध्दतीचा अवलंब केलेला आहे.

२) करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर :

करवीर नगर वाचन मंदिर हे शतकोत्तर हीरक महोत्सव साजरे करणारे कोल्हापूरातील ज्ञानपीठ होय. कोल्हापूरच्या सांस्कृतिक जडणघडणीत करवीर नगर वाचन मंदिरने दिलेले योगदान केवळ अविस्मरणीय ! या ग्रंथालयाची स्थापना १५ जून, १८५० रोजी करण्यात आली. या ग्रंथालयाने कोल्हापूरच्या तब्बल आठ पिढ्यांचे मानसिक व बौध्दीक भरण–पोषण केले. स्वामी

विवेकानंद, यशवंतराव चव्हाण, ना.सी.फडके, रणजीत देसाई, माधव ज्युलियन यासारख्या अनेक दिग्गज साहित्यीक, शास्त्रज्ञ आणि सेनाधिकारी यांनी करवीर नगर वाचन मंदिरास भेट दिलेली आहे. स्वामी विवेकानंदांनी १८९२ मध्ये शिकागो परिषदेला जाण्यापूर्वी जे भारतभ्रमण केले, त्यावेळी वाचनालयास भेट दिली होती. आजच्या माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या युगामध्ये वाचकांना अद्यावत ज्ञान मिळावे म्हणून ग्रंथालयाचे संगणकीकरण करण्यात आले. करवीर नगर वाचन मंदिरने संस्थेच्या वेबसाईटचे आधुनिकीकरण करून www.kanawa.in ही वेबसाईट सुरू केली. दुर्मिळ ग्रंथ, हस्तलिखिते, पोथ्या तसेच नवनवीन दर्जेदार पुस्तके अशा तब्बल एक लाख तेरा हजार पाचशे इतक्या ग्रंथसंग्रहाने हे ग्रंथालय समृध्द आहे. तसेच वाचकांसाठी सर्च यंत्रणा, ओपेक टचस्क्रीन माध्यमातून उपलब्ध करण्यात आली आहे. ग्रंथालयाचे एकूण सभासद ४,१४४ आहेत. दररोज सकाळी ८ ते रात्री ८ पर्यंत ग्रंथालय सुरू असते. मराठी वाचक, इंग्रजी, हिंदी बालवाचक दिवसभरात पुस्तके घेतात. ग्रंथालयात ६५ मासिके, १६ साप्ताहिके, २७ वृत्तपत्रे येतात. दररोज सुमारे ५५० वाचक लाभ घेतात. संपूर्ण ग्रंथालय संगणकीकृत आहेत. तसेच अंध लोकांसाठी विशेष उपयुक्त सॉफ्टवेअर आहे. गरीब व होतकरू मुलांसाठी मोफत अभ्यासिका चालवली जाते.

संस्थेने आसपासच्या परिसरातील ७१ ग्रंथालये साखळीअंतर्गत जोडलेली आहेत. कोल्हापूरवासीयांच्या जीवनाशी एकरूप झालेले हे एक महत्वाचे सांस्कृतिक केंद्र आहे. तरी सुध्दा दोलामुद्रितांचा वापर करणाऱ्या वाचकांची संख्या अत्यल्प आहे. या ग्रंथालयामध्ये कांही ग्रंथ संग्रहाकरीता मुक्तद्वार पध्दतीचा अवलंब केला जातो. तसेच महिलांसाठी स्वतंत्र विभाग व बालवाचकांसाठी स्वतंत्र वाचन कक्ष आहेत.

३) कविवर्य मोरोपंत ग्रंथालय, पन्हाळा :

कविवर्य मोरोपंत ग्रंथालय, पन्हाळा या सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना इ.स.१९५७ मध्ये करण्यात आली असून ग्रंथालयास शासनातर्फे 'अ' वर्ग मानांकन २०१० या वर्षी प्राप्त झाले. या सार्वजनिक ग्रंथालयाची स्वतंत्र इमारत असून या ग्रंथालयात एकूण २३,००० असा प्रचंड ग्रंथसंग्रह आहे. या ग्रंथालयात हस्तलिखितेही उपलब्ध आहेत. एकूण सद्यस्थितीला ४६ नियतकालिके मागविली

जातात, इतका प्रचंड ग्रंथसंग्रह असून सुध्दा ३५० सभासद आहेत. या ग्रंथालयीन सभासदांना विविध ग्रंथालयीन सेवा पुरविण्यासाठी एकाच ग्रंथालयीन कर्मचाऱ्याची नेमणूक करण्यात आलेली आहे. हे ग्रंथालय नगरपालिकेतर्फे चालविले जात असून पुर्वीचा ग्रंथपाल सेवानिवृत्त झाल्यानंतर अद्याप नवीन ग्रंथपालाची नेमणूक करण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रचंड ग्रंथसंपदा असून सुध्दा ग्रंथालयीन सेवा पुरविण्यात अडचणी निर्माण झालेल्या आहेत. त्यामुळे सभासद संख्या कमी आहे.

४) क्रांतीवीर रत्नाप्पाण्णा कुंभार सार्वजनिक वाचनालय, गंगानगर :

या ग्रंथालयाची स्थापना २८ जून, १९६४ रोजी करण्यात आली. सार्वजनिक ग्रंथालयाची स्वतंत्र इमारत आहे. गंगानगर सारख्या भागात राहणाऱ्या लोकांच्या वाचनाच्या गरजा भागविण्यासाठी या ग्रंथालयाची स्थापना केली गेली. सदरचे वाचनालय रत्नाप्पाण्णा कुंभार सहकारी साखर कारखान्याच्या जवळ असल्यामुळे या कारखान्यातील कामगारांना देखील या वाचनालयाचा फायदा झालेला आहे. हे वाचनालय या भागातील सामाजिक व सांस्कृतिक केंद्र बनत चालले आहे. या ग्रंथालयात वेगवेगळ्या स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, धावण्याच्या शर्यती, सांस्कृतिक कार्यक्रम, शेतकरी वर्गासाठी शेतीविषयक वाचनसाहित्य पुरविण्याचे कार्य हे ग्रंथालय करीत आहे. खास करून ऊस उत्पादन वाढीसाठी कृषीतज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करून शेतकरी वर्गास मार्गदर्शन केले जाते. अशा ग्रंथालयाची ग्रंथसंपदा खालीलप्रमाणे आहे :–

एकूण ग्रंथ संख्या – ३४,१२२ नियतकालिके – ६३ कर्मचारी वर्ग – ५

ग्रंथालयाची वेळ : सकाळी ९ ते संध्याकाळी ६ 'अ' वर्ग मानांकन प्राप्त असणारे ग्रंथालय संगणकीकृत केलेले आहे. त्याद्वारे वाचकांना आधुनिक ग्रंथालय सेवा सुविधा पुरविल्या जातात. ग्रामीण शाळा व ग्रंथालयांना साखळी योजनेअंतर्गत ग्रंथ पुरवठा केला जातो. तसेच स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी व्याख्याने आयोजित केली जातात. तसेच गरीब व हुशार विद्यार्थ्यांसाठी मोफत ग्रंथालयात बसून वाचण्यासाठी पुस्तके दिली जातात. सध्या या ग्रंथालयाची सभासद संख्या ५९१ इतकी आहे.

५) नगर वाचनालय, कुरूंदवाड :

कुरूंदवाड संस्थानचे अधिपती श्रीमंत आण्णासाहेब पटवर्धन यांनी १८९८ मध्ये 'स्टेट लायब्ररी' सुरू केली. त्यासाठी त्यांनी स्वत:जवळील ग्रंथसंपदा दिली. पुढे संस्थानातील ग्रंथप्रेमी नागरिकांनी देखील मेहनत घेऊन वाचनालय नावारूपास आणले. १९१५ मध्ये लोकनियुक्त कार्यकारी संचालक मंडळाने 'नगर वाचनालय' असे नामकरण केले.

तालुका व जिल्हा असे कोणतेही सरकारी महत्वाचे ठिकाण नसताना येथे ग्रंथालय चळवळ चांगली रूजली आहे. सन १९६७ पूर्वी या गावी येण्यासाठी रस्ता देखील नव्हता. या वाचनालयास राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन् यांनी भेट दिली आहे. तसेच न.चि.केळकर, वि.स. खांडेकर, ग.दि.माडगुळकर, धोंडो केशव कर्वे इत्यादींनी भेटी दिलेल्या आहेत. या वाचनालयाने पंचक्रोशीत वाचन संस्कृती जोपासली आहे.

वाचनालयासाठी दहा हजार रूपये देणगी देणाऱ्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या इच्छेनुसार वाचनालयात फोटो लावण्याची व्यवस्था आहे. तसेच दीड हजार रूपये देणाऱ्याला आजीव सभासद होता येते. या वाचनालयास महाराष्ट्र शासनाकडून शताब्दी ग्रंथालय म्हणून पाच लाख रूपये मिळाले आहेत. महाराष्ट्र शासनाचा, 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार', कोल्हापूर जिल्हा ग्रंथालय संघाचा उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार मिळालेले आहेत. या वाचनालयाने अनेक दुर्मिळ दस्तऐवज जतन केलेले आहेत. त्यामध्ये सर्वांत महत्वाचे म्हणजे हस्तलिखिते, हरिवंश, सादीक पर्व, भागवतातील आदी पर्व १ व २, लीलावती, भागवत महात्म्य अशी अनेक हस्तलिखितेही वाचनालयाचा मौलीक ठेवा आहेत. ग्रंथालयात एकूण ग्रंथसंपदा ३४,००० इतकी असून ५ कर्मचारी, ८७ नियतकालिके येतात. सभासद ३०० आहेत. ग्रंथालय सकाळी ८ ते १२.३० व दुपारी ४.०० ते ७.३० पर्यंत सुरू असते. वाचनालयातर्फे दरवर्षी सांस्कृतिक कार्यक्रम, चर्चासत्रे, व्याख्याने, परिसंवाद, पुस्तक प्रदर्शन, वक्तृत्व स्पर्धा, थोर नेत्यांच्या जयंत्या, पुण्यतिथी व त्यानिमित्त त्यांच्या जीवनावरील ग्रंथांचे प्रदर्शन भरविले जाते.

६) पुज्य साने गुरूजी सार्वजनिक मोफत वाचनालय, गडहिंग्लज :

ग्रंथालयाची स्थापना १८७४ मध्ये 'जनरल लायब्ररी' या नावाने झाली. सन १९४७ मध्ये तालुका वाचनालय म्हणून मान्यता मिळाली. सन १९५९ मध्ये ग्रंथालयाचे नगरपालिकेकडे हस्तांतरण झालेनंतर 'गडहिंग्लज नगरपालिका सार्वजनिक तालुका वाचनालय' असे नामकरण करण्यात आले. पुढे सानेगुरूजी यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने त्यांचे पुण्यस्मरण चिरस्थायी ठेवण्याच्या दृष्टीने या वाचनालयाचे ''पूज्य साने गुरूजी मोफत वाचनालय'' असे नामकरण करण्यात आले. या ग्रंथालयाने १९८७ मध्ये तालुका 'अ' वर्ग दर्जा मिळविलेला आहे.

या ग्रंथालयात आज ३५,४०० ग्रंथ संपदा असून २२ दैनिके, १८ साप्ताहिके, ५ पाक्षिके व ५५ मासिके नियमितपणे येतात. सध्या या ग्रंथालयात ६६१ सभासद आहेत. गडहिंग्लज तालुक्यातील सांस्कृतिक व शैक्षणिक केंद्र म्हणून या ग्रंथालयाची ओळख आहे. या ग्रंथालयासाठी दोन मजली भव्य अशी स्वतंत्र इमारत आहे. संदर्भ विभाग, देवघेव विभाग, संगणक विभाग, महिला व वाचन विभाग, नियतकालीक विभाग, वर्तमानपत्र विभाग, अभ्यासिका इत्यादी विभाग कार्यरत आहेत. या ग्रंथालयाने आपल्या सभासदांसाठी मुक्तद्वार पध्दतीचा अवलंब केला आहे. या ग्रंथालयामध्ये ग्रंथपालसह इतर चार कर्मचारी असा एकूण पाच कर्मचारी वर्ग सेवा पुरिवत आहेत.

वाचनालयामार्फत गेली २५ वर्षे 'लोक शिक्षण' व्याख्यानमाला आयोजित केली जाते. ग्रंथालयामार्फत प्रत्येक वर्षी मराठी साहित्य संमेलन भरविले जाते. ग्रंथ प्रदर्शन, कथाकथन, वक्तृत्व स्पर्धा इत्यादी उपक्रमांचे आयोजन केले जाते.

७) प्रबोधन वाचनालय, इचलकरंजी :

वैज्ञानिक समाजवादाचे खुले ज्ञानपीठ म्हणून या संस्थेची स्थापना कै.शांताराम गरूड यांच्या पुढाकाराने ११ मे, १९७७ रोजी करण्यात आली. आजतागायत महाराष्ट्रातील विशेषत: दक्षिण महाराष्ट्रातील प्रबोधन करणारी अग्रगण्य संस्था म्हणून समाजवादी प्रबोधनीने लौकीक संपादन केला आहे. १९९९ सालचा महाराष्ट्र फौंडेशनतर्फे दिला जाणारा समाजकार्य गौरव पुरस्कार या संस्थेला प्राप्त झाला आहे. संस्थेची वाटचाल प्रामुख्याने लोक वर्गणीच्या आधारेच झाली आहे व त्यातूनच

स्वत:ची प्रशस्त व नेटकी वास्तू उभी करण्यात आलेली आहे. त्यासाठी लोक वर्गणी इचलकरंजी नगरपालिका, मुख्यमंत्री निधी, देणगीदार, स्थायी निधी मोहिम, कार्यकर्ते, यांचीच मदत झाली.

या प्रबोधनाद्वारे संचलित प्रबोधन वाचनालय, इचलकरंजी या सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना १९८४ मध्ये करण्यात आली. तर या सार्वजनिक ग्रंथालयास 'अ' वर्ग मानांकन २०१० मध्ये मिळाले आहे. हे ग्रंथालय स्वत:च्या सुसज्ज इमारतीमध्ये असून कामकाजाची वेळ ९.०० ते १२.३० व दुपारी ४.०० ते ८.०० अशी आहे. या ग्रंथालयामध्ये एक ग्रंथपाल व इतर चार कर्मचारी कार्यरत आहेत. या ग्रंथालयाची एकूण ग्रंथसंपदा २६,८०० इतकी असून एकूण ९८ नियतकालिके उपलब्ध आहेत. या ग्रंथालयाची सध्याची सभासद संख्या ८५० इतकी आहे. त्या सभासदांना ग्रंथालयात अभ्यासिकेची सोय आहे. त्यांना मुक्तद्वार पध्दती दिली जाते. अशा पध्दतीने हे ग्रंथालय इचलकरंजी विकासामध्ये महत्वपूर्ण भूमिका निभावण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीत आहे. हे ग्रंथालय संगणकीकृत आहे.

८) महात्मा गांधी वाचनालय, कागल :

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे वडील श्रीमंत जयसिंगराव घाटगे यांनी १२ नोव्हेंबर, १८८० रोजी कागल मध्ये 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' स्थापन केली. स्थापनेवेळी वाचनालयाचा संपूर्ण खर्च जहांगिरीतून देण्याची व्यवस्था केली. सन १९५० साली या ग्रंथालयाचे 'महात्मा गांधी वाचनालय' असे नामकरण करण्यात आले. ग्रंथालय जसे प्रगती करत गेले, तसे वृत्तपत्रे, मासिके यांची संख्या वाढत गेली. वाचकांच्या आवडीची पुस्तके घेतली. वाचन चळवळ वाढावी यासाठीही या ग्रंथालयाने विविध उपक्रम राबविले. तालुक्याच्या इतर गावातील ग्रंथालयांना मौलीक असे मार्गदर्शन करून त्यांच्या अडणची सोडविण्यास मदत केली जाते.

या वाचनालयात ग्रंथ देवघेव, नियतकालीक विभाग, संदर्भ विभाग, बालविभाग, महिला विभाग, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र असे स्वतंत्र विभाग आहेत. वाचकांना वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी वाचनालयाच्यावतीने 'सभासद वाचक स्पर्धा' आयोजित केली जाते. जे वाचक काही अपरिहार्य कारणास्तव वाचनालयात येऊ शकत नाहीत, त्यांना घरपोच ग्रंथ पाठविण्याची सुविधा या वाचनालयामार्फत दिली जाते. वाचकासाठी दिपावली अंक योजना, व्याख्यानमाला, विद्यार्थ्यांसाठी

विविध स्पर्धा, पुस्तक प्रदर्शन, गणेश जयंती निमित्त सांस्कृतिक कार्यक्रम तसेच ग्रंथपाल कार्यशाळा आदि उपक्रम वाचनालयामार्फत यशस्वीपणे राबविले जातात. वाचनालयात असलेल्या ग्रंथांमध्ये विशेष दुर्मिळ ग्रंथ उपलब्ध आहेत. कागल शहराचे भूषण असलेल्या व गेली १३७ वर्षे सातत्याने वाचनालयाच्या माध्यमातून सामाजिक व जन जागृतीचे काम वाचनालय करीत आहे. ग्रंथसंख्या २३,७१६, दुर्मिळ ग्रंथ ४२, सभासद संख्या ४९८, ग्रंथालयीन कामकाज : सकाळी ९ ते १२ व सायंकाळी ५ ते ८. नियतकालिके – ८५, कर्मचारी : ५ आहेत.

अशा या प्रगतीपथावर असलेल्या सार्वजनिक ग्रंथालयास सन २०१० मध्ये 'अ' वर्ग मानांकन मिळाले. ग्रंथालयाची स्वतंत्र इमारत असून सभासदांसाठी मुक्तद्वार पध्दतीचा अवलंब केलेला आहे.

९) रसिकरंजन वाचनालय, घुणकी :

हे हातकणंगले तालुक्यातील एक महत्वाचे सार्वजनिक ग्रंथालय असून या सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना त्रिशताब्दी राज्याभिषेकदिनी म्हणजेच २४ मे, १९७४ रोजी करण्यात आली. हे 'अ' वर्ग (२०१०) सार्वजनिक ग्रंथालय असून गावाच्या मेन रोडवरती ग्रामपंचायतीजवळ आधुनिक बांधणीची आर.सी.सी. तीन मजली इमारत, भरपूर हवा, वीज, पाणी, प्रकाश, फर्निचर व स्वच्छतागृह इ. सोयींनी परिपूर्ण असून याचे क्षेत्रफळ एकूण १७३४ चौ.फूट आहे. या ग्रंथालयामध्ये ग्रंथ देवघेव विभाग, महिला विभाग, संदर्भ विभाग, बाल विभाग, स्पर्धा परीक्षा विभाग, रसिकरंजन सभागृह व अभ्यासिका इत्यादी आवश्यक विभाग आहेत. ग्रंथालयाने मुक्तद्वार पध्दतीचा अवलंब केला आहे.

या ग्रंथालयामध्ये असणाऱ्या पुस्तकांची संख्या २१,२६५ असून १६ दैनिके, ११ साप्ताहिके, ४ पाक्षिके, ६५ मासिके व इतर तीन अशी एकूण ९९ नियतकालिके मागविली जातात. या ग्रंथालयाचे कामकाजाची वेळ सकाळी ८ ते ११.३० व सायंकाळी ६ ते ९ अशी असून या ग्रंथालयाची सभासद संख्या ६४५ इतकी असून त्यांना ग्रंथालयीन सेवा पुरविण्यासाठी ग्रंथपाल व इतर चार ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. या ग्रंथालयाने मुक्तद्वार पध्दतीचा

अवलंब केलेला आहे. या ग्रंथालयास अनेक ग्रंथालय पुरस्कार मिळालेले आहेत. अगदी अलीकडे पुणे विभागाचा आदर्श ग्रंथालय सेवा पुरस्कार ग्रंथपाल सर्जेराव मोरे यांना २०१६ मध्ये देण्यात आला.

१०) राजर्षी शाहूनगर वाचन मंदिर, शिरोळ :

या ग्रंथालयाची स्थापना जून, १८७७ रोजी झाली. मोरो हरी ओक, बाबासाो कोरे, व्यापारी या सर्वांनी मिळून या ग्रंथालयाची स्थापना केली. श्री छत्रपती सरकार यांनी पहिल्या वर्षी पंचवीस रूपये अनुदान मंजूर केले. १९५४ मध्ये सुभाष वाचनालय म्हणून दुसरे ग्रंथालय सुरू झाले होते. परंतु दोन्ही वाचनालया दरम्यान संघर्ष सुरू झाला. त्यामुळे दोन्ही वाचनालयाच्या कार्यकर्त्यांनी समझोता करून दोन्ही वाचनालयाचे एकत्रीकरण करून राजर्षी शाहूनगर वाचन मंदिर असे नांव देण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. इ.स. १८७७ रोजी २९३ ग्रंथ संख्या व १० सभासद व दरमहा १० रूपये उत्पन्नाने सुरू झालेल्या ग्रंथालयात ३०,१२७ इतकी ग्रंथ संख्या असून ६२० सभासद संख्या आहे. ग्रंथालयास १९८९ मध्ये 'अ' वर्ग दर्जा प्राप्त झालेला आहे. ग्रंथालयात देवघेव विभाग, वृत्तपत्र व नियतकालीक विभाग, बालविभाग, महिला वाचक विभाग, अभ्यासिका इत्यादी विभाग आहेत. ज्ञानप्रसार करून ग्रामीण जनतेच्या बौध्दिक, मानसिक व सांस्कृतिक विकास करणे हा ग्रंथालयाचा उद्देश आहे. ग्रंथालयामार्फत व्याख्याने, वाचक मेळावे इत्यादी सारखे सांस्कृतिक उपक्रमाचे आयोजन केले जाते. ग्रंथालयात एकूण ११६ नियतकालिके, कर्मचारी वर्ग ५, ग्रंथालयाची वेळ : सकाळी ८ ते १२ व सायंकाळी ४ ते ९ अशी आहे. या ग्रंथालयात मुक्तद्वार पध्दतीचा अवलंब केलेला आहे. त्यामुळे सभासदांना हवे ते पुस्तक शोधणे सोयीस्कर जाते. तसेच १ मे ते ६ मे रोजी शाहू व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते.

११) सार्वजनिक वाचनालय, मलकापूर :

या ग्रंथालयाची स्थापना विशाळगड जहांगिरीचे जहांगीरदार आबासाहेब पंतप्रतिनिधी यांनी सन १८८१ मध्ये मलकापूर येथे स्वत:जवळील ग्रंथ संग्रहाच्या साह्याने 'नेटीव्ह जनरल लायब्ररी' ची स्थापना केली. सुरूवातीच्या काळात ग्रंथ संपदा फारच कमी होती. आठवड्यातून एक किंवा दोन दिवस ग्रंथ देवघेव होत असे. कालांतराने सरकारी मोफत वाचनालय असे नाव देण्यात आले. सन

१९२८ मध्ये वाचनालयाचे नगरपालिकेकडे स्थलांतर झाले. त्यावेळी सरकारी मोफत वाचनालय ऐवजी 'सार्वजनिक वाचनालय' असे नामकरण करण्यात आले. १९७१ मध्ये स्वतंत्र ट्रस्टच्यावतीने या वाचनालयाचा कारभार सुरू झाला. १९७३ मध्ये वाचनालयास 'ब' वर्ग दर्जा मिळाला. तर सन २००९ मध्ये तालुका 'अ' वर्ग वाचनालय दर्जा मिळाला. सन २००७ मध्ये वाचनालयाने शतकोत्तर रौप्य महोत्सव साजरा केला व कै.शैलजादेवी पंतप्रतिनिधीच्या नावाने व्याख्यानमाला सुरू केली. तसेच शतकोत्तर रौप्य महोत्सवानिमित्त कोल्हापूर जिल्हा ग्रंथालयाचे अधिवेशन घेण्यात आले.

या वाचनालयाच्यावतीने वाचन चळवळ गतिमान होण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. दरवर्षी दिपावली निमित्त 'दिपावली अंक योजना' सुरू असते. त्यामध्ये २५० दिवाळी अंक खरेदी केले जातात. या वाचनालयाच्यावतीने शाहुवाडी तालुक्यातील लहान ग्रंथालयांना साखळी योजना कार्यान्वित आहे. या वाचनालयात २६,५४० इतकी ग्रंथ संख्या असून १६५ दुर्मिळ ग्रंथ आहेत. दुर्मिळ ग्रंथांमध्ये वेद, पुराणे, जुन्या पोथ्यांचा समावेश आहे. या वाचनालयाचे संगणकीकरण झालेले आहे. ग्रंथालयाची सभासद संख्या ८५५ इतकी आहे.

१२) हुतात्मा तुकाराम वाचनालय, मुरगूड :

हुतात्मा तुकाराम वाचनालयाची स्थापना १९५१ साली झाली. सुरूवातीस 'स्टेट लायब्ररी' म्हणून मान्यता मिळाली. दोन वर्षानंतर १९५३ साली संस्थेस 'ड' वर्ग मिळाला. ग्रंथालयात सुरूवातीस १२८५ ग्रंथसंपदा होती. १९६४ मध्ये संस्थेत शासनाचा 'क' वर्ग हा दर्जा मिळाला. संस्थेस दिनांक २४.०६.१९६८ रोजी रजिस्ट्रेशन मिळाले व वाचनालयात गॅझेट मोफत येऊ लागले. तेव्हापासून सरकारी अनुदान मिळण्यास सुरूवात झाली. सन १९८८ मध्ये संस्थेस शासनाकडून 'ब' इतर दर्जा प्राप्त झाला. संस्थेच्या नवीन इमारतीचे उद्घाटन दिनांक ०७.१०.१९९५ इ. रोजी करण्यात आले. संस्थेस मिस्टर हॉग नेदरलँड यांनी भेट दिली. या सार्वजनिक ग्रंथालयास 'अ' वर्ग मानांकन इ.स.२०१० मध्ये मिळाले. सध्या या ग्रंथालयाची ग्रंथसंपदा २०,०४२ इतकी असून ८५ नियतकालिके मागविली जातात. या ग्रंथालयाचे ६४५ इतके सभासद असून त्यांना ग्रंथालयीन सेवा

पुरविण्यासाठी एक ग्रंथपाल व तीन इतर कर्मचारी असा एकूण पाच जणांचा कर्मचारी वर्ग आहे. या ग्रंथालयाने आपल्या ग्रंथसंग्रहास सभासदांसाठी मुक्तद्वार पध्दतीचा अवलंब केलेला आहे.

१३) श्री छत्रपती शिवाजी वाचनालय, सावर्डे :

छत्रपती शिवाजी वाचनालयाची स्थापना सन १९७६ मध्ये झाली असून अत्यंत कठीण परिस्थितीत गावच्या शैक्षणिक विकासासाठी व विद्यार्थ्यांचे ज्ञान वाढविण्यासाठी ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली. 'खेड्याकडे चला' या महात्मा गांधींच्या म्हणीप्रमाणे 'गाव तेथे ग्रंथालय' या अनुषंगाने झालेले आहे. आज संपूर्ण कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामीण परिसरातील वाचनालय चळवळीस अभिमानास्पद ठरावी अशी वाचनालयाने वाटचाल केलेली आहे. सुरूवातीला ३० सभासद असणाऱ्या या वाचनालयाची आज सभासद संख्या ५०५ इतकी आहे. सुरूवातीस १५० पुस्तके असणाऱ्या या वाचनालयाची आजची पुस्तक संख्या २०,३०९ इतकी आहे. ५१ नियतकालिके व १६ वृत्तपत्रे वाचनालयात उपलब्ध आहेत. हे वाचनालय दुर्मिळ ग्रंथ संपदेने नटलेले ग्रंथ भांडार आहे.

दरवर्षी गावामध्ये ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आयोजित केला जातो. त्यासाठी ग्रंथालयासाठी १०० ज्ञानेश्वरी सोहळ्यासाठी विना मोबदला उपलब्ध करून दिल्या आहेत. वाचनालयामध्ये महिला विभाग, बाल विभाग, पुरूष विभाग, अभ्यासिका, कात्रण सेवा, वृत्तपत्र विभाग, नियतकालिक विभाग इ. विभाग आहेत. या ग्रंथालयास जिल्हा पातळीवरील प्रथम पारितोषिक मिळालेले आहे. बाल वाङ्मय, अध्यात्म विज्ञान, सामान्य विज्ञान अशी अनेक पुस्तके उपलब्ध करून दिलेली आहेत. विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा अशा प्रकारच्या स्पर्धा आयोजित करून विद्यार्थ्यांना उत्तेजन दिले जाते. ग्रामीण भागातील उत्कृष्ट ग्रंथालय म्हणून नावलौकीक मिळविलेला आहे.

१४) श्री दत्त सार्वजनिक वाचनालय, नृसिंहवाडी :

श्री दत्त सार्वजनिक वाचनालय, नृसिंहवाडी या सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना १९७५ मध्ये करण्यात आली. सदर सार्वजनिक ग्रंथालयास शासनाकडून १९९० मध्ये 'अ' वर्ग मानांकन प्राप्त झाले. अशा या ग्रंथालयाची कार्यालयीन वेळ सकाळी ८ ते ११ व दुपारी ४ ते ७ पर्यंत आहे. या ग्रंथालयातील ग्रंथ संग्रहात २७,८९८ इतके ग्रंथ संग्रह असून ९७ नियतकालिके मागविली जातात. या

ग्रंथालयाचे ३२० इतके सभासद असून त्यांना ग्रंथालयीन संदर्भ सेवा, माहिती सेवा, यासारख्या सेवा पुरविण्यासाठी एक ग्रंथपाल आणि इतर चार कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. या ग्रंथालयाच्या ग्रंथ संग्रहास सभासदांना मुक्तद्वार पध्दतीचा अवलंब केलेला नाही. या ग्रंथालयाचा ग्रंथ संग्रह बंदिस्त स्वरूपाचा आहे. त्यामुळे वाचकांना हवे ते पुस्तक मिळविण्यास अडचणी येतात आणि ग्रंथालयीन कर्मचारी तसेच वाचक वर्गाच्या वेळेचा अपव्यय होतो. ग्रंथालयाने मुक्तद्वार पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. या ग्रंथालयाची स्वतंत्र इमारत आहे. तसेच ग्रंथालयीन सभासदांना व वाचकांना अभ्यासासाठी अभ्यासिकेची सोय आहे.

१५) श्री भास्कररराव जाधव वाचनालय, कोल्हापूर :

करवीर परिसरातील सर्वांत जुन्या सार्वजनिक वाचनालयापैकी एक ग्रंथालय आहे. करवीरवासीयांसाठी एक सांस्कृतिक केंद्र म्हणून नावारूपास आलेले हे वाचनालय सामाजिक, सांस्कृतिक त्याचबरोबर शैक्षणिक वारसा जतन करीत आलेले आहे. इतिहासामध्ये पाहिल्यास सन १९४० ते सन १९४१ या स्वातंत्र्यपूर्व काळात करवीर नगर परिषदेने श्री. भास्कररराव जाधव वाचनालय, छत्रपती महाराणी ताराबाई वाचनालय व पद्माराजे वाचनालय अशी तीन वाचनालये सुरू केली होती. परंतु करवीर संस्थानाचे भारतामध्ये विलीनीकरण झाल्यानंतर सन १९५२ मध्ये तत्कालीन नगर परिषदेने इतर दोन ग्रंथालये भास्कररराव जाधव वाचनालयामध्ये समाविष्ट करून सुसज्ज असे वाचनालय सुरू केले. श्री. भास्कररराव जाधव हे कोल्हापूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी होते. त्यांनी कोल्हापूर शहरासाठी केलेले कार्य व योगदान यांच्या स्मरणार्थ या वाचनालयात श्री.भास्कररराव जाधव वाचनालय असे नाव देण्यात आले. वाचनालय दरवर्षी सामाजिक प्रबोधनपर कार्यक्रम म्हणून राजर्षी शाहू लोकशिक्षण व्याख्यानमाला आयोजित करते. वाचनालयाच्या स्थापनेपासून समाज प्रबोधनासाठी अनेक तज्ज्ञ लोकांची व्याख्याने आयोजित केली जातात.

या ग्रंथालयाची एकूण ग्रंथसंपदा ५५,३३९, नियतकालिकांची संख्या ९४, सेवकांची संख्या ९, कामकाजाची वेळ : सकाळी ८.३० ते १२.३० व दुपारी ३ ते ७ अशा पध्दतीने हे ग्रंथालय कोल्हापूर शहराच्या विकासात एक सांस्कृतिक केंद्र म्हणून महत्वाची भूमिका पार पाडीत आहे. या

सार्वजनिक ग्रंथालयास 'अ' वर्ग मानांकन इ.स.१९७२ मध्ये मिळालेला आहे. या ग्रंथालयाची स्वतंत्र इमारत आहे.

१६) श्री शारदा वाचन मंदिर, वारणानगर :

श्री शारदा वाचन मंदिर, वारणानगर, तालुका : पन्हाळा या सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना १९७० मध्ये करण्यात आली. सदर सार्वजनिक ग्रंथालयास शासनाने 'अ' वर्ग मानांकन सन १९९२ मध्ये बहाल केलेले आहे. या ग्रंथालयाची प्रशस्त अशी स्वतंत्र इमारत आहे. या ग्रंथालयात ३२,००० पुस्तकांचा ग्रंथसंग्रह असून ६५ नियतकालिके मागविली जातात. ग्रंथालयामध्ये विविध विभाग असून ५८० सभासदांना विविध ग्रंथालयीन सेवा पुरविल्या जातात. या कामी ग्रंथालयात एक ग्रंथपाल कार्यरत असून इतर चार ग्रंथालय कर्मचारी विविध ग्रंथालयीन सेवा सभासदांना पुरविण्यात मदत करीत आहेत. या ग्रंथालयाने बंदिस्त देवघेव पध्दतींचा वापर केलेला असून वाचकांना प्रत्यक्ष ग्रंथ संग्रहामध्ये प्रवेश दिला जात नाही.या ग्रंथालयाच्या कामकाजाची वेळ सकाळी ८ ते १२ व सायंकाळी ४ ते ८ अशी आहे. या ग्रंथालयाची स्वत:ची सर्व सोयींनीयुक्त अशी इमारत आहे. भरपूर हवा, सूर्यप्रकाश, वायुविजन, पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन, पाणी, अग्नी, कीटक, वेगवेगळे कृमी इत्यादींपासून पुस्तकांचे संरक्षण व जतन करण्याच्या सुविधा निर्माण केलेल्या आहेत. ग्रंथालयाच्या सभोवती वृक्ष लागवड करत ग्रीन लायब्ररी संकल्पना (हिरवे ग्रंथालय) अंमलात आणण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१७) श्री शाहू वाचनालय, गारगोटी :

भुदरगडचे मामलेदार बखले यांनी गारगोटीतील सार्वजनिक इमारत म्हणून एकमेव असलेल्या धर्मशाळेत १८७६ ला 'जनरल लायब्ररी' सुरू केली. त्यांनी जनतेकडून ३०० रूपये निधी जमवून छोटेखानी स्वतंत्र इमारत बांधली व १८८९ ला या वाचनालयाचे 'नेटीव्ह जनरल लायब्ररी' असे नामकरण करून सरकारी अनुदान मंजूर केले. या ग्रंथालयात सेवाभावी वृत्तीने पूर्णवेळ व विना मोबदला काम करणारे ठाकूर हे या वाचनालयाचे पहिले सेवक होत. १९२६ मध्ये राजाराम गोविंद सामंत यांनी स्वत:ची जागा या वाचनालयास दिली. या जागेत वाचनालयाची सुसज्ज इमारत बांधण्यात

आली. या इमारतीत १९२८ मध्ये स्थलांतर झाले. त्याचवेळी वाचनालयाचे 'श्री शाहू वाचनालय' असे नामकरण करण्यात आले.

या वाचनालयास १९८९ मध्ये 'अ' वर्ग दर्जा प्राप्त झाला. ग्रंथालयात ३१,२२५ इतकी ग्रंथ संख्या आहे. ग्रंथाचे द्विबिंदू पध्दतीने वर्गीकरण केले आहे. वाचनालयात वृत्तपत्रे व नियतकालिके विभाग व मुक्तद्वार पध्दती आहे. बाल विभाग, महिला विभाग, अभ्यासिका सुसज्ज आहे. वाचनालयात दुर्मिळ ग्रंथ आहेत. वर्गणीदार सभासद ४९१ आहेत. संस्थेत राजाराम मोहन रॉय साखळी योजने अंतर्गत २,८२७ इतके ग्रंथ आहेत. या योजनेचा २३ संस्था सभासद लाभ घेत आहेत. महिलांसाठी भरतकाम, विणकाम, पाकशास्त्र आदि विषयावरील पाचशे ग्रंथ ठेवण्यात आलेले आहेत. संदर्भ ग्रंथ विभाग, पुस्तक देवघेव विभाग, अभ्यासिका असे स्वतंत्र विभाग सुरू आहेत. मुक्तद्वार विभागात १६ दैनिके, १५ साप्ताहिके, ९ पाक्षिके आणि ३५ मासिके नियमित घेतली जातात. एकूण सभासद संख्या १,२२४ इतकी आहे.

१८) श्री सरस्वती वाचनालय सांस्कृतिक मंडळ, मडिलगे, ता.आजरा, जि.कोल्हापूर :

या ग्रंथालयाची स्थापना प्रा. आर. एस.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली त्यावेळच्या तरूण कार्यकर्त्यांनी एकत्रित येऊन १९८० साली स्थापना केली. ग्रामीण भागातील सामान्य माणसांना वाचनाची आवड असून दैनिके, नियतकालिके, पुस्तके, स्वत: खरेदी करून वाचणे अशक्य होते. म्हणून ग्रामीण भागातील लोकांच्या वाचनाच्या गरजा भागविण्यासाठी श्री भालेश्वरी ग्राम विकास मंडळांतर्गत हे वाचनालय सुरू केले गेले. सुरूवातीला १२१ पुस्तके व ६९ सभासद एवढ्यावरच ग्रंथालय सुरू करण्यात आले. १९८१ साली वाचनालयाला शासनाची मान्यता मिळाली व इतर 'ड' वर्गात वाचनालय सुरू झाले. १९९३-९४ मध्ये श्री.निऊंगरे यांनी श्री.केदारी पोवार यांच्या मार्गदर्शनाखाली व ग्रंथपाल चोडणकर यांच्या मदतीने वाचनालय प्रगतीपथावर नेण्याचा प्रयत्न केला. वर्ग बदलण्यासाठी लागणारी पुस्तके, मासिके व कागदपत्रे यांची पूर्तता करून वाचनालयाला इतर 'क' वर्ग मिळाला. सन १९९८ मध्ये वाचनालयास कोल्हापूर जिल्हा ग्रंथालयातर्फे 'क' वर्गातील उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार मिळाला व ग्रंथालयास गौरवण्यात आले. तत्कालीन खासदार कै.सदाशिवराव

मंडलीक यांच्या फंडातून वाचनालयास ४ लाखाचा निधी उपलब्ध करून दिला. वर्ग बदलासाठी लागणाऱ्या सर्व निकषाची पूर्तता करून सन २००४–०५ मध्ये वर्ग बदलास मान्यता मिळाली व ग्रंथालयास 'अ' वर्ग मानांकन मिळाले.

'वाचाल तर वाचाल' या वाचनालयाच्या ब्रीदवाक्याची खात्री सर्व वाचकांना पटल्याने दिवसेंदिवस वाचक वर्ग वाढत गेला. या वाचनालयाने स्कॉलरशिप, स्पर्धा परीक्षा, नेट, सेट, एम.पी.एस.सी., यु.पी.सी. पर्यंत सर्व प्रकारची जनरल नॉलेजची पुस्तके उपलब्ध केली आहेत.

वाचनालयाकडे वेगवेगळ्या प्रकारची ग्रंथसंपदा खालीलप्रमाणे आहे :–

ग्रंथ संख्या : २०,९४६, नियतकालिके : ९७, ग्रंथालय कर्मचारी : ५, ग्रंथालयीन वेळ : सकाळी ७ ते १० व संध्याकाळी ५ ते ९. या ग्रंथालयाची स्वतंत्र इमारत असून एकूण सभासद संख्या ५५५ आहे. या ग्रंथालयाने मुक्तद्वार पध्दतीचा अवलंब केलेला आहे.

१९) श्रीमंत गंगामाई वाचन मंदिर, आजरा :

कोल्हापूर जिल्ह्यातील एक महत्वाचे शतकोत्तरी 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालय असून याची स्थापना १८८९ मध्ये विजयादशमीला झालेली आहे. प्रारंभी १३४ पुस्तके व ४ नियतकालिकांवर ग्रंथालयाचे कामकाज खासगी जागेत सुरू केले. श्रीमंत गंगामाई राणी सरकार यांनी आजरा भेटीप्रसंगी ग्रंथालयाला पंधरा हजार रूपये देणगी दिली. म्हणून १९३३ मध्ये ग्रंथालयाला 'श्रीमंत गंगामाई वाचन मंदिर' असे नाव देण्यात आले. आजरा परिसरातील हे वाचनालय एक महत्वाचे सामाजिक व सांस्कृतिक केंद्र असून ग्रामीण भागातील वाचकांच्या माहितीच्या गरजा भागविण्याचे महत्वाचे कार्य पार पाडीत आहे. सध्या शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी ग्रंथालयाची स्वमालकीची सर्व सोयींनीयुक्त दुमजली इमारत आहे. पारंपारिक ग्रंथालय सेवेबरोबरच आधुनिकतेची कास धरून ग्रंथालयाचे संगणकीकरण व बार कोडींगचे काम पूर्ण असून ग्रंथालयाचे कामकाज संगणकावर केले जाते. ग्रंथालयाच्यावतीने नियमित विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. यामध्ये ग्रंथ प्रदर्शन व्याख्यानमाला, विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा, महिला, शेतकरी, जेष्ठ नागरिकांसाठी विविध कार्यक्रम, साहित्य पुरस्कार योजना, उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार योजना आदींचा समावेश होतो. ग्रंथालयामध्ये मुक्तद्वार वाचनालय, ग्रंथ

देवधेव विभाग, संदर्भ ग्रंथ विभाग, अभ्यासिका, महिला विभाग, बालविभाग, साखळी योजना, स्पर्धा परीक्षा विभाग, ध्वनीफित, चित्रफीत इ. विविध विभाग आहेत. या ग्रंथालयामध्ये असणारे वाचन साहित्य खालीलप्रमाणे आहे. ग्रंथ संपदा – ३०,२७१, नियतकालिके – १२१, कर्मचारी – ५, ग्रंथालयीन वेळ : सकाळी ९ ते १२.३० व दुपारी ३ ते ७. या सर्व ग्रंथालयीन सेवांचा १,०३१ ग्रंथालय सभासद लाभ घेत आहेत.

३.१६.२ पुणे :

१) इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ तालुका वाचनालय, इंदापूर

या ग्रंथालयाची स्थापना सन १९३८ मध्ये झाली. स्थापनेनंतर या तालुका वाचनालयाचे कार्य लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने 'अ' वर्ग मानांकन दिले. ग्रंथालयाची स्वत:च्या मालकीची इमारत आहे. या ग्रंथालयाचा दैनंदिन कारभार चालविला जातो. ग्रंथालयात वृत्तपत्रविभाग, पुस्तक देवघेव विभाग, बालविभाग, महिला विभाग, संदर्भ विभाग असे स्वतंत्र विभाग आहेत. वाचन संस्कृती वाढविण्यासाठी ग्रंथालयाच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. ग्रंथप्रदर्शन, वाचकांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. तसेच ग्रंथालयाच्या सभासद वाचकांची निवड करून उत्कृष्ट वाचन पुरस्कार, उत्कृष्ट बालवाचक पुरस्कार दिला जातो. महाराष्ट्राच्या जडणघडणीत केलेल्या योगदानाप्रित्यर्थ महाराष्ट्र शासनाच्या वतीने ग्रंथालयास सन्मान पत्र व विशेष अनुदान देऊन गौरविण्यात आले आहे. ग्रंथालयात एकूण २९१७४ इतका ग्रंथसंग्रह आहे. तसेच नियतकालिकांची संख्या ६४ अशी आहे. ग्रंथालयात एक ग्रंथपाल व इतर चार कर्मचारी काम करीत आहेत. ग्रंथालयाची एकूण सभासद संख्या ७०४ अशी आहे.ग्रंथालयात मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. ग्रंथालयाची वेळ सकाळी ९ ते १२ व सायंकाळी ३ ते ७ अशी आहे. वाचनालयाच्या वतीने गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी नि:शुल्क अभ्यासिकेची सोय करण्यात आली आहे. अभ्यासिकेत स्पर्धा परीक्षेची पुस्तके ठेवण्यात आली आहेत. या स्पर्धा परीक्षा अभ्यासिकेचा उपयोग अनेक विद्यार्थ्यांना झाला आहे. 'वाचन संस्कृती वाढावी' यासाठी या वाचनालयाच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.

२) इंदिरा सार्वजनिक ग्रंथालय काँग्रेस भवन, पुणे.

मुळा व मुठा या दोन नद्यांच्या किनारी वसलेल्या, विद्येचे माहेर घर असलेल्या पुणे नगरीत इंदिरा सार्वजनिक ग्रंथालय शिवाजीनगर, पुणे सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना सन १९९६ रोजी करण्यात आली. ग्रंथालयाची स्वत:ची अशी इमारत आहे. ग्रंथालयास 'अ' वर्ग दर्जा सन २००३ मध्ये देण्यात आलेला आहे. तसेच ग्रंथालयाची कामकाज वेळ सकाळी ९ ते १ सायंकाळी ४ ते ७ अशी आहे. या सार्वजनिक ग्रंथालयाच्या ग्रंथसंग्रहामध्ये २१८१४ पुस्तके आहेत. त्यामध्ये संदर्भ ग्रंथ, विश्वकोश, बालवाड्.मय, क्रमिक पुस्तके, कथासंग्रह, नाटके, चरित्र, पुराणे इत्यादींचा समावेश होतो. या ग्रंथालयाची एकूण सभासद संख्या ५१० अशी आहे. ग्रंथालयीन सेवा चांगल्या प्रकारे देण्यासाठी एक ग्रंथपाल व इतर तीन कर्मचारी काम करीत आहेत.

या इंदिरा सार्वजनिक ग्रंथालयामध्ये प्रामुख्याने वाचन विभाग, देवघेव विभाग, बालविभाग, संदर्भ विभाग, अभ्यासिका असे स्वतंत्र विभाग आहेत. ग्रंथालयाच्या वतीने वाचन संस्कृती वाढविण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. सांस्कृतिक कार्यक्रम, वक्तृत्वस्पर्धा, गाण्यांच्या स्पर्धा, हळदीकुंकू, थोरामोठ्यांची भाषणे, निबंध स्पर्धा इ. स्पर्धा आयोजित केल्या जातात. या सार्वजनिक ग्रंथालयात ८२ नियतकालिके घेतली जातात. ग्रंथालयाची सभासद संख्या ५१० अशी आहे.ग्रंथालयातील पुस्तकांची देवघेव करण्यासाठी मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब केलेला आहे. त्यामुळे वाचकांना आपणास हवे ते पुस्तक मिळाल्याचा आनंद प्राप्त होतो. या ग्रंथालयीन चळवळीतील विशेष कार्यास महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक जडणघडणीत मोलाचे मार्गदर्शन मिळत आहे.

३) ए.आर.एस. इनामदार पब्लिक लायब्ररी ॲन्ड फ्री रिडींग रूम आझम कॅम्पस, पुणे.

या सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना सन १९१५ मध्ये केली. सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना मुळातच समाजातील व्यक्तींना माहिती देणे, त्याचबरोबर त्यांच्या शैक्षणिक गरजा भागविणे या उद्देशाने केलेले असते. लोकांना आजीव शिक्षण देणे हा ग्रंथालयाचा उद्देश असतो. ज्यामुळे समाजाच्या विकासाबरोबर सर्वसामान्य लोकांना स्वतंत्रपणे कोणावरही अवलंबून न राहता स्वत:चे निर्णय स्वत: घेण्यास सक्षम बनविले जाते. ए.आर.एस. इनामदार सार्वजनिक ग्रंथालय याच उद्देशाने प्रेरीत होऊन

कार्य करीत आहे. याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने इतर 'अ' वर्ग मानांकन दिले आहे. या ग्रंथालयामध्ये ३०,००० ग्रंथ उपलब्ध आहेत. पुस्तकांचे अंकीकरण (डिजिटायझेशन) करण्याचे कार्य प्रगतीपथावर आहे. या ग्रंथालयामध्ये हिंदी, इंग्रजी, उर्दू भाषेतील ग्रंथ उपलब्ध आहेत. त्याचबरोबर हे ग्रंथालय १४२ नियतकालिके मागविते. त्यामुळे वाचकांना अद्यावत ज्ञान मिळण्यास मदत होते. ग्रंथालयाच्या संगणकीकरणामुळे दर्जेदार व अद्यावत ग्रंथालयीन सेवा देणे ग्रंथालयास शक्य झाले आहे. ग्रंथालयाची एकूण वाचक संख्या ६३६ आहे. या सर्व सभासदांना ग्रंथालय दर्जेदार सेवा देते. त्यासाठी ग्रंथालयामध्ये एक ग्रंथपाल व चार ग्रंथालयीन कर्मचारी कार्यरत आहेत. या ग्रंथालयाने पुस्तक देवघेव सेवेसाठी मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब केलेला आहे. त्याचबरोबर ग्रंथालयातर्फे आंबेडकर जयंती रॅली, स्वतंत्रता दिवस, अखिल भारतीय मुशेरा, अपना मुकाम पैदाकर, इकबाल दिवस, ईद ए मिलाद दिनादि रॅली, पालकांचे गेट टुगेदर, प्रजासत्ताक दिन, गालीद दिवस, मेहरीक आझादी, उर्दू शाहीरी, ईस्लाम हसरे हाजीर, आंतरशालेय कथाकथन स्पर्धा, शिवजयंती यासारखे उपक्रम राबविले आहेत. अशाप्रकारे हे ग्रंथालय समाजाच्या विकासासाठी प्रयत्नशील आहे.

४) कविवर्य मोरोपंत वाचनालय, भिगवणचौक, बारामती.

समाजपरिवर्तनासाठी ग्रंथालय आवश्यक आहे. ही सामाजिक जाण ठेवून नगरपालिकेने कविवर्य मोरोपंत वाचनालयाची सन १९१० मध्ये स्थापना करण्यात आलेली आहे. ग्रंथालयाची सुसज्ज अशी दोन मजली इमारत बांधली आहे. या ग्रंथालयात मुक्तद्वार विभाग, पुस्तक देवघेव विभाग, संदर्भ विभाग, महिला विभाग, अभ्यासिका, संगणक कक्ष असे स्वतंत्र विभाग आहेत. ग्रंथालयात ६७३०० इतकी ग्रंथसंख्या असून यामध्ये दुर्मिळ पुस्तकांचा संग्रह आहे. या वाचनालयाची वैशिष्ट्यपूर्ण वाटचाल झाल्याने सन १९७० मध्ये या वाचनालयास शासनाकडून 'अ' वर्ग हा दर्जा मिळाला आहे.

या ग्रंथालयाच्या वतीने व्याख्यानमाला आयोजित केली जाते. सर्वांसाठी कथाकथन, काव्यवाचन स्पर्धा, शालेय विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा, स्मृतीवाचन स्पर्धा, पाठांतर स्पर्धा, देशभक्तीपर समूहगीत, महिलांसाठी गीता गायन स्पर्धा आयोजित केल्या जातात. ग्रंथालयातील ग्रंथ

संग्रहाचा वाचकांना जास्तीत जास्त उपयोग करता यावा म्हणून ग्रंथालयाने मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब केला आहे. ग्रंथालयात शब्दकोश, बालवाड्.मय, कथा कादंबरी, ललितसंग्रह, विश्वकोश इत्यादीचा अंतर्भाव केलेला आहे. या ग्रंथालयात २४३ नियतकालिके मागविली जातात. ग्रंथालयाच्या कामकाजाची वेळ सकाळी ८ ते ११.३० आणि सायंकाळी ५ ते ८.३० अशी आहे. ग्रंथालयात एक ग्रंथपाल, इतर चार कर्मचारी काम करीत आहेत. ग्रंथालयातील पुस्तकांचे संरक्षण करण्यासाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. ग्रंथालयाचा खर्च बारामती नगरपालिकेतूनच केला जातो. त्यामुळे हे ग्रंथालय सुसज्ज असे आहे.

५) ग्रामपंचायत वाचनालय, मंचर

हे सार्वजनिक ग्रंथालय ग्रामपंचायतीमार्फत चालविले जाते. या ग्रंथालयाची स्थापना सन १९६८ साली झालेली आहे. ग्रंथालयास तालुका इतर 'अ' वर्ग मान्यता मिळाली आहे. मंचरच्या वाचनालयात विविध विषयावरील कथा, कादंबरी, धार्मिक ग्रंथ, गौरव ग्रंथ, प्रवास वर्णन, स्पर्धा परीक्षा संबंधी असणारे वाचन साहित्य इत्यादीचा समावेश होतो. या ग्रंथालयातील बालवाड्.मय, स्त्रीविषयक साहित्य, धार्मिक ग्रंथ असे वाचन साहित्य निवडले जाते. समाजातील तळागाळातील लोकापर्यंत वाचनसंस्कृती रूजवण्यासाठी या ग्रंथालयाची निर्मिती झाली असल्यामुळे सर्व स्तरातील लोकांच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन ग्रंथालयातील वाचन साहित्य खरेदी केले जाते. आज वाचनालयात २२३०७ हून जास्त ग्रंथ उपलब्ध आहेत. ग्रंथालयात एकूण ८१ नियतकालिके खरेदी केली जातात. ग्रंथालयात एक ग्रंथपाल व इतर तीन कर्मचारी काम पाहत आहेत.ग्रंथालयाची एकूण सभासद संख्या ५३० इतकी आहे. ग्रंथालयाची कामकाजाची वेळ ९.३० ते ५.३० अशी आहे. ग्रंथालयाने मुक्तद्वार व बंदिस्त पद्धतीचा अवलंब केलेला आहे. वाचनालयात महिला विभाग, बालविभाग, पुस्तक देवघेव विभाग, नियतकालिके विभाग, संदर्भ विभाग असे विविध विभाग आहेत. मुक्तद्वार विभागात १५ दैनिके नियमित येतात. हे ग्रंथालय 'वाचन चळवळ' वृद्धिंगत होण्यासाठी सातत्याने उपक्रम राबविते. त्याचबरोबर सामाजिक व सांस्कृतिक कार्य ही करते. ग्रंथालयाच्या वतीने शालेय व महाविद्यालयीन

विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व, निबंध, कथाकथन, वादविवाद, काव्यवाचन, अभंग वाचन, स्फूर्तीगीत, रांगोळी, गायन, चित्रकला स्पर्धा आयोजित केल्या जातात.

दरवर्षी १५ ऑगस्टला स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला ग्रंथालयाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. मे महिन्यात विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी व्यक्तीमत्व विकास शिबीर घेतले जाते. ग्रंथालयाने बंदिस्त पद्धतीचा अवलंब केलेला आहे.

६) जयहिंद वाचनालय, धामणी

पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील धामणी या ग्रामीण भागात जयहिंद वाचनालयाची स्थापना सन १९४७ मध्ये झाली. धामणी या गावात वाचन संस्कृती निर्माण व्हावी या उद्देशाने या ग्रंथालयाची निर्मिती केली. या वाचनालयाद्वारे समाजाचा, सामाजिक, सांस्कृतिक विकास व्हावा या उद्देशाने वाचनालयाची निर्मिती केली. या वाचनालयास स्वत:च्या मालकीची इमारत आहे. या वाचनालयास सुरूवातीस 'ड' वर्ग मिळालेला होता. आज वाचनालयास महाराष्ट्र सरकारकडून सन २००० साली 'अ' वर्ग म्हणून मान्यता मिळाली आहे. जयहिंद वाचनालय हे विविध प्रकारच्या ग्रंथांनी परिपूर्ण असे समृद्ध वाचनालय आहे. या वाचनालयातील ग्रंथसंग्रहात विविध विषयातील ग्रंथ, कथा, कादंबरी, धार्मिक ग्रंथ, प्रवास वर्णन इ. प्रकारचे वाङ्मय प्रकारातील साहित्याची निवड केली जाते. वेगवेगळ्या वाचक सभासदांच्या प्रकारानुसार वाचन साहित्याची निवड केली जाते. या ग्रंथालयातील एकूण ग्रंथसंग्रह ३२८०० एवढा आहे. विविध प्रकारचे ग्रंथ, धार्मिक ग्रंथ, संदर्भ ग्रंथ तसेच हिंदी, इंग्रजी भाषातील वाचन साहित्य इत्यादीचा समावेश होतो.

जयहिंद वाचनालयात ८० मासिके येतात. ती विविध विषयातील ललित, गृहलक्ष्मी, किर्लोस्कर इत्यादीचा समावेश होतो. ग्रंथालयात विविध विषयातील साप्ताहिके घेतली जातात. यात मार्मिक, सपना, आऊटलूक, इंडिया टुडे याचा समावेश होतो. वाचनालयात दरवर्षी दिवाळी अंक योजना राबविली जाते. या योजनेद्वारे विविध विषयावरील दिवाळी अंक वाचकांना उपलब्ध करून दिले जातात. जयहिंद वाचनालयामध्ये विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे वाचकांना विविध विषयावरील ग्रंथ प्रदर्शन तसेच मान्यवरांची व्याख्याने आयोजित केली जातात. या ग्रंथालयाची एकूण

सभासद संख्या ५०२ असून वाचनालयाची देवघेव वेळ ८ ते ११.३० व सायंकाळी ४.३० ते ८ अशी आहे. ग्रंथालयात ग्रंथपाल व इतर तीन कर्मचारी काम पाहत आहेत.

७) श्री गणेश मोफत वाचनालय व ग्रंथालय, तळेगांव दाभाडे

श्री गणेश मोफत वाचनालयाची स्थापना सन १९९६ मध्ये करण्यात आली. समाजातील सर्व लोकांमध्ये वाचनाबद्दल आवड निर्माण होण्यासाठी ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली. या ग्रंथालयाची स्वत:ची इमारत आहे. या वाचनालयास सन २००९ साली'अ' वर्ग शासनमान्यता मिळाली आहे. वाचनालयातील ग्रंथसंग्रह हा समृद्ध व विविध प्रकारच्या वाचनसाहित्याने परिपूर्ण असा आहे.

या ग्रंथसंग्रहात विविध विषयावरील ग्रंथ, कथा, कादंबरी, संदर्भ ग्रंथ, प्रवास वर्णन असे विविध प्रकारचे वाचनसाहित्य घेतले जाते. तसेच महिला विभाग, बालविभाग, संदर्भ विभाग या सर्व विभागांचे कामकाज स्वतंत्रपणे सुरू असून त्यासाठी चांगले संस्कारश्रम साहित्याची निवड केली जाते. याचा लाभ अनेक महिला, वाचक, विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक इत्यादी वाचकांना होत आहे. या ग्रंथालयात ३८८६४ इतकी ग्रंथसंख्या आहे. या ग्रंथामध्ये विविध विषयावरील संदर्भ ग्रंथ, धार्मिक ग्रंथ, मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषातील वाचन साहित्याचा समावेश होतो. या ग्रंथालयाची स्वत:ची अशी इमारत असून ग्रंथालयाची कामकाज वेळ सकाळी ८ ते १०.३० व सायंकाळी ४.३० ते ८ अशी आहे. वाचकांना अद्यावत ज्ञान प्राप्त होण्यासाठी नियतकालिके, वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके घेतली जातात व वाचकांना मोफत वाचण्यासाठी ठेवली जातात. 'अ' वर्ग ग्रंथालयातील ग्रंथ संग्रहाचा वापर ५६८ सभासद घेत असून ग्रंथालय त्यांना संदर्भ सेवा, माहिती सेवा या सारख्या सेवा पुरविते. या ग्रंथालयीन सेवा पुरविण्यासाठी एक ग्रंथपाल व इतर तीन कर्मचारी काम पाहतात. ग्रंथालयातील सभासदांसाठी मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब केलेला आहे.

८) जुन्नर नगर वाचनालय, जुन्नर

जुन्नर नगर वाचनालयाची स्थापना सन १९१० मध्ये करण्यात आली.सार्वजनिक ग्रंथालयाचे कार्य लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने १९८६ मध्ये 'अ' वर्ग दर्जा दिलेला आहे. ग्रंथालयाची स्वतंत्र

अशी इमारत आहे. या वाचनालयामध्ये विविध विभाग आहेत. त्यामध्ये वृत्तपत्र विभाग, पुस्तक देवघेव विभाग, महिला विभाग, बालविभाग, संदर्भ विभाग आदिचा समावेश होतो. या वाचनालयाच्या वतीने वाचन संस्कृती वाढविण्यासाठी ग्रंथ प्रदर्शन, वाचक स्पर्धा आयोजित केल्या जातात. तसेच विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा घेतल्या जातात. तसेच महिलांसाठी महिला जनजागृती कार्यक्रम घेण्यात येतो. या वाचनालयाचे वैशिष्ट्य म्हणजे शेतकऱ्यांना उपयुक्त अशा ग्रंथाची सोय ग्रंथालयात केली आहे. तसेच शेतकऱ्यांना शेतीविषयक मार्गदर्शन करण्यासाठी शेतीतज्ज्ञांची व्याख्याने ठेवली जातात. ग्रंथालयातील एकूण ग्रंथसंग्रह ३१०३९ अशी आहे. ग्रंथालयाची कामकाज वेळ सकाळी ९ ते १२ व सायंकाळी ४ ते ८ अशी आहे. ग्रंथालयात विश्वकोश, कथा, कादंबऱ्या, संदर्भ पुस्तके, पोथी पुराणे, बालवाड्.मय इत्यादीचा अंतर्भाव होतो. वाचकांना अद्यावत ज्ञान मिळविण्यासाठी ग्रंथालयामार्फत नियतकालिके घेतली जातात. या ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहाचा लाभ ९०० सभासद घेत आहेत. ग्रंथालयामार्फत सभासदांना वेळेत सेवा पुरविण्यासाठी ग्रंथालय व्यवस्थापनाने एक ग्रंथपाल व तीन इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. या ग्रंथालयाने वाचकांना ग्रंथालयीन सेवा पुरविण्यासाठी मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब केलेला आहे.

९) श्रीमंत सौ.गंगुबाई पंतसचिव वाचनालय, भोर

शिवछत्रपतींच्या वास्तव्याने पावन झालेल्या सह्याद्रीच्या कुशीतील विद्येचे माहेरघर पुण्यनगरीत वसलेले भोर शहर श्रीमंत पंत सचिवांनी ९ जून, १९१८ रोजी पंत सचिव वाचनालयाची स्थापना झाली. श्रीमंत सौ.गंगूताई साहेब पंत सचिव वाचनालय भोरच्या संस्थानिकांनी शहरासाठी ठेवलेला एक अनमोल ठेवा. सामाजिक, सुसंस्कृत विचार चक्राला गती देणारा ग्रंथाचा ठेवा आहे. वारसा वाचक वर्गाला वैचारिक ज्ञान मिळविण्यासाठी या ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली. या ग्रंथालयाने शतक महोत्सव साजरे केलेले आहे.

आज रोजी या वाचनालयात ३७६८३ पुस्तके आहेत. त्यात मराठी, इंग्रजी, हिंदी, संस्कृत, गुजराती प्रकारचे वाड्.मय आहे. वाचनालयात १८ दैनिके, १२ साप्ताहिके, १० साप्ताहिके उपलब्ध आहेत. ग्रंथालयात संदर्भ विभाग वेगळा आहे. या ग्रंथालयास १९५२ मध्ये 'अ' वर्ग मानांकन देण्यात

आलेले आहे. ग्रंथालयाचे संगणकीकरण झालेले आहे.वाचनालयात वृत्तपत्र विभाग, नियतकालिक विभाग, पुस्तक देवघेव विभाग, संदर्भ विभाग, बाल विभाग, महिला विभाग असे विभाग आहेत. वाचन संस्कृती वाढविण्यासाठी वाचनालयाच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्यामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्याने, निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, हळदी–कुंकू इत्यादी कार्यक्रम घेतले जातात.

या वाचनालयास सन १९९२ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार प्राप्त झाला आहे. तसेच जिल्हा ग्रंथालय संघ, पुणे यांचा आदर्श ग्रंथालय पुरस्कार मिळालेला आहे. या संस्थेतर्फे किलबील बालक मंदिर गेली २५ वर्षापासून चालू आहे. तसेच ज्येष्ठनागरिकांसाठी विविध कार्यक्रम वाचनालयाच्या माध्यमातून घेतले जातात. या ग्रंथालयाला अनेक मान्यवरांनी भेटी दिलेल्या आहेत. आज रोजी या ग्रंथालयाचे सभासद ५५० आहेत.ग्रंथालयाने मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब केलेला आहे.

१०) श्री सोमेश्वर वाचनालय, सोमेश्वरनगर

सोमेश्वरनगर येथे सन १९७९ मध्ये या वाचन मंदिराची स्थापना करण्यात आली. हे वाचनालय पंचक्रोशीतील अव्याहतपणे वाचनसंस्कृती वाढीसाठी प्रयत्न करीत आहे.

ग्रामीण भागातील वाचनालय असूनही वाचनालयात धार्मिक, वैचारिक, इतिहास, कथा, कादंबऱ्या, नाटके, चरित्रे, स्पर्धा परीक्षेसाठी लागणारी पुस्तके आहेत. वाचनालयात वृत्तपत्र विभाग, पुस्तक देवघेव विभाग, नियतकालिक विभाग, संदर्भ ग्रंथ, बालविभाग, महिला विभाग असे विविध विभाग असून स्वतंत्र अभ्यासिकाही आहे. वाचनालयाच्या वतीने वेगवेगळ्या विषयावर व्याख्याने, वाचक स्पर्धा, लोकनृत्य, देशभक्तीपर समूहगीत, वक्तृत्व, कथाकथन, काव्यवाचन आदि स्पर्धा घेतल्या जातात. बालवाचक, वाचनवृद्धी सप्ताह आदि उपक्रम राबविले जातात. ग्रंथालयाचे प्रगती व कार्य लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने ग्रंथालयास 'अ' वर्ग मानांकन दिले. या ग्रंथालयाची स्वत:ची इमारत असून कामकाजाची वेळ सकाळी १०.३० ते १.३० व सायंकाळी ५ ते ८ अशी आहे. या सार्वजनिक ग्रंथालयामध्ये २०६८६ इतकी ग्रंथसंख्या आहे. सोमेश्वर वाचनालयामध्ये ६४ नियतकालिके व १७ वृत्तपत्रे घेतली जातात. आजमितीस ग्रंथालयात ३५२ सभासद आहेत.

ग्रंथालयीन सभासदांना ग्रंथालयीन सेवा पुरविण्यासाठी एक ग्रंथपाल व इतर तीन कर्मचारी काम पाहत आहेत. ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहाची देवघेव करण्यासाठी मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

११) श्री कान्होबा सार्वजनिक वाचनालय, चांडोली ब्रा

श्री कान्होबा सार्वजनिक वाचनालयाची स्थापना सन १९९४ मध्ये करण्यात आली. सदरच्या ग्रंथालयास महाराष्ट्र शासनातर्फे इतर 'अ' वर्ग मानांकन सन २००२ मध्ये देण्यात आला. ग्रंथालयाची स्वत:च्या मालकीची दुमजली इमारत आहे. तसेच कामकाजाची वेळ सकाळी८ ते ६ पर्यंत आहे. कान्होबा सार्वजनिक ग्रंथालयाच्या ग्रंथसंग्रहात २१३०० पुस्तके आहेत.

वाचनालयाच्या नि:स्वार्थी कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेऊन वाचनालयाचा विकास साधला आहे. वाचनालयात मुक्तद्वार विभाग, महिला विभाग, बालविभाग, पुस्तक देवघेव विभाग, नियतकालिके विभाग, संदर्भ विभाग असे विविध विभाग आहेत. ग्रंथालयात विश्वकोश, कथा, कादंबरी, नाटके, चरित्र, निबंध, महिलांच्यासाठी गृहशोभिका, उद्योजकता, बालवाड्.मय या सारख्या ग्रंथाचा समावेश आहे. वाचकांना अद्यावत ज्ञान मिळविण्यासाठी १०९ नियतकालिके घेतलेली आहेत. वाचनालयाच्या वतीने दरवर्षी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. वक्तृत्व स्पर्धा, हळदी कुंकू, कथाकथन स्पर्धा,ग्रंथालय सप्ताह, व्याख्यानमाला, स्पर्धा परीक्षेसाठी मार्गदर्शन वर्ग, परिसंवाद इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. ग्रंथालयात एक ग्रंथपाल व इतर तीन कर्मचारी काम पाहत आहेत.ग्रंथालयात एकूण ५०४ सभासद आहेत. ग्रंथालयाने मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब केलेला आहे. ग्रंथालयामार्फत सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. वाचनालयामार्फत दरवर्षी वाचकांना दिवाळी अंक वाचावयास उपलब्ध करून दिले जातात. दिवाळी अंकाची स्वतंत्र देवघेव केली जाते. वाचनालयाने आपल्या ग्रंथालयीन सेवेद्वारे विविध सार्वजनिक ग्रंथालयांना साखळी योजनेद्वारे ग्रंथ पुरवले आहेत. ग्रंथालयातील वाचन साहित्य हे वाचकांच्या आवडीनुसार व मागणीस प्राधान्य देऊन निवडले जाते. अशाप्रकारे वाचनालयातील समृद्ध असा ग्रंथ संग्रह दिवसेंदिवस वृद्धिंगत होत आहे.

१२) त्वष्टा कासार समाज संस्था वाचनमंदिर, कसबा पेठ, पुणे

ग्रंथालयाची स्थापना सन १९९३ मध्ये झाली. स्थापनेनंतरचे या सार्वजनिक ग्रंथालयाचे समाजाच्या जडणघडणीतील कार्य लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने 'अ' वर्ग मानांकन दिले. ग्रंथालयाची स्वतंत्र अशी दुमजली इमारत आहे. ग्रंथालयाच्या कामकाजाची वेळ ५.३० ते १२.३० व सायंकाळी ५.३० ते ८.३० अशी आहे. ग्रंथालयामध्ये ४३५०० ग्रंथ उपलब्ध आहेत. त्याचबरोबर तीस नियतकालिके वाचकांना अद्यावत माहिती मिळण्याच्या हेतूने मागविली जाते. ग्रंथालयाने २००० व्यक्तींना ग्रंथालयाचे सभासदत्व दिले आहे. त्यामुळे त्यांना ग्रंथालयीन सेवांचा लाभ घेणे सहज साध्य होते. ग्रंथालयीन सेवा वाचकांना कमीत कमी वेळेत व अचूकपणे देण्यासाठी ग्रंथपाल आणि इतर तीन कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. वाचकांना ग्रंथालयातील पुस्तकांची देवघेव सेवा देण्यासाठी मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब केलेला आहे. ग्रंथालयामार्फत पुस्तक प्रदर्शन, वक्तृत्व स्पर्धा, वाचन स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, हळदी–कुंकू, संगीत खुर्ची, झिम्माफुगडी इ. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, थोरामोठ्यांच्या जयंत्या साजऱ्या करणे, मान्यवर व्यक्तींची व्याख्याने इ. उपक्रम राबविले जातात. सार्वजनिक ग्रंथालयाचा ग्रंथ संग्रह संपन्न असून यामध्ये संदर्भ ग्रंथ, विश्वकोश, पोथीपुराणे, कथा कादंबरी, क्रमिक पुस्तके, महान व्यक्तींची चरित्रे, शब्दकोश, अहवाल इत्यादीचा अंतर्भाव होतो.

१३) धर्मगंगा सार्वजनिक ग्रंथालय, मोरया गोसावी चिंचवड, पुणे

ग्रंथालयाची स्थापना दिनांक १५.०८.१९८४ मध्ये करण्यात आली. ग्रंथालयास सन २००९ मध्ये इतर 'अ' वर्ग मानांकन मिळाले. ग्रंथालयाची स्वत:ची इमारत आहे. ग्रंथालयीन कामकाजाची वेळ सकाळी ९ ते १२ व सायंकाळी ४ ते ८ अशी आहे. सार्वजनिक ग्रंथालयाच्या ग्रंथसंग्रहामध्ये २२००२ पुस्तके आहेत. त्याचबरोबर ग्रंथालयामध्ये ६७ नियतकालिके मागविली जातात. त्यामुळे वाचकांना अद्यावत माहिती मिळण्यास मदत होते. सार्वजनिक ग्रंथालयाने ५०० व्यक्तींना ग्रंथालयीन सभासदत्व दिलेले आहे. ग्रंथालय वाचकांना विविध ग्रंथालयीन सेवा हे ग्रंथालय पुरविते. वाचकांना दर्जेदार ग्रंथालयीन सेवा पुरविण्यासाठी एक ग्रंथपाल आणि इतर चार ग्रंथालयीन कर्मचारी काम करीत आहेत. वाचकांना ग्रंथालयीन सेवा पुरविण्यासाठी मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब

केलेला आहे. धर्मगंगा सार्वजनिक ग्रंथालयाने बायोगॅस प्रकल्प, सत्यनारायण पूजा, ग्रंथपाल दिन, रक्षाबंधन, हळदी–कुंकू, ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार, मोठ्याने वाचन स्पर्धा, तिळगूळ समारंभ, कवी संमेलन इत्यादी कार्यक्रम ग्रंथालयामार्फत राबविले जातात. तसेच बालवाचन विभाग व खास करून महिला विभाग या स्वतंत्र विभागांना प्रतिसाद वाढत असून रोज वेगवेगळ्या विषयावरील पुस्तकांची मागणी महिलांकडून केली जाते. यावरून पुस्तक वाचनाची आवड वृद्धिंगत होण्यास ग्रंथालय यशस्वी होत आहे. सेवावस्तीमध्ये उपग्रंथालय चालू करणे व तेथील वाचकांची बौद्धिक भूक भागविणेस सहाय्यक करते. ग्रंथालयात सकाळी व सायंकाळी नियमित वाचक मोठ्या प्रमाणात येतात. अशाप्रकारे हे सार्वजनिक ग्रंथालय परिसरातील सामाजिक, सांस्कृतिक, बौद्धिक त्याचबरोबर राजकीय विकासामध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावत आहेत.

१४) रविंद्रनाथ ठाकूर सार्वजनिक ग्रंथालय, निगडी , पुणे

स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळाची स्थापनासन १९८३ मध्ये करण्यात आली. तेव्हापासून सातत्याने प्राधिकरण क्षेत्रात प्रबोधन, प्रशिक्षण व प्रोत्साहन या त्रिसूत्रीचा आधार घेऊन कार्यरत आहे. पिंपरी–चिंचवड औद्योगिक नगरीत मंडळाने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. निरपेक्ष व अव्याहतपणे कार्यरत असणारे कार्यकर्ते, सक्रीय सहभागी होणारे हितचिंतक या मंडळाचा शक्तीस्त्रोत आहे. याच मंडळाने रविंद्रनाथ ठाकूर सार्वजनिक ग्रंथालय १९८४ मध्ये स्थापन केले. त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन ग्रंथालयास सन २००३ मध्ये 'अ' वर्ग मानांकन देण्यात आले. ग्रंथालयाची दोन मजली इमारत आहे. ग्रंथालयातील सभागृहात अद्यावत असा सर्व सोयीनियुक्त ध्वनी व्यवस्था, ए.सी. प्रोजेक्टर बसविलेले आहेत. सार्वजनिक ग्रंथालयात विविध उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये एन.डी.ए. प्रवेश परीक्षा तयारी वर्ग, आंतरराष्ट्रीय योगदिन, स्वातंत्र्यदिन, कलादालन, व्याख्यान, आकाशकंदिल बनविणे, कार्यशाळा, किल्ले बनविणे स्पर्धा, पक्षी निरीक्षण, सावरकर पुण्यतिथी, समर्थ भारत अभियान, छत्रपती शिवाजी व्याख्यानमाला, रक्तदान शिबीर, ग्रंथपाल दिन, वाचक प्रेरणा दिन, ग्रंथालय वर्धापन दिन इत्यादी उपक्रम प्रत्येक वर्षी राबविले जातात. ग्रंथालयात एकूण ४४००० हजार ग्रंथ संग्रह आहे. ग्रंथालयाची वेळ सकाळी ८ ते १२ व सायंकाळी ४ ते ८ अशी आहे. सार्वजनिक

ग्रंथालयाचे संगणकीकरण केले आहे. ११० नियतकालिके ग्रंथालयात येत आहेत. ग्रंथालयात एक ग्रंथपाल व इतर सहा कर्मचारी कार्यरत आहेत.सार्वजनिक ग्रंथालयाची एकूण सभासद संख्या ३७०० आहे. बालवाचकांसाठी उन्हाळ्याच्या सुट्टीत मोफत पुस्तक वाचनाची सोय ग्रंथालयातर्फे उपलब्ध करून देण्यात आली आहे.

१५) सेवाधाम ट्रस्ट ग्रंथालय व मोफत वाचनालय, तळेगांव स्टेशन

तळेगाव येथील मोफत वाचनालयाची स्थापना सन १९८१ मध्ये करण्यात आली आहे.प्रारंभी हे वाचनालय छोट्या जागेत होते. नंतर ग्रंथालयाचा विकास होत गेला व सध्या ग्रंथालयाची भव्य अशी दोन मजली इमारत आहे. मोफत वाचनालयास महाराष्ट्र शासनाकडून सन २००९ मध्ये 'अ' वर्ग मानांकन दर्जा देण्यात आलेला आहे.ग्रंथालयातील ग्रंथ संग्रहाचा वाचकांना जास्तीत जास्त उपयोग करता यावा म्हणून ग्रंथालयाने मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब केलेला आहे.ग्रंथालयाची एकूण ग्रंथसंख्या २६८०० इतकी आहे. या ग्रंथालयात मराठी, हिंदी, इंग्रजी अशा विविध भाषेतील ग्रंथ आहेत. या मोफत वाचनालयाने वाचकांची वैचारिक भूक भागविण्यासाठी ग्रंथालय सप्ताह, शारदीय प्रबोधनमाला, वर्धापन दिन महोत्सव या व इतर माध्यमातून अनेक मान्यवर मंडळी ग्रंथालयात येऊन गेलेली आहेत. या ग्रंथालयात संदर्भ विभाग, पुस्तक देवघेव विभाग, स्पर्धा परीक्षा विभाग असे विविध विभाग आहेत. ग्रंथालय चळवळ वाढावी यासाठी ग्रंथालयाने विशेष प्रयत्न केले आहेत. तसेच या ग्रंथालयाने एकूण १०३ नियतकालिके घेतलेली आहेत. त्यामुळे ग्रंथालयातील सभासद व इतर वाचकांना अद्यावत ज्ञान मिळण्यास मदत होते.ग्रंथालयातील कामकाज पाहण्यासाठी ग्रंथपाल व इतर तीन कर्मचारी काम पाहत आहेत.मोफत वाचनालयाची एकूण सभासद संख्या ७१५ आहे.वाचकांना त्यांच्या आवडीची पुस्तके घेता यावीत म्हणून ग्रंथालयाने मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब केलेला आहे.

१६) साई मित्रमंडळ वाचनालय, गंगानगर, जुने सांगवी, पुणे

साई मित्रमंडळ वाचनालय या ग्रंथालयाची स्थापना सन १९८९ मध्ये झाली. पण या सार्वजनिक ग्रंथालयास महाराष्ट्र शासनाने इतर 'अ' वर्ग मानांकन सन २०१० मध्ये दिले. सार्वजनिक

ग्रंथालयाची स्वतंत्र इमारत असून कामकाजाची वेळ सकाळी १०.३० ते १.३० व सायंकाळी ५.३० ते ८.३० अशी आहे. ग्रंथालयाच्या ग्रंथसंग्रहामध्ये आजमितीस २४३४८ पुस्तके उपलब्ध आहेत. वाचकांना अद्यावत माहिती पुरविण्यासाठी वर्तमानपत्रे व नियतकालिके मागविली जातात. या सार्वजनिक ग्रंथालयाने ५३८ व्यक्तींना ग्रंथालयाचे सभासदत्व दिलेलेआहे. सर्वच सभासदांना विविध ग्रंथालयीन सेवा पुरविल्या जातात. ई–सेवा पुरविण्याचा प्रयत्न केला जातो. ग्रंथपाल व इतर चार कर्मचारी वाचकांना दर्जेदार ग्रंथालयीन सेवा कमी वेळेत व अचूकपणे पुरविण्यासाठी कार्य करीत आहे. वाचकांना पुस्तक देवघेव सेवा पुरविण्यासाठी सदरच्या ग्रंथालयाने मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब केलेला आहे. जनतेच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, बौद्धिक विकासासाठी ग्रंथालय पुस्तक प्रदर्शन, पुस्तक वाचन, राष्ट्रीयदिन साजरे करणे, थोर व्यक्तीचे चरित्र वाचन, व्यवसाय मार्गदर्शनपर व्याख्याने, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, थोर व्यक्तींची व्याख्याने, लघुउद्योग, कुटीर उद्योग या विषयक माहिती देणे, रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा आयोजित करणे यासारखे उपक्रम राबविते.

१७) सन्मित्र तरूण मंडळ मोफत वाचनालय, जुनी सांगवी,पुणे

या सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना सन १९६९ मध्ये करण्यात आली. महाराष्ट्र शासनाने या सार्वजनिक ग्रंथालयास इतर 'अ' वर्ग मानांकन सन २००२ मध्ये दिलेले आहे. ग्रंथालयाची स्वत:ची इमारत असून ग्रंथालयीन कामकाजाची वेळ सकाळी १० ते १ व सायंकाळी ६ ते ९ अशी आहे. या सार्वजनिक ग्रंथालयाची ग्रंथसंपदा २४००० हजार असून यात कथा, कादंबरी, नाट्के, चरित्रे, निबंध, शब्दकोश, विश्वकोश, बालवाड्.मय, महिला जगत या सारख्या ग्रंथाचा समावेश आहे. वाचकांना दैनंदिन ताज्या घडामोडी विषयी माहिती देण्यासाठी ग्रंथालयात वर्तमानपत्रे मागविली जातात. त्याचबरोबर वाचकांना अद्यावत माहिती पुरविण्यासाठी १०१ नियतकालिके उपलब्ध करून दिली जातात. या ग्रंथालयातील सभासद संख्या ६०० आहे. त्यांना विविध ग्रंथालयीन सेवा दिली जाते. ई–माहितीस्त्रोत उपलब्ध केले जातात. वाचकांना कमी वेळेत दर्जेदार व अचूक सेवा देण्यासाठी एक ग्रंथपाल आणि इतर तीन ग्रंथालय कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. वाचकांना या सार्वजनिक ग्रंथालयाच्या ग्रंथसंग्रहातील पुस्तकांची देवघेव सेवा पुरविण्यासाठी ग्रंथालयाने मुक्तदार पद्धतीचा

अवलंब केलेला आहे. या परिसरातील जनतेच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, बौद्धिक विकास करण्यासाठी ग्रंथालयातर्फे विविध उपक्रम राबविले जातात. पुस्तक प्रदर्शन, व्यवसाय मार्गदर्शन, स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन, रांगोळी स्पर्धा, हळदी–कुंकू, थोर व्यक्तींची व्याख्याने, जयंत्या, निबंध स्पर्धा, राष्ट्रीय दिन साजरे करणे, पोथीवाचन यासारखे उपक्रम राबविले जातात.

१८) सरस्वती ग्रंथालय, पडवी

सरस्वती ग्रंथालय पडवी या ग्रंथालयाची स्थापना सन १९९८ मध्ये करण्यात आली. प्रारंभी वाचनालयाची छोटीशी इमारत होती. नंतर ग्रंथालयाचा विकास होत गेला. सध्या या ग्रंथालयाची भव्य अशी इमारत उभी आहे. या ग्रंथालयास महाराष्ट्र शासनाकडून सन २०१२ मध्ये 'अ' वर्ग दर्जा देण्यात आलेला आहे. परंतु ग्रंथालय शासनाच्या नियमानुसार प्रत्येक वाचकाला त्याचा आवडीचा ग्रंथ मिळाला पाहिजे या सुत्राचा वापर न करता ग्रंथालयाने बंदिस्त पद्धत वापरलेली आहे. ते वाचकांना मारक ठरते. ग्रंथालयाची एकूण ग्रंथसंख्या १९५०२ इतकी आहे. या ग्रंथालयात मराठी, हिंदी, इंग्रजी अशा विविध भाषेतील ग्रंथ आहेत. ग्रंथालयात एकूण ७७ नियतकालिके येतात. त्याचा उपयोग वाचक, संशोधक, शिक्षक यांना वाचण्यासाठी उपयोगी पडतात. ग्रंथालयात वृत्तपत्र विभाग, बालविभाग, महिला विभाग, संदर्भ विभाग असे स्वतंत्र विभाग केलेले आहेत. ग्रंथालयामार्फत ग्रंथप्रदर्शन, विविध स्पर्धा, बालवाचकांसाठी पुरस्कार घेतले जातात. ग्रंथालयात एक ग्रंथपाल व इतर ३ कर्मचारी काम करीत आहेत. ग्रंथालयाची एकूण सभासद संख्या १८१९ आहे. ग्रंथालयाची वेळ सकाळी ९ ते ११ अशी आहे. ग्रंथालयात शब्दकोश, बालवाङ्मय, कथा–कादंबरी, विश्वकोश इत्यादीचा अंतर्भाव केलेला आहे.ग्रंथालय प्रत्येक वर्षी वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन केले जाते.

१९) सिद्धार्थ वाचनालय आणि ग्रंथालय कॅम्प, पुणे

सिद्धार्थ मोफत वाचनालयाची स्थापना २६ जानेवारी १९५९ साली झाली. तेव्हापासून आजवर असंख्य व्यक्तींनी ग्रंथालयाला भेटी दिलेल्या आहेत. दरिद्री, मागासवर्गीय वस्तीतल्या नागरिकांना, त्यांच्या मुलामुलींना वाचनाची गोडी लावण्यासाठी ग्रंथालयाची स्थापना केली आहे.

ग्रंथालयास 'अ' वर्ग मानांकन मिळालेले आहे.ग्रंथालयाची एकूण ग्रंथसंपदा ५०६६८ आहे. तसेच नियतकालिकांची संख्या १०१ आहे. कामकाजाची वेळ सकाळी ९ ते १२ व सायंकाळी ५ ते ८ अशी आहे. ग्रंथालयात एक ग्रंथपाल व इतर तीन कर्मचारी काम करीत आहेत. एकूण सभासद संख्या ५३८ अशी आहे. ग्रंथालयात संदर्भ ग्रंथ मोठ्या प्रमाणात आहेत. त्यामध्ये मराठी विश्वकोश, भारतीय संस्कृती कोश, एनसायक्लोपिडिया, अभिनव मराठी ज्ञानकोश, तत्त्वज्ञान महाकोश इत्यादी संदर्भ ग्रंथ सार्वजनिक ग्रंथालयात आहेत. तसेच फ्रेंच, जर्मन, इटालियन, हिब्रू, पोर्तुगीज, रशियन, स्पॅनिश, इंग्रजी इत्यादी परदेशी भाषेतील पुस्तके उपलब्ध आहेत. नवनाथ, हरिविजय, पांडवप्रताप, गजानन महाराज या धार्मिक पोथ्या देखील या ग्रंथालयात उपलब्ध आहेत. बालवाड्.मय हा ग्रंथालयाचा महत्वाचा ठेवा आहे. बालवाचकांसाठी अमरकथा, चित्रमय भारत, भारताचा इतिहास, आकाशदर्शन, टारझनचा संच या संग्रहात दिसतात. मुलींसाठी स्वतंत्र इंग्रजी कथासंग्रह आहे. मुलींसाठी साहस कथा, अद्भूत कथा इत्यादीचा संग्रह आहे. ग्रंथालयात मुलांसाठी गोष्टीचा कार्यक्रम, ग्रंथप्रदर्शन, थोरामोठ्यांच्या जयंत्या, हळदी–कुंकू, रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा इत्यादी कार्यक्रम घेतले जातात. वाचकांसाठी ग्रंथालयाने मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब केलेला आहे.

३.१६.३ सांगली :

१) आष्टा जनरल लायब्ररी, आष्टा :

सांगली जिल्हा वाळवा तालुक्यातील आष्टा येथे सन १९२८ मध्ये आष्टा जनरल लायब्ररीची स्थापना झाली. या सार्वजनिक ग्रंथालयाची स्वत:ची इमारत असून ग्रंथालयीन कामकाजाची वेळ सकाळी ८.३० ते ११.३० व सायंकाळी ५ ते ८ अशी आहे. या ग्रंथालयास महाराष्ट्र शासनाकडून इतर 'अ' वर्ग मानांकन सन २०११ मध्ये प्राप्त झाले. या ग्रंथालयाच्या ग्रंथ संग्रहामध्ये १९,२१७ ग्रंथांचा समावेश आहे. त्याचबरोबर सदरचे ग्रंथालय ८२ नियतकालिके मागविते. या ग्रंथालयाचे १,२६० इतके सभासद आहेत. त्यांना विविध ग्रंथालयीन सेवा पुरविल्या जातात. यामध्ये पुस्तक देवघेव सेवा, संदर्भ सेवा, माहिती सेवा, स्पर्धा परीक्षा, व्यवसाय मार्गदर्शन इत्यादींचा समावेश होतो. अशा विविध सेवा वेळेत व दर्जेदार पुरविण्यासाठी ग्रंथालयामध्ये एक ग्रंथपाल व इतर तीन ग्रंथालयीन

कर्मचारी कार्यरत आहेत. हे ग्रंथालय आपल्या वाचकांना मुक्तद्वार पध्दतीने सेवा पुरविते. मुक्तद्वार पध्दती म्हणजे वाचकाला प्रत्यक्ष ग्रंथसंग्रहात जाऊन आपल्या आवडीचे पुस्तकनिवडण्याची मुभा दिली जाते. त्यामुळे ग्रंथालयीन कर्मचारी त्याचबरोबर वाचकांचा वेळ सत्कारणी लागण्यास मदत होते आणि एस.आर. रंगनाथन यांनी सांगितलेल्या ग्रंथालय शास्त्राच्या चौथ्या नियमाची अंमलबजावणी होते.

२) कै.ईश्वराप्पा उर्फ तात्यासो वाले नगर वाचनालय, नांद्रे :

मिरज तालुक्यातील नांद्रे येथे कै.ईश्वराप्पा उर्फ तात्यासो वाले नगर वाचनालयाची स्थापना मे, १९७९ मध्ये करण्यात आली. २००४ साली या सार्वजनिक ग्रंथालयास महाराष्ट्र शासनाकडून 'अ' वर्ग मानांकन मिळालेले आहे. नांद्रे पंचक्रोशीच्या विकासासाठी झटणाऱ्या या ग्रंथालयाची स्वत:ची दुमजली इमारत असून कामकाजाची वेळ सकाळी ९ ते १२ व सायंकाळी ५ ते ८ अशी आहे. या ग्रंथालयाचे विविध विभाग असून विविध ग्रंथालयीन सेवा पुरविल्या जातात. ग्रंथालयाच्या इमारतीमधील काही गाळे भाड्याने देऊन ग्रंथालय निधी गोळा केला जातो. या ग्रंथालयात समृध्द असे २४,००० ग्रंथ आहेत. त्याचबरोबर ग्रंथालयात ३५ नियतकालिके मागविली जातात. या ग्रंथालयाची १,४०० सभासद संख्या असून त्यांना विविध ग्रंथालयीन सेवा दिल्या जातात. या ग्रंथालयीन सेवा वाचकांना / सभासदांना वेळेत व अचूकपणे देण्यासाठी एक ग्रंथपाल व चार कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. ग्रंथालयामार्फत ग्रंथ प्रदर्शन, रांगोळी स्पर्धा, हळदी–कुंकू कार्यक्रम, थोरामोठ्यांची व्याख्याने, पुण्यतिथी इ. उपक्रम राबविले जातात. त्याचबरोबर सध्याच्या स्पर्धेच्या युगातील काळाची गरज लक्षात घेऊन तरूणांना करिअर मार्गदर्शन, व्यवसाय मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन असे अत्यंत महत्वाच्या विषयावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन आयोजित केले जाते.

३) जत वाचनालय, जत :

जत येथे दिनांक १७ मार्च, १८८५ रोजी जत वाचनालय, जत या ग्रंथालयाची स्थापना झाली. प्रारंभी या ग्रंथालयाचे नांव 'नेटीव्ह जनरल लायब्ररी' असे होते. सन १९५० मध्ये वाचनालयास शासकीय अनुदान सुरू झाले. सन १९८० मध्ये महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्या हस्ते नवीन इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ग्रंथालयास 'ब' वर्ग

तालुका ग्रंथालय दर्जा मिळाला. सन २०१० मध्ये वाचनालय संगणकीकृत झाले. या वाचनालयाची वैशिष्ट्यपूर्ण वाटचाल झाल्याने शासनाकडून सन २०११ मध्ये 'अ' वर्ग तालुका वाचनालय दर्जा मिळाला. ग्रंथालयात विविध विभाग असून त्यामध्ये वृत्तपत्र विभाग, पुस्तक देवघेव विभाग, महिला विभाग, बाल विभाग, व्यवसाय मार्गदर्शन केंद्र व अभ्यासिका असे विभाग आहेत. व्यवसाय मार्गदर्शन केंद्र व अभ्यासिकेचा वापर करून ६० विद्यार्थी पोलीस, ५ विद्यार्थी पोलीस निरीक्षक, तीन विद्यार्थी बँकींग क्षेत्रात व दोन विद्यार्थी ग्रामसेवक म्हणून उत्तीर्ण होऊन कार्यरत आहेत. या ग्रंथालयामध्ये एकूण २९,२०० इतके ग्रंथ असून नियतकालिके ५८ मागविली जातात. या ग्रंथालयाचे ५१७ सभासद असून त्यांना ग्रंथालयीन सेवा पुरविण्यासाठी ग्रंथपाल आणि इतर चार कर्मचारी कार्यरत आहेत. सभासदांना मुक्तद्वार पध्दतीची सोय उपलब्ध आहे.

४) तरूण मित्र मंडळ वाचनालय, शिराळा :

तरूण मित्र मंडळ वाचनालयाची स्थापना सन १९२४ मध्ये झालेली आहे. या सर्वाजनिक ग्रंथालयासाठी स्वत:ची सर्व सोयींनीयुक्त इमारत आहे. या ग्रंथालयाची कामकाज वेळ सकाळी ९ ते १२ व दुपारी ३ ते ६ अशी आहे. प्रत्येक शनिवारी साप्ताहिक सुट्टी असते. सदर ग्रंथालयास इतर 'अ' वर्ग मानांकन महाराष्ट्र शासनाने सन १९८८ मध्ये दिलेले आहे. या ग्रंथालयाच्या ग्रंथ संग्रहामध्ये २७,७४२ इतका ग्रंथ संग्रह असून त्यामध्ये कथा, कादंबरी, संदर्भ पुस्तके, सामान्यज्ञानावर आधारित पुस्तके त्याचबरोबर विश्वकोश, स्मरणिका, गॅझीटर इत्यादींचा समावेश होतो. या ग्रंथालयामध्ये १०० नियतकालिके मागविली जातात. या ग्रंथालयाचे १,४०७ इतके सभासद असून त्यांना विविध ग्रंथालयीन सेवा दिल्या जातात. या सेवा पुरविण्यासाठी ग्रंथालय व्यवस्थापनाने एक ग्रंथपाल आणि तीन इतर ग्रंथालयीन कर्मचारी नेमलेले आहेत. ग्रंथालयाने देवघेव विभाग, नियतकालिक विभाग, वाचन विभाग, अभ्यासिका, वर्तमानपत्र विभाग असे विविध विभाग आहेत. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कक्ष व व्यवसाय मार्गदर्शन कक्ष अशा प्रकारचे कक्ष सुध्दा ग्रंथालयात आहेत. याचा तरूण पिढीला आपल्या करिअरच्या जडणघडणीमध्ये खूपच फायदा होतो. ग्रंथालयाने सभासदांची ग्रंथालयीन

देवघेव करताना मुक्तद्वार पध्दतीचा अवलंब केलेला आहे. हे ग्रंथालय शिराळा येथील सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक व बौध्दीक विकासामध्ये महत्वपूर्ण योगदान देत आहे.

५) द नगर वाचनालय, विटा :

या सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना १४ जून, १८६९ मध्ये करण्यात आली. सदर ग्रंथालयास महाराष्ट्र शासनाचे 'अ' वर्ग मानांकन इ.स.२०११–१२ मध्ये देण्यात आले आहे. या सार्वजनिक ग्रंथालयाची प्रशस्त अशी दोन मजली इमारत असली तरी दोलामुद्रितासाठी वेगळा विभाग उपलब्ध नाही. या ग्रंथालयाची कामकाजाची वेळ सकाळी ८.३० ते संध्याकाळी ८ अशी आहे. या सार्वजनिक ग्रंथालयाच्या ग्रंथ संग्रहामध्ये २५६९३ पुस्तके आहेत. यामध्ये पुस्तके, नियतकालिके, संदर्भग्रंथ, दोलामुद्रिते, दिवाळी अंक, बालवाङ्मय, कादंबऱ्या, विश्वकोश, चरित्रकोश, चरित्रे, महिलांच्यासाठी गृहशोभिका, थोरामोठ्यांची चरित्रे, महाकाव्ये, इत्यादींचा समावेश आहे. या ग्रंथालयाचे सभासद एक वर्षासाठी दिले जाते. ग्रंथालयाचे एकूण सभासद १४५० असून त्यामध्ये व्यावसाईक, विद्यार्थी, मुले, प्रौढ व्यक्ती, संशोधक, कामगार इत्यादींचा समावेश आहे. हे ग्रंथालय या विभागाच्या आर्थिक, सामाजिक, भावनिक, सांस्कृतिक विकासासाठी विविध उपक्रम राबविते. यामध्ये प्रामुख्याने सांस्कृतिक कार्यक्रम, या थोरामोठ्यांची व्याख्याने, कथाकथन स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, पुस्तक वाचन, हळदी–कुंकू, भाषण स्पर्धा, पोथी वाचन, स्पर्धा परिक्षेसाठी प्रोत्साहित करणारी व्याख्याने, मार्गदर्शन वर्ग, करिअर गाईडस् इत्यादींविषयी उपक्रम राबविले जातात. त्याचबरोबर हे ग्रंथालय पुस्तकांचे प्रदर्शन भरविते. त्यामुळे परिसरातील वाचक वर्ग व ग्रंथालयातील ग्रंथ संपदेशी परिचित होतात व त्यातूनच वाचन संस्कृती जोपासली जाते. ग्रंथालयाने आपल्या ग्रंथ संग्रहास मुक्तद्वार पध्दतीचा अवलंब केलेला आहे. या पध्दतीमध्ये वाचकाला प्रत्यक्ष ग्रंथ संग्रहामध्ये जाऊन स्वत:च्या आवडीचा ग्रंथ निवडण्याची मुभा दिलेली असते. त्यामुळे कर्मचाऱ्यांचा ग्रंथ संग्रहात जाऊन वाचकास हवे असलेले ग्रंथ शोधून आणून त्यांना देण्यामध्ये जाणारा वेळ वाचतो. त्याचबरोबर ग्रंथालयीन कर्मचारी या वाचलेल्या वेळेचा सदुपयोग करून अधिक चांगल्या प्रकारे सेवा देऊ शकतात.

या ग्रंथालयामध्ये एकूण चार ग्रंथालय कर्मचारी असून यामध्ये ग्रंथपालाचाही समावेश आहे. ग्रंथपालाची नेमणूक कायमस्वरूपी असल्यामुळे तो ग्रंथालयाचा योग्य प्रकारे विकास करू शकतो.

६) नगर वाचन मंदिर, डिग्रज :

या ग्रंथालयाची स्थापना दिनांक १६ मे, १९७२ रोजी करण्यात आली. या ग्रंथालयाची स्वत:ची इमारत असून २०,५५० चौरस फुटावरती इमारत उभारली आहे. १,००० चौरस फूट रिकामी जागा आहे. ग्रंथालयाची कामकाजाची वेळ सकाळी ८ ते १२ व संध्याकाळी ५ ते ९ अशी आहे. या सार्वजनिक ग्रंथालयास सन २००७ मध्ये शासनाकडून 'अ' वर्ग मानांकन प्राप्त झाले आहे. या ग्रंथालयाच्या ग्रंथसंग्रहामध्ये २०,८०० ग्रंथ संग्रह आहेत. ग्रंथालयामध्ये ७५ नियतकालिके मागविली जातात. ग्रंथालयातील ग्रंथ संग्रहालयाचा ८०२ ग्रंथालयीन सभासद लाभ घेत आहेत. विविध ग्रंथालयीन सेवा वाचकांना पुरविण्यासाठी ग्रंथालयाने एक ग्रंथपाल व इतर तीन कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. वाचकांना देवघेव सेवा पुरविण्यासाठी मुक्तद्वार पध्दतीचा अवलंब केला आहे. हे ग्रंथालय डिग्रजच्या सांस्कृतिक व सामाजिक विकासासाठी ग्रंथ प्रदर्शन, पोथी वाचन, रांगोळी स्पर्धा, हळदी–कुंकू कार्यक्रम, थोरामोठ्यांची व्याख्याने, निबंध स्पर्धा, त्याचबरोबर व्यवसाय मार्गदर्शन केंद्र, स्पर्धा परीक्षा केंद्र इत्यादी सारखे उपक्रम राबविले जातात.

७) बायसिंगर मेमोरिअल लायब्ररी, गांधी चौक, मिरज :

बायसिंगर मेमोरिअल सार्वजनिक ग्रंथालय, मिरज येथील गांधी चौकात आहे. या सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना सन १९६९ मध्ये करण्यात आली व शासनाने सन १९७५ मध्ये या सार्वजनिक ग्रंथालयास 'अ' वर्ग मानांकन दिले. या ग्रंथालयाची स्वतंत्र इमारत असून आजघडीला या ग्रंथालयाच्या ग्रंथ संग्रहात २४,००० ग्रंथ उपलब्ध आहेत. तसेच या सार्वजनिक ग्रंथालयामध्ये ५९ नियतकालिके मागविली जातात. या सार्वजनिक ग्रंथालयाचे ६८० सभासद असून त्यांना विविध ग्रंथालयीन सेवा पुरविण्यासाठी ग्रंथपाल व इतर पाच ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. या ग्रंथालयाची कामकाज वेळ सकाळी ८.५० ते १२.३० व सायंकाळी ४ ते ८ अशी आहे. हे ग्रंथालय

आपल्या ग्रंथालयीन सभासदांना मुक्तद्वार पध्दतीने सेवा पुरविते. पण आश्चर्याची बाब म्हणजे या ग्रंथालयाची स्वत:ची वेगळी इमारत नाही.

८) भारतीय सार्वजनिक मोफत वाचनालय, पेठ

या ग्रंथालयाची स्थापना दिनांक १८ सप्टेंबर, १९९० रोजी झाली. वाचनालयास 'अ' वर्ग दर्जा सन २००५ ला मिळालेला आहे. ग्रामीण भागात पुरेसा वाचक वर्ग मिळत नसल्यामुळे वाचनालयाकडून सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात. त्यामध्ये प्रामुख्याने व्याख्यानमाला, ए.पी.जे. अब्दुल कलाम जन्मदिन, एस.आर.रंगनाथन जयंती, स्वातंत्र्य दिन, महाराष्ट्र दिन यासारखे उपक्रम वाचन संस्कृती जोपासण्यासाठी उपयुक्त ठरतात. त्याचबरोबर लहान मुलांना वाचनाची आवड लागावी, यासाठी शाळेमध्ये हस्ताक्षर व निबंध स्पर्धा ग्रंथालयामार्फत घेतल्या जातात. वर्षातून एकदा ग्रंथ प्रदर्शन भरविले जाते. त्यामुळे वाचकांना नवनवीन पुस्तकांची माहिती मिळते. दिनांक २३ एप्रिल हा दिवस 'जागतिक पुस्तक दिन' म्हणून साजरा करण्यात येतो.

वाचनालयात ग्रंथ खरेदी, ग्रंथ निवड समितीमार्फत केली जाते. तसेच ग्रंथालयातील सभासद व इतर वाचकांनी सुचविलेल्या पुस्तकांची देखील खरेदी केली जाते. स्पर्धा परिक्षेची पुस्तके देखील खरेदी केली जातात. रंगनाथन यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून शासन परिपत्रकाप्रमाणे शाळा दत्तक उपक्रम राबविला जातो व शाळेतील मुलांच्यामार्फत कथाकथन हा कार्यक्रम राबविला जातो. ग्रंथालयाची एकूण ग्रंथ संपदा २१,४७९ इतकी आहे. ग्रंथालयामार्फत ७५ नियतकालिकांची खरेदी केली जाते. ग्रंथालयाची एकूण सभासद संख्या ५३७ इतकी आहे. या सभासदांना ग्रंथालयीन सेवा पुरविण्यासाठी एक ग्रंथपाल आणि तीन इतर ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. ग्रंथालयाने सभासदांना देवघेव करण्यासाठी बंदीस्त पध्दतीचा अवलंब केलेला आहे. ग्रंथालयाची स्वतंत्र इमारत आहे. तसेच ग्रंथालयाची कामकाज वेळ : सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.३० अशी आहे.

९) मिरज विद्यार्थी संघ, खरे वाचन मंदिर वाचनालय, मिरज :

मिरज येथील विद्यार्थ्यांनी चालवलेल्या स्टुडा युनियन आणि सरस्वती वाचनालयाचे एकत्रित करून ९ नोव्हेंबर, १९१९ रोजी मिरज विद्यार्थी संघाची स्थापना झाली. प्रारंभी हे वाचनालय भाड्याच्या जागेत सुरू होते.

महाराष्ट्राचे इतिहास संशोधक खरे यांचे स्मारक म्हणून इमारतीचे बांधकाम करण्यात आले. त्याचे उद्घाटन मिरज संस्थानचे अधिपती पटवर्धन यांचे शुभहस्ते दिनांक १८.१०.१९२५ रोजी झाले. या इमारतीसाठी 'संगीत स्वयंवर' नाटकाचे उत्पन्न देणगी म्हणून देण्यात आली व इतर दानशूर लोकांनी इमारतीसाठी मदत दिलेली आहे. संस्थेच्या सभागृहाचे उद्घाटन सन १९९० मध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, पु.ल.देशपांडे, कवी कुसुमाग्रज यांच्या उपस्थितीत झाले. सन १९५०–५१ मध्ये मुंबई सरकारने तालुका वाचनालय अशी मान्यता दिली. सन १९७७–७८ या वर्षी संस्थेस 'ब' वर्गातून १९७९ मध्ये 'अ' वर्ग तालुका वाचनालय ही वरची श्रेणी मिळाली. शासनाकडून संस्थेस प्रतिवर्षी विशेष अनुदान दिले जाते. ज्ञान प्रसाराच्या उद्देशाने या वाचनालयाच्या स्थापनेपासून मुक्तद्वार वाचनालयाचा अवलंब केलेला आहे. वक्तृत्व स्पर्धा, व्याख्याने, प्रवचने, परिसंवाद, ललितकला, प्रदर्शने असे उपक्रम ग्रंथालयामार्फत राबविले जातात. ग्रंथालयामार्फत विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका, बालकांच्यासाठी स्वतंत्र वाचन कक्ष, महिलांच्यासाठी उपयुक्त साहित्य असे अनेक कार्य संस्थेने चालविली आहेत. सन १९२५ या वर्षापासून मिरज विद्यार्थी संघाची वसंत, व्याख्यानमाला सातत्याने चालू आहे. या ग्रंथालयात महात्मा गांधी, महर्षी कर्वे, सावरकर, लोकमान्य टिळक यांनी भेटी दिलेल्या आहेत. या ग्रंथालयाची एकूण ग्रंथ संपदा ३७,९५५ इतकी आहे व नियतकालिकांची संख्या ९० च्या आसपास आहे. ग्रंथालयात ग्रंथपाल व तीन कर्मचारी ग्रंथालयाचे कामकाज पहात आहेत. ग्रंथालयाची वेळ सकाळी ९ ते १२ व सायंकाळी ४.३० ते ८.३० अशी आहे. या ग्रंथालयाने सभासदांच्या ग्रंथ देवघेवीसाठी मुक्तद्वार पध्दतीचा अवलंब केला आहे.

१०) यशवंतराव चव्हाण सार्वजनिक ग्रंथालय शांतीनिकेतन लोक विद्यापीठ, सांगली :

सांगली शहरातील शांतीनिकेतन विद्यापीठाच्या विकासामध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या यशवंतराव चव्हाण ग्रंथालयाची स्थापना दिनांक २ ऑक्टोबर, १९९२ रोजी करण्यात आली. या

सार्वजनिक ग्रंथालयाची स्वत:ची सर्व सोयींनीयुक्त इमारत असून या ग्रंथालयाच्या कामकाजाची वेळ सकाळी १० ते सायंकाळी ६ अशी आहे. मात्र या ग्रंथालयाची अभ्यासिका सकाळी १० ते रात्री ९ पर्यंत चालू असते. महाराष्ट्र शासनाचे सन २०११ मध्ये 'अ' वर्ग मानांकन दिलेले आहे. या ग्रंथालयामध्ये पुस्तक देवघेव विभाग, नियतकालिक विभाग, बाल विभाग, महिला विभाग, अभ्यासिका, शेतकऱ्यांच्यासाठी शेतीविषयक मार्गदर्शनपर पुस्तके उपलब्ध करून दिली जातात. हे ग्रंथालय आपल्या वाचकांना विविध सेवा पुरविण्यासाठी या ग्रंथालयाने ग्रंथपाल व तीन इतर ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. या ग्रंथालयामध्ये एकूण २०,९३५ इतके ग्रंथ आहेत. त्यामध्ये संदर्भ ग्रंथ, गॅझेट, अहवाल, विश्वकोश, शब्दकोश, इत्यादींचा समावेश केलेला आहे. या ग्रंथालयाने ५४ नियतकालिके मागविलेली आहे. हे ग्रंथालय वाचकांना व सभासदांना मुक्तद्वार पध्दतीने सेवा पुरविते.

११) राजमती सार्वजनिक ग्रंथालय नेमिनाथनगर विश्रामबाग, सांगली :

नेमिनाथनगर परिसरातील जनतेला वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी स्व.राजमती आक्कांनी २४ वर्षांपूर्वी स्वतंत्र दिनादिवशी राजमती सार्वजनिक ग्रंथालयाचा शुभारंभ केला. या रोपट्याचे माजी महापौर सुरेश पाटील यांनी मोठ्या वटवृक्षात रूपांतर केले. सांस्कृतिक जडणघडण करण्यात ग्रंथालयाचा मोठा वाटा आहे. या ग्रंथालयास सन १९८६ मध्ये सुरूवात झाली. ग्रंथ, ग्रंथालये व वाचक हीच खरी शिदोरी मानून समाज परिवर्तनासाठी संस्कार व नितीमुल्याची होणारी घसरण थांबविण्याचा प्रयत्न ग्रंथालयाच्या माध्यमातून सुरू आहे.

पुस्तकांची देवघेव करण्यापुरतेच काम मर्यादित न ठेवता असंख्य उपक्रमातून लोकांच्यात जागृती करण्याचे काम ग्रंथालयाने केले आहे. १९९६ पासून स्मृती व्याख्यानमाला आयोजित केली जाते. या स्मृती व्याख्यानमालेस अनेक नामवंतांनी भेट दिलेली आहे. राजमती ग्रंथालय व दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेच्या संयुक्त विद्यमाने १४ वे दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलन सांगली येथे पार पाडले आहे. या संमेलनात ग्रंथ प्रदर्शन, ग्रंथ दिंडी, परिसंवाद, बालसाहित्य, मेळावा, कवि संमेलन, कथाकथन इ. कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या ग्रंथालयास महाराष्ट्र शासनाकडून 'अ' वर्ग मानांकन २००३ मध्ये दिलेले आहे. ग्रंथालयात एकूण २१,००० पुस्तके आहेत. ग्रंथालयाची

स्वत:ची अशी भव्य इमारत उभी केलेली आहे. प्रत्येक वर्षी ९० नियतकालिके खरेदी केली जातात. ग्रंथालयात एकूण पाच कर्मचारी काम करीत आहेत. ग्रंथालयाची एकूण सभासद संख्या ४०० आहे. ग्रंथालयाची वेळ ८ ते १२ व सायंकाळी ४ ते ८ अशी आहे. ग्रंथालयाने ग्रंथांच्या देवघेवीसाठी मुक्तद्वार पध्दतीचा अवलंब केलेला आहे.

१२) वि.स.खांडेकर वाचनालय, राम मंदिर चौक, सांगली :

सांगली शहरामध्ये सांगली, मिरज, कुपवाड, महानगरपालिकेअंतर्गत राम मंदिर चौक, सांगली येथे कै.वि.स.खांडेकर वाचनालय या सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना सन १९७५ मध्ये करण्यात आली. या सार्वजनिक ग्रंथालयास महाराष्ट्र शासनाने सन १९७९ मध्ये 'अ' वर्ग मानांकन दिले. या सार्वजनिक ग्रंथालयाची स्वत:ची अशी इमारत आहे. सांगली शहराच्या विकासामध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या ग्रंथालयामध्ये ६९,००० ग्रंथ उपलब्ध आहेत. त्याचबरोबर हे ग्रंथालय प्रत्येक वर्षी ९४ नियतकालिके मागविते. सध्या ग्रंथालयाची सभासद संख्या १,०७० आहे. या सभासदांना विविध ग्रंथालयीन सेवा पुरविल्या जातात. त्यासाठी ग्रंथालयामध्ये एक ग्रंथपाल व पाच इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. तरूण पिढीच्या हितासाठी व्यवसाय, शिक्षण, मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, थोर व्यक्तींची व्याख्याने, थोरा–मोठ्यांची जयंती, पुण्यतिथी, ग्रंथ प्रदर्शन, रांगोळी स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, हळदी–कुंकू कार्यक्रम, महिलांच्यासाठी विविध प्रकारचे उपक्रम राबविले जातात. या ग्रंथालयाने मुक्तद्वार पध्दतीचा अवलंब केला आहे.

१३) व्या.मो.ज्ञा.मं. महात्मा गांधी ग्रंथालय, सांगली :

स्वातंत्र्यपूर्व काळात १९१६ साली व्यापारी मोफत वाचनालय सुरू केले. त्याचे नामकरण १९८० साली महात्मा गांधी ग्रंथालय असे करण्यात आले. महात्मा गांधी ग्रंथालयाने वाचन चळवळीबरोबर सामाजिक कामामध्ये भाग घेतलेला आहे. महात्मा गांधी ग्रंथालयाने शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी लेखन व कार्यशाळा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, राष्ट्रभक्तीपर गीत–गायन स्पर्धा इत्यादींचे आयोजन केले आहे. समाज जागृतीसाठी महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाच्या अधिवेशनामध्ये सक्रीय भाग घेतलेला होता. तसेच या ग्रंथालयाची कोनशिला महात्मा

गांधी यांच्या हस्ते १९२० साली बसविलेली आहे. ग्रंथालयाने गांधीजींचे स्मारक, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका, बालविभाग व महिला विभाग सुसज्ज आहे. ग्रंथालयातील सर्व पुस्तकांचे डिजिटायझेशन केलेले आहे. लोकमान्य टिळक यांनी ग्रंथालयास भेट दिलेली आहे. सन १९८६ मध्ये ग्रंथालयास 'अ' वर्ग मिळाला आहे. महात्मा गांधी ग्रंथालयाकडे ४८,००० पुस्तके, १९ दैनिके, ९१ साप्ताहिके, आश्रयदाते सभासद २० आहेत. एकूण सभासद संख्या २,१४७ आहे. या ग्रंथालयात मुक्तद्वार पध्दतीचा अवलंब केलेला आहे. ग्रंथालयात सेवक वर्ग ६ आहेत. ग्रंथालयीन सेवा पुरविण्यासाठी सुसज्ज अशी इमारत आहे. या ग्रंथालयाची कामकाज वेळ सकाळी ८ ते १२ व सायंकाळी ५ ते ८ अशी आहे.

१४) सांगली (जिल्हा) नगर वाचनालय, सांगली :

सांगली (जिल्हा) नगर वाचनालय, सांगली ही संस्था इ.स.१८६९ मध्ये स्थापन झाली. आजमितीस सांगलीतील सार्वजनिक संस्थांमधील सर्वांत जुनी संस्था आहे. गेल्या १४७ वर्षांपासून वाचन संस्कृती जोपासण्याचे आणि सांस्कृतिक जडणघडणीचे कार्य करीत आहे. सन १९५० मध्ये या ग्रंथालयास जिल्हा नगर वाचनालय म्हणून मान्यता मिळाली. महाराष्ट्र शासनाचा 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार' १९८५-८६ साली मिळाला. हा पुरस्कार राज्यातील सर्वोत्कृष्ट ग्रंथालयास दिला जातो. या ग्रंथालयामध्ये दुर्मिळ जुन्या हस्तलिखितांचा संग्रह आहे. ग्रंथालयातील वाचकांना/सभासदांना मुक्तद्वार पध्दतीमुळे पुस्तकापर्यंत प्रवेश मिळतो. सभासदांना मुक्त प्रवेशाची वेळ सकाळी ८ ते रात्री ८ पर्यंत असते. सदरचे ग्रंथालय हे सांगली जिल्ह्यातील संगणकीकृत ग्रंथालय आहे. ग्रंथालयात एकूण ५० विभाग आहेत. हे सांगलीतील सांस्कृतिक वसा जोपासणारे प्रमुख केंद्र आहे. या ग्रंथालयाची स्वत:ची अशी भव्य इमारत आहे. ग्रंथालयातील ग्रंथ संग्रहामध्ये १,३०,००० इतके ग्रंथ संग्रह आहेत. त्याचप्रमाणे दैनिक व नियतकालिकांची संख्या १३० इतकी आहे. या सर्व सभासदांना वेळेत व अचूक संदर्भ सेवा पुरविण्यासाठी एक ग्रंथपाल व इतर सहा कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. ग्रंथालयात कथा, कादंबरी, नाटक, कविता, चरित्र, ललित, इंग्रजी कादंबरी इ. विभाग आहेत. ग्रंथालयाने साखळी योजना सुरू केलेली आहे. त्या अंतर्गत १४ सार्वजनिक वाचनालये आहेत.

ग्रंथालयात जुनी हस्तलिखिते, पोथ्या, दुर्मिळ ग्रंथ, जुनी दैनिके या संदर्भ सेवेसाठी बरेच विद्यार्थी येतात. पीएच.डी., एम.फिल. करणारे विद्यार्थी तसेच शालेय प्रबंधासाठी विविध प्रकल्पासाठी संदर्भ ग्रंथ पुरविले जातात.

१५) स्वामी विवेकानंद वाचनालय, पलूस :

सांगली जिल्ह्यातील पलूस येथे स्वामी विवेकानंद वाचनालयाची स्थापना दिनांक १५ जुलै, १९९१ मध्ये करण्यात आली. सन १९९३ मध्ये या सार्वजनिक ग्रंथालयास शासनाकडून 'अ' वर्ग मानांकन मिळाले. या ग्रंथालयाची स्वत:ची इमारत असून विविध विभाग आहेत. ग्रंथालयाची कामकाजाची वेळ सकाळी ८ ते १२ व सायंकाळी ४ ते ८ अशी आहे. या सार्वजनिक ग्रंथालयात २३,००० ग्रंथ संख्या उपलब्ध आहे. या व्यतिरिक्त ग्रंथालयात ११० नियतकालिके घेतली जातात. ग्रंथालयीन सेवेचा लाभ ५१५ सभासदांना मिळत आहे. या विविध सेवा पुरविण्यासाठी ग्रंथालयाने एक ग्रंथपाल व तीन कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. ग्रंथालयाची स्वत:ची इमारत असून वाचकांना व सभासदांना मुक्तद्वार पध्दतीची सेवा पुरविली जाते. हे सार्वजनिक ग्रंथालय पलूस तालुक्याच्या सांस्कृतिक, सामाजिक व शैक्षणिक प्रगतीसाठी विविध उपक्रम राबविते. यामध्ये प्रामुख्याने ग्रंथ प्रदर्शन, व्याख्यानांचे आयोजन, थोर व्यक्तींच्या जयंती, पुण्यतिथीचे कार्यक्रम साजरे करणे, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वाचन स्पर्धा, यासारखे उपक्रम राबविते. ग्रंथालयामध्ये व्यवसाय शिक्षण मार्गदर्शन व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन यासारख्या महत्वाच्या विषयावर तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात, जेणेकरून त्यातून तरूणांमध्ये सकारात्मक दृष्टीकोन निर्माण व्हावा व ते जीवनात यशस्वी व्हावेत, अशारितीने हे सार्वजनिक ग्रंथालय पलूसच्या विकासात महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे.

१६) श्री शिवाजी सार्वजनिक वाचनालय, मांगले, ता.शिराळा, जि.सांगली :

या वाचनालयाची स्थापना दिनांक १ मे, १९८३ रोजी झाली आहे. या ग्रंथालयाची स्वत:ची इमारत असून ग्रंथालयाची कामकाज वेळ : सकाळी ८ ते ११ व दुपारी ४ ते ९ अशी आहे. या

ग्रंथालयास महाराष्ट्र शासनाने सन २००४ मध्ये 'अ' वर्ग मानांकन दिलेले आहे. या ग्रंथालयामध्ये एकूण २१,५५० ग्रंथ संग्रह असून १५ दैनिके, १६ साप्ताहिके, ४५ मासिके, ०७ पाक्षिके व ५० वार्षिके असे एकूण ४,११८ नियतकालिके मागविली जातात. या ग्रंथालयाची सभासद संख्या ५२७ इतकी असून त्यांना ग्रंथपाल व इतर तीन ग्रंथालयीन कर्मचारी विविध ग्रंथालयीन सेवा पुरवितात. ग्रंथालयामध्ये सुसज्ज असे विभाग आहेत. या ग्रंथालयाने मुक्तद्वार पध्दतीचा अवलंब केलेला आहे. वाचकांना प्रोत्साहन म्हणून प्रत्येक वर्षी आदर्श वाचक पुरस्कार दिला जातो. यामध्ये एक प्रौढ वाचक पुरूष, एक महिला वाचक, एक विद्यार्थी वाचक व एक विद्यार्थिनी वाचक अशी चार जणांची निवड केली जाते.

राजाराम मोहनरॉय प्रतिष्ठान व ग्रंथालय संचालनालय, मुंबई, गृहमंत्रालय मुंबई, लोक वर्गणीतून १,३०,०००/– रूपये खर्चाची भव्य वास्तू उभारली आहे. वाचनालयाच्या विस्तारीत इमारतीत शालेय विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज अभ्यासिका स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू केले आहे. त्याचबरोबर मुलांच्यासाठी स्वतंत्र चिल्ड्रन कॉर्नर (विभाग) सुरू करण्यात आलेला आहे. वाचनालयाच्या चांगल्या कामाची दखल घेऊन महाराष्ट्र शासन व इतर सेवाभावी संस्थांनी पुरस्कार देऊन ग्रंथालयास गौरविलेले आहे.

१७) श्रीमंत बाळासाहेब ज्युबिली लायब्ररी, लक्ष्मी मार्केट, मिरज :

१८७५ च्या सुमारास नेटीव्ह लायब्ररी नावाचे ग्रंथालय मिरजेत कार्यरत होते. १९१८ मध्ये ती लायब्ररी बंद झाली. त्यानंतर श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन यांचा साठाव्या वर्षी हीरक महोत्सवाच्यावेळी या ज्युबिलीचे स्मरण म्हणून बंद पडलेल्या नेटीव्ह लायब्ररीचे श्रीमंत बाळासाहेब ज्युबिली लायब्ररी या नव्या संस्थेत दिनांक १२.०४.१९२८ रोजी रूपांतर करण्यात आले. सन १९३८ मध्ये बांधलेल्या सरस्वती मंदिर या इमारतीने ग्रंथालयाच्या इमारतीची गरज पूर्ण केली. ही इमारत सर्वच दृष्टीने परिपूर्ण होती. आजमितीस संस्थेच्या ग्रंथालयात ३०,६५५ इतके ग्रंथ असून त्यात २२४ पोथ्या, ३४२ संस्कृत ग्रंथ, २६२ हिंदी पुस्तके, धार्मिक तत्वज्ञानाचे ३०० ग्रंथ, २,५०० कादंबऱ्या, १,२२० कथा व बालवाङ्मय इत्यादींचा समावेश आहे. संस्थेच्या ग्रंथालयाचे

वर्गीकरण व दाखल नोंद रजिस्टर सन १९६६-६७ मध्ये करण्यात आले. दिवाळीच्यावेळी सभासदांना व वाचकांना अत्यल्प मोबदल्यात दिवाळी अंक घरी वाचण्यास दिले जातात. संस्थेच्या वाचनालयात महाराष्ट्रातील प्रमुख दैनिके, साप्ताहिके, मासिके घेतली जातात. सध्या ग्रंथालयाची सभासद संख्या ९२७ इतकी असून त्यांना ग्रंथालयीन सेवा पुरविण्यासाठी एक ग्रंथपाल व इतर चार ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांची नेमणूक केली आहे. ग्रंथालयामध्ये ८१ नियतकालिके मागविली जातात. या ग्रंथालयाने ग्रंथांच्या देवघेवीसाठी मुक्तद्वार पध्दतीचा अवलंब केलेला आहे.

३.१६.४ सातारा :

१) नगरपालिका नगर वाचनालय, कराड :

कृष्णा व कोयना नद्यांच्या संगमावर वसलेल्या कराड नगरीत या वाचनालयाची स्थापना सन १८५७ मध्ये झाली. सन १९५२ मध्ये हे वाचनालय नगरपालिकेकडे वर्ग करण्यात आले. सन १९६३ मध्ये या ग्रंथालयात ग्रंथपालाची नेमणूक करण्यात आली. सन १९६४ मध्ये हे ग्रंथालय नगरपालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये हलविण्यात आले.

सन १९७१ मध्ये या ग्रंथालयाने ९ संशोधकांना पीएच.डी. पदवी मिळवण्यास मोलाचे सहकार्य केले. यावेळी ग्रंथालय शास्त्राप्रमाणे पुस्तकांचे ड्युई दशांश पध्दतीने वर्गीकरण व ए.एल.कॅटलॉग कोड पध्दतीने तालीकीकरण केलेले हे महाराष्ट्रातील पहिले सार्वजनिक ग्रंथालय आहे. या ग्रंथालयाने वृत्तपत्र विभाग, महिला विभाग, संशोधन विभाग, अभ्यासिका विभाग, बाल विभाग असे विभाग केले आहेत. या ग्रंथालयामार्फत दरवर्षी २५ नोव्हेंबर रोजी यशवंतराव व्याख्यानमाला आयोजित केली जाते. या व्याख्यानमालेत निवडक व्याख्यानांचे पुस्तक प्रकाशित केले जाते. या ग्रंथालयामध्ये सात संगणक असून ग्रंथालयातील सर्व पुस्तकांची डाटा एंट्री झाली आहे. तसेच स्पर्धा परिक्षेकरीता बसलेल्या विद्यार्थ्यांना मोफत इंटरनेट सेवा पुरविली जाते. सन १९८८ मध्ये महाराष्ट्र शासनाचा बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट पुरस्कार मिळालेला आहे. या ग्रंथालयात एकूण ७२,००० पुस्तके आहेत. ग्रंथालयाची स्वत:ची सुसज्ज इमारत आहे. ग्रंथालयात एकूण ७० नियतकालिके घेतली

जातात. ग्रंथपाल व इतर नऊ कर्मचारी काम करीत आहेत. ग्रंथालयाची वेळ सकाळी ९ ते १ व सायंकाळी ४.३० ते ८ अशी आहे. सभासद संख्या ४,१२२ अशी आहे.

२) पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव सार्वजनिक मुक्तद्वार ग्रंथालय, वाई :

वाई तालुक्यातील यशवंतनगर येथील मुक्तद्वार ग्रंथालयाची स्थापना दिनांक १५ ऑगस्ट, १९८८ मध्ये करण्यात आली. या सार्वजनिक ग्रंथालयास महाराष्ट्र शासनाने २००८ साली इतर 'अ' वर्ग मानांकन दिले आहे. ग्रंथालयाची स्वत:ची इमारत असून त्यामध्ये देवघेव विभाग, ग्रंथसंग्रह विभाग, नियतकालिक विभाग, वर्तमानपत्र विभाग, वाचनकक्ष, शेतकऱ्यांसाठी उपयुक्त नियतकालिके असे स्वतंत्र विभाग आहेत. या ग्रंथालयाच्या कामकाजाची वेळ सकाळी ९ ते १२ व सायंकाळी ५ ते ८ अशी आहे. या ग्रंथालयाच्या ग्रंथ संग्रहामध्ये कथा, कादंबऱ्या, बालवाङ्मय, संदर्भ पुस्तके, महिलांच्यासाठी उपयुक्त पाककला, मेहंदी, रांगोळी विषयक पुस्तके, सामान्यज्ञानावरील पुस्तके अशी २२,७५७ ग्रंथसंख्या आहे. तसेच ग्रंथालयात शब्दकोश, विश्वकोश अशी संदर्भ साधने वाचकांच्यासाठी ठेवण्यात आलेली आहेत. या ग्रंथालयात ७६ नियतकालिके मागविली जातात. ग्रंथालयाने ५४० वाचकांना सभासदत्व दिलेले असून त्यांना विविध ग्रंथालयीन सेवा पुरविण्यासाठी एक ग्रंथपाल आणि इतर चार ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. ग्रंथालयातर्फे विविध सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक व बौध्दीक कार्यक्रम घेतले जातात. यामध्ये प्रामुख्याने ग्रंथ प्रदर्शन, रांगोळी प्रदर्शन, राष्ट्रीय दिन, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, कथाकथन, व्याख्याने, थोर व्यक्तींच्या जयंत्या इत्यादींचा समावेश होतो. ग्रंथालयाने वाचकांना ग्रंथसेवा पुरविण्यासाठी मुक्तद्वार पध्दतीचा अवलंब केलेला आहे.

३) महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालय, मेढा :

सातारा जिल्हा जावळी तालुक्यातील मेढ्व येथे महात्मा गांधी सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना दिनांक २६ जानेवारी, १९६९ रोजी करण्यात आली. या सार्वजनिक ग्रंथालयास सन २०११ मध्ये इतर 'अ' वर्ग मानांकन महाराष्ट्र शासनाकडून देण्यात आले. ग्रंथालयाची स्वत:ची सर्व सोयींनीयुक्त इमारत असून ग्रंथालयाच्या कामकाजाची वेळ सकाळी ९ ते १२ व सायंकाळी ४ ते ८ अशी आहे.

१९,७४७ पुस्तके या ग्रंथालयाच्या ग्रंथ संग्रहामध्ये उपलब्ध आहेत. तर वाचकांना अद्यावत माहिती पुरविण्यासाठी ९९ नियतकालिकेही मागविली जातात. या ग्रंथालयाचे ३४० सभासद असून त्यांना विविध प्रकारच्या ग्रंथालयीन सेवा पुरविल्या जातात. या सेवा पुरविण्यासाठी ग्रंथालय प्रशासनाने एक ग्रंथपाल नेमलेला आहे. त्याच्या मदतीसाठी इतर तीन ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. हे ग्रंथालय आपल्या सभासदांना ग्रंथालयाची देवघेव सेवा पुरविताना बंदिस्त पध्दतीचा अवलंब करते. या विभागातील वाचन चळवळीचे लोन सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या कार्यामध्ये या ग्रंथालयाने पुढाकार घेतलेला आहे. सांस्कृतिक, सामाजिक, बौध्दीक, विकासासाठी असणारे वाचन साहित्य उपलब्ध करून देण्याबरोबर पुस्तक प्रदर्शन, व्यवसाय मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, रांगोळी स्पर्धा, हळदी–कुंकू, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, कथाकथन, व्याख्याने, थोरामोठ्यांच्या जयंत्या, राष्ट्रीय दिन साजरे करणे या प्रकारचे उपक्रम राबविले जातात.

४) लोणंद नगर पंचायत वाचनालय, लोणंद :

या सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना १९६३ मध्ये करण्यात आली. उत्तरोत्तर प्रगती केल्याने व वाचन चळवळीतील योगदानामुळे महाराष्ट्र शासनाने इतर 'अ' वर्ग मानांकन दिलेला आहे. या ग्रंथालयाची स्वत:ची इमारत आहे. ग्रंथालयीन कामकाजाची वेळ सकाळी ८ ते १२ व सायंकाळी ४ ते ७ अशी आहे. ग्रंथालयाच्या ग्रंथ संग्रहामध्ये १८,२६४ ग्रंथ संपदा आहे. यामध्ये विश्वकोश, शब्दकोश, कथा कादंबरी, बालवाङ्मय, शेतीविषयक पुस्तके, महिलांच्याकरीता पुस्तके, गृहउद्योग, यावरील पुस्तकांचा समावेश आहे. सामान्यज्ञानाची पुस्तके व ताज्या घडामोडी याबाबत ही अद्यावत पुस्तके मागविली जातात. वाचकांना आपल्या क्षेत्रामध्ये अद्यावत माहिती मिळविण्यासाठी ग्रंथालयामध्ये १०५ नियतकालिके मागविली जातात. ८०६ सभासदांना ग्रंथालय विविध ग्रंथालयीन सेवा पुरविते. यामध्ये संदर्भ सेवा, माहिती सेवा, इत्यादींचा समावेश असतो. या सेवा पुरविण्यासाठी ग्रंथालयाने ग्रंथपालाची नेमणूक केलेली आहे. तसेच इतर दोन ग्रंथालयीन कर्मचारी नेमलेले आहेत. हे ग्रंथालय वाचकांना ग्रंथ देवघेव सेवा पुरविण्यासाठी मुक्तद्वार पध्दतीचा अवलंब करीत आहे. या व्यतिरिक्त लोणंदच्या सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक व बौध्दीक विकासासाठी ग्रंथ प्रदर्शन, वक्तृत्व स्पर्धा,

विविध व्याख्याने, कथाकथन, रांगोळी स्पर्धा, हळदी–कुंकू कार्यक्रम, व्यवसाय मार्गदर्शनपर व्याख्याने, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, पोथी वाचन, थोरामोठ्यांच्या जयंत्या साजऱ्या करणे, राष्ट्रीय दिन साजरे करणे यासारखे उपक्रमही राबविले जातात.

५) हिंद वाचनालय, रहिमतपूर :

रहिमतपूरमधील सर्वोत्कृष्ट व पुरस्कार प्राप्त हिंद वाचनालय, रहिमतपूर या सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना दिनांक १३ जानेवारी, १९५२ रोजी करण्यात आली. या ग्रंथालयास सन २००५ मध्ये इतर 'अ' वर्ग मानांकन देण्यात आले. या ग्रंथालयाची स्वत:ची इमारत नाही. या सार्वजनिक ग्रंथालयाच्या ग्रंथ संग्रहामध्ये २२,२५० इतक्या ग्रंथांचा समावेश आहे. तर वाचकांच्या माहितीच्या गरजा भागविण्यासाठी ११५ नियतकालिके मागविली जातात. ग्रंथालयाचे १,०९२ इतके सभासद आहेत. ग्रंथालयाने ग्रंथपाल आणि तीन इतर ग्रंथालय कर्मचाऱ्यांची नेमणूक सभासदांना विविध ग्रंथालयीन सेवा पुरविण्यासाठी केलेली आहे. ग्रंथालय सभासदांना ग्रंथांची देवघेव सेवा पुरविण्यासाठी मुक्तद्वार पध्दती अवलंबली आहे. या ग्रंथालयाची कामकाज वेळ सकाळी ८.३० ते ११.३० व सायंकाळी ४ ते ८.३० अशी आहे. पुस्तकांची वाचकांच्या आवडीनुसार खरेदी, बाल वाचकांच्यासाठी बालवाङ्मयचा प्रचंड खजिना, उन्हाळी सुट्टीत मोफत वाचनमाला, स्वत:च्या हाताने पुस्तक निवडण्याची सोय, दिवाळीच्या सुट्टीत विविध प्रकारचे दिवाळी अंक उपलब्ध अशी कांही या वाचनालयाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

६) श्री छत्रपती प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय, सातारा :

छत्रपतींच्या गादीचा वारसा लाभलेल्या सातारा या ऐतिहासिक नगरीत सन १८५३ मध्ये या वाचनालयाची स्थापना झाली. साताऱ्याचे थोरले प्रतापसिंह महाराज यांचा ग्रंथ संग्रह प्रचंड होता. त्यांनी स्वत:चे ग्रंथालय सुरू केले. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे बंधू श्रीमंत आप्पासाहेब यांनी ग्रंथालयाची जोपासना केली. या ग्रंथालयात देशी–विदेशी वर्तमानपत्रे येत. आप्पासाहेबांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी आईसाहेब यांनी हे खाजगी ग्रंथालय लोकोपयोगी व्हावे म्हणून दिनांक ६ जुलै, १८५३ रोजी या सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना झाली. पुढे सर्व पदाधिकाऱ्यांनी अथक परिश्रमाने हे ग्रंथालय

नावारूपास आणले. प्रारंभी या ग्रंथालयाचे नाव सातारा सिटी जनरल लायब्ररी, त्यानंतर सातारा व्हिक्टोरिया लायब्ररी त्यानंतर श्री छत्रपती प्रतापसिंह महाराज नगर वाचनालय झाले.

या नगर वाचनालयात १,०८,५८३ इतके ग्रंथ संग्रह आहेत. तसेच दैनिके, साप्ताहिके, मासिके, पाक्षिके घेतली जातात. या ग्रंथालयात २८० दुर्मिळ पुस्तकांचा संग्रह आहे. तसेच लंडन टाईम्सचे १८७४ चे अंक जतन केले आहेत. रविकिरण प्रकाशनाची सर्व मुळ पुस्तके हा ग्रंथालयाचा अनमोल ठेवा आहे. ग्रंथालयाचे संगणकीकरण पूर्ण झाले आहे. ग्रंथालयाचे सर्व व्यवहार संगणकावर केले जातात. ग्रंथालयामार्फत अनेक उपक्रम राबविले जातात. शालेय स्पर्धा, वाचक व्यासपीठ, शारदीय व्याख्यानमाला परिसंवाद, कवि संमेलन, व्याख्याने आयोजित केली जातात. ग्रंथालयाच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सव साजरा करण्यात आलेला आहे. या ग्रंथालयाची एकूण सभासद संख्या २,२०० इतकी आहे. ग्रंथालयात ग्रंथपाल व इतर सहा कर्मचारी काम करीत आहेत. ग्रंथालयात एकूण १७७ मासिके येत आहेत. या ग्रंथालयाने मुक्तद्वार पध्दतीचा अवलंब केलेला आहे.

७) श्री नागोजीराव पाटणकर स्मारक वाचनालय, पाटण :

या सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना सन १९४४ मध्ये करण्यात आली. उत्तरोत्तर प्रगती होत गेल्याने परिसरातील वाचन चळवळीमध्ये या ग्रंथालयाचे योगदान लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने सन २००३ मध्ये इतर 'अ' वर्ग मानांकन दिलेले आहे. या ग्रंथालयाची स्वतंत्र अशी सर्व सोयींनीयुक्त इमारत असून ग्रंथालयामध्ये आजमितीला २७,७७९ ग्रंथ वाचकांच्या माहितीच्या गरजा भागविण्यासाठी ग्रंथ संग्रहामध्ये उपलब्ध आहेत. त्याचबरोबर ११८ विविध विषयावरील नियतकालिके मागविली जातात. ग्रंथालयामध्ये देवघेव विभाग, ग्रंथसंग्रह विभाग, नियतकालिक विभाग, वाचनकक्ष इत्यादी आवश्यक विभाग आहेत. या ग्रंथालयाची वाचक संख्या ७५६ इतकी असून त्यांना विविध ग्रंथालयीन सेवा पुरविल्या जातात. वाचकांना ग्रंथालयीन सेवा पुरविण्यासाठी ग्रंथालयाने ग्रंथपालासह इतर तीन ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. या ग्रंथालयाच्या कामकाजाची वेळ सकाळी ८.३० ते ११ व दुपारी ३.३० ते ८.३० अशी आहे. या ग्रंथालयाने वाचकांना देवघेव सेवा पुरविण्यासाठी मुक्तद्वार पध्दतीचा अवलंब केलेला आहे.

८) श्री शिव छत्रपती वाचनालय, सातारा :

श्री शिव छत्रपती वाचनालय, सातारा या सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना इ.स. १९८१ मध्ये करण्यात आली. या ग्रंथालयाचे कार्य व वाचन चळवळीस दिलेले योगदान लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने इ.स. २००४ मध्ये 'अ' वर्ग मानांकन दिले. ग्रंथालयाची स्वत:ची इमारत आहे. ग्रंथालयीन कामकाजाची वेळ सकाळी ९ ते १२ व सायंकाळी ४ ते ७.३० अशी आहे. ग्रंथालयामध्ये २५,४३० विविध विषयावरील ग्रंथसंग्रह आहेत. त्यामध्ये कथा, कादंबऱ्या, गोष्टी, विनोदी चुटके, बालवाङ्मय, शब्दकोश, विश्वकोश, ग्रामीण साहित्य, दलित साहित्य इत्यादींचा समावेश आहे. वाचकांना अद्यावत माहिती पुरविण्यासाठी ९७ नियतकालिके मागविली जातात. ग्रंथालय आपल्या वाचकांना संदर्भ सेवा, माहिती सेवा यासारख्या विविध सेवा पुरविते. या सेवा वाचकांना वेळेत व अचूकपणे पुरविण्यासाठी ग्रंथालय प्रशासनाने ग्रंथपाल व इतर तीन ग्रंथालय कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. या ग्रंथालयाने वाचकांना देवघेव सेवा पुरविण्यासाठी मुक्तद्वार पध्दतीचा अवलंब केलेला आहे. याचबरोबर हे ग्रंथालय सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक विकासासाठी पुस्तक प्रदर्शन, रांगोळी प्रदर्शन, व्याख्याने, कथाकथन, व्यवसाय मार्गदर्शन, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन, थोरामोठ्यांच्या जयंत्या इ. उपक्रम राबविते. अशा प्रकारे या ग्रंथालयाने साताऱ्यामधील वाचन चळवळीला प्रेरणा देण्याचे कार्य केले आहे. माहिलांसाठी गृहशोभिका, मेरी सहेली चार चौघी, मिळून साऱ्याजणी, यासारखी अनेक मासिके घेतली जातात.

३.१६.५ सोलापूर :

१) ओम सच्चिदानंद वाचनालय, सोलापूर

ओम सच्चिदानंद वाचनालय, कस्तुरबा मार्केट, सोलापूर या सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना इ.स. १९५० मध्ये करण्यात आली. सदर सार्वजनिक ग्रंथालयास महाराष्ट्र शासनातर्फे इतर 'अ' वर्ग मानांकन सन २००० मध्ये मिळाले. या ग्रंथालयाची स्वत:ची इमारत आहे. तसेच कामकाजाची वेळ सकाळी १० ते १ व सायंकाळी ५ ते ८ अशी आहे. या सार्वजनिक ग्रंथालयाच्या ग्रंथसंग्रहामध्ये विविध प्रकारच्या १८९५० पुस्तकांचा अंतर्भाव आहे. त्यामध्ये संदर्भ पुस्तके, विश्वकोश, क्रमिक

पुस्तके, कविता संग्रह, नाटके, शब्दकोश, बालवाड्.मय, चरित्रे, पोथीपुराणे, कथा–कादंबऱ्या इत्यादीचा समावेश होतो. या ग्रंथालयाची एकूण सभासद संख्या ४६० असून वाचकांना ग्रंथालयातील सेवा पुरविल्या जातात. ग्रंथालयीन सेवा अचूक व वेळेत पुरविण्यासाठी एक ग्रंथपाल आणि इतर चार कर्मचारी कार्यरत आहेत. या ग्रंथालयाने आपल्या ग्रंथालयातील पुस्तकांची देवघेव करण्यासाठी मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब केलेला आहे. आधुनिक काळातील गरजा लक्षात घेवून ग्रंथालय सभासदांना संगणकाद्वारे ई–सेवा पुरविण्याचा प्रयत्न करीत आहे. ई बुक्स, ई जनरल, ई न्यूज पेपर इत्यादी संसाधने ही वाचकांसाठी ग्रंथालयामार्फत उपलब्ध करून दिली जातात. हे ग्रंथालय आपल्या वाचकांना त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये अद्यावत ठेवण्यासाठी विविध विषयांवरील ७३ नियतकालिके मागविते. जेणेकरून वाचकांना आपल्या कार्यक्षेत्रामध्येच हवी ती माहिती उपलब्ध व्हावी. या विविध प्रकारच्या ग्रंथालयीन सेवा पुरविण्यासाठी ग्रंथालय व्यवस्थापनाने ग्रंथालय आणि इतर चार ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. ग्रंथालयाने पुस्तकांची देवघेव करण्यासाठी मुक्तद्वार पद्धतीचा उपयोग केलेला आहे.

२) नगर वाचन मंदिर, मंगळवेढा

नगर वाचन मंदिराची स्थापना १२ जून १८७५ रोजी तत्कालिन मामलेदार कुंटे व कोल्हटकर यांनी पुढाकार घेऊन 'नेटीव्ह जनरल लायब्ररीची ' स्थापना केली. त्यावेळी मंगळवेढा हा तालुका सांगोला संस्थानमध्ये सामील होता. या वाचनालयास जागा अपुरी पडू लागली म्हणून ग्रामस्थांनी लोक वर्गणी काढून सन १९१७ साली इमारत बांधली. त्यानंतर संचालकांनी वाचनालयाचे 'श्रीमंत युवराज माधव वाचनालय' असे नामकरण केलेनंतर पुढे संस्थाने खालसा झाल्यानंतर त्या वाचनालयाचे 'नगर वाचनालय' असे नामकरण केले.

वाचनालयाने उल्लेखनीय प्रगती केल्याने या वाचनालयास सन २००४–०५ या वर्षात 'अ' वर्ग तालुका वाचनालय असा दर्जा देण्यात आला. सन २००६–०७ या वर्षात महाराष्ट्र शासनाने पाच लाख रुपये विशेष अनुदान दिले. ग्रंथालयात वृत्तपत्र विभाग, पुस्तक देवघेव विभाग, बालविभाग, स्पर्धा परीक्षा विभाग असे विविध विभाग आहेत. वाचनालयाच्या वतीने सभासद व वाचकांसाठी विविध उपक्रम

राबविले जातात. त्यामध्ये विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन, व्यक्तीमत्त्व विकास, कथाकथन, व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, ग्रंथप्रदर्शन तसेच विविध क्षेत्रात यश संपादन करणाऱ्या मान्यवरांचा व गुणी विद्यार्थ्यांचा सत्कार ग्रंथभेट देवून केला जातो.

सामाजिक उपक्रम म्हणून ग्रंथालयातील नियतकालिके कारागृहातील कैद्यांना मोफत वाचनासाठी दिली जातात. ग्रंथालयात एकूण ५०० सभासद आहेत.ग्रंथालयाची ग्रंथसंपदा २१११३ इतकी आहे.कर्मचारी वर्ग ४ आहे. ग्रंथालयाची वेळ सकाळी ८ ते १२ व सायंकाळी ४ ते ८ अशी आहे. नियतकालिकांची संख्या ८३ आहे.

३) नगर वाचन मंदिर, सांगोला

नगर वाचन मंदिराने सन २००४ साली शताब्दी वर्ष साजरे केले असून तालुका 'अ' वर्ग २००३ प्राप्त केलेले हे वाचनालय सांगोल्याचे वैभव म्हणून दिमाखदारपणे उभे आहे. या ग्रंथालयाची स्थापना १९०४ मध्ये करण्यात आली. वाचनालयास सांगोला तालुका ग्रंथालय संघाचा व सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघ यांचा आदर्श ग्रंथालय पुरस्कार देवून गौरविण्यात आले आहे. सन १९८८ मध्ये आमदार फंडातून सुसज्ज अशी दुमजली इमारत बांधली आहे. आज ग्रंथालयात एकूण २६०५४ ग्रंथसंख्या असून त्यामध्ये कथा, कादंबरी, धार्मिक, बालसाहित्य, प्रवासवर्णने, चरित्र, संदर्भ ग्रंथ, स्पर्धा परीक्षा इ. पुस्तके उपलब्ध आहेत. नियतकालिके ७८ असून वाचनालयात चार कर्मचारी आहेत. या वाचनालयात वाचकांच्या मागणीनुसार ग्रंथखरेदी केली जाते. सांगोला शहर व तालुक्यातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी गुणवंत विद्यार्थी पुरस्कार दिले जातात. सन २००७ साली वाचनालयास महाराष्ट्र शासनाकडून शताब्दी महोत्सवानिमित्त पाच लाख रुपयांचे विशेष अनुदान मिळाले आहे. ग्रंथालयाची एकूण सभासद संख्या ५०२ इतकी आहे. या ग्रंथालयाच्या वतीने व्याख्यानमाला आयोजित केली जाते. महिलांसाठी गीतगायन स्पर्धा घेतली जाते. वाचनालयात वृत्तपत्र विभाग, पुस्तक देवघेव विभाग, संदर्भ विभाग, बालविभाग, महिला विभाग, स्पर्धा परीक्षा विभाग, अभ्यासिका असे स्वतंत्र विभाग आहेत. या वाचनालय ग्रंथपरंपरेचा उपयोग संशोधक व व्यापारी वर्गांना चांगल्या प्रकारे होत आहे. ग्रंथालयाची वेळ सकाळी ८ ते ११ व सायंकाळी ४ ते ७ अशी आहे.

४) नगर वाचन मंदिर, पंढरपूर

महाराष्ट्राचे एक चिरंतन स्फूर्तीस्थान पंढरपूरचे श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर अशा तीर्थक्षेत्राच्या पंढरपूर नगरीत सन १८७४ मध्ये रावबहाद्दूर व श्री लालशंकर त्रिवेदी यांनी ग्रंथालयाची स्थापना केली. प्रारंभी या वाचनालयाचे नाव 'नेटीव्ह जनरल लायब्ररी' असे होते. मदनमोहन मालवीय यांच्या हस्ते या वाचनालयाचे सन १९३२ साली 'नगर वाचन मंदिर' असे नामकरण केले. या वाचनालयास सर्वात मोठा फटका सन १९५६ च्या प्रलयकारी पुराने बसला. त्यावेळी अनेक ग्रंथांना व बहुमोल कागदपत्रांना जलसमाधी मिळाली. वाचनमंदिराचे मोठे नुकसान झाले. या वाचनालयाची इमारत दोन मजली असून चंद्रभागेकाठी मोठ्या दिमाखात उभी आहे. या ग्रंथालयात देवघेव विभाग, संदर्भ विभाग, वृत्तपत्र विभाग, बालविभाग, महिला विभाग असे स्वतंत्र विभाग आहेत. हे ग्रंथालय संगणकीकृत आहे. सन २००२ साली राजाराम मोहन रॉय यांच्याकडून ग्रंथालयास रु.५०,०००/– निधी मिळालेला आहे. त्यावेळी शतकोत्तर महोत्सव साजरा करण्यात आला. या ग्रंथालयास सन १९५३ साली 'अ' वर्ग मानांकन देण्यात आले आहे. या ग्रंथालयाची एकूण ग्रंथसंपदा ३५४०० इतकी आहे. ग्रंथालय संघाचे विभागीय अधिवेशन या वाचन मंदिराच्या वतीने घेण्यात आले. ग्रंथालयाची एकूण सभासद संख्या ५५६ इतकी आहे. या शतायू वाचनमंदिरास ग्रंथालयीन चळवळीतील विशेष कार्य व महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक जडणघडणीत केलेल्या कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाने सन्मानपत्र प्रदान करून पाच लाख रुपयांचे अनुदान दिले आहे.

या ग्रंथालयाच्या वतीने वाचनसंस्कृती वाढावी म्हणून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. तालुक्यातील इतर ग्रंथालयांना साखळी योजनेअंतर्गत ग्रंथपुरवठा केला जातो. या ग्रंथालयाने सन २००० पासून ग्रंथालयाची शाखा सुरू केलेली आहे. ग्रंथालयाची वेळ सकाळी ९.३० ते ११.३० व दुपारी ४ ते ८ अशी आहे.

५) पूर्वविभाग सार्वजनिक वाचनालय , सोलापूर

पूर्वविभाग सार्वजनिक वाचनालयाची स्थापना सन १९७५ मध्ये करण्यात आली. वाचनालयास महापालिकेकडून साडेपाच हजार स्क्वे.फूट जागा विकत घेऊन भव्य इमारत उभारण्यात

आली. वाचनालयात आज २८७१८ इतकी ग्रंथसंपदा आहे. एकूण सभासद संख्या ३४८२ आहे. वाचनालयाने वेबसाईट व ई–मेल आणि पुस्तकांचे बारकोडींग सिस्टीम सुरू केलेली आहे. तसेच मोफत संगणक वर्ग, तेलगू साक्षरता वर्ग, कन्नड साक्षरता वर्ग, संस्कृत संभाषण वर्ग घेतले जातात. ग्रंथालयात १०० नियतकालिके घेतली आहेत. ग्रंथालयाच्या वर्धापन दिनानिमित्त दरवर्षी शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी चित्रकला, रांगोळी, निबंध, वक्तृत्व, हस्ताक्षर, श्लोक, पाठांतर, काव्यवाचन, कथाकथन, वाचन मेळावा व्याख्याने आयोजित केली जातात. वाचनालयास वाचकांनी देणगी स्वरूपात पुस्तके भेट दिलेली आहेत. ग्रंथालयात मराठी, हिंदी, तेलगू, इंग्रजी, कथा, कादंबरी, काव्य व इतर साहित्यसंपदा आहे. महाराष्ट्र शासनाच्या आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार मिळालेला आहे. ग्रंथालयाची कामकाजाची वेळ ८ ते ६ आहे. कर्मचारी वर्ग एक ग्रंथपाल व तीन इतर कर्मचारी काम करीत आहेत. ग्रंथालयाने मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब केलेला आहे. या ग्रंथालयास राजाराम मोहन रॉय ग्रंथालय फौंडेशनकडून अनुदान मिळत आहे. विद्यार्थ्यांसाठी व स्पर्धा परीक्षा देणाऱ्या वाचकांसाठी मोफत अभ्यासिकेची सोय करण्यात आलेली आहे.

६) व्यापारी मोफत वाचनालय, मोहोळ

व्यापारी मोफत वाचनालय, मोहोळ, जि.सोलापूर या सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना सन १९४३ मध्ये करण्यात आली, पण मान्यता मात्र सन १९४९ मध्ये मिळाली. महाराष्ट्र शासनातर्फे ग्रंथालयास इतर 'अ' वर्ग मानांकन सन २००४ मध्ये देण्यात आले. या सार्वजनिक ग्रंथालयाच्या ग्रंथ संग्रहालयातील ग्रंथसंग्रहाची रचना स्वत:च्या इमारतीत केलेली आहे. ग्रंथालयामध्ये एकूण २५१५२ पुस्तके उपलब्ध आहेत. त्याचबरोबर ६१ नियतकालिके व दैनिकेही घेतली जातात. या ग्रंथालयाने ५०४ व्यक्तींना ग्रंथालयीन सभासदत्व दिले असून त्यांना विविध प्रकारच्या ग्रंथालयीन सेवा पुरविल्या जातात. या सेवा वाचकांना पुरविण्यासाठी ग्रंथालयामध्ये एक ग्रंथपाल व इतर तीन ग्रंथालयीन कर्मचारी काम करीत आहेत. या ग्रंथालयाच्या कामकाजाची वेळ सकाळी ८ ते १२ व सायंकाळी ४ ते ७ अशी आहे. ग्रंथालयाच्या ग्रंथसंग्रहातील ग्रंथालयाची देवघेव सेवा वाचकांना देण्यासाठी ग्रंथालयाने मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब केलेला आहे. पुस्तक प्रदर्शन, थोर व्यक्तीच्या जयंत्या, राष्ट्रीय दिन साजरे करणे,

व्यवसाय विषयक मार्गदर्शन वर्ग, पोथीपुराण वाचन, रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, शेती विषयक मार्गदर्शनपर व्याख्याने, स्पर्धा परीक्षा, मार्गदर्शनपर व्याख्याने इत्यादी कार्यक्रम राबवून परिसराचा सामाजिक, सांस्कृतिक, बौद्धिक, सांस्कृतिक दर्जा उंचावण्याचे काम निरंतरपणे करण्याचा प्रयत्न ग्रंथालय करीत आहे. ग्रंथालयाच्या ग्रंथसंग्रहामध्ये कथा, कादंबरी, कविता संग्रह, नाटके, ग्रामीण साहित्य, एकांकिका, बालवाङ्मय, पाकशास्त्र विषयक पुस्तके, शब्दकोश, विश्वकोश, थोर व्यक्तींची चरित्रे इत्यादीचा अंतर्भाव आहे. अशा रितीने हे ग्रंथालय मोहोळ परिसराच्या विकासात महत्वपूर्ण योगदान देण्याचा प्रयत्न करीत आहे.

७) शिवलाल रामचंद्र वाचनालय , माढा

सोलापूर जिल्ह्यातील शिवलाल रामचंद्र वाचनालय, माढा या सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना सन १९५४ मध्ये करण्यात आली. वाचन चळवळीतील या ग्रंथालयाचे योगदान लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने सन १९८० मध्ये या ग्रंथालयास 'अ' वर्ग मानांकन दिले. या ग्रंथालयाच्या ग्रंथसंग्रहामध्ये काही हस्तलिखितांचा समावेश आहे. या ग्रंथालयाची स्वतंत्र इमारत असून ग्रंथालयीन कामकाजाची वेळ सकाळी १० ते २ व दुपारी ३ ते ७ अशी आहे. हे ग्रंथालय विविध प्रकारच्या ग्रंथांनी समृद्ध असून ग्रंथसंग्रहामध्ये ३८२६७ पुस्तके उपलब्ध आहेत. या ग्रंथालयाची वैशिष्ट्ये म्हणजे २४९ हस्तलिखिते जतन व संवर्धन करून ठेवलेली आहेत. त्याचबरोबर पाच दोलामुद्रितेही उपलब्ध आहेत. या प्रकारच्या सांस्कृतिक वारसाबरोबर वाचकांना अद्यावत ज्ञान प्राप्त करून देण्यासाठी ७५ नियतकालिके मागविली जातात. ग्रंथालयाची सभासद संख्या ७५० आहे. या सभासदांना विविध ग्रंथालयीन सेवा पुरविल्या जातात. या ग्रंथालयीन सेवा पुरविण्यासाठी ग्रंथपाल व इतर चार कर्मचारी कार्यरत आहेत. ग्रंथालयाने आपल्या वाचकांना देवघेव सेवा पुरविण्यासाठी मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब केलेला आहे. पण हस्तलिखिते व दोलामुद्रिते बंदिस्त स्वरूपात आहेत.

८) श्रीमंत शहाजीराजे भोसले वाचनालय , अक्कलकोट

श्री स्वामी समर्थ यांचे प्रसिद्ध मंदिर असलेल्या अक्कलकोट शहरात संस्थानच्या राजमाता श्रीमंत लक्ष्मीबाई राणीसाहेब यांनी श्रीमंत शहाजीराजे भोसले वाचनालयाची स्थापना सन १८७६ मध्ये

केली. या ग्रंथालयास 'अ' वर्ग तालुका ग्रंथालय हा दर्जा सन १९८४ मध्ये मिळाला. ग्रंथालयाची प्रशस्त इमारत असून त्यामध्ये वृत्तपत्र विभाग, पुस्तक देवघेव विभाग, संदर्भ विभाग, बालविभाग, महिला विभाग असे स्वतंत्र विभाग आहेत. सीमा विभाग असल्याने कन्नड दैनिकेही वाचनालयात उपलब्ध करून दिलेली आहेत.

ग्रंथालय चळवळ वाढावी यासाठी या वाचनालयाच्या वतीने विविध उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये वक्तृत्व स्पर्धा, भाषणे, थोरा–मोठ्यांच्या जयंती निमित्त विविध कार्यक्रम घेतले जातात. वाचनालयाच्या वैशिष्ट्यपूर्ण कामगिरीमुळे वाचनालयास आदर्श ग्रंथालय पुरस्कार मिळाला. सन २०११ ला महाराष्ट्र शासनाच्या राज्यस्तरीय बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रामीण ग्रंथालय पुरस्कार मिळाला. ग्रंथालयात एकूण ९४ नियतकालिके घेतली जातात. ग्रंथालयाचे एकूण सभासद ८०० आहेत. ग्रंथालयात ग्रंथपाल व इतर ४ कर्मचारी काम करीत आहेत. ग्रंथालयात कथा–कादंबरी, मराठी विश्वकोश, बालवाड्.मय,चरित्रे, पोथीपुराणे इत्यादीचा अंतर्भाव आहे.

९) श्री हनुमान सार्वजनिक वाचनालय , वासूद

मु.पो.अकोला, ता.सांगोला, जि.सोलापूर येथील समाजसेवेचा वसा घेतलेले व वाचन चळवळीस प्रेरणा देणारे श्री हनुमान सार्वजनिक वाचनालय, वासूद या ग्रंथालयाची स्थापना सन १९९९ मध्ये करण्यात आली. या ग्रंथालयाचे समाज परिवर्तनातील योगदान लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने सन २०११ मध्ये ग्रंथालयास इतर 'अ' वर्ग मानांकन दिले. स्वत:च्या स्वतंत्र इमारतीत वसलेल्या या ग्रंथालयाच्या कामकाजाची वेळ सकाळी ८ ते ११ व सायंकाळी ४ ते ७ आहे. आजमितीस या ग्रंथालयामध्ये १९२३० पुस्तके उपलब्ध आहेत. यामध्ये संदर्भ पुस्तके, विश्वकोश, कथा–कादंबऱ्या, पोथी–पुराणे, बालवाड्.मय, महिलाविश्व इत्यादीचा अंतर्भाव होतो. वाचकांची अद्यावत ज्ञानाची तहान भागविण्यासाठी ग्रंथालयामार्फत ९८ नियतकालिके मागविली जातात. सध्या या 'अ' वर्ग ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहाचा वापर ९८७ सभासद घेत असून ग्रंथालय त्यांना पुस्तक देवघेव संदर्भ सेवा, माहिती सेवा यासारख्या सेवा पुरविते. या ग्रंथालयीन सेवा सभासदांना अचूकपणे व वेळेत पुरविण्यासाठी ग्रंथालय व्यवस्थापनाने एक ग्रंथालय व तीन इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. हे

ग्रंथालय आपल्या ग्रंथालयातील पुस्तकांची देवघेव करण्यासाठी मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब करते. ग्रंथालय परिसरातील जनतेच्या सांस्कृतिक, सामाजिक, बौद्धिक, शैक्षणिक विकासासाठी ग्रंथालय विविध उपक्रम राबविते.

१०) श्री हिराचंद नेमचंद वाचनालय, सोलापूर

श्री हिराचंद नेमचंद वाचनालयाची स्थापना सन १८५३ साली झाली. त्यावेळी या वाचनालयाचे नाव 'नेटीव्ह जनरल लायब्ररी' असे होते. प्रारंभ २५ सभासद, १२५ ग्रंथ वाचनालयात होते. सोलापूर नगरपालिकेने वाचनालयास मोफत जागा दिली. शेठ श्री हिराचंद नेमचंद यांनी रु.१४५०० इतक्या देणगीतून वाचनालयाची इमारत बांधली. सन १९५७ मध्ये सोलापूर जनरल लायब्ररीचे हिराचंद नेमचंद वाचनालय असे नामकरण केले. या ग्रंथालयाने मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब केलेला आहे. विद्यार्थ्यांसाठी मोफत अभ्यासिकेची सोय करण्यात आली आहे. त्या ठिकाणी स्पर्धा परीक्षेसाठी उपयुक्त पुस्तकांची उपलब्धता करून दिली आहे. त्याचबरोबर वाचकांसाठी वॉटरकुलर, लिफ्ट व झेरॉक्स मशीनची सोय केलेली आहे.

या वाचनालयात हवे असलेले पुस्तक त्वरित मिळावे म्हणून संगणकीकरणाचे काम पूर्ण झालेले आहे. वाचनालयाच्या वेबसाईटवरून वाचनालयात नवीन दाखल झालेल्या ग्रंथांची यादी घरात बसून मिळू शकते. ग्रंथालयाची एकूण ग्रंथसंपदा १२३७०० इतकी आहे.वाचनालयात नियमित ३५ नियतकालिके येतात. लहान मुलांच्यात वाचनाची गोडी निर्माण व्हावी म्हणून बालविभाग सुरू करण्यात आला आहे. राजाराम मोहन रॉय प्रतिष्ठानकडून ग्रंथखरेदीस अनुदान मिळते. या वाचनालयात संगीत विभाग असून त्यात मराठी, हिंदी गाण्यांच्या ४७५ दुर्मिळ रेकॉर्डस् व ५० सिडीज् उपलब्ध आहेत. शहरवासियांच्या प्रबोधनासाठी व्याख्याने आयोजित केली जातात. वाचनालयाने ३१ गाळ्यांचे भव्य व्यापारी संकुल बांधले आहे. त्यामुळे वाचनालयाला कायमस्वरूपी उत्पन्नाची सोय झाली आहे. ग्रंथालयात एकूण १३ कर्मचारी काम करीत आहेत. ग्रंथालयाची वेळ सकाळी ८ ते १२ व सायंकाळी ५ ते ८ अशी आहे. ग्रंथालयास 'अ' वर्ग जिल्हा ग्रंथालय दर्जा देण्यात आलेला आहे.

११) सदुभाऊ सार्वजनिक वाचनालय, अकलूज

सदुभाऊ सार्वजनिक वाचनालय अकलूज ग्रामपंचायत मार्फत चालविले जाते. या सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना सन १९५९ मध्ये करण्यात आलेली आहे. या ग्रंथालयात महाराष्ट्र शासनाने सन २००८ मध्ये 'अ' मानांकन दिलेले आहे. ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहाचा वाचकांना जास्तीत जास्त उपयोग करता यावा म्हणून ग्रंथालयाने मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब केलेला आहे.ग्रंथालयाची एकूण ग्रंथ संख्या ३८७५८ इतकी आहे. त्यामध्ये शब्दकोश, विश्वकोश, बालवाड्.मय, कथा–कादंबरी, ललित संग्रह इत्यादीचा अंतर्भाव केलेला आहे. ग्रंथालयामार्फत विविध उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये वक्तृत्व स्पर्धा,हळदी कुंकू, शेतकऱ्यांच्यासाठी पीक स्पर्धा, भाषण स्पर्धा, रांगोळी इत्यादी उपक्रम घेतले जातात. या ग्रंथालयास सन २००४ मध्ये आदर्श ग्रंथालय पुरस्कार व महाराष्ट्र शासनाचा सन २००७–०८ मध्ये बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार मिळालेला आहे. या ग्रंथालयात ९१ नियतकालिके मागविली जातात. त्यामुळे वाचकांना अद्यावत ज्ञान प्राप्त करण्यास मदत होते. या सार्वजनिक ग्रंथालयाची सभासद संख्या ८५० आहे. वाचकांना विविध ग्रंथालयीन सेवा पुरविल्या जातात. ग्रंथालय वाचकांना ई–सेवा पुरविते. त्यामध्ये ई–बुक्स, ई–जर्नल्स, ई–न्यूज पेपर इत्यादी ग्रंथालयामधील संगणकावर वाचक वाचू शकतात. ग्रंथालयाची सुसज्ज इमारत असून ग्रंथालयाची कामाकाजाची वेळ सकाळी ८ ते १२ व सायंकाळी ४ ते ८ आहे. वाचकांना विविध सेवा पुरविण्यासाठी ग्रंथपालसह इतर चार कर्मचारी कार्यरत आहेत.

१२) श्री संतसेवा वाचनालय,सोलापूर

श्री संतसेवा वाचनालय, विजापूर रोड, सोलापूर या 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना सन १९८७ मध्ये करण्यात आली. ग्रंथालयाची उत्तरोत्तर होत गेलेली प्रगती व कार्य लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने ग्रंथालयास 'अ' वर्ग मानांकन दिले. या'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयाची स्वत:ची स्वतंत्र इमारत असून कामकाजाची वेळ सकाळी ८ ते ११ व सायंकाळी ५ ते ८ अशी आहे. या'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयामध्ये ३३४६३ इतके ग्रंथ आहेत. यामध्ये विविध विषयातील पुस्तके, संदर्भ ग्रंथ, क्रमिक पुस्तके, कथा–कादंबऱ्या, पोथीपुराणे, बाल वाड्.मय संग्रह, गोष्टीची पुस्तके, पाककला

साहित्य, समाजसुधारकांवरील पुस्तके इत्यादीचा अंतर्भाव आहे. तसेच वाचकांना अद्यावत ज्ञान देण्यासाठी १११ नियतकालिके मागविली जातात. आजमितीस या ग्रंथालयाची सभासद संख्या १६१८ आहे. ग्रंथालयीन सभासदांना विविध ग्रंथालयीन सेवा पुरविण्यासाठी ग्रंथालय व्यवस्थापनाने एक ग्रंथपाल व चार इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. ग्रंथालयाच्या ग्रंथ संग्रहालयातील पुस्तकांची देवघेव करण्यासाठी मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब केलेला आहे. या व्यतिरिक्त समाज प्रबोधनासाठी व जनजागृतीसाठी ग्रंथालय विविध सांस्कृतिक कार्यक्रम, थोरामोठ्यांच्या जयंत्या, पोथीपुराणे वाचन, रांगोळी स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, मान्यवरांची व्याख्याने इत्यादी उपक्रम राबविते.

१३) श्री ज्ञानेश्वर वाचनमंदिर मुक्तद्वार वाचनालय, करमाळा

श्री ज्ञानेश्वर वाचन मंदिर या ग्रंथालयाने मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब केलेला आहे. उपरोक्त ग्रंथालयाची स्थापना दिनांक १६.०४.१९४९ रोजी करण्यात आली.स्थापनेनंतर या ग्रंथालयाची दिवसेंदिवस होत गेलेली प्रगती व समाजपरिवर्तनामधील ग्रंथालयाचे योगदान लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने या सार्वजनिक ग्रंथालयास सन १९७२ मध्ये इतर 'अ' वर्ग मानांकन दिले. या ग्रंथालयाची स्वतंत्र इमारत असून कामकाजाची वेळ सकाळी ८ ते ११ व सायंकाळी ४ ते ८ अशी आहे. या सार्वजनिक ग्रंथालयाच्या ग्रंथसंग्रहामध्ये ३७२१० इतकी पुस्तके आहेत. या व्यतिरिक्त अद्यावत ज्ञान उपलब्ध करून देण्यासाठी शंभर नियतकालिके मागविली जातात. त्याचबरोबर आधुनिकतेची कास धरून वाचकांना ई–संसाधने ही उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जातो. ग्रंथालय सभासद संख्या ५३५ आहे.सर्व सभासदांना त्यांच्या मागणीनुसार विविध ग्रंथालयीन सेवा पुरविल्या जातात. या सेवा वेळेत अचूकपणे व सर्वसमावेशकपणे देण्यासाठी ग्रंथालय प्रशासनाने एक ग्रंथपाल व दोन इतर ग्रंथालयीन कर्मचारी नेमलेले आहेत. ग्रंथालयातील वाचकांना देवघेव सेवा पुरविण्यासाठी ग्रंथालयाने बंदिस्त पद्धतीचा अवलंब केला आहे. ग्रंथालयाच्या नावात मुक्तद्वार हा शब्द असून सुद्धा बंदिस्त पद्धतीचा अवलंब केला आहे. ग्रंथालयीन वाचन साहित्याच्या संरक्षणासाठी हे पाऊल उचललेले दिसते. पण हे रंगनाथन यांच्या ग्रंथालय शासनाच्या पाच तत्वांना मारक आहे. पुस्तक प्रदर्शन भरविणे, रांगोळी स्पर्धा घेणे, मान्यवर व्यक्तींची व्याख्याने आयोजित करणे, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, व्याख्यानाचे

आयोजन करणे, व्यवसाय मार्गदर्शनकरणे, कथाकथन स्पर्धांचे आयोजन करणे या सारखे उपक्रम राबविले जातात.

१४) श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालय, बार्शी

या ग्रंथालयाची स्थापना सन १९३९ मध्ये करण्यात आली. सदर ग्रंथालयाची उत्तरोत्तर प्रगती व वाचन चळवळीतील योगदान लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने इतर 'अ' वर्ग मानांकन सन २००४ मध्ये दिले. या सार्वजनिक ग्रंथालयाची स्वत:ची इमारत आहे. तसेच सकाळी ८ ते १२ व सायंकाळी ५ ते ८ ही ग्रंथालयाच्या सुट्टी व्यतिरिक्त दैनंदिन कामाकाजाची वेळ आहे. ग्रंथालयाने पुस्तकाची देवघेव करण्यासाठी मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब केलेला आहे.आजमितीस ग्रंथालयामध्ये २७६३१ ग्रंथ असून त्यामध्ये कथा, कादंबरी, विश्वकोश, बालवाड्.मय, चरित्रे, पोथीपुराणे, थोरामोठ्यांची चरित्रे इत्यादीचा अंतर्भाव आहे. या व्यतिरिक्त वाचकांना आपआपल्या कार्यक्षेत्रामध्ये अद्यावत ज्ञान मिळविण्यासाठी १३६ नियतकालिके मागविली जातात. आजघडीला ग्रंथालयाचे ५५० सभासद असून त्यांना विविध ग्रंथालयीन सेवा पुरविल्या जातात. या सेवा अचूकपणे व वेळेत पुरविण्यासाठी ग्रंथालय व्यवस्थापनाने एक ग्रंथपाल व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. ग्रंथालय आपल्या कार्यक्षेत्रातील जनतेच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, बौद्धिक व शैक्षणिक प्रगतीसाठी पुस्तक प्रदर्शन, पोथीवाचन, वक्तृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, व्यवसाय मार्गदर्शन, कथाकथन, बालवाड्.मय, हळदीकुंकू यासारखे कार्यक्रम राबविते. या वाचनालयामध्ये सन १९६८ पासून पंडित नेहरू मोफत पेपर वाचन विभाग आहे. तसेच लहान मुलांसाठी बालवाचन विभाग व महिलांसाठी स्वतंत्र विभाग आहेत. सांस्कृतिक कार्यक्रम विभागातर्फे ज्ञानदान विभाग, संगीताचे कार्यक्रम, वक्त्यांची भाषणे, कला प्रदर्शन, निबंध स्पर्धा, शारदोत्सव इत्यादी कार्यक्रम सातत्याने घेतले जातात.

१५) सार्वजनिक वाचनालय, बार्शी

मराठवाड्याचे प्रवेशद्वार ठरलेल्या बार्शी शहरात 'नेटीव्ह जनरल लायब्ररी' ची स्थापना सन १८६३ मध्ये झाली. या नेटीव्ह लायब्ररीचे सार्वजनिक वाचनालय असे नामकरण करण्यात आले. सन

१९६४ ला या वाचनालयाच्या शतसांवत्सारिक महोत्सव साजरा करण्यात आला. सन १९७७ मध्ये बार्शी नगरपालिकेने वाचनालयास जागा दिली. ग्रंथालयाची सुसज्ज अशी दुमजली इमारत असून ग्रंथालयास 'अ' वर्ग दर्जा मिळालेला आहे.ग्रंथालयाच्या ग्रंथसंग्रहात एकूण ३११९१ इतका संग्रह आहे. या वाचनालयात मोफत वाचन विभाग असून वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके आहेत. दुर्मिळ ग्रंथसंपदा सार्वजनिक वाचनालयात आहे. सन २०१३ ला वाचनालयास १५० वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त ग्रंथालयाने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले. वाचनसंस्कृती वाढीस लागावी यासाठी ग्रंथालयाने विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. ग्रंथालयाने नव्या युगाप्रमाणे बदलत जाऊन आज ग्रंथालयाचे संगणकीकरण झाले आहे. शतायू वाचनालयास ग्रंथालयीन चळवळीतील विशेष कार्य व महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक जडणघडणीत केलेल्या योगदानाप्रित्यर्थ महाराष्ट्र शासनाने या ग्रंथालयास सन्मानपत्र व पाच लाख रुपयांचे अनुदान दिले आहे.

ग्रंथालयात ग्रंथपाल व इतर तीन कर्मचारी काम करीत आहेत. वाचनालयाची सभासद संख्या ५६० इतकी आहे. ग्रंथालयात बालविभाग, प्रौढ विभाग, नियतकालिक विभाग, देवघेव विभाग, अभ्यासकांच्यासाठी स्टडीरूम इ. विभाग आहेत. वाचनालयामार्फत प्रत्येक वर्षी वक्तृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, थोरामोठ्यांची भाषणे, हळदीकुंकू, झिम्माफुगडी इ. कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. ग्रंथालयाची वेळ सकाळी ८.३० ते दुपारी १२ व सायंकाळी ५.३० ते ८ अशी आहे.

१६) स्वा.सावरकर मुक्तद्वार वाचनालय, पंढरपूर

स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळ पंढरपुरात गेली चौतीस वर्षे काम करीत आहे. याच मंडळाने सार्वजनिक ग्रंथालय सन १९७१ रोजी स्थापन करण्यात आली आहे. या ग्रंथालयात आजमितीस एकूण २८०३१ ग्रंथसंग्रह उपलब्ध आहेत. महाराष्ट्रशासनाने दिनांक १२.०४.२००५ इ. रोजी इतर 'अ' वर्ग दर्जा दिलेला आहे.सावरकरांचे विचार तरूण मुलांच्या मनावर बिंबवण्यासाठी सावरकर वक्तृत्व स्पर्धा, वाङ्.मय पाठांतर स्पर्धा, चित्रकला स्पर्धा प्रत्येक वर्षी आयोजित केल्या जातात. ग्रंथालयाने सावरकर जन्मशताब्दी निमित्त स्वतंत्र संमेलन घेतले जाते. गेली चौतीस वर्षे सावरकर पुण्यतिथी निमित्त व्याख्यानमाला आयोजित केली जाते. राष्ट्रभक्ती निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविले

जातात. महिलांसाठी व युवकांसाठी व्याख्यानमाला घेतली जाते. 'आषाढस्य प्रथम दिवसे' कालिदास उत्सव प्रतिवर्षी तीन दिवस साजरा केला जातो. सार्वजनिक ग्रंथालयात, वृत्तपत्र विभाग, बालविभाग, महिला विभाग, अभ्यासिका, संतसाहित्य दालन असे स्वतंत्र विभाग आहेत. ग्रंथालयात ग्रंथपाल व इतर तीन कर्मचारी कार्यरत आहेत. ग्रंथालयात एकूण ११३ नियतकालिके घेतली जातात. सावरकर ग्रंथालयाचे सभासद ६९८ आहेत. ग्रंथालयाची वेळ सकाळी ७ ते रात्री ९ वाजेपर्यंत आहे. ग्रंथालयाची स्वतंत्र इमारत बांधण्याचे काम सुरू आहे. त्यासाठी ४० लाख खर्च अपेक्षित धरलेला आहे.

१७) ज्ञानदान सार्वजनिक मोफत वाचनालय, भुरीकवठे

ज्ञानदान सार्वजनिक मोफत वाचनालय भुरीकवठे, ता.अक्कलकोट या ग्रंथालयाची स्थापना २ ऑक्टोबर १९९१ रोजी करण्यात आली. सदर ग्रंथालयाची प्रगती लक्षात घेऊन व समाजातील विकासाच्या चळवळीतील ग्रंथालयाचे योगदान लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने या ग्रंथालयास इतर 'अ' वर्ग मानांकन २००३ मध्ये दिलेले आहे. सदर ग्रंथालयाची स्वतंत्र इमारत असून ग्रंथालयीन कामकाजाची वेळ सकाळी ८ ते ११ व सायंकाळी ४ ते ७ अशी आहे. आजमितीस या ग्रंथालयामध्ये १९६४३ इतकी पुस्तके असून यामध्ये संदर्भ पुस्तके, कथा कादंबऱ्या, पोथी पुराणे, बालवाङ्मय, पाकशास्त्र, स्पर्धापरीक्षा इत्यादीचा समावेश आहे. वाचकांना अद्यावत ज्ञान उपलब्ध करून देण्यासाठी ग्रंथालय ७९ नियतकालिके मागविते.त्याचबरोबर ई–संसाधने ही वाचकांना उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जातो. या सार्वजनिक ग्रंथालयामध्ये ५०४ व्यक्तींना सभासदत्व दिलेले आहे. त्यांना विविध प्रकारच्या ग्रंथालयीन सेवा पुरविल्या जातात. वेळेत व अचूक ग्रंथालय सेवा पुरविण्यासाठी ग्रंथालयाने ग्रंथपाल व इतर ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांची नेमणूक केली आहे. ग्रंथसंग्रहातील पुस्तकांची देवघेव सेवा वाचकांना पुरविण्यासाठी ग्रंथालयाने मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब केला आहे. त्याचबरोबर परिसरातील जनतेच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, बौद्धिक विकासासाठी ग्रंथालयातर्फे विविध उपक्रम राबविले जातात. यामध्ये पुस्तकप्रदर्शन, रांगोळी स्पर्धा, पोथीवाचन, हळदीकुंकू कार्यक्रम, व्याख्यानाचे आयोजन, वक्तृत्व स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, निबंध स्पर्धा, लिंबू चमचा, संगीत खुर्ची, व्यवसाय मार्गदर्शन वर्ग, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन इत्यादीचा समावेश होतो.

३.१७ राष्ट्रीय पाण्डुलिपी संस्थानच्या कार्याचा आढावा :

जीवनाशी विशिष्ट स्वरूपात निगडीत असलेल्या हस्तलिखीतांचा प्राचीन दस्तऐवजांचा पाण्डुलिपीचा संबंध आहे. पाण्डुलिपी हा एक अशा प्रकारचा हस्तलिखीत दस्तऐवज आहे की त्याचे वैज्ञानिक, ऐतिहासिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक महत्व आहे. किंवा जो कमीत कमी पंच्याहत्तर वर्षापेक्षा प्राचीन असावा. पाण्डुलिपी फक्त ऐतिहासिक दस्तऐवजच असतो असे नाही तर ती कोणत्याही देशात घडलेल्या परिवर्तनाचे साक्षीदार असते. या सर्वांपेक्षा महत्वपूर्ण म्हणजे त्या देशाची वैचारिक परंपरा आणि अनुभवाचे प्रतिनिधीत्व करते.

''वेगवेगळ्या संस्था, मंदिरे, मठ, खाजगी ग्रंथसंग्रह इत्यादींमधून संग्रहित केलेल्या हस्तलिखीतांचा शोध घेणे, त्याचे प्रलेखन जतन करून अभ्यासकांना जास्तीत जास्त उपयोग करता येईल, या दृष्टीने कार्य करण्याच्या हेतूने फेब्रुवारी, २००३ मध्ये राष्ट्रीय पाण्डुलिपी मिशन (National Mission For Manuscripts (Namami) नमामी या संस्थेची स्थापना पर्यटन आणि संस्कृती, मंत्रालय, भारत सरकार यांच्याद्वारे करण्यात आली. नमामीचे मुख्य कार्यालय नवी दिल्ली येथे आहे. इंदिरा गांधी नॅशनल सेंटर फॉर द आर्टस् (IGNCA) हे प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी नोडल एजन्सी म्हणून कार्य करते.'' (http//www.namami.gov.in 21.08.2018) या योजनेचा कालावधी पाच वर्षांचा ठेवण्यात आलेला आहे. भारतामध्ये जवळजवळ पन्नास लाख पाण्डुलिपी आहेत. पाण्डुलिपीच्या माध्यमातून भारताच्या समृध्द इतिहासाची व सांस्कृतिक चिंतनाची जाणीव होते. पाण्डुलिपीमध्ये वेद भाषा, लिपी व निरनिराळे विषय यांचा अंतर्भाव आढळतो. पाण्डुलिपी सर्वसामान्य जनतेला उपलब्ध करून दिल्याने भारताच्या समृध्द इतिहासाला, वर्तमानकाळ व भविष्यकाळाशी जोडले जाऊ शकते.

३.१७.१ राष्ट्रीय पाण्डुलिपी मिशनची उद्दिष्टे :

१. पाण्डुलिपीचे सर्वेक्षण करून देश पातळीवर हस्तलिखीतांचा शोध घेणे.

२. भारतातील उपलब्ध हस्तलिखीतांचा माहिती साठा तयार करणे.

३. हस्तलिखीतांचे संवर्धन आवश्यकतेनुसार पारंपारिक अथवा आधुनिक पध्दतीने करणे.

४. नवीन तरूण पिढीला प्रशिक्षणाद्वारे हस्तलिखीतांच्या विविध पैलूचे ज्ञान देऊन हस्तलिखीत शास्त्राचा अभ्यास बनविणे.

५. मौल्यवान हस्तलिखीतांचे अंकीकरण करून त्याचे जतन व संवर्धन करणे.

६. अप्रकाशित हस्तलिखीतांची तालिका प्रकाशित करून त्यांच्या वापरास चालना देणे.

७. व्याख्याने, चर्चासत्रे, प्रकाशने इत्यादी कार्यक्रमांद्वारे लोकांना हस्तलिखीतांची ओळख करून जागृतता निर्माण करणे.

८. इंदिरा गांधी नॅशनल सेंटर फॉर द आर्टस् (IGNCA) येथे हस्तलिखीतांचे राष्ट्रीय ग्रंथालय निर्माण करणे.

नमामी ही संस्था भारतीय हस्तलिखीतांचे (पाण्डुलिपी) जतन व संरक्षण करणे त्याचबरोबर त्याचे डिजीटायझेशन करणे या कामी कार्यरत आहे. यामुळे संशोधकांना पाण्डुलिपी सहजपणे उपलब्ध होतील. या संस्थेने पाण्डुलिपीच्या जतन व संरक्षणासाठी राष्ट्रीय संस्थांचे जाळे स्थापन केले आहे. यामध्ये पाण्डुलिपी संस्थान केंद्र (MRCC), पाण्डुलिपी संरक्षण केंद्र (NCCS), मॅन्युस्क्रीप्ट पार्टनर सेंटर (MPCS), मॅन्युस्क्रीप्ट कॉन्जरव्हेशन पार्टनर सेंटर (MCPC), स्पॅरीड कॉस द नेशन्स या संस्थेने कृती संपदा नावाच्या पाण्डुलिपीच्या हस्तलिखीतांचा डेटाबेसची स्थापना केलेली आहे. भांडारकर ओरिएंटल इन्स्टिट्युशन, पुणे येथे ऋग्वेदाच्या हस्तलिखीतांचे जतन केले आहे. ऑक्टोबर, २०१० मध्ये सयाजीराव गायकवाड लायब्ररी सेंट्रल ग्रंथालय आणि बडोदा आणि नमामी यांच्या सहकार्याने ग्रंथालयामध्ये हस्तलिखीतांचे जतन यावर राष्ट्रीय कार्यशाळा आयोजित केली होती. हस्तलिखीतांचे संरक्षण व संवर्धनासाठी पाण्डुलिपी जतन व संरक्षण केंद्र या योजने अंतर्गत भारतामध्ये चौत्तीस संस्थांचे जाळे कार्यरत आहे. यांचे भौगोलिक विभागामध्ये विभाजन केले आहे. उत्तर विभागामध्ये दहा, दक्षिण विभागामध्ये नऊ, पूर्व विभागामध्ये दहा, पश्चिम विभागामध्ये चार आणि मध्य विभागामध्ये एक असे संस्थांचे जाळे पाण्डुलिपीच्या संरक्षण व जतनासाठी विणले गेले आहे. सन २००४ मध्ये नमामीने हस्तलिखीतांच्या अंकीकरणासाठी एक Pilot Project केला. सन २००६ मध्ये हा प्रकल्प पूर्ण झाला. या प्रकल्पामुळे हस्तलिखीतांच्या अंकीकरणासाठी मार्गदर्शक आणि

प्रमाणके ठरविण्यात आली. आजपर्यंत नमामीने भारतातील विविध रिपॉझिटरी मधील २६००० हून अधिक हस्तलिखीतांचे अंकीकरण केले आहे.

३.१८ सारांश

संशोधकाने दोलामुद्रिताचा अर्थ मान्यवरांनी दिलेल्या दोलामुद्रितांच्या व्याख्या स्पष्ट करण्याचा प्रयत्न सदर संशोधन शोध प्रबंधाच्या तिसऱ्या प्रकरणात केला आहे. त्याचबरोबर मुद्रण कलेचा इतिहास,भारतात मुद्रण कलेची सुरूवात याचे विश्लेषण केले आहे. मराठी दोलामुद्रिताची संकल्पना व त्याचा कालावधी विशद केला आहे. मराठी दोलामुद्रिताचा पहिला प्रयत्न, दुसरा प्रयत्न व तिसरा प्रयत्न त्याचबरोबर मराठी दोलामुद्रितांकरिता प्रियोळकरांचे योगदान याचे वर्णन केले आहे. पुणे विद्यापीठात उपलब्ध असलेल्या मराठी दोलामुद्रितांचा उहापोह केला आहे. त्याचबरोबर दोलामुद्रितांची सद्यस्थिती विशद केली आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयाचा अभ्यास या सदर संशोधनातील प्रकरणामध्ये संशोधकाने सार्वजनिक ग्रंथालयाचा आढावा घेतला आहे. भारतातील ग्रंथालयाचा इतिहास, मुघलांचा काळ, ब्रिटीश काळ याबाबत विश्लेषण केले आहे. महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयाचा ऐतिहासिक आढावाही या प्रकरणात घेतलेला आढळतो. पश्चिम महाराष्ट्रातील ८० अ वर्ग सार्वजनिक ग्रंथालयाची माहिती दिलेली आहे. शेवटी राष्ट्रीय पाण्डुलिपी संस्थानच्या कार्याचा आढावा संशोधकाने घेतला आहे.

संदर्भसूची

- करमरकर, प्रकाश (२००५–०६) छापील व हस्तलिखित कागदांचे संरक्षण, नाशिक : ज्ञानगंगोत्री, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, १५७, १५७.
- कर्वे, चिंतामणी गणेश (१९५४) संयुक्त महाराष्ट्राचा ज्ञानकोश, पुणे : प्रसाद प्रकाशन.
- कुलकर्णी, र.अ. (१९४९) मराठी दोलामुद्रिते, मुंबई : महाराष्ट्र ग्रंथ भांडार, पृ.६
- कोण्णूर, एम्.बी. (२००८) डायमंड ग्रंथालय व माहितीशास्त्र कोश, पुणे : डायमंड प्रकाशन, पृ.३४८.

- गावस्कर, सु.आ. (१९६१) मराठी दोलामुद्रिते, मुंबई : मराठी ग्रंथ संग्रहालय, पृ.२२, २३.
- गोगटे, शरद (२००८) मराठी ग्रंथ प्रकाशनाची दोनशे वर्ष, पुणे : राजहंस प्रकाशन.
- जोशी, लक्ष्मणशास्त्री (१९७६) मराठी विश्वकोश खंड १२, मुंबई : म.रा.म. विश्वकोश निर्मिती मंडळ, पृ.१४५०
- जैन, प्रकाश (२००१) सुलभ ग्रंथालयशास्त्र, नागपूर : विश्व पब्लिशर्स ॲन्ड डिस्ट्रीब्युटर्स, पृ.५२
- थोरात, लक्ष्मण (२००७) ग्रंथालय माहितीशास्त्र, पुणे : डायमंड पब्लिकेशन्स.
- दडकर, जया (१९९८) संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश, मुंबई : जी.आर. भरकल फाऊंडेशन, पृ.२८५
- देवधर, विजय (२०१३) ग्रंथालय व माहितीशास्त्र कोश, पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन, पृ.११
- देवकुळे, च.ग. (१९५६) मुद्रण व्यवस्थापन, पुणे : व.ग. देवकुळे प्रकाशन.
- धांडोरे, किरण गं. (२०१६) अंतर्गत अर्थसहाय्याच्या विविध योजनांची माहिती पुस्तिका.
- धायुगडे य.ए. (१९६०) मुद्रित शोधन, पुणे : दि पुना प्रेस ओनर्स असोसिएशन.
- पडोळे, ल.वा. (१९५१) मराठी ग्रंथालयाचा इतिहास, नागपूर : पूजा प्रकाशन.
- प्रियोळकर, अ.का. (१९६३) ग्रंथालय गौरव ग्रंथ भाग १, मुंबई : मराठी ग्रंथ संग्रहालय, पृ.६
- प्रियोळकर, अ.का. (१९६६) भारतीय ग्रंथ संरक्षणाची शताब्दी, मुंबई : मराठी ग्रंथ संग्रहालय, पृ.८
- प्रियोळकर, अ.का. (१९६९) मराठी ग्रंथाचे आदर्श संग्रहालय, मुंबई : मराठी साहित्य, संघ, पृ.८०
- पारखी, गंगाधर र. (२००८) ग्रंथालयशास्त्र परिचय, पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन.
- पाटील, सा.श्री. (२००५) विश्व महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालये, देवगड : स्नेहल एजन्सीज्.

- भागवत, शशिकला गं. (१९८९) मराठी दोलामुद्रितांची तालिका, पुणे : युनिव्हर्सल प्रेस, पृ.१८६
- महाजन, शा.गं. (१९८९) मराठी दोलामुद्रितांची तालिका, पुणे : जयकर ग्रंथालय, पृ.४, ४०
- मोरजे, गंगाधर (१९९५) मराठी दोलामुद्रिते, गोवा : गोमंतक मराठी अकादमी, पृ.२५४.
- मराठे, ना.रा. (१९७५) भारतीय ग्रंथालय इतिहास, मुंबई : अभिनव प्रकाशन.
- मुळे, यादवराव (१९६४) ग्रंथ वर्णन व ग्रंथसूची, मुंबई : ग्रंथालय गौरव ग्रंथ.
- विद्यासागर अमोल शंकरराव (२०१३) उपयोजित इतिहास,पुणे : म.रा.वि.प. मंडळ, पृ.७
- Daleh, Hoiberg (2013) Britannica Reference Encyclopedia, New Delhi : Ency Britannia Inc. Page 349.
- Parmar, P.P. (1989) Ency. Dictionary of Library Information Science Vol. II, New Delhi : Anmol Publication, Page 585.
- Simpson, J.A. (1989) The Oxford English Dictionary Oxford : Clarend on Press, Page 834
- Sharma / Pandey S.K. (1987) Libraries S. Society, New Delhi : ESS Publication, Page 90, 91
- https:/wwwtechnopediacom.definition-26.07.2018 accessed on
- https://enwikipediaorg./wiki/2011censusofIndia10.08.2018 accessed on
- https//wwwnamamigovin21.08.2018 accessedon
- www.maharashtratimescom.6Jul2012.

प्रकरण चौथे

माहितीचे संकलन, विश्लेषण व सादरीकरण

४.१ माहितीचे संकलन

संशोधकाने हाती घेतलेले **'पश्चिम महाराष्ट्रातील अ वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रितांचा अभ्यास'** संशोधन कार्य यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणारी माहिती संकलित करण्यासाठी प्रामुख्याने प्रश्नावलीचा वापर केला. सुरूवातीस प्रश्नावली तयार करून करवीर वाचन मंदिर, कोल्हापूर येथे भरण्यास दिली. माहिती देतेवेळी येणाऱ्या अडचणी लक्षात घेवून प्रश्नावलीमध्ये आवश्यक ते बदल करून पश्चिम महाराष्ट्रातील सर्वच ९९ 'अ' वर्ग ग्रंथालयांना प्रश्नावली पाठविली. परंतु दुर्देवाने प्रश्नावली भरून पाठविण्याचा ग्रंथालयांचा प्रतिसाद खूपच कमी होता. संशोधकाने आवश्यकतेनुसार ग्रंथालयांना प्रत्यक्ष भेटी देवून, त्यांचे निरीक्षण करून तसेच ग्रंथपालांच्या मुलाखती घेवून संशोधनासाठी आवश्यक माहिती संकलित केली. पश्चिम महाराष्ट्रातील ९९ 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी संशोधकाच्या अथक प्रयत्नाने ८० ग्रंथालयांनी संशोधनासाठी आवश्यक माहितीची पूर्तता केली.

अ.नं.	एकूण प्रश्नावली वितरीत 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालये	प्रश्नावली/माहिती भरून दिलेली ग्रंथालये	शेकडा प्रमाण %
१.	९९	८०	८०.८०%

वरील तक्तानुसार स्पष्ट होते की, संशोधनासाठी निवडलेल्या ९९ 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी ८० (८०.८०%) ग्रंथालयांनी संशोधन कार्यास आवश्यक माहिती उपलब्ध करून दिली, तर उर्वरीत १९ (१९.२०%) ग्रंथालयांनी माहिती उपलब्ध करून दिली नाही. या ८० ग्रंथालयांनी पुरविलेल्या माहितीचे विश्लेषण व सादरीकरण केले.

पश्चिम महाराष्ट्रातील अभ्यासासाठी निवडलेल्या ९९ ग्रंथालयांपैकी २० ग्रंथालयात उपलब्ध मराठी दोलामुद्रित ग्रंथ मिळालेले आहेत. त्यांची ग्रंथालयनिहाय संख्या पुढील तक्त्यात दर्शविलेली आहे.

तक्ता क्र.४.१


पश्चिम महाराष्ट्रातील अ वर्ग ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रित ग्रंथसंख्या

अ.नं.	ग्रंथालयाचे नाव	दोलामुद्रित संख्या	टक्के %
१	आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी	१४	८.२८%
२	करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर	१८	१०.६५%
३	जत वाचनालय, जत	०६	३.५५%
४	द. नगर वाचनालय, विटा	०८	४.७३%
५	नगर वाचनालय, कुरूंदवाड	०३	१.७७%
६	नगर वाचन मंदिर, डिग्रज	०५	२.९५%
७	नगर वाचनमंदिर, पंढरपूर	१०	५.९१%
८	नगर वाचन मंदिर, सांगोला	०३	१.७७%
९	नगर वाचनालय, मंगळवेढा	०८	४.७३%
१०	नगरपालिका नगर वाचनालय, कराड	०७	४.१४%
११	महात्मा गांधी वाचनालय, कागल	०७	४.१४%
१२	राजर्षि शाहूनगर वाचन मंदिर, शिरोळ	०७	४.१४%
१३	सानेगुरूजी सार्व.मोफत वाचनालय, गडहिंग्लज	०८	४.७३%
१४	सार्वजनिक वाचनालय, मलकापूर	०४	२.३६%
१५	श्री छत्रपती प्रतापसिंह महाराज नगर वाचनालय, सातारा	१६	९.४६%
१६	श्री सार्वजनिक वाचनालय, बार्शी	१७	१०.५%

१७	श्री शाहू वाचनालय, गारगोटी	०५	२.९५%
१८	श्री.हिराचंद नेमचंद्र वाचनालय, सोलापूर	०९	५.३%
१९	श्रीमंत गंगामाई वाचन मंदिर, आजरा	०२	१.१८%
२०	श्रीमंत शहाजीराजे भोसले वाचनालय, अक्कलकोट	१२	७.१०%
	एकूण दोलामुद्रित ग्रंथसंख्या	१६९	

आलेख क्र.४.१

पश्चिम महाराष्ट्रातील अ वर्ग ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रित ग्रंथसंख्या



उपरोक्त तक्ता क्र.१ अन्वये स्पष्ट होते की, पश्चिम महाराष्ट्रातील ८० अ वर्ग सार्वजनिक ग्रंथालयापैकी फक्त २० (२५%) ग्रंथालयांमध्ये एकूण १६९ मराठी दोलामुद्रिते आढळली. उर्वरीत ६० (७५%) ग्रंथालयामध्ये दोलामुद्रिते आढळली नाहीत. सर्वांत जास्त १८ (१०.६५%) मराठी दोलामुद्रिते करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर येथे आहेत. तर सर्वांत कमी २ (१.१८%) मराठी दोलामुद्रिते श्रीमंत गंगामाई वाचन मंदिर, आजरा येथे आहेत.

४.२ कालानुक्रमे नोंदी :

दोलामुद्रिताचे महत्त्व प्रकाशन कालामध्ये असल्याने नामावलीतील नोंदी या कालानुक्रमे दिलेल्या आहेत. एकाच सालात मुद्रित असल्याने ग्रंथ हे ग्रंथकार नामानुसार नोंदविलेले आहेत. लेखकाचे नाव, शिर्षक, प्रकाशक, प्रकाशनस्थळ, शके, इ.स., पृष्ठसंख्या, शिळा, मूल्य इत्यादी ग्रंथाची माहिती दिली आहे. शेवटी ग्रंथ कोणत्या ग्रंथ संग्रहालयात उपलब्ध झाला त्याची माहिती दिली आहे.

तक्ता क्र.४.२

नोंदीतील सांकेतिक शब्द

भाषा	भाषांतरकार
संपा	संपादक
आ.	आवृत्ती
मु.	मुद्रक
पृ.	पृष्ठे
शिळा.	शिळाछाप
मु.रु.	मूल्य रुपये
दा.नों.क्र.	दाखल नोंद क्रमांक
मो.नों.क्र.	मोरजे नोंद
गा.नों.क्र.	गावस्कर नोंद

तक्ता क्र.४.३

कालानुक्रमे मराठी दोलामुद्रितांची उपलब्धता

अ.क्र.	कालावधी	ग्रंथालये	आढळलेली दोलामुद्रिते	शेकडा प्रमाण
१.	१८००–१८१०	२ (१०%)	२	१.१८%
२.	१८११–१८२०	३ (१५%)	४	२.३६%
३.	१८२१–१८३०	४ (२०%)	५	२.९५%
४.	१८३१–१८४०	४ (२०%)	५	२.९५%
५.	१८४१–१८५०	६ (३०%)	१४	८.२८%
६.	१८५१–१८६०	१५ (७५%)	५६	३३.१३%
७.	१८६१–१८६७	१९ (९५%)	७९	५६.७४%

उपरोक्त तक्ता क्र. ४.३ मधील माहितीच्या आधारे स्पष्ट होते की, इ.स. १८०० ते १८१०, १८११ ते १८२०, १८२१ ते १८३०, १८३१ ते १८४०, १८४१ ते १८५०, १८५१ ते १८६० व १८६१ ते १८६७ या कालावधीमध्ये प्रकाशित झालेली मराठी दोलामुद्रिते अनुक्रमे २ (१०%), ३ (१५%), ४ (२०%), ४ (२०%), ६ (३०%), १५ (७५%) व १९ (९५%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयामध्ये आढळली. इ.स. १८०० ते १८१०, १८११ ते १८२०, १८२१–१८३०, १८३१ ते १८४०, १८४१ ते १८५०, १८५१ ते १८६० व १८६१ ते १८६७ या कालावधीमध्ये प्रकाशित झालेली अनुक्रमे २ (१.१८%), ४ (२.३६%), ५ (२.९५%), ५ (२.९२%), १४ (८.२८%), ५६ (३३.१३%) आणि ७९ (४६.७४%) मराठी दोलामुद्रित ग्रंथ २० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयामध्ये आढळलेल्या १६९ मराठी दोलामुद्रितांमध्ये समाविष्ट आहेत.

४.३ वर्णनात्मक नोंदी :

नोंद क्रमांक : १

लेखकाचे नांव : लेले त्र्यंबककर गणेशशास्त्री.

शीर्षक : महाकवी कालिदास विरचीत रघुवंश.

प्रकाशक : निर्णयसागर छापखाना. प्रकाशन स्थळ : –.

प्रकाशन वर्ष : १८०५. शके : १७२६. इ.स. : १८०५. पृष्ठ संख्या : २७३.

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : दोन रूपये.

महत्त्वाचा मजकूर : –.

ग्रंथालयाचे नांव : महात्मा गांधी वाचनालय, कागल.

नोंद क्रमांक : २

लेखकाचे नांव : मोडक जनार्दन बाळाजी.

शीर्षक : मोरोपंतकृत प्रकरण भाग १.

प्रकाशक : डेक्कन कॉलेज. प्रकाशन स्थळ : पुणे.

प्रकाशन वर्ष : १८०५. शके : १७२६. इ.स. : १८०५. पृष्ठ संख्या : २४२.

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –.

महत्त्वाचा मजकूर: –.

ग्रंथालयाचे नांव : नगर वाचन मंदिर, कसबा डिग्रज.

नोंद क्रमांक : ३

लेखकाचे नांव : हर्डीकर अंताजी रामचंद्र.

शीर्षक : फडणविसांचे निवडक पत्रांचा संग्रह.

प्रकाशक : जगध्दितेच्छु छापखाना. प्रकाशन स्थळ : –.

प्रकाशन वर्ष : १८११. शके : १७३२. इ.स. : १८११. पृष्ठ संख्या : ६३.

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : ८ आणे.

महत्त्वाचा मजकूर : –.

ग्रंथालयाचे नांव : नगर वाचन मंदिर, कसबा डिग्रज.

नोंद क्रमांक : ४

लेखकाचे नांव : परब काशिनाथ पांडूरंग.

शीर्षक : दशकुमार चरित्रम्.

प्रकाशक : निर्णयसागर छापखाना. प्रकाशन स्थळ : –.

प्रकाशन वर्ष : १८११. शके : १७३२. इ.स. : १८११. पृष्ठ संख्या : २८६.

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : एक रूपया.

महत्त्वाचा मजकूर : –.

ग्रंथालयाचे नांव : महात्मा गांधी वाचनालय, कागल.

नोंद क्रमांक : ५

लेखकाचे नांव : गोडबोले रघुनाथ भास्करराव.

शीर्षक : श्री ज्ञानदेवाची गाथा.

प्रकाशक : जगध्दितेच्छु छापखाना. प्रकाशन स्थळ : –.

प्रकाशन वर्ष : १८१३. शके : १७३४. इ.स. : १८१३. पृष्ठ संख्या : २३०.

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –.

महत्त्वाचा मजकूर : –.

ग्रंथालयाचे नांव : महात्मा गांधी वाचनालय, कागल.

नोंद क्रमांक : ६

लेखकाचे नांव : पागवी नारायण भगवानराव.

शीर्षक : भारतीय साम्राज्य.

प्रकाशक : सत्यप्रकाश छापखाना. प्रकाशन स्थळ : पुणे.

प्रकाशन वर्ष : –. शके : १७३६. इ.स. : १८१५. पृष्ठ संख्या : २१६.

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : १४ आणे.

महत्त्वाचा मजकूर : आर्यनीती, प्रकृती सौजन्य, शौर्य, वेदान्तशास्त्र, ज्योतिषशास्त्र, वैद्य, शिल्पकला, गायनवादन कला यांची माहिती सांगितलेली आहे.

ग्रंथालयाचे नांव : श्री छत्रपती प्रतापसिंह नगर वाचनालय, सातारा.

नोंद क्रमांक : ७

लेखकाचे नांव : तेंडूलकर बाबाजी अनंतप्रभू.

शीर्षक : रामदासी कुबडी.

प्रकाशक : श्री हरिवरदा. प्रकाशन स्थळ : मुंबई.

प्रकाशन वर्ष : –. शके : १७४३. इ.स. : १८२२. पृष्ठ संख्या : ४४.

दाखल अंक (Call No.) : ४८२४. बोधांक (Call No.) : ८९१.४६१. किंमत : ४ आणे.

महत्त्वाचा मजकूर : गणेशाला वंदन करून पुस्तकाची सुरूवात केली आहे. मुमुक्षुसाधक चातकजना तयाचे व्हावे समाधान । वळोनिकृपेचा घन । दासबोधी जीवन वर्षला । दशक नववा मध्ये अनुभविकज्ञान, उपासना, घनदाट संसारात गुंतून पडला स्वप्रकाश तेजाने गरज नाही तो, वस्तूचे सत्यरूप पालटणारे विकार, मुळवर्ण इत्यादीची माहिती दिली आहे.

ग्रंथालयाचे नांव : करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर.

नोंद क्रमांक : ८

लेखकाचे नांव : जर्विस जॉर्ज

शीर्षक : गणित कृती अथवा गणित मार्ग (भाषांतर)

प्रकाशक : मुंबई (शिळाछाप) प्रकाशन स्थळ : मुंबई.

प्रकाशन वर्ष : १८२६. शके : १७४७. इ.स. : १८२६. पृष्ठ संख्या : ४+१२५.

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : सदरचे पुस्तक गणित विषयाचे असून हरनचा कोर्स ऑफ मॅथॅमॅटिक्स या इंग्रजी ग्रंथांचे भाषांतर आहे. संस्कृत शब्द वापरण्याचा प्रयत्न केला

असून प्रत्येक विषयाच्या व्याख्या व उदाहरणे सोडवून दाखविली आहेत.

ग्रंथालयाचे नांव : आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी.

गावस्कर नोंद : १५.

मोरजे नोंद : ६२.

नोंद क्रमांक : ९

लेखकाचे नांव : जर्विस जॉर्ज

शीर्षक : कर्तव्यभुमिती

प्रकाशक : कुरिअर प्रेस प्रकाशन स्थळ : मुंबई.

प्रकाशन वर्ष : –. शके :१७४७. इ.स.:१८२६ (शिळाछाप).पृष्ठ संख्या : १६+१७३.

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : कर्नल पास्ले यांच्या प्रॅक्टीकल जोमेट्री या पुस्तकाचे भाषांतर होय.

ग्रंथालयाचे नांव : सार्वजनिक वाचनालय, बार्शी

गावस्कर नोंद : १४.

मोरजे नोंद : ६०.

नोंद क्रमांक : १०

लेखकाचे नांव : जर्विस जॉर्ज

शीर्षक : अंकगणित अपूर्णांक भाग–२

प्रकाशक : बॉम्बे नेटिव्ह सोसायटी छापखाना. प्रकाशन स्थळ : मुंबई.

प्रकाशन वर्ष : १८२६. शके : १७४७. इ.स. :१८२६

पृष्ठ संख्या : ८+२४७ (शिळाछाप).

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : प्रस्तुत पुस्तक मुंबईतील शिळाछापाचे पहिले मुद्रण होय.

ग्रंथालयाचे नांव : सार्वजनिक वाचनालय, बार्शी

गावस्कर नोंद : १६.

मोरजे नोंद : ६३.

नोंद क्रमांक : ११

लेखकाचे नांव : दामले मो.के.

शीर्षक : न्यायशास्त्र

प्रकाशक : पूर्ण चंद्रोदय छापखाना. प्रकाशन स्थळ : बडोदे.

प्रकाशन वर्ष : –. शके : १७४७. इ.स. : १८२६ पृष्ठ संख्या : ४७६

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : १ रूपया

महत्त्वाचा मजकूर : –

ग्रंथालयाचे नांव : सार्वजनिक वाचनालय, बार्शी

नोंद क्रमांक : १२

लेखकाचे नांव : जर्विस जॉर्ज

शीर्षक : शिक्षणमाला प्रथम पुस्तक (भाषांतर)

प्रकाशक : –. प्रकाशन स्थळ : मुंबई.

प्रकाशन वर्ष : १८२८. शके : १७४९. इ.स. :१८२८ पृष्ठ संख्या : १० + ४७०.

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : सदरचा ग्रंथ भाषांतरीत असून गणित वहिवाट वही नाण्याचे वर्तमान या विषयांची माहिती आहे. हरन आणि वॉनीकॅसल यांच्या ग्रंथाचे भाषांतर इंग्रजी शब्दांना मराठी पारिभाषीक शब्द दिलेले आहेत.

ग्रंथालयाचे नांव : आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी.

गावस्कर नोंद : १८.

मोरजे नोंद : नाही.

नोंद क्रमांक : १३

लेखकाचे नांव : जगनाथशास्त्री आणि इतर

शीर्षक : महाराष्ट्र भाषेचा कोश

प्रकाशक : बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन. प्रकाशन स्थळ : मुंबई.

प्रकाशन वर्ष : –. शके : १७५०. इ.स. :१८२९ (शिळाछाप) पृष्ठ संख्या : ७७६.

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : मराठी भाषेचा शब्दकोश हा कोश पंडित मंडळीचा कोश म्हणून प्रसिध्द आहे. शब्दाचा अर्थ, संस्कृत प्रचूर भाषेत आहेत.

ग्रंथालयाचे नांव : नगर वाचनालय, कुरुंदवाड.

गावस्कर नोंद : २१.

मोरजे नोंद : ९१.

नोंद क्रमांक : १४

लेखकाचे नांव : केपन डेव्हीड

शीर्षक : मराठ्यांची बखर (भाषांतर)

प्रकाशक : सरकारी छापखाना. प्रकाशन स्थळ : मुंबई.

प्रकाशन वर्ष : १८२९. शके : १७५०. इ.स. :१८२९

पृष्ठ संख्या : २ + ४२७ (शिळाछाप).

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : मुसलमान लोक हिंदुस्थानात संचार करू लागलेत. सन १८१८ मध्ये मराठ्यांचे राज्य इंग्रजांनी घेतले याचा इतिहास सांगितलेला आहे. पुरातन लेख, सरकारी दप्तरे, जहागीरदार यांच्याकडील कागदपत्रे, मुसलमान बखरी यांचा सारांश दिलेला आहे. डफने इंग्लंडमध्ये इंग्रजीत बखर लिहिली, त्याचे भाषांतर केलेले आहे.

ग्रंथालयाचे नांव : आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी.

गावस्कर नोंद : २०.

मोरजे नोंद : ९४.

नोंद क्रमांक : १५

लेखकाचे नांव : जर्विस जॉर्ज

शीर्षक : विद्येचे उद्देश (भाषांतर)

प्रकाशक : मु.एफ.डी. रामोस प्रकाशन स्थळ : मुंबई.

प्रकाशन वर्ष : १८२९. शके : १७५०. इ.स. :१८२९ पृष्ठ संख्या : २ + १६९.

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : गणित, पदार्थ विज्ञान यांचा अभ्यास का करावा, त्यापासून फायदे कोणते, सुख कसे मिळते यांचे प्रतिपादन असलेला निबंध होय. ग्रंथाच्या शेवटी शब्दकोश दिलेला आहे.

ग्रंथालयाचे नांव : आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी.

गावस्कर नोंद : नाही.

मोरजे नोंद : ९५.

नोंद क्रमांक : १६

लेखकाचे नांव : सोमवंशी हरि के.

शीर्षक : रसायनशास्त्र विषयक संवाद (भाषांतर)

प्रकाशक : शिक्षा मंडळी आर.प्रेस छापखाना. प्रकाशन स्थळ : मुंबई.

प्रकाशन वर्ष : –. शके:१७५८. इ.स.:१८३७(शिळाछाप)पृष्ठ संख्या :२+१५+४७८

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : ८ रूपये

महत्त्वाचा मजकूर : रसायनशास्त्र गुरूशिष्य संवाद रूपाने रसायनशास्त्राची तपशीलवार चर्चा एकूण २५ संवाद. या ग्रंथात वाफेचे यंत्र, उष्णता, ऑक्सिजन, नायट्रोजन धातू, हायड्रोजन इ. अनेक विषयाची माहिती.

ग्रंथालयाचे नांव : सार्वजनिक वाचनालय, बार्शी.

गावस्कर नोंद : ५६.

मोरजे नोंद : २२२.

नोंद क्रमांक : १७

लेखकाचे नांव : दुगल रामचंद्र अमृत

शीर्षक : जागती जोत

प्रकाशक : मुद्रणालयाची नोंद नाही. प्रकाशन स्थळ : नाशिक.

प्रकाशन वर्ष : –. शके : १७५९. इ.स. : १८३८(शिळाछाप) पृष्ठ संख्या : ६०

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : ऊस, बटाटे, शेतकी इ. पदार्थांची लागवड शेतीचे व्यवहार वगैरे विषयावर संवादात्मक विवेचन. शेतकऱ्याच्या मुलांनी शिक्षण घेतले पाहिजे.

ग्रंथालयाचे नांव : नगर वाचन मंदिर, पंढरपूर.

गावस्कर नोंद : ५८.

मोरजे नोंद : २३०.

नोंद क्रमांक : १८

लेखकाचे नांव : दुगल रामचंद्र अमृत

शीर्षक : जागती जोत

प्रकाशक : मुद्रणालयाचा उल्लेख नाही. प्रकाशन स्थळ : नाशिक

प्रकाशन वर्ष : १८३८. शके : १७५९. इ.स. : १८३८ पृष्ठ संख्या : ६०.

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : शेतकी, ऊस, बटाटे इत्यादी पदार्थांची लागवड कशी करावी, शेतीचे व्यवहार याचे विवेचन, शेतकऱ्याच्या मुलांनी शिक्षण घेतले पाहिजे, त्यांना लिहिता वाचता आले पाहिजे याविषयी माहिती दिली आहे.

ग्रंथालयाचे नांव : आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी.

गावस्कर नोंद : नाही.

मोरजे नोंद : २३०.

नोंद क्रमांक : १९

लेखकाचे नांव : निळोबा महाराज

शीर्षक : अभंग–१ (श्री निळोबारायकृत अभंग)

प्रकाशक : – प्रकाशन स्थळ : पुणे

प्रकाशन वर्ष : –. शके : १७५९. इ.स. :१८३८ पृष्ठ संख्या : २९४.

दाखल अंक (Call No.) : ४८७५. बोधांक (Call No.) : ८९१.४६१ किंमत : २ रू.

महत्त्वाचा मजकूर : या पुस्तकाची पुढील पाने फाटलेली आहेत. या पुस्तकात एकूण १५४९ अभंग लिहिलेले आहेत. सुरूवातीला चांगदेवाचे चरित्राने प्रारंभ केलेला आहे. ज्ञानेश्वरांना वंदन करून पुढील अभंगास सुरूवात केलेली आहे. पुस्तकाची रचना मुळाक्षराप्रमाणे केलेली आहे.

ग्रंथालयाचे नांव : करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर.

नोंद क्रमांक : २०

लेखकाचे नांव : हरि केशवजी

शीर्षक : इंग्लंडचा वृत्तांत

प्रकाशक : गणपत कृष्णाजी छापखाना प्रकाशन स्थळ : मुंबई.

प्रकाशन वर्ष : १८३८. शके : १७५९. इ.स. :१८३८ पृष्ठ संख्या : २८२.

दाखल अंक(Call No.) :१४७७९. बोधांक(Call No.):९२९.९९ ढ.३८ किंमत:रू.१.७५ पैसे

महत्त्वाचा मजकूर : हा ग्रंथ इंग्रजीचे मराठीत भाषांतर केलेला आहे. इ.स.१०६६ पासून १८२९ पर्यंत इंग्लंड देशात कोणकोणते राजे व राणी झाल्यात व त्यांनी किंती वर्षे राज्य केले याची माहिती सांगितली आहे.

ग्रंथालयाचे नांव : करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर.

गावस्कर नोंद : नाही.

मोरजे नोंद : २४७.

नोंद क्रमांक : २१

लेखकाचे नांव : गणोबा पांडुरंग

शीर्षक : सृष्टिजन्य ईश्वरज्ञान (भाषांतर)

प्रकाशक : गणपत कृष्णाजी छापखाना प्रकाशन स्थळ : मुंबई.

प्रकाशन वर्ष : –. शके : १७६३. इ.स. : १८४२ (शिळाछाप) पृष्ठ संख्या : ३४९.

दाखल अंक(Call No.):१४४८७. बोधांक(Call No.):५००.५९९ढ.४२ किंमत:रू.२.५० पैसे

महत्त्वाचा मजकूर : मानवाच्या शरीराची माहिती सांगितलेली आहे. कौशल्य, कल्पना, संकेत, वाफेचे गलबन, स्कंध स्नायू, स्निग्धरस, स्नायूचे अकुंचन, प्रसरण, शरीराच्या अवयवाचे यथायोग्य निरंतर मुखाचा ज्ञानरज्जू डोळा, मधमाशीची नांगी, पतंग याची माहिती दिली आहे. सूर्य, पृथ्वी, चंद्र आणि तारा यांचे वर्णन, ईश्वराची आश्चर्यकारक शक्ती तसेच आकाशातील नक्षत्राचे महत्व याची माहिती मांडलेली आहे.

ग्रंथालयाचे नांव : करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर.

गावस्कर नोंद : ९१.

मोरजे नोंद : २९४.

नोंद क्रमांक : २२

लेखकाचे नांव : गोडबोले परशरामपंत

शीर्षक : सरळरेघ त्रिकोणमिती

प्रकाशक : पाठशाळावाडा विश्रामबाग प्रकाशन स्थळ : पुणे

प्रकाशन वर्ष : –. शके : १७६६. इ.स. : १८४५ पृष्ठ संख्या : ३२.

दाखल अंक (Call No.) : १४४८४. बोधांक (Call No.) : –. किंमत : २ रू.

महत्त्वाचा मजकूर : सरळ रेघ, त्रिकोणमिती, सरळ रेघ, त्रिकोणाच्या बाजू आणि कोन यांचे गुण आणि हिशोब दाखविले, वर्तुळ, भूमिती, कोनबिंदू यांची माहिती सांगितलेली आहे. शेवटी लॉगॅरिथमचे टेबल दिलेले आहे.

ग्रंथालयाचे नांव : करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर

गावस्कर नोंद : ११५.

मोरजे नोंद : ३५५.

नोंद क्रमांक : २३

लेखकाचे नांव : हरि केशवजी

शीर्षक : शालोपयोगी नीतिग्रंथ (भाषांतर)

प्रकाशक : गणपत कृष्णाजी छापखाना प्रकाशन स्थळ : मुंबई.

प्रकाशन वर्ष : –. शके : १७६७. इ.स. : १८४६ पृष्ठ संख्या : १०+२२६+१.

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : सभ्यपणा मिताहार परोपकारी बुध्दी इ. विषयक उदाहरणासह माहिती दिली आहे.

ग्रंथालयाचे नांव : नगर वाचन मंदिर, पंढरपूर

गावस्कर नोंद : १२७.

मोरजे नोंद : ३८१.

नोंद क्रमांक : २४

लेखकाचे नांव : भावे वासुदेव कृष्ण

शीर्षक : तुर्कांचे साम्राज्य

प्रकाशक : लोकसंग्रह छापखाना प्रकाशन स्थळ : बुधवार पेठ, पुणे.

प्रकाशन वर्ष : १८४७. शके : १७६८. इ.स. : १८४७ पृष्ठ संख्या : ३१६.

दाखल अंक (Call No.) : १६३७–ए६–१–३. बोधांक (Call No.) : –. किंमत : २ रू.

महत्त्वाचा मजकूर : पूर्व युरोप व पश्चिम आशिया खंड यात उस्मानाच्या तुर्की सत्तेची उत्पत्ति व वृध्दि कशी झाली. तसेच राजकीय, धार्मिक व सामाजिक स्थिती समजावून घेणे आवश्यक आहे. इ.स.२८४ पासून रोमन बादशाहा डायोक्लेशियन याने राज्यकारभारारया सोयीसाठी रोमन

साम्राज्याचे पूर्व व पश्चिम असे दोन भाग पाडले . ख्रिस्ती धर्मास राजाश्रय व स्थैर्य मिळवून दिले. तुर्कपूर्व परिस्थिती, तुर्काचा ऱ्हासकाळ, तरूण तर्क व राज्यक्रांति, तरूण तर्क व महायुध्द, तहाची वाटाघाट, दोन चरित्रे, केमालपाशा, अनवरपाशा, इस्लामी धर्म व खिलाफत, समाज रचना, बारा जाती यांचे वर्णन सांगितलेले आहे.

ग्रंथालयाचे नांव : श्रीमंत गंगामाई वाचन मंदिर, आजरा.

नोंद क्रमांक : २५

लेखकाचे नांव : मंडलीक विश्वनाथ नारायण

शीर्षक : हिंदुस्थानचा इतिहास

प्रकाशक : तत्वविवेचक छापखाना प्रकाशन स्थळ : –

प्रकाशन वर्ष : १८४७. शके : १७६८. इ.स. :१८४७ पृष्ठ संख्या : ३३१.

दाखल अंक(Call No.) : –. बोधांक(Call No.) : – किंमत : १ रूपया

महत्त्वाचा मजकूर : –

ग्रंथालयाचे नांव : महात्मा गांधी वाचनालय, कागल.

नोंद क्रमांक : २६

लेखकाचे नांव : केपन डेव्हीड

शीर्षक : बखर मराठ्यांची (भाषांतर)

प्रकाशक : परशराम बल्लाळ छापखाना प्रकाशन स्थळ : पुणे

प्रकाशन वर्ष : –. शके :१७६८. इ.स.: १८४७ पृष्ठ संख्या :२४+३४० (शिळाछाप)

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राचा इतिहास सांगितलेला आहे. कॅडीचे सहाय्य झालेचा उल्लेख आहे. शेवटी शालिवाहन शकाचे इंग्रजी अंकात रूपांतर कसे करावे.

ग्रंथालयाचे नांव : सार्वजनिक वाचनालय, बार्शी

गावस्कर नोंद : १३०.

मोरजे नोंद : नाही.

नोंद क्रमांक : २७

लेखकाचे नांव : जर्विस जॉर्ज

शीर्षक : बीजगणित (भाषांतर)

प्रकाशक : सरकारी शाळेचा छापखाना प्रकाशन स्थळ : पुणे.

प्रकाशन वर्ष : –. शके : १७६९. इ.स.: १८४८(शिळाछाप) पृष्ठ संख्या : २+२७०.

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : –

ग्रंथालयाचे नांव : सार्वजनिक वाचनालय, बार्शी.

गावस्कर नोंद : १४७.

मोरजे नोंद : ४३०.

नोंद क्रमांक : २८

लेखकाचे नांव : कोल्हटकर महादेव गोविंदशास्त्री

शीर्षक : कोलम्बसाचा वृत्तांत

प्रकाशक : अमेरिकन मिशन छापखाना प्रकाशन स्थळ : मुंबई.

प्रकाशन वर्ष : १८४९. शके : १७७१. इ.स. : १८४९ पृष्ठ संख्या : १७८.

दाखल अंक (Call No.): १४६६१. बोधांक (Call No.): ९२० ढ२९. किंमत : १ रू. ५० पै.

महत्त्वाचा मजकूर : पोर्तुगीजांनी नवीन देश शोधून काढले. या किर्तीस भुलून अन्य देशांचे लोक त्याच्या चाकरीस राहिले होते. त्यात ख्रिस्तोफर कोलोन अथवा कोलम्बस म्हणून एक पुरूष होता. कोलम्बसच्या वडीलांनी आपल्या निर्वाहाकरीता सफरी लोकांचे काम पत्करले होते. हिंदुस्थानातील जवळचा मार्ग कोलम्बसाने शोधून काढला आहे.

ग्रंथालयाचे नांव : करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर.

गावस्कर नोंद : १६५.

मोरजे नोंद : ४६८.

नोंद क्रमांक : २९

लेखकाचे नांव : चापेकर नारायण गोविंद

शीर्षक : एडमंड बर्कचे चरित्र

प्रकाशक : आर्य संस्कृति मुद्रणालय प्रकाशन स्थळ : –

प्रकाशन वर्ष : १८४९. शके : १७७०. इ.स. : १८४९ पृष्ठ संख्या : २०८.

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : एक रूपया.

महत्त्वाचा मजकूर : –

ग्रंथालयाचे नांव : महात्मा गांधी वाचनालय, कागल.

नोंद क्रमांक : ३०

लेखकाचे नांव : जोशी लक्ष्मणशास्त्री

शीर्षक : आनंद मीमांसा

प्रकाशक : चिटणीस पाज्ञ पाठशाळा मंडळ प्रकाशन स्थळ : वाई.

प्रकाशन वर्ष : १८५०. शके : १७५१. इ.स. : १८५० पृष्ठ संख्या : ६८.

दाखल अंक (Call No.): ६३९६. बोधांक (Call No.):१००–१९९ थ–२८.किंमत: ३७ पैसे

महत्त्वाचा मजकूर : दु:ख मीमांसा व आनंद मीमांसा याची तुलना सांगितलेली आहे. अहिंसा ब्रह्मचर्यादिरूप, नितीच्या एकांगाची स्थापना, प्रपंच पोषक व समाजधारक पूर्ण नीतीची स्थापना, संन्यास वादास प्राधान्य येते. कर्मयोगास वैशिष्ठ्य येते. मठ संस्थापक, कर्मयोगी, कुटूंब जाती, समाज राज्यमठ यांची स्थापना, भारतीय धर्मशास्त्राचे आनंद सिध्दांताशी कसे सुसंगत आहे हे लेखकास दाखवायचे आहे.

ग्रंथालयाचे नांव : करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर

नोंद क्रमांक : ३१

लेखकाचे नांव : ठकार नारो रामचंद्र

शीर्षक : इंग्लंड देशाची बखर भाग–१ (भाषांतर)

प्रकाशक : पाठशाळा विश्रामबाग छापखाना प्रकाशन स्थळ : पुणे.

प्रकाशन वर्ष : १८५०. शके : १७७२. इ.स. : १८५० पृष्ठ संख्या : २६८.

दाखल अंक (Call No.) : १४७८१. बोधांक (Call No.) : ९२९.९९ किंमत : रू.२.७५ पै.

महत्त्वाचा मजकूर : ज्युलियस सीझर रोमन लोकांचा राजा याचे चढायापासून रोमन लोकांनी ब्रिटन बेट सोडल्यापासूनच्या कथा या पुस्तकात लिहिलेल्या आहेत.

ग्रंथालयाचे नांव : करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर

गावस्कर नोंद : १८२.

मोरजे नोंद : ५०९.

नोंद क्रमांक : ३२

लेखकाचे नांव : थॉमस कॅंडी

शीर्षक : वाचन पाठमाला (भाषांतर)

प्रकाशक : नारो रामचंद्र ठकार प्रकाशन स्थळ : पुणे.

प्रकाशन वर्ष : १८५०(शिळाछाप).शके:१७७१. इ.स.:१८५० पृष्ठ संख्या:१५+२९६

दाखल अंक (Call No.) : ३१३. बोधांक (Call No.) : –. किंमत : दोन आणा

महत्त्वाचा मजकूर : इंग्रजी पुस्तकातील गोष्टीचे मराठी भाषांतर करून मराठी लोकास वाचण्याकरीता ६६ गोष्टींचे मराठीत भाषांतर केलेले आहे. मराठी शाळेतील मुलांना समजण्यासाठी लिहिलेली होती. मुलास उपदेश, मानवी कुटूंब, मनुष्य जातीचे इंद्रीय, चांगला विद्यार्थी, युरोप खंडातील चार ऋतूंचे वर्णन इ. कथांचे मराठीत भाषांतर केलेले आहे.

ग्रंथालयाचे नांव : श्री शाहू वाचनालय, गारगोटी

गावस्कर नोंद : १७९.

मोरजे नोंद : ५०३.

नोंद क्रमांक : ३३

लेखकाचे नांव : अष्टपुत्रे भाऊशास्त्री

शीर्षक : गायन प्रकाशन

प्रकाशक : ज्ञानप्रकाशन छापखाना प्रकाशन स्थळ : पुणे

प्रकाशन वर्ष : –. शके:१७७१. इ.स.: १८५०(शिळाछाप) पृष्ठ संख्या : १६+११३.

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : गायनातील स्वर, राग, परिभाषा इत्यादीविषयी संगीत रत्नाकर, संगीत दर्पण, इत्यादी संस्कृत, प्राकृत ग्रंथाद्वारे शास्त्रीय विवेचन केलेले आहे. संस्कृत श्लोक व मराठीची चित्रे दिलेली आहेत.

ग्रंथालयाचे नांव : सार्वजनिक वाचनालय, बार्शी

गावस्कर नोंद : १७८.

मोरजे नोंद : ४९९.

नोंद क्रमांक : ३४

लेखकाचे नांव : शेणवी गोविंद नारायण

शीर्षक : ऋणनिषेधक बोध

प्रकाशक : गोविंद नारायण शेणवी प्रकाशन स्थळ : मुंबई.

प्रकाशन वर्ष : १८५० (शिळाछाप). शके:१७७१. इ.स.:१८५० पृष्ठ संख्या: २+७०.

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : कर्ज कां होते, ते कसे निवारावे या विषयीचा उपदेश.

ग्रंथालयाचे नांव : नगर वाचन मंदिर, कसबे डिग्रज.

गावस्कर नोंद : १९५.

मोरजे नोंद : ५४२.

नोंद क्रमांक : ३५

लेखकाचे नांव : रानडे कृष्णाजी त्रिंबक

शीर्षक : भरतखंड पर्व

प्रकाशक : ज्ञान प्रकाशक छापखाना प्रकाशन स्थळ : पुणे

प्रकाशन वर्ष : १८५१. शके : १७७३. इ.स. : १८५१ पृष्ठ संख्या : ५६.

दाखल अंक (Call No.) : १४६००. बोधांक (Call No.) : ९५४. किंमत : ६२ पैसे.

महत्त्वाचा मजकूर : इतिहासाची व्यवस्था करण्याकरीता तीन कालसंज्ञा मानल्या आहेत. १) पवित्र, २) प्राचिन, ३) अर्वाचीन. पहिल्या काळात पुराणातील कथा, दुसऱ्यात कलियुगाचे आरंभापासून मुसलमानांच्या संचारापर्यंत वर्णन केले. तिसऱ्या काळात मुसलमान लोक आल्यापासून म्हणजे ११०० शालीवहन शकापासून इतिहास लिहिलेला आहे. त्या इतिहासाचा संग्रह केला आहे. त्यास अर्वाचीन इतिहास म्हणावे.

ग्रंथालयाचे नांव : करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर

नोंद क्रमांक : ३६

लेखकाचे नांव : बी.टी.बी.एस.

शीर्षक : रोम बादशाचा वृत्तांत

प्रकाशक : अमेरिकन मिशन छापखाना प्रकाशन स्थळ : मुंबई.

प्रकाशन वर्ष : –. शके : १७७२. इ.स. : १८५१ पृष्ठ संख्या : ६+२०५.

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : रोमन बादशहाचा सविस्तर जीवन वृत्तांत दिला आहे. ज्युलियस सिझर पासून त्रेजनपर्यंत चौदा राज्यांची माहिती सांगितली आहे.

ग्रंथालयाचे नांव : श्री छत्रपती प्रतापसिंह नगर वाचनालय, सातारा.

गावस्कर नोंद : २२१.

मोरजे नोंद : ५९४.

नोंद क्रमांक : ३७

लेखकाचे नांव : लोकहितवादी

शीर्षक : खोटी शपथ देऊ नये

प्रकाशक : ज्ञान प्रकाशन छापखाना प्रकाशन स्थळ : पुणे.

प्रकाशन वर्ष : –. शके : १७७२. इ.स.: १८५१ (शिळाछाप) पृष्ठ संख्या : २+३०

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : १ रूपया

महत्त्वाचा मजकूर : –

ग्रंथालयाचे नांव : सार्वजनिक वाचनालय, बार्शी

गावस्कर नोंद : २१०.

मोरजे नोंद : ५७३.

नोंद क्रमांक : ३८

लेखकाचे नांव : फरार मिसेस

शीर्षक : बाळबोध गोष्टी (आवृत्ती ३ री)

प्रकाशक : सरकारी पाठशाळेचा छापखाना प्रकाशन स्थळ : पुणे.

प्रकाशन वर्ष : –. शके : १७७२. इ.स.: १८५१ (शिळाछाप) पृष्ठ संख्या : ४+९१

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : मुलासाठी गोष्टीच्या आरंभी गोष्टीतील जोडाक्षरे वेगळी दिलेली आहेत.

वानर, हत्ती, कुत्रा इ. प्राण्यांची माहिती दिलेली आहे.

ग्रंथालयाचे नांव : श्रीमंत शहाजीराजे भोसले वाचनालय, अक्कलकोट

गावस्कर नोंद : २१६.

मोरजे नोंद : ५८१.

नोंद क्रमांक : ३९

लेखकाचे नांव : जर्विस जॉर्ज मेहरबान

शीर्षक : अंकगणित दुसरा भाग अपूर्णांक

प्रकाशक : नारो रामचंद्र ठकार प्रकाशन स्थळ : पुणे.

प्रकाशन वर्ष : –. शके : १७७३. इ.स. : १८५२ पृष्ठ संख्या : २०९.

दाखल अंक (Call No.):१४४८६.बोधांक (Call No.): ५१०.५१९ ढ–५२ किंमत: २ रूपये.

महत्त्वाचा मजकूर : या पुस्तकामध्ये गणित आणि बीजगणित यामध्ये दाखविणारी चिन्हे आहेत. वजाबाकी, गुणाकार, भागाकार, त्रेराशिक, दशांश अपूर्णांक, दशांश रूपभेद, वर्गमुळ काढणे, घनमुळ काढणे, चक्रवाढ व्याज, गणितातील कामाचे प्रश्न इत्यादी मांडण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला आहे.

ग्रंथालयाचे नांव : करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर

गावस्कर नोंद : २३३.

मोरजे नोंद : ६३४.

नोंद क्रमांक : ४०

लेखकाचे नांव : क्षीरसागर शंकर धोंडो

शीर्षक : गोमांतक शुध्दीचा इतिहास

प्रकाशक : मुंबई प्रेस प्रकाशन स्थळ : मुंबई.

प्रकाशन वर्ष : १८५२. शके : १७७३. इ.स. : १८५२ पृष्ठ संख्या : ३००.

दाखल अंक (Call No.) : २११०३. बोधांक (Call No.) : –. किंमत : रू.३.५० पैसे

महत्त्वाचा मजकूर : ग्रंथामध्ये गोमांतक शुध्दीचा इतिहास सांगण्यामध्ये आर्य संस्कृती हिंदू सनातनत्व गोमांताचा इतिहास, धार्मिक मुक्तीचे प्रयत्न याबद्दल माहिती आहे.

ग्रंथालयाचे नांव : आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी.

नोंद क्रमांक : ४१

लेखकाचे नांव : गाडगीळ हरी रघुनाथ

शीर्षक : जगाचा संक्षिप्त इतिहास भाग–१ (भाषांतर)

प्रकाशक : अमेरिकन मिशन छापखाना प्रकाशन स्थळ : मुंबई

प्रकाशन वर्ष : –. शके : १७७३. इ.स.: १८५२ पृष्ठ संख्या : ८+१८८

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : जगाच्या उत्पत्तीपासून मॅसिडनची बादशाही नष्ट झाली. तोपर्यंतचा इतिहास सांगितला आहे. तसेच इतिहास चार काळामध्ये सांगितला आहे. चिपळूणकरांनी भाषांतर तपासले नाही.

ग्रंथालयाचे नांव : श्री छत्रपती प्रतापसिंह नगर वाचनालय, सातारा.

गावस्कर नोंद : २२५.

मोरजे नोंद : ६२४.

नोंद क्रमांक : ४२

लेखकाचे नांव : चिपळूणकर कृष्णाशास्त्री

शीर्षक : सॉक्रेटीस चरित्र (भाषांतर)

प्रकाशक : ज्ञानप्रकाशन छापखाना प्रकाशन स्थळ : पुणे

प्रकाशन वर्ष : –. शके : १७५३. इ.स.: १८५२ पृष्ठ संख्या : ६+१३०

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : सॉक्रेटीसचे चरित्र १ ते ७ अध्ययात सांगितले आहे. सॉक्रेटीसच्या गुणाविषयी वाचकांच्या मते प्रिती निर्माण व्हावी या हेतूने हे चरित्र लिहिले.

ग्रंथालयाचे नांव : श्री छत्रपती प्रतापसिंह नगर वाचनालय, सातारा.

गावस्कर नोंद : २२९.

मोरजे नोंद : ६२८.

नोंद क्रमांक : ४३

लेखकाचे नांव : –

शीर्षक : इंग्लंड देशाची बखर भाग–२

प्रकाशक : नारो रामचंद्र ठकार प्रकाशन स्थळ : पुणे

प्रकाशन वर्ष : १८५२. शके : १७५३. इ.स.: १८५२ पृष्ठ संख्या : ४+२५८

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : –

ग्रंथालयाचे नांव : सार्वजनिक वाचनालय, बार्शी.

गावस्कर नोंद : नाही.

मोरजे नोंद : ६१९.

नोंद क्रमांक : ४४

लेखकाचे नांव : –

शीर्षक : इंग्लंड देशाची बखर भाग–२

प्रकाशक : नारो रामचंद्र ठकार प्रकाशन स्थळ : पुणे

प्रकाशन वर्ष : –. शके : १७७३ (शिळाछाप). इ.स.: १८५२

पृष्ठ संख्या : ४+३६८ (अपूर्ण)

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : –

ग्रंथालयाचे नांव : सार्वजनिक वाचनालय, बार्शी.

गावस्कर नोंद : नाही.

मोरजे नोंद : ६१८.

नोंद क्रमांक : ४५

लेखकाचे नांव : फडके गंगाधर आप्पाशास्त्री

शीर्षक : हिंदू धर्मतत्व

प्रकाशक : मुद्रणाचा उल्लेख नाही. प्रकाशन स्थळ : –

प्रकाशन वर्ष : –. शके : १७७३. इ.स.: १८५२ पृष्ठ संख्या : १७६

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : हिंदू धर्मीयास आपल्या धर्माचा विसर पडला असून इतर धर्मतत्वाशी त्यांचा परिचय होऊ लागल्यामुळे हिंदू धर्म तत्वास मरगळ आली आहे.

ग्रंथालयाचे नांव : श्री हिराचंद नेमचंद वाचनालय, सोलापूर.

गावस्कर नोंद : २३४.

मोरजे नोंद : ६४१.

नोंद क्रमांक : ४६

लेखकाचे नांव : जांभेकर बाळ गंगाधरशास्त्री

शीर्षक : हिंदुस्थानचा इतिहास (भाषांतर)

प्रकाशक : पुणे पाठशाळेकडील छापखाना प्रकाशन स्थळ : पुणे

प्रकाशन वर्ष : –. शके:१७७३. इ.स.:१८५२(शिळाछाप)पृष्ठ संख्या : ६+१९७+८

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : या पुस्तकाची पहिली आवृत्ती प्रसिध्द झाल्यानंतर कॅडी यांच्याकडे तपासणीसाठी पाठविण्यात आली. त्यांनी भाषेविषयक दोष दाखविण्यात आले आहेत.

ग्रंथालयाचे नांव : श्रीमंत शहाजीराजे भोसले वाचनालय, अक्कलकोट.

गावस्कर नोंद : २३१

मोरजे नोंद : ६३२.

नोंद क्रमांक : ४७

लेखकाचे नांव : शास्त्री केशव सखाराम

शीर्षक : इंग्लंड देशाची बखर भाग–१

प्रकाशक : टामस ग्राहाम प्रकाशन स्थळ : टामस ग्राहाम, मुंबई

प्रकाशन वर्ष : १८५२ (शिळाछाप). शके:१७७३. इ.स.:१८५२ पृष्ठ संख्या:४+३६८

दाखल अंक (Call No.) : २०८१३. बोधांक (Call No.) : –. किंमत : १ रूपया.

महत्त्वाचा मजकूर : भारतीय लेखकांनी इंग्लंड देशाविषयीची माहिती दिलेली आहे.

ग्रंथालयाचे नांव : आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी.

गावस्कर नोंद : नाही.

मोरजे नोंद : ६१८.

नोंद क्रमांक : ४८

लेखकाचे नांव : क्यापटन डेविड केपन साहेब

शीर्षक : मराठ्यांचा इतिहास आवृत्ती तिसरी

प्रकाशक : पुणे पाठशाळेकडील छापखाना प्रकाशन स्थळ : पुणे

प्रकाशन वर्ष : १८५३. शके : १७७४. इ.स. : १८५३ पृष्ठ संख्या : ३२८

दाखल अंक (Call No.) : १४७३९. बोधांक (Call No.): ९२९.९९ ढ–५३ किंमत : ३ रू.

महत्त्वाचा मजकूर : पेशव्याने आपला भाऊ रघुनाथराव यांच्याबरोबर फौज देऊन त्याची रवानगी हिंदुस्थानात पाठविले आणि आपण मोठे सैन्य जमा करून कर्नाटककडे पाठविले. पुस्तकाच्या शेवटी इंग्रजी आणि हिंदी महिन्याची माहिती दिली आहे. इंग्रजांच्या इसवीसन निघाल्यापासून पुढे हिंदूंचा शालीवहन शके कोणत्या वर्षी चालू झाला ते व इंग्रजी आणि हिंदी भाषा, महिन्यांची नांवे दिली आहेत.

ग्रंथालयाचे नांव : करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर.

नोंद क्रमांक : ४९

लेखकाचे नांव : रत्नागिरीकर परशुराम आगाशे

शीर्षक : विष्णू सहस्त्रनाम

प्रकाशक : ज्ञानदर्पण प्रकाशन स्थळ : मुंबई

प्रकाशन वर्ष : १८५३. शके : १७७४. इ.स. : १८५३ पृष्ठ संख्या : ६०

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : –

ग्रंथालयाचे नांव : विटा तालुका नगर वाचनालय, विटा.

नोंद क्रमांक : ५०

लेखकाचे नांव : लेले सदाशिव गणेशशास्त्री

शीर्षक : जलपर्यटनाचा वृत्तांत (भाषांतर)

प्रकाशक : पाठशाळेकडील छापखाना प्रकाशन स्थळ : पुणे

प्रकाशन वर्ष : –. शके: १७७४. इ.स. : १८५३ (शिळाछाप) पृष्ठ संख्या:८+१६०३

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : भिन्न भिन्न देशात जे परमविख्यात जलपर्यटन करणारे होऊन गेले, त्यांच्या वृत्तांतावरून कूक यांनी मराठीत भाषांतर केले.

ग्रंथालयाचे नांव : श्री हिराचंद नेमचंद वाचनालय, सोलापूर.

गावस्कर नोंद : नाही.

मोरजे नोंद : ७०६.

नोंद क्रमांक : ५१

लेखकाचे नांव : कोंडो अमृत महाराव

शीर्षक : हत्तीच्या गोष्टी (भाषांतर)

प्रकाशक : ज्ञान प्रकाशन छापखाना प्रकाशन स्थळ : पुणे

प्रकाशन वर्ष : –. शके: १७७४. इ.स. : १८५३ पृष्ठ संख्या : ४ + ११९

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : हत्ती या प्राण्याचे वर्णन आणि त्याला पकडण्याचे आणि माणसाळविण्याचे मार्ग त्याच्यासंबंधी याविषयी माहिती दिलेली आहे.

ग्रंथालयाचे नांव : श्री हिराचंद नेमचंद वाचनालय, सोलापूर.

गावस्कर नोंद : २४६.

मोरजे नोंद : ६७२.

नोंद क्रमांक : ५२

लेखकाचे नांव : पुराणिक, महादेव शास्त्री

शीर्षक : भूगोल विद्येची आणि खगोल विद्येची मुलतत्वे

प्रकाशक : अमेरिकन मिशन छापखाना प्रकाशन स्थळ : मुंबई

प्रकाशन वर्ष : १८५४. शके: १७७५. इ.स. : १८५४ पृष्ठ संख्या : १०+२६९

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : सुलविन यांच्या इंग्रजी ग्रंथाचे मराठीत भाषांतर आहे. मेजर कॅडी यांनी भाषांतर तपासले आहे. या ग्रंथात भूगोल व खगोल विद्येची मुलतत्वे, पृथ्वीचा आकार, गतीची कारणे, नद्या, सरोवरे, नकाशे पाहण्याचे विवेचन केले आहे.

ग्रंथालयाचे नांव : राजर्षी शाहूनगर वाचन मंदिर, शिरोळ

गावस्कर नोंद : २८६.

मोरजे नोंद : ७५८.

नोंद क्रमांक : ५३

लेखकाचे नांव : जांभेकर बालगंगाधर शास्त्री

शीर्षक : हिंदुस्थानातील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास

प्रकाशक : अमेरिकन मिशन प्रेस प्रकाशन स्थळ : मुंबई

प्रकाशन वर्ष : १८५४. शके: १७७५. इ.स. : १८५४ पृष्ठ संख्या : २८+२७४

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : मेजर कॅडीने आवृत्ती सुधारित छापण्यासाठी सुरू केली.

ग्रंथालयाचे नांव : विटा तालुका नगर वाचनालय, विटा

गावस्कर नोंद : २७७.

मोरजे नोंद : ७३६.

नोंद क्रमांक : ५४

लेखकाचे नांव : भाटवडेकर कृष्णशास्त्री

शीर्षक : लोखंडी रस्त्याचे वर्णन (भाषांतर)

प्रकाशक : गणपत कृष्णाजी छापखाना प्रकाशन स्थळ : मुंबई

प्रकाशन वर्ष : –. शके: १७७५. इ.स. : १८५४ पृष्ठ संख्या : ६+६२

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : मुंबईपासून कल्याणपर्यंत रेल्वे रस्ता बांधला. त्यावेळी या विषयावरील ग्रंथ रेल्वे म्हणजे देशाची संपत्ती व शोभा वाढविण्याचे द्वारच होय.

ग्रंथालयाचे नांव : सार्वजनिक वाचनालय, बार्शी

गावस्कर नोंद : २९३.

मोरजे नोंद : ७६६.

नोंद क्रमांक : ५५

लेखकाचे नांव : गोडबोले परशुरामपंत

शीर्षक : नवनीत महाराष्ट्र भाषेतील कवितांचे वेचे

प्रकाशक : पाठशाळेचा छापखाना प्रकाशन स्थळ : पुणे

प्रकाशन वर्ष : –. शके:१७७५. इ.स.: १८५४ (शिळाछाप) पृष्ठ संख्या : ६+४००

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : प्राचीन मराठी कवितेचे निवडक वेचे तयार करण्यास सांगितले. तोच हा काव्यसंग्रह मराठी भाषेतील काव्याची गोडी लागावी हा हेतू तुकाराम नामदेव पंडीत कवी, रामजोशी यांची काव्ये आहेत.

ग्रंथालयाचे नांव : श्री हिराचंद नेमचंद वाचनालय, सोलापूर

गावस्कर नोंद : २७४.

मोरजे नोंद : ७३१.

नोंद क्रमांक : ५६

लेखकाचे नांव : आळतेकर स. खं.

शीर्षक : श्री समर्थ चरित्र

प्रकाशक : – प्रकाशन स्थळ : –

प्रकाशन वर्ष : १८५५. शके: १७७६. इ.स. : १८५५ पृष्ठ संख्या : –

दाखल अंक (Call No.) : ५९३३. बोधांक (Call No.) : –. किंमत : रूपये ५/–

महत्त्वाचा मजकूर : श्री स्वामी समर्थ रामदास चरित्र ग्रंथामध्ये रेखाटले आहे. जीवनातील विविध गोष्टींचा उल्लेख केला आहे.

ग्रंथालयाचे नांव : आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी

नोंद क्रमांक : ५७

लेखकाचे नांव : करंदीकर जनार्दन गंगाधर

शीर्षक : योगाची पूर्तता

प्रकाशक : भक्तीवेदांत बुक ट्रस्ट प्रकाशन स्थळ : –

प्रकाशन वर्ष : –. शके: १७७६. इ.स. : १८५५ पृष्ठ संख्या : ८५

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : योगाविषयी माहिती ग्रंथात दिलेली आहे. ग्रंथ अपूर्ण स्वरूपात आहे.

ग्रंथालयाचे नांव : श्री छत्रपती वाचनालय, सातारा

नोंद क्रमांक : ५८

लेखकाचे नांव : चाफेकर ना. गो.

शीर्षक : बदलापूर

प्रकाशक : आर्य संस्कृती मुद्रणालय प्रकाशन स्थळ : पुणे

प्रकाशन वर्ष : –. शके: १७७६. इ.स. : १८५५ पृष्ठ संख्या : ५०२

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : रूपये ६/–

महत्त्वाचा मजकूर : –

ग्रंथालयाचे नांव : सार्वजनिक वाचनालय, बार्शी

नोंद क्रमांक : ५९

लेखकाचे नांव : दीक्षित सखाराम रामचंद्र

शीर्षक : शास्त्रीय ज्ञान दर्शन (भाषांतर)

प्रकाशक : गणपत कृष्णाजी छापखानाप्रकाशन स्थळ : मुंबई

प्रकाशन वर्ष : –. शके: १७७७. इ.स. : १८५६ पृष्ठ संख्या : २२+२६८+३

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : उष्णता, वीज, वायु इ. सृष्टीतील चमत्कार व त्यांची भिन्न कारणे यांचे २९ प्रकरणात प्रश्नोत्तर रूपाने वर्णन केले आहे.

ग्रंथालयाचे नांव : नगर वाचनालय, कुरूंदवाड.

गावस्कर नोंद : ३५४.

मोरजे नोंद : ८९१.

नोंद क्रमांक : ६०

लेखकाचे नांव : कोल्हटकर महादेवशास्त्री

शीर्षक : कोलंबसाचा वृत्तांत (भाषांतर)

प्रकाशक : गणपत कृष्णाजी छापखानाप्रकाशन स्थळ : मुंबई

प्रकाशन वर्ष : १८५६. शके: १७७७. इ.स. : १८५६ पृष्ठ संख्या : २+१७८

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : १ रूपया

महत्त्वाचा मजकूर : –

ग्रंथालयाचे नांव : विटा तालुका नगर वाचनालय, विटा.

गावस्कर नोंद : ३४२.

मोरजे नोंद : ८७२.

नोंद क्रमांक : ६१

लेखकाचे नांव : चितळे मोरेश्वर श्रीधर

शीर्षक : न्याय विश्वसेतू

प्रकाशक : जगन्मित्र छापखाना प्रकाशन स्थळ : रत्नागिरी

प्रकाशन वर्ष : १८५६. शके: १७७७. इ.स. : १८५६ पृष्ठ संख्या : ५०

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : रू.१.७५ पैसे

महत्त्वाचा मजकूर : –

ग्रंथालयाचे नांव : विटा तालुका नगर वाचनालय, विटा.

गावस्कर नोंद : नाही.

मोरजे नोंद : ८८२.

नोंद क्रमांक : ६२

लेखकाचे नांव : काळे काशिनाथ पंत

शीर्षक : लोकाविषयी संभाषण बैठक चावडी

प्रकाशक : गणपत कृष्णाजी छापखानाप्रकाशन स्थळ : मुंबई

प्रकाशन वर्ष : १८५६. शके: १७७७. इ.स. : १८५६ पृष्ठ संख्या : २४

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : नव्या राजवटीत लोकांनी कसे वागावे याविषयी संवादात्मक उपदेश. जकात भरणे किती आवश्यक आहे याची माहिती दिलेली आहे.

ग्रंथालयाचे नांव : नगर वाचनालय, मंगळवेढा.

गावस्कर नोंद : ३६३.

मोरजे नोंद : ८६९.

नोंद क्रमांक : ६३

लेखकाचे नांव : कॅंडी थॉमस

शीर्षक : नीति बोधकथा

प्रकाशक : सरकारी पाठशाळेचा कारखाना प्रकाशन स्थळ : पुणे

प्रकाशन वर्ष : –. शके: १७७७. इ.स. : १८५६ (शिळाछाप) पृष्ठ संख्या : ४+६०

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : बंगाली भाषेतील ग्रंथाच्या पहिल्या भागाचे मराठी भाषांतर बोधकथा नावाने व दुसऱ्या भागाचे नीतिकथा नावाने प्रसिध्द झाले होते.

ग्रंथालयाचे नांव : श्री हिराचंद नेमचंद वाचनालय, सोलापूर.

गावस्कर नोंद : ३४३.

मोरजे नोंद : ८७०.

नोंद क्रमांक : ६४

लेखकाचे नांव : चौगुले रामजी गणोजी

शीर्षक : रसायनशास्त्र

प्रकाशक : चौगुले यांचा छापखाना प्रकाशन स्थळ : मुंबई

प्रकाशन वर्ष : –. शके: १७७७. इ.स. : १८५६ पृष्ठ संख्या : २४+५५२

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : पृथ्वीतील गुप्तागुप्त पदार्थांची उत्पत्ती, परीक्षा व उपयोग इत्यादींचे विवरण केले आहे.

ग्रंथालयाचे नांव : श्रीमंत शहाजीराजे भोसले, अक्कलकोट

गावस्कर नोंद : ३५१.

मोरजे नोंद : ८८३.

नोंद क्रमांक : ६५

लेखकाचे नांव : फडके गोविंद गंगाधर

शीर्षक : यंत्रशास्त्राची मुळे

प्रकाशक : थॉमस ग्रॅहम छापखाना प्रकाशन स्थळ : मुंबई

प्रकाशन वर्ष : १८५६. शके: १७७७. इ.स. : १८५६ पृष्ठ संख्या : ८+२००

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : –

ग्रंथालयाचे नांव : नगर वाचन मंदिर, कसबे डिग्रज.

गावस्कर नोंद : ३५८.

मोरजे नोंद : ८९८.

नोंद क्रमांक : ६६

लेखकाचे नांव : शास्त्री केशव सखाराम

शीर्षक : इंग्लंड देशाची बखर भाग–२

प्रकाशक : श्री.स.सौ. गंगामाई प्रकाशन स्थळ : मुंबई

प्रकाशन वर्ष : १८५७. शके: १७७८. इ.स. : १८५७ पृष्ठ संख्या : ४+१८९

दाखल अंक (Call No.) : २०५२०. बोधांक (Call No.) : –. किंमत : १ रू.२५ पै.

महत्त्वाचा मजकूर : प्राचिन इंग्रजांचा इंग्लंड देश कसा होता, त्यावेळची राजकीय, धार्मिक परिस्थिती कशी होती, त्याचबरोबर तेव्हाची परकीय आक्रमणे, युध्दे, इतर देशांबरोबरचे संबंध या ग्रंथामध्ये पहावयास मिळतात.

ग्रंथालयाचे नांव : आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी.

गावस्कर नोंद : ३९८.

मोरजे नोंद : ६१९.

नोंद क्रमांक : ६७

लेखकाचे नांव : मोल्सबर्ग जे.टी.

शीर्षक : मराठी आणि इंग्रजी

प्रकाशक : मुंबई एज्युकेशन सोसायटी प्रकाशन स्थळ : मुंबई

प्रकाशन वर्ष : –. शके: १७७८. इ.स. : १८५७ पृष्ठ संख्या : ९२०

दाखल अंक (Call No.) : ३०+६०२. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : अ पासून ज्ञ पर्यंतची अक्षराचे मराठी शब्दाचे इंग्रजीमध्ये रूपांतर केलेले आहे.

ग्रंथालयाचे नांव : नगर वाचनालय, कुरूंदवाड.

गावस्कर नोंद : नाही.

मोरजे नोंद : ९७४.

नोंद क्रमांक : ६८

लेखकाचे नांव : बेंजामण

शीर्षक : बोधसार

प्रकाशक : इंडियन प्रिंटींग प्रकाशन स्थळ : मुंबई

प्रकाशन वर्ष : –. शके: १७७८. इ.स. : १८५७ पृष्ठ संख्या : ६+५१

दाखल अंक (Call No.) : ३१६. बोधांक (Call No.) : –. किंमत : पाच आणे

महत्त्वाचा मजकूर : मुलास कसे वागवावे हे माहित नसल्यामुळे किती वाईट परिणाम घडून येतात ह्याचा क्षणभर विचार केला असता, मनास खेद वाटल्यावाचून राहणार नाही. तर अशा गैरमाहितीमुळे मनुष्य मात्रावर जी आरिष्टे येऊन कोसळतात, त्याच्या निवारणार्थ बोधपर अशा सूचना केलेल्या आहेत.

ग्रंथालयाचे नांव : श्री शाहू वाचनालय, गारगोटी

गावस्कर नोंद : ३९६.

मोरजे नोंद : ९६६.

नोंद क्रमांक : ६९

लेखकाचे नांव : केपन डेव्हीड

शीर्षक : मराठ्याची बखर – उत्तरार्ध

प्रकाशक : टायसेग्रंहाम प्रकाशन स्थळ : मुंबई

प्रकाशन वर्ष : १८५७. शके: १७७८. इ.स. : १८५७ पृष्ठ संख्या : २०+ ३३८

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : –

ग्रंथालयाचे नांव : विटा तालुका नगर वाचनालय, विटा

गावस्कर नोंद : ३७२.

मोरजे नोंद : नाही.

नोंद क्रमांक : ७०

लेखकाचे नांव : गाडगीळ हरी रघुनाथ

शीर्षक : जगाचा संक्षिप्त इतिहास (भाषांतर)

प्रकाशक : थॉमस ग्रॅहम यांचा छापखाना प्रकाशन स्थळ : मुंबई

प्रकाशन वर्ष : – शके: १७७८. इ.स. : १८५७ पृष्ठ संख्या : ६+१४२

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : –

ग्रंथालयाचे नांव : श्री हिराचंद नेमचंद वाचनालय, सोलापूर.

गावस्कर नोंद : ३७४.

मोरजे नोंद : ९३६.

नोंद क्रमांक : ७१

लेखकाचे नांव : गाडगीळ हरी रघुनाथ

शीर्षक : जगाचा संक्षिप्त इतिहास भाग–२ (भाषांतर)

प्रकाशक : थॉमस ग्रॅहम यांचा छापखाना प्रकाशन स्थळ : मुंबई

प्रकाशन वर्ष : – शके: १७७८. इ.स. : १८५७ पृष्ठ संख्या : ६+१४२

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : रोमच्या उत्पत्तीपासून ख्रिस्ती जन्मापर्यंतचा प्राचिन इतिहास नानाशास्त्री आपटे यांनी मुद्रणप्रत तयार केली.

ग्रंथालयाचे नांव : श्री हिराचंद नेमचंद वाचनालय, सोलापूर.

गावस्कर नोंद : ३७४.

मोरजे नोंद : ९३६.

नोंद क्रमांक : ७२

लेखकाचे नांव : मांडे गोविंद रावजी

शीर्षक : न्यायदर्शक

प्रकाशक : ज्ञानदर्पण छापखाना प्रकाशन स्थळ : मुंबई

प्रकाशन वर्ष : – शके:१७७९. इ.स. : १८५८ पृष्ठ संख्या : १२+७६४ (शिळाछाप)

दाखल अंक (Call No.) : ४. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : या पुस्तकामध्ये हुकूम आणि वारसाविषयी धर्मशास्त्र यांचा उपयोग कोणकोणत्या प्रकरणात कशाप्रकारे झाला आहे हे उदाहरण देऊन दर्शविले आहे. तसेच या ग्रंथात कायद्यांचा सारांश, पुरावे, नोंदणी इ. कोर्ट कामांची तपशीलाने माहिती दिलेली आहे.

ग्रंथालयाचे नांव : सानेगुरूजी मोफत वाचनालय, गडहिंग्लज.

गावस्कर नोंद : ४३२.

मोरजे नोंद : नाही.

नोंद क्रमांक : ७३

लेखकाचे नांव : भागवत भास्कर हरी

शीर्षक : राजाराम मोहन रॉय यांचे चरित्र

प्रकाशक : गणपत कृष्णाजीचा छापखाना प्रकाशन स्थळ : मुंबई

प्रकाशन वर्ष : – शके : १७७९. इ.स. : १८५८ पृष्ठ संख्या : ४+६८

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : कलकत्ता रेव्ह्यू या इंग्रजी त्रैमासिकातील बहुतेक मजकुरांचे भाषांतर होय. या ग्रंथात राजाराम मोहन रॉय यांचा व्यक्तित्व व कार्याविषयी लिहिलेली माहिती इतरांनी वाचावी व त्यातून काही तरी बोध घ्यावा असे लेखकाने सांगितले आहे.

ग्रंथालयाचे नांव : राजर्षी शाहू नगर वाचन मंदिर, शिरोळ.

गावस्कर नोंद : ४२५.

मोरजे नोंद : १०३९.

नोंद क्रमांक : ७४

लेखकाचे नांव : मांडे गोविंद रावजी

शीर्षक : न्यायदर्शक

प्रकाशक : ज्ञानदर्पण छापखाना प्रकाशन स्थळ : मुंबई

प्रकाशन वर्ष : – शके:१७८०. इ.स. : १८५८ पृष्ठ संख्या : १२+७६४ (शिळाछाप)

दाखल अंक (Call No.) : २८५४. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : कायदे व ॲक्ट व सदर दिवाणी अदालतीचे हुकूम आणि वारसा विषयी धर्मशास्त्र यांचा उपयोग कोणकोणत्या प्रकरणात कसा होतो हे उदाहरणासह दर्शविले आहे. फौजदारी काम चालविण्यास अंमलदार व अधिकारी नेमणे व त्यांचे कामाची रीत, गुन्हे न होऊ देण्याचा बंदोबस्त ठेवणे व गुन्हेगारास धरणे इ. विषयीची माहिती दिलेली आहे.

ग्रंथालयाचे नांव : श्री शाहू वाचनालय, गारगोटी.

गावस्कर नोंद : ४३२.

मोरजे नोंद : नाही.

नोंद क्रमांक : ७५

लेखकाचे नांव : माधवराव, श्रीधर

शीर्षक : लग्न प्रकरणी संवाद

प्रकाशक : गणपत कृष्णाजी छापखानाप्रकाशन स्थळ : मुंबई

प्रकाशन वर्ष : – शके: १७८०. इ.स. : १८५९ पृष्ठ संख्या : ६३

दाखल अंक (Call No.) : १३. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : क्षत्रिय जातीमधील लग्नविधी संबंधी विविध गोष्टींचा उल्लेख केलेला आहे व सुधारणावादी विचार संवाद रूपाने मांडलेला आहे. आतील पृष्ठावर विवाह प्रकरणी संवाद असे उपशीर्षक दिलेले आहे.

ग्रंथालयाचे नांव : सानेगुरूजी मोफत वाचनालय, गडहिंग्लज.

गावस्कर नोंद : नोंद नाही.

मोरजे नोंद : १०९९.

नोंद क्रमांक : ७६

लेखकाचे नांव : ब्रह्मचारी विष्णूबाबा

शीर्षक : वेदोक्त धर्म प्रकाशन

प्रकाशक : गणपत कृष्णार्जीचा छापखाना प्रकाशन स्थळ : मुंबई

प्रकाशन वर्ष : – शके: १७८०. इ.स. : १८५९ पृष्ठ संख्या : २+७९०

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : ३ रूपये

महत्त्वाचा मजकूर : तत्वज्ञाना विषयीचा ग्रंथ आहे. वेद धर्म सर्व लोकांना कळावा या हेतूने धर्मविषयक गोष्टींची चर्चा, प्रश्न व उत्तरे या पध्दतीने केली आहे. शेवटी पद्य प्रकरण आहे.

ग्रंथालयाचे नांव : नगरपालिका नगर वाचनालय, कराड, जि.सातारा.

गावस्कर नोंद : ४६६.

मोरजे नोंद : नाही.

नोंद क्रमांक : ७७

लेखकाचे नांव : पंडित विष्णू परशरामशास्त्री

शीर्षक : नाना फडणवीस यांची संक्षिप्त बखर

प्रकाशक : थॉमस ग्रॅहम यांचा छापखाना प्रकाशन स्थळ : मुंबई

प्रकाशन वर्ष : – शके: १७८०. इ.स. : १८५९ पृष्ठ संख्या : ८४

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : –

महत्त्वाचा मजकूर : मॅकडोनेल्डने लिहिलेल्या मूळ बखरीचा सोप्या भाषेत संक्षेप घटनांचे निर्देश तारखा दिलेल्या आहेत.

ग्रंथालयाचे नांव : नगर वाचन मंदिर, पंढरपूर.

गावस्कर नोंद : ४५०.

मोरजे नोंद : १०८७.

नोंद क्रमांक : ७८

लेखकाचे नांव : भास्कर दामोदर

शीर्षक : मराठी पद्यरचना

प्रकाशक : गणपत कृष्णाजी छापखानाप्रकाशन स्थळ : मुंबई

प्रकाशन वर्ष : १८६० शके: १७८१. इ.स. : १८६० पृष्ठ संख्या : ४+७२

दाखल अंक (Call No.) : २१. बोधांक (Call No.) : –. किंमत : ४ आणे

महत्त्वाचा मजकूर : या ग्रंथात मराठी कवीचे चरित्रात्मक वर्णन केलेले आहे. यामध्ये प्रामुख्याने मराठी क्रमाची संपूर्ण माहिती व मुकुंदराज ज्ञानदेव इत्यादी कवींच्या चरित्रांचा समावेश आढळतो.

ग्रंथालयाचे नांव : सानेगुरूजी मोफत वाचनालय, गडहिंग्लज.

गावस्कर नोंद : ५०२.

मोरजे नोंद : ११८२.

नोंद क्रमांक : ७९

लेखकाचे नांव : शास्त्री महादेव गोविंद

शीर्षक : प्राकृत कवितेचे पहिले पुस्तक पद्य (भाषांतर)

प्रकाशक : ज्ञानप्रकाश छापखाना प्रकाशन स्थळ : पुणे

प्रकाशन वर्ष : – शके: १७८१. इ.स. : १८६० पृष्ठ संख्या : २+६+१+१०२

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : ५ आणे

महत्त्वाचा मजकूर : सदर पुस्तक हे शाळेतील मुलांकरीता असून यामध्ये मुलांच्यासाठी कविता दिल्या आहेत. कविता बालबोध करावयाच्या आहेत. तितक्या करण्याचा प्रयत्न ग्रंथात केलेला आहे.

ग्रंथालयाचे नांव : राजर्षी शाहूनगर वाचन मंदिर, शिरोळ.

गावस्कर नोंद : ५०७.

मोरजे नोंद : नाही.

नोंद क्रमांक : ८०

लेखकाचे नांव : छत्रे केरो लक्ष्मण

शीर्षक : ग्रह साधनांची कोष्टके

प्रकाशक : गणपत कृष्णाजीचा छापखाना प्रकाशन स्थळ : मुंबई

प्रकाशन वर्ष : – शके: १७८१. इ.स. : १८६० पृष्ठ संख्या : १८+३३१+१

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : ३ रूपये

महत्त्वाचा मजकूर : या ग्रंथात पंचग्रहाची कोष्टके दिली असून व वास्तव स्थितीचे गणित मांडले आहे. गणित आणि ज्योतिष शास्त्रातील परिभाषिक शब्दांचे ज्ञान गृहीत धरले आहे. युरोपातील गणकांचे ग्रंथ व प्रत्यक्ष वेध यावरून कोष्टके तयार केली आहेत.

ग्रंथालयाचे नांव : राजर्षी शाहूनगर वाचन मंदिर, शिरोळ.

गावस्कर नोंद : ४९०.

मोरजे नोंद : ११४७.

नोंद क्रमांक : ८१

लेखकाचे नांव : छत्रे केरो लक्ष्मण

शीर्षक : ग्रह साधनांची कोष्टके

प्रकाशक : गणपत कृष्णाजीचा छापखाना प्रकाशन स्थळ : मुंबई

प्रकाशन वर्ष : – शके: १७८१. इ.स. : १८६० पृष्ठ संख्या : ३३१

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : ३ रूपये

महत्त्वाचा मजकूर : हा ग्रंथ खगोल शास्त्राविषयी आहे. आपले देश बांधव जे हिंदू लोक यांचेसाठी युरोपातील मोठमोठे गणकाचे ग्रंथ व प्रत्यक्ष वेध यावरून कोष्टके तयार करण्यात आली. यात चंद्र, रवि, मंगळ, पंचग्रह यांची

कोष्टके दिली आहेत. या कोष्टकावरून तिथी करण्याची उदाहरणे दिली आहेत.

ग्रंथालयाचे नांव : नगरपालिका नगर वाचनालय, कराड.

गावस्कर नोंद : ४९०.

मोरजे नोंद : ११४७.

नोंद क्रमांक : ८२

लेखकाचे नांव : कॅंडी थॉमस

शीर्षक : हिंदुस्थानचे वर्णन

प्रकाशक : गणपत कृष्णाजीचा छापखाना प्रकाशन स्थळ : मुंबई

प्रकाशन वर्ष : – शके: १७८१. इ.स. : १८६० पृष्ठ संख्या : १५६

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : ७ आणे

महत्त्वाचा मजकूर : हिंदुस्थानच्या इतिहासाबद्दल माहिती दिली आहे. तसेच हिंदुस्थानातील नद्या, पर्वत, इतिहास, धर्म, राज्यव्यवस्था, लोक, जात, कला, लिपी इत्यादीविषयी वर्णन आहे.

ग्रंथालयाचे नांव : नगरपालिका नगर वाचनालय, कराड.

गावस्कर नोंद : ४८०.

मोरजे नोंद : ११३३.

नोंद क्रमांक : ८३

लेखकाचे नांव : क्षत्री काशिनाथ गंगाधरजी

शीर्षक : राज्य व्यवहार कोश

प्रकाशक : गणपत कृष्णाजीचा छापखाना प्रकाशन स्थळ : मुंबई

प्रकाशन वर्ष : – शके: १७८१. इ.स. : १८६० पृष्ठ संख्या : ४२

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : ७ रूपये

महत्त्वाचा मजकूर : शिवाजी राजाने स्वत: आपल्या मराठी भाषेचे ज्ञान प्रौढ व विद्वान लोकांप्रमाणे बोलता यावे एवढ्याकरीता लिहिला आहे. या कोशात दहा विभाग केले आहेत. राजवर्ग, कार्यस्थान वर्ग, भोगवर्ग, शस्त्रवर्ग, चतुरंग वर्ग, सामंत वर्ग, दुर्गवर्ग, लेखन वर्ग, जनपर वर्ग, पुण्य वर्ग, असंस्कृत शब्दाची सुची दिलेली आहे.

ग्रंथालयाचे नांव : नगरपालिका नगर वाचनालय, कराड.

गावस्कर नोंद : ५२१.

मोरजे नोंद : १२२८.

नोंद क्रमांक : ८४

लेखकाचे नांव : क्षत्री काशिनाथ गंगाधरजी

शीर्षक : राज्य व्यवहार कोश

प्रकाशक : गणपत कृष्णाजीचा छापखाना प्रकाशन स्थळ : मुंबई

प्रकाशन वर्ष : – शके: १७८१. इ.स. : १८६० पृष्ठ संख्या : ४२

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : ७ रूपये

महत्त्वाचा मजकूर : श्री छत्रपती शिवाजीराजे भोसले यांच्या आज्ञेवरून रघुनाथ पंडित यांनी हा कोश रचिला. कालखंड इ.स.१६७५–७६. या कोशात दहा विभाग दिले आहेत.

ग्रंथालयाचे नांव : श्री छत्रपती प्रतापसिंह नगर वाचनालय, सातारा.

गावस्कर नोंद : ५२१.

मोरजे नोंद : १२२८.

नोंद क्रमांक : ८५

लेखकाचे नांव : नारायण भाई

शीर्षक : कथित पाठमाला

प्रकाशक : बॉम्बे एज्युकेशन सोसायटी छापखाना प्रकाशन स्थळ : मुंबई

प्रकाशन वर्ष : – शके: १७८१. इ.स. : १८६० पृष्ठ संख्या : १२२

दाखल अंक (Call No.) : –. बोधांक (Call No.) : –. किंमत : १ रू. ४ आणे.

वरील तक्ता क्र. ४.१७ व आलेख क्र. ४.९ अन्वये स्पष्ट होते की, संशोधनासाठी निवडलेल्या ८० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी २० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये दोलामुद्रिते आढळली. पण या २० ग्रंथालयांपैकी १७ (८५%) ग्रंथालयांमध्ये मराठी दोलामुद्रितांना दाखल अंक देऊन त्यांचे वर्गीकरण केलेले आहे. त्याचबरोबर ही १७ ग्रंथालये संदर्भ सेवा, माहिती सेवा, विस्तार सेवा, रेफरल सेवा व ऑनलाईन सेवाही पुरवतात. ३ (१५%) ग्रंथालयांमध्ये या सेवा पुरविल्या जात नाही. १६ (८०%) ग्रंथालयांनी दोलामुद्रितांचे तालिकीकरण केले आहे व त्यांची देवघेवही केली जाते. उर्वरीत ४ (२०%) ग्रंथालयांमध्ये दोलामुद्रितांचे तालिकीकरण केलेले नाही व त्यांची देवघेवही केली जात नाही.


४.८.५ ग्रंथालयीन सूचना :

तक्ता क्र.४.१८

अ.नं.	सूचना	ग्रंथालय	टक्के %
१.	अपुऱ्या अनुदान/निधीमुळे दर्जेदार सेवा पुरविण्यात अडचणी	८	४०%
२.	अपुऱ्या निधीमुळे दोलामुद्रितांचे जतन व संवर्धन करणेत अडचणी	२	१०%
३.	शासनाने ग्रंथालयांच्या अनुदानात वाढ करावी व वेतनश्रेणी सुरू करावी	१	५%
४.	अपुरा निधी व अपुऱ्या मनुष्यबळामुळे दर्जेदार सेवा पुरविण्यात अडचणी	३	१५%
५.	शासनाने ग्रंथालयांच्या अनुदानात वाढ करावी.	२	१०%
६.	कोणत्याही प्रकारची सूचना नाही	३	१५%

आलेख क्र.४.१०

ग्रंथालयीन सूचना



उपरोक्त तक्ता क्र. ४.१८ व आलेख क्र. ४.१० अन्वये असे निदर्शनास येते की, दोलामुद्रिते आढळलेल्या २० ग्रंथालयांपैकी ८ (४०%) ग्रंथालयांमध्ये कार्यरत असणाऱ्या ग्रंथपालानी अपुऱ्या अनुदान/निधीमुळे दर्जेदार सेवा पुरविण्यात अडचणी येत असल्याचे म्हटले आहे. २ (१०%) ग्रंथालयांना अपुऱ्या निधीमुळे दोलामुद्रितांचे जतन व संरक्षण करण्यात अडचणी येत आहेत. २ (१०%) ग्रंथालयांना शासनाने ग्रंथालयांच्या अनुदानात वाढ करावी व कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी सुरू करावी असे वाटते. ३ (१५%) ग्रंथालयांना अपुरा निधी व अपुऱ्या मनुष्यबळामुळे दर्जेदार सेवा पुरविण्यात अडचणी येतात. २ (१०%) सार्वजनिक ग्रंथालयांनी त्यांच्या अनुदानात वाढ सुचवली आहे. तर उर्वरीत ३ (१५%) ग्रंथालयांनी कोणत्याही प्रकारची सूचना केली नाही.

सारांश

सदर प्रकरणात संशोधकाने संकलित केलेल्या माहितीचे शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण व सादरीकरण करून सदर संशोधनास पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयात आढळलेल्या १६९ मराठी दोलामुद्रितांच्या कालानुक्रमे नोंदी, वर्णनात्मक नोंदी, लेखक सूची, ग्रंथ सूचक नोंदी, मोरजे यांच्या मराठी दोलामुद्रिते सूचीच्या तिसऱ्या आवृत्तीमध्ये समाविष्ट नसलेली दोलामुद्रिते समाविष्ट असलेली दोलामुद्रिते यांचा तुलनात्मक अभ्यास करून ३३ नवीन मराठी दोलामुद्रिते वाचकांसाठी या संशोधनातून उपलब्ध झाली आहेत. संशोधकाने गृहितकांची पडताळणीही केली आहे. संकलित माहितीचे विश्लेषण व सादरीकरणाआधारे पहिले व दुसरे अशी दोन्हीही गृहितके स्विकारली आहेत. संशोधकाने अंतिमत: भविष्यातील संशोधनाचा भविष्यवेध अधोरेखित केला आहे.

प्रकरण पाचवे

निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तावना

प्रस्तुत संशोधन कार्य यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी संशोधकाने संशोधनाच्या उद्दिष्टांवर आधारित माहितीचे संकलन केले आहे आणि त्या माहितीचे सादरीकरण व विश्लेषणावरून स्पष्ट होते की, पश्चिम महाराष्ट्रातील ९९ 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी फक्त २० सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये १६९ मराठी दोलामुद्रिते आढळली आहेत. त्यापैकी १३६ मराठी दोलामुद्रितांची नोंद गावस्कर आणि मोरजे यांच्या मराठी दोलामुद्रितांच्या सूचीत आढळते. पण उर्वरीत ३३ मराठी दोलामुद्रितांची नोंद कोणत्याही सूचीत आढळत नाही. सदरच्या संशोधनामुळे संशोधकाने नवीन ३३ मराठी दोलामुद्रितांचा शोध घेवून ती वाचकांच्या अभ्यासासाठी/वापरासाठी उपलब्ध करून दिली आहेत. त्यामुळे सद्य:स्थितीत संशोधनासाठी संकलित केलेल्या माहितीचे सादरीकरण व शास्त्रीय विश्लेषणा आधारे संशोधकाने निष्कर्ष व शिफारशी खाली नमूद केल्या आहेत.

उद्दिष्टांची पूर्तता :

उद्दिष्ट क्र.१ 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील दोलामुद्रितांच्या सद्य:स्थितीचा शोध घेणे व सूची तयार करणे.

वरील उद्दिष्ट क्र.१ पूर्ण झाले व त्यानुसार निष्कर्ष व शिफारशी खाली नमूद केल्या आहेत.

निष्कर्ष :

१. संशोधकाने संशोधनासाठी निवडलेल्या पश्चिम महाराष्ट्रातील ९९ 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी ८० (८०.८०%) सार्वजनिक ग्रंथालयांनी प्रतिसाद दिलेला आहे. उर्वरीत १९ (१९.२०%) ग्रंथालयांनी प्रश्नावलीस प्रतिसाद दिलेला नाही.

२. पश्चिम महाराष्ट्रातील संशोधनासाठी निवडलेल्या ८० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी २० (२५%) ग्रंथालयामध्ये १६९ मराठी दोलामुद्रिते आढळली. पण ६० (७५%) ग्रंथालयांमध्ये मराठी दोलामुद्रिते आढळली नाहीत.

शिफारशी :

१. संशोधकाने हाती घेतलेले संशोधनासाठी आवश्यक माहिती संकलित करणेसाठी ९९ 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांना प्रश्नावली पाठविली. परंतु फक्त ८० ग्रंथालयातील ग्रंथालयांमध्ये कार्यरत ग्रंथपालांनी प्रतिसाद दिला. उर्वरीत ग्रंथपालांनी आपली मानसिकता बदलून संशोधकास सहकार्य करणे गरजेचे होते. भविष्यात ग्रंथपालांनी आपली कार्यक्षमता वाढवून संशोधकांना संशोधनासाठी आवश्यक माहिती उपलब्ध करून द्यावी.

२. ६० (७५%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांनीही मराठी दोलामुद्रित ग्रंथांचा शोध घ्यावा व दोलामुद्रितांच्या ग्रंथ संग्रहात भर घालावी, जेणेकरून मराठी दोलामुद्रित ग्रंथ संपदा समृध्द व्हावी.

उद्दिष्ट क.२ 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील ग्रंथपाल, कर्मचारी यांच्याकडून दोलामुद्रितांचे जतन व संवर्धन योग्य रितीने होते की नाही याचा शोध घेणे.

वरील उद्दिष्ट क्र.२ पूर्ण झाले व त्यानुसार निष्कर्ष व शिफारशी खाली नमूद केल्या आहेत.

निष्कर्ष :

१. मराठी दोलामुद्रिते आढळलेल्या २० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील १९ (९५%) ग्रंथालयांमध्ये दोलामुद्रित ग्रंथांच्या जतन व संवर्धनासाठी विभाग आहे. १ (५%) ग्रंथालयामध्ये दोलामुद्रित ग्रंथ जतन व संवर्धन विभाग विषयक माहिती उपलब्ध झाली नाही.

२. मराठी दोलामुद्रिते आढळलेल्या २० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी १३ (६५%) दोलामुद्रित ग्रंथ जतन व संवर्धन विषयक प्रशिक्षित कर्मचारी आहेत, तर ६ (३०%) ग्रंथालयांमध्ये प्रशिक्षित कर्मचारी नाहीत. एका (५%) ग्रंथालयाने ही माहिती उपलब्ध करून दिली नाही.

३. मराठी दोलामुद्रित ग्रंथ आढळलेल्या २० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी १७ (८५%) ग्रंथालयांमध्ये दोलामुद्रित ग्रंथांची बांधणी व दुरूस्ती केली जाते. एका (५%) ग्रंथालयात दोलामुद्रित ग्रंथांची बांधणी व दुरूस्ती केली जात नाही तर २ (१०%) ग्रंथालयांनी याविषयी माहिती दिली नाही.

४. १८ (९०%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये दोलामुद्रित ग्रंथांच्या जतन व संवर्धनासाठी यंत्रांचा वापर केला जातो. २ (१०%) ग्रंथालयांनी याविषयी माहिती दिलेली नाही.

५. मराठी दोलामुद्रित ग्रंथ आढळलेल्या २० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी७ (३५%) ग्रंथालयांमध्ये दोलामुद्रित ग्रंथ जतन प्रयोगशाळा आहे. ११ (५५%) अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये अशी प्रयोगशाळा नाही. तर २ (१०%) ग्रंथालयांनी याविषयीची माहिती पुरविली नाही.

६. १५ (७५%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये मराठी दोलामुद्रित ग्रंथांच्या जतन व संवर्धनासाठी धुरी चेंबरची सुविधा आहे. ३ (१५%) ग्रंथालयांमध्ये धुरी चेंबरची सुविधा नाही. २ (१०%) ग्रंथालयांनी याबाबतची माहिती उपलब्ध करून दिली नाही.

७. लॅमिनेशनची सुविधा २० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी १२ (६०%) ग्रंथालयांमध्ये उपलब्ध आहे. ६ (३०%) ग्रंथालयांमध्ये लॅमिनेशनची सुविधा नाही. २ (१०%) ग्रंथालयांनी याबाबतची माहिती दिली नाही.

८. मराठी दोलामुद्रित ग्रंथांच्या जतन व संवर्धनासाठी २० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी एकाही ग्रंथालयाने ० (०%) दोलामुद्रित ग्रंथांचा डेटा बेस तयार केला नाही.

शिफारशी :

१. दोलामुद्रित ग्रंथ जतन व संवर्धन विभाग नसल्यास १ (५%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयाने असा विभाग सुरू करावा. त्यामुळे दोलामुद्रितांचे जतन व संवर्धन करून हाताळणी सुलभ होईल.

२. दोलामुद्रित ग्रंथ जतन व संवर्धन विषयक प्रशिक्षित कर्मचारी नसलेल्या ६ (३०%) ग्रंथालयांनी ग्रंथ जतन व संवर्धन विषयक प्रशिक्षित कर्मचाऱ्याची नेमणूक करावी.

३. दोलामुद्रित ग्रंथांची बांधणी व दुरूस्तीची सुविधा नसलेल्या १ (५%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयाने ही सुविधा सुरू करावी. या विषयी माहिती उपलब्ध नसलेल्या २ (१०%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये ग्रंथ बांधणी व दुरूस्तीची सुविधा नसेल तर त्यांनीही ही सुविधा सुरू करावी. त्यामुळे दोलामुद्रित ग्रंथ जतन व संवर्धन करणे शक्य होईल.

४. 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये दोलामुद्रित ग्रंथांच्या जतन व संवर्धनासाठी यंत्रांचा वापर केला जातो की नाही याविषयी माहिती न दिलेल्या २ (१०%) ग्रंथालये यंत्रांचा वापर करत नसतील तर त्यांनी तो करावा.

५. दोलामुद्रित ग्रंथ जतन प्रयोगशाळा नसलेल्या ११ (५५%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांनी अशी प्रयोगशाळा उभारावी. या विषयीची माहिती उपलब्ध होऊ न शकलेल्या २ (१०%) ग्रंथालयांमध्ये अशी प्रयोगशाळा नसेल तर त्यांनीही प्रयोगशाळा उभारावी.

६. ३ (१५%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांनी दोलामुद्रित ग्रंथांच्या जतन व संवर्धनासाठी धुरी चेंबरची सुविधा उपलब्ध करून घ्यावी. २ (१०%) ग्रंथालयांनी याविषयी माहिती दिली नाही. त्यांच्याकडे ही सुविधा उपलब्ध नसेल तर त्यांनी ही सुविधा उपलब्ध करावी.

७. लॅमिनेशनची सुविधा नसलेल्या ६ (३०%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांनी मराठी दोलामुद्रित ग्रंथांच्या जतन व संवर्धनासाठी ही सुविधा सुरू करावी. २ (१०%) ग्रंथालयांनी याबाबतची माहिती दिली नाही. त्यांच्याकडे ही सुविधा नसेल तर सुरू करावी.

८. मराठी दोलामुद्रित ग्रंथांच्या जतन व संवर्धनासाठी सर्वच २० (१००%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांनी दोलामुद्रित ग्रंथांचे अंकीकरण करुन घ्यावे.

उद्दिष्ट क्र.३ दोलामुद्रितांच्या व्यवस्थापनात येणाऱ्या अडचणींचा शोध घेऊन त्यावरील उपाय योजना सुचविणे.

वरील उद्दिष्ट क्र.३ पूर्ण झाले व त्यानुसार निष्कर्ष व शिफारशी खाली नमूद केल्या आहेत.

निष्कर्ष :

१. पश्चिम महाराष्ट्रातील संशोधकाने संशोधनासाठी निवडलेल्या ८० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी २ (२.५०%) ग्रंथालयांमध्ये हंगामी ग्रंथपाल कार्यरत आहेत, तर १ (१.२५%) ग्रंथालयामध्ये ग्रंथपाल यांची नेमणूक करण्यात आलेली नाही.

२. पश्चिम महाराष्ट्रातील ८० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये कार्यरत असलेल्या ग्रंथपालांपैकी १२ (१५%) ग्रंथपालांना दोलामुद्रिते या संकल्पनेविषयी माहिती नाही. तर ५ (७.५%) ग्रंथालयातील ग्रंथपालांनी याविषयी माहिती दिली नाही.

३. संशोधनासाठी निवडलेल्या ८० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथपालांपैकी २० ग्रंथालयांमध्ये दोलामुद्रिते आढळली. त्यापैकी फक्त ५ (२५%) ग्रंथालयांमध्ये दोलामुद्रितांसाठी विशेष कर्मचारी नेमलेला आहे. उर्वरीत १५ (७५%) दोलामुद्रितासाठी विशेष कर्मचारी नेमलेला नाही.

४. मराठी दोलामुद्रिते आढळलेल्या २० ग्रंथालयांपैकी ७ (३५%) ग्रंथालयांमध्ये दोलामुद्रिते विभाग आहे. तर उर्वरीत १३ (६५%) ग्रंथालयांमध्ये दोलामुद्रितांसाठी वेगळा विभाग नाही.

५. मराठी दोलामुद्रिते आढळलेल्या २० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी १७ (८५%) ग्रंथालयांमध्ये दोलामुद्रितांना दाखल अंक देवून त्यांचे वर्गीकरण केले आहे. तर ३ (१५%) ग्रंथालयांनी दोलामुद्रितांना दाखल अंक देवून त्यांचे वर्गीकरण केलेले नाही. ४ ग्रंथालयांनी दोलामुद्रितांचे तालिकीकरण केले नाही.

६. मराठी दोलामुद्रिते आढळलेल्या १६ (८०%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये दोलामुद्रित ग्रंथांची देवघेव केली जाते. पण ४ (२०%) ग्रंथालयांमध्ये दोलामुद्रित ग्रंथांची देवघेव केली जात नाही.

७. संशोधनासाठी निवडलेल्या ८० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी ६७ (८३.७५%) ग्रंथालयांनी आपल्या ग्रंथ संग्रहास वाचकांसाठी मुक्तद्वार पध्दतीचा अवलंब केलेला आहे. तर १३ (१६.२५%) ग्रंथालयांनी आपल्या ग्रंथ संग्रहास वाचकांसाठी बंदिस्त द्वार पध्दतीचा अवलंब केला आहे.

८. संदर्भ सेवा, माहिती सेवा, विस्तार सेवा, रेफरल सेवा व ऑन लाईन सेवा १७ (८५%) अ वर्ग सार्वजनिक ग्रंथालयामध्ये दिल्या जातात, पण उर्वरीत ३ (१५%) ग्रंथालये या सेवा देत नाहीत.

९. दोलामुद्रिते आढळलेल्या २० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी ८ (४०%) ग्रंथालयांमध्ये कार्यरत ग्रंथपालांनी अपुऱ्या अनुदान / निधीमुळे दर्जेदार ग्रंथालयीन सेवा पुरविण्यात अडचणी येत असल्याचे म्हटले आहे. तसेच २ (१०%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांना अपुऱ्या निधीमुळे दोलामुद्रितांचे जतन व संवर्धन करण्यात अडचणी येत आहेत.

१०. अपुऱ्या मनुष्यबळामुळे दर्जेदार सेवा पुरविण्यात ३ (१५%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांना अडचणी येत आहेत.

शिफारशी :

१. पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी हंगामी ग्रंथपाल कार्यरत असलेल्या २ (१०%) ग्रंथालयांनी कायमस्वरूपी ग्रंथपालांची नेमणूक करावी. तर ग्रंथपालाची नेमणूकच केलेली नसलेल्या एका (५%) ग्रंथालयाने लवकरात लवकर ग्रंथपालाची नेमणूक करावी. त्यामुळे वाचकांना चांगल्या ग्रंथालयीन सेवा पुरवणे शक्य होईल.

२. पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये कार्यरत असलेल्या परंतु मराठी दोलामुद्रितांविषयी अनभिज्ञ असलेल्या १२ (१५%) ग्रंथपालांनी मराठी दोलामुद्रितांविषयी सखोल माहिती घ्यावी. त्यामुळे मराठी दोलामुद्रितांचा शोध घेणे, त्यांची नोंद, तांत्रिक सोपस्कार करणे, देवघेव करणे आणि त्यांचे जतन व संवर्धन करणे शक्य होईल.

३. पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी २० ग्रंथालयांमध्ये दोलामुद्रिते आढळली. त्यातील दोलामुद्रितांसाठी विशेष ग्रंथालयीन कर्मचारी कार्यरत नसलेल्या १५ (७५%) ग्रंथालयांनी त्वरीत त्याची नेमणूक करावी. त्यामुळे दोलामुद्रितांचे जतन व संवर्धन करणे सुलभ होईल.

४. दोलामुद्रितांसाठी वेगळा विभाग नसलेल्या १३ (६५%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांनी दोलामुद्रितासाठी वेगळा विभाग करावा. जेणेकरून त्यांची देवघेव, जतन व संवर्धन करणे सुलभ होईल.

५. मराठी दोलामुद्रितांना दाखल अंक देवून त्यांचे वर्गीकरण केले नसलेल्या ३ (१५%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांनी त्वरीत दोलामुद्रित ग्रंथांवर तांत्रिक सोपस्कार करावेत. त्यामुळे त्यांची देवघेव करणे सोयीचे होईल.

६. दोलामुद्रित ग्रंथांची देवघेव केली जात नसलेल्या ४ (२०%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांनी दोलामुद्रित ग्रंथांची वाचकांना/सभासदांना देवघेव करावी. कारण दोलामुद्रितांसारखा ज्ञानाचा खजिना हा वापरासाठी असतो. बंदिस्त करून ठेवण्यासाठी नव्हे.

७. बंदिस्तद्वार पध्दतीचा अवलंब केलेल्या १३ (१६.२५%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांनी आपल्या वाचकांसाठी ग्रंथ संग्रहास मुक्तद्वार पध्दतीचा अवलंब करावा. त्यामुळे ग्रंथालय शास्त्राच्या पहिल्या चार तत्वांचे समाधान होईल.

८. संदर्भसेवा, माहितीसेवा, विस्तारसेवा, रेफरलसेवा, ऑनलाईन सेवा देत नसलेल्या ३ (१५%) ग्रंथालयांनी या सेवा पुरविण्याची व्यवस्था करावी. त्यामुळे वाचकांच्या माहिती विषयक गरजा पूर्ण होण्यास मदत होईल.

९. शासनाने 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांच्या अनुदानात वाढ करावी. त्याचबरोबर वाचकांना दर्जेदार सेवा पुरविण्यास मदत होईल. तसेच मराठी दोलामुद्रितांचे जतन व संवर्धन चांगल्या प्रकारे करता येईल. सर्वच अ वर्ग सार्वजनिक ग्रंथालयानी दोलामुद्रितासाठी स्वतंत्र बजेट करावे व एनएमएम कडे प्रपोजल पाठवून ग्रँट मिळवाव्यात.

१०. 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील रिक्त पदे ग्रंथालयांनी भरावीत. त्यामुळे दर्जेदार सेवा पुरवता येतील.

उद्दिष्ट क्र.४ 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयात असणाऱ्या डॉ. मोरजे व गावस्कर यांच्या सुचीत दोलामुद्रितांचा शोध घेऊन त्याचा अभ्यास करणे.

वरील उद्दिष्ट क्र.४ पूर्ण झाले व त्यानुसार निष्कर्ष व शिफारशी खाली नमूद केल्या आहेत.

निष्कर्ष :

१. संशोधकाने संशोधनासाठी निवडलेल्या ८० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी २० (२५%) ग्रंथालयांमध्ये १६९ दोलामुद्रिते आढळली. या दोलामुद्रित ग्रंथाचा मोरजे यांच्या मराठी

दोलामुद्रित सूचीशी तुलनात्मक अभ्यास केल्यानंतर, १३६ दोलामुद्रित ग्रंथ सूचीत समाविष्ट होते. परंतु या १३६दोलामुद्रित ग्रंथांपैकी १०५ (७७.२०%) दोलामुद्रित ग्रंथांच्या नोंदी मोरजे यांच्या सूचीमधील नोंदींशी तंतोतंत जुळल्या नाहीत.

२. गंगाधर मोरजे यांच्या मराठी दोलामुद्रितांच्या सूचीमध्ये ८५ (६२.५%) दोलामुद्रित ग्रंथ कोणत्या ग्रंथालयामध्ये उपलब्ध आहेत या विषयी उल्लेख केलेला नाही.

३. कोल्हापूर जिल्ह्यातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयामध्ये आढळलेल्या व मोरजे यांच्या दोलामुद्रित सुचीमध्ये समाविष्ट असलेल्या २८ मराठी दोलामुद्रित ग्रंथ कोणत्या ग्रंथालयात उपलब्ध आहेत, याचा उल्लेख मोरजे यांच्या मराठी दोलामुद्रित ग्रंथ सूचीमध्ये केलेला नाही.

४. सांगली जिल्ह्यातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयामध्ये आढळलेल्या व मोरजे यांच्या मराठी दोलामुद्रित ग्रंथ सुचीमध्ये समाविष्ट असलेले ७ मराठी दोलामुद्रित ग्रंथ कोणत्या ग्रंथालयात उपलब्ध आहेत याचा उल्लेख मोरजे यांच्या मराठी दोलामुद्रित ग्रंथ सूचीमध्ये केलेला नाही.

५. सातारा जिल्ह्यातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयामध्ये आढळलेल्या व मोरजे यांच्या मराठी दोलामुद्रित सुचीमध्ये समाविष्ट असलेल्या ९ मराठी दोलामुद्रित ग्रंथ कोणत्या ग्रंथालयात उपलब्ध आहेत यांची मोरजे यांच्या सुचीमध्ये नोंद केलेली नाही.

६. सोलापूर जिल्ह्यातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयामध्ये आढळलेल्या ४१ मराठी दोलामुद्रित ग्रंथांची डॉ.मोरजे यांच्या मराठी दोलामुद्रिते या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीमध्ये दिलेल्या सुचीमध्ये नोंद करताना सदरची दोलामुद्रिते कोणत्या ग्रंथालयामध्ये उपलब्ध आहेत याचा उल्लेख आढळत नाही.

७. मोरजे यांच्या दोलामुद्रित ग्रंथ सूचीमध्ये ४६ (३३.८२%) दोलामुद्रितांचा सविस्तर तपशील दिलेला नाही.

८. संशोधकाने संशोधनासाठी निवडलेल्या ८० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी २० ग्रंथालयांमध्ये १६९ दोलामुद्रिते आढळली. या दोलामुद्रित ग्रंथांच्या गावस्कर यांच्या मराठी दोलामुद्रित सूचीची तुलना केल्यानंतर ११८ दोलामुद्रित ग्रंथ सूचीत समाविष्ट होते. परंतु या

११८ दोलामुद्रित ग्रंथांपैकी ८६ नोंदी (७२.८८%) गावस्कर यांच्या सूचीमधील नोंदींशी तंतोतंत जुळल्या नाहीत.

९. गावस्कर यांच्या मराठी दोलामुद्रित सूचीमध्ये ८० (६७.७९) दोलामुद्रित ग्रंथ कोणत्या ग्रंथालयामध्ये उपलब्ध आहेत याचा उल्लेख केलेला नाही.

१०. गावस्कर यांच्या सूचीमध्ये ६८ (५८.६२) मराठी दोलामुद्रितांचा तपशील सविस्तर दिलेला नाही.

शिफारशी :

१. प्रस्तुत संशोधनाआधारे संशोधकाने तयार केलेल्या मराठी दोलामुद्रित ग्रंथांच्या सूचीमधील नोंदींची माहिती मोरजे यांच्या सूचीमध्ये नोंदवावी त्यामुळे ती सूची अधिक समृद्ध व परिपूर्ण होईल.

२. ८५ (६२.५%) मराठी दोलामुद्रित ग्रंथ कोणत्या 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयामध्ये उपलब्ध आहेत याचा मराठी दोलामुद्रितांच्या सुचीमध्ये उल्लेख करावा.

३. कोल्हापूर जिल्ह्यातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयात आढळलेल्या २८ मराठी दोलामुद्रित ग्रंथांचा ते कोणत्या ग्रंथालयात उपलब्ध आहेत याचा उल्लेख मोरजे यांच्या मराठी दोलामुद्रित सुचित करावा.

४. सांगली जिल्ह्यातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयात आढळलेल्या ८० मराठी दोलामुद्रित ग्रंथांचा ते कोणत्या ग्रंथालयात उपलब्ध आहेत याचा उल्लेख मोरजे यांच्या मराठी दोलामुद्रित सुचित करावा.

५. सातारा जिल्ह्यातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयात आढळलेल्या ९ मराठी दोलामुद्रित ग्रंथांचा ते कोणत्या ग्रंथालयात उपलब्ध आहेत याचा उल्लेख मोरजे यांच्या मराठी दोलामुद्रित ग्रंथ सुचीमध्ये करण्यात यावा.

६. सोलापूर जिल्ह्यातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयात आढळलेल्या ४१ मराठी दोलामुद्रित ग्रंथ कोणत्या ग्रंथालयात उपलब्ध आहेत याचा उल्लेख मोरजे यांच्या मराठी दोलामुद्रित ग्रंथ सुचीमध्ये करण्यात यावा.

७. ४६ (३३.८२%) मराठी दोलामुद्रित ग्रंथांचा तपशील सविस्तरपणे गंगाधर मोरजे यांच्या दोलामुद्रित ग्रंथांच्या सूचीतील नोंदीमध्ये करावा.

८. प्रस्तुत संशोधनाआधारे संशोधकाने तयार केलेल्या मराठी दोलामुद्रित ग्रंथांच्या सूचीमधील नोंदीची माहिती गावस्कर यांच्या सूचीमध्ये समाविष्ट करावी. त्यामुळे सूची परिपूर्ण होईल.

९. गावस्कर यांच्या दोलामुद्रित सूचीमध्ये ६८ (५८.६२%) नोंदीची माहिती मराठी दोलामुद्रित सूचीमध्ये करण्यात यावी. त्यामुळे ती अधिक परिपूर्ण होईल.

१०. गावस्कर यांच्या दोलामुद्रित ८५ (६२.५%) मराठी दोलामुद्रित ग्रंथांचा तपशील सविस्तरपणे गावस्कर सूचीमधील नोंदीमध्ये करावा.

उद्दिष्ट क्र.५ प्रसिध्द झालेल्या दोलामुद्रितांच्या सूचीमध्ये समाविष्ट नसलेल्या 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील दोलामुद्रितांची सूची तयार करणे.

वरील उद्दिष्ट क्र.५ पूर्ण झाले व त्यानुसार निष्कर्ष व शिफारशी खाली नमूद केल्या आहेत.

निष्कर्ष :

१. डॉ. गंगाधर मोरजे यांच्या ''मराठी दोलामुद्रिते'' या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीमध्ये १९०० मराठी दोलामुद्रित ग्रंथांची नोंद आहे. संशोधकाने हाती घेतलेल्या प्रस्तुत संशोधनामुळे या सूचीमध्ये नसलेल्या ३३ मराठी दोलामुद्रितांचा शोध लागला आहे. यांची नोंद मोरजे यांच्या मराठी दोलामुद्रितांच्या सुचीमध्ये केल्यास १९०० + ३३ अशी एकूण १९३३ मराठी दोलामुद्रित ग्रंथांची सुचीमध्ये नोंद होईल.

२. संशोधकाने पूर्वी प्रसिध्द झालेल्या डॉ. मोरजे, दाते व तत्सम सुचीमध्ये समाविष्ट नसलेल्या पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये आढळलेल्या ३३ मराठी दोलामुद्रितांची सूची तयार केली आहे.

शिफारशी :

१. प्रस्तुत संशोधन कार्यातून संशोधकाने शोधून काढलेल्या ३३ मराठी दोलामुद्रितांची नोंद मोरजे यांच्या 'मराठी दोलामुद्रिते' या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीमध्ये दिलेल्या सुचीमध्ये करावी. त्यामुळे सूचीमध्ये एकूण १९३३ मराठी दोलामुद्रित ग्रंथांची नोंद होईल.

२. संशोधकाने प्रस्तुत संशोधनाद्वारे तयार केलेल्या मराठी दोलामुद्रितांच्या सुचीचा समावेश पूर्वी प्रसिध्द झालेल्या डॉ. मोरजे, दाते व तत्सम सुचीमध्ये करावा.

उद्दिष्ट क्र.६ संकलित होणाऱ्या दोलामुद्रितांच्या डिजिटायझेशनच्या सद्य:स्थितीची पाहणी करणे व त्याकरीता विस्तारीत योजना सुचविणे.

वरील उद्दिष्ट क्र.६ पूर्ण झाले व त्यानुसार निष्कर्ष व शिफारशी खाली नमूद केल्या आहेत.

निष्कर्ष :

१. मराठी दोलामुद्रित ग्रंथ आढळलेल्या २० ग्रंथालयांपैकी ८ (४०%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये मराठी दोलामुद्रित ग्रंथांच्या डिजिटायझेशनचे काम (Full Text) १००% पूर्ण झालेले आहे. ५ (२५%) ग्रंथालयामध्ये दोलामुद्रित ग्रंथांच्या डिजिटायझेशनचे काम चालू आहे. उर्वरीत ७ (३५%) ग्रंथालयांनी दोलामुद्रितांचे डिजिटायझेशन केलेले नाही.

२. मराठी दोलामुद्रित ग्रंथांचे डिजिटायझेशन करण्यासाठी ७ (३५%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांनी ग्रंथालयातील कर्मचाऱ्यास डिजिटायझेशनचे प्रशिक्षण दिलेले आहे. १२ (६०%) ग्रंथालयांनी ग्रंथालयीन कर्मचाऱ्यास डिजिटायझेशनचे प्रशिक्षण दिलेले नाही, तर एका ग्रंथालयाने (५०%) या विषयीची माहिती उपलब्ध करून दिलेली नाही.

३. १२ (६०%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांनी आपल्या ग्रंथ संग्रहातील मराठी दोलामुद्रित ग्रंथांचे डिजिटायझेशन करण्यासाठी स्कॅनिंग पध्दतीचा अवलंब केला आहे. ८ (४०%) ग्रंथालयांनी याविषयी माहिती दिलेली नाही.

४. मराठी दोलामुद्रित ग्रंथांचा १५ (७५%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयामध्ये वाचकाकडून वापर केला जातो. ४ (२०%) ग्रंथालयांमध्ये मराठी दोलामुद्रित ग्रंथांचा सभासद/वाचक वापर करत नाहीत. एका (५%) ग्रंथालयाने त्याविषयी माहिती दिली नाही.

शिफारशी :

१. मराठी दोलामुद्रित ग्रंथांचे डिजिटायझेशन करू न शकलेल्या ७ (३५%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांनी मराठी दोलामुद्रित ग्रंथांचे डिजिटायझेशन (Full Text) करून घ्यावे. त्यामुळे या ग्रंथालयांना दोलामुद्रित ग्रंथांचे जतन व संवर्धन करता येऊ शकेल. त्याचबरोबर वाचकांना

ऑन लाईन सेवाही पुरवता येतील. ५ (२५%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांनी दोलामुद्रित ग्रंथांच्या डिजिटायझेशनचे चालू असलेले काम त्वरीत पूर्ण करावे. त्यामुळे त्यांना दोलामुद्रित विषयक ऑनलाईन सेवा देता येतील.

२. १२ (६०%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांनी, ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना डिजिटायझेशनचे प्रशिक्षण द्यावे.

३. ८ (४०%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांनी मराठी दोलामुद्रितांच्या डिजिटायझेशनचे कार्य हाती घेवून ते स्कॅनिंग किंवा केयिंग पध्दतीचा अवलंब करून पूर्ण करावे.

४. ४ (२०%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांतील वाचकांनीही मराठी दोलामुद्रित ग्रंथांचा वापर करावा. ग्रंथालयांनी त्यांना दोलामुद्रितांच्या वापरास परवानगी द्यावी.

गृहितकांची पडताळणी :

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने उद्दिष्टाला अनुसरून निष्कर्षाप्रत पोहोचण्यासाठी कांही गृहितके योजली होती. संशोधनासाठी आवश्यक माहितीचे संकलन, विश्लेषण, सादरीकरण व निष्कर्षाच्या आधारे दोन्हीही गृहितके स्विकारण्यात आली आहेत. याविषयी विश्लेषण खालील प्रमाणे:

१. पश्चिम महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयात दोलामुद्रित ग्रंथ काही प्रमाणात उपलब्ध आहेत.

प्रस्तुत संशोधन कार्याच्या विश्लेषण व सादरीकरणातून पुढे आलेल्या माहितीनुसार पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयामध्ये ६८ (४०.२३%) मराठी दोलामुद्रित उपलब्ध आहेत. सांगली जिल्ह्यामध्ये १९ (११.२४%)मराठी दोलामुद्रिते आढळली. सातारा जिल्ह्यातील ग्रंथालयांमध्ये २३ (१३.६०%) मराठी दोलामुद्रिते आहेत. तसेच सोलापूर जिल्ह्यातील ग्रंथालयांमध्ये ५९ (३४.९१%) मराठी दोलामुद्रिते निदर्शनास आली. अशाप्रकारे एकंदरित विचार करता पहिले गृहितक काही प्रमाणात स्विकारण्यात आले आहे.

२. पश्चिम महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील दोलामुद्रितांचे डिजिटायझेशन करण्यात अडचणी आहेत.

संशोधकाने हाती घेऊन यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या संशोधन कार्यातील संकलीत माहितीचे विश्लेषण व सादरीकरणावरून मराठी दोलामुद्रिते आढळलेल्या २० 'अ'वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी ८ (४०%) ग्रंथालयांनी अंकीकरणाचे काम १००% पूर्ण केलेले आहे. तरी सुध्दा त्यांना मनुष्यबळ व निधीची कमतरता भासली. ७ (३५%) 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांनी मराठी दोलामुद्रितांचे अंकीकरण केलेले नाही. मनुष्यबळ व उपलब्ध निधीअभावी त्यांना मराठी दोलामुद्रित ग्रंथांच्या अंकीकरणाचे कार्य हाती घेता आलेले नाही. तर ५ (२५%) ग्रंथालयामध्ये दोलामुद्रितांच्या अंकीकरणाचे काम चालू आहे. ७ (३५%) सार्वजनिक ग्रंथालयांनी या कामी त्यांच्या कर्मचाऱ्यांना अंकीकरणाचे प्रशिक्षण दिलेले आहे. १२ (६०%) ग्रंथालयांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांना अंकीकरणाचे प्रशिक्षण दिलेले नाही. एका ग्रंथालयाची याबाबतची उपलब्ध माहिती होऊ शकली नाही. अपुऱ्या निधीमुळे दोलामुद्रितांचे अंकीकरण (जतन व संरक्षण) करण्यात २ (१०%) ग्रंथालयांना अडचणी आलेल्या आहेत. तर ८ (४०%) ग्रंथालयांना अपुऱ्या निधीमुळे दर्जेदार सेवा पुरविण्यात अडचणी आल्या आहेत. ३ (१५%) ग्रंथालयांना अपुरा निधी व अपुऱ्या मनुष्यबळामुळे दर्जेदार सेवा पुरविण्यात अडचणी येतात.

वरील माहितीच्या आधारे मराठी दोलामुद्रितांचे अंकीकरण करण्यात अडचणी आहेत हे सिध्द होते. त्यामुळे सदर गृहितक स्विकारण्यात आले आहे.

५.४ पुढील संशोधनाचा भविष्यवेध:

संशोधकाने हाती घेतलेले संशोधन कार्य यशस्वीरित्या पूर्ण करताना संशोधनास कांही मर्यादा पडत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे कांही 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांची माहिती संकलित करणे शक्य झाले. त्यामुळे मराठी दोलामुद्रितांची खरी संख्या समोर येण्यास मर्यादा पडतात. या अनुषंगाने मराठी दोलामुद्रित सुचीमधील नोंदी परिपूर्ण होऊ शकत नाहीत. अशा विषयावर संशोधन

होऊन मराठी दोलामुद्रितांची परिपूर्ण सूची तयार होण्यासाठी अनेक बाबींवर संशोधन व्हावे असे संशोधकास वाटते. त्यानिमित्त संशोधकाने पुढील विषय संशोधनासाठी सुचविलेले आहेत.

१. महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रितांचा अभ्यास या विषयावर संशोधन होऊ शकते. अशा संशोधनातून मराठी दोलामुद्रितांची वास्तव संख्या समोर येऊ शकते व सूची परिपूर्ण होऊ शकते.

२. महाराष्ट्रातील शतकोत्तरी सार्वजनिक ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रितांचा आढावा.

३. महाराष्ट्रातील शैक्षणिक (शाळा, महाविद्यालय, विद्यापीठ) ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रितांचा अभ्यास या विषयावर संशोधन होऊ शकते.

४. महाराष्ट्रातील वैयक्तीक (पर्सनल लायब्ररी) ग्रंथालये व मराठी दोलामुद्रिते या विषयावर अभ्यास होऊ शकतो.

५. मराठी दोलामुद्रित ग्रंथ सूची परिपूर्ण करण्यासाठी अखिल भारतीय ग्रंथालयातील (सार्वजनिक, शैक्षणिक, विशेष, राष्ट्रीय) मराठी दोलामुद्रितांचा अभ्यास करता येईल.

६. महाराष्ट्रातील इतर भाषेतील दोलामुद्रितांचा अभ्यास या विषयावर महत्त्वपूर्ण संशोधन होऊ शकते.

७. महाराष्ट्रातील सर्व प्रकारच्या ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रितांचा अभ्यास करणे.

५.५ समारोप :

पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रितांचा अभ्यास या विषयाच्या संशोधनाची सुरूवात संशोधकास मराठी दोलामुद्रिताविषयी असलेल्या आवडीतून व सदर संशोधन समस्येतून झाली. प्रस्तुत संशोधन कार्य संशोधनाच्या उद्दिष्टानुसार पूर्ण करण्याचा सखोल प्रयत्न संशोधकाने केलेला आहे. संशोधकास प्रस्तुत संशोधनाद्वारे ३३ मराठी दोलामुद्रिते नवीन आाढळली आहेत व त्यात त्याला यश आलेले आहे. अशाप्रकारे या संशोधनातील निष्कर्ष आणि शिफारशींचा मराठी दोलामुद्रित ग्रंथसुची व्यापक प्रमाणात परिपूर्ण करणेकामी मदत झाली आहे. त्याचबरोबर पुढील संशोधनाचा भविष्यवेध या सदराखाली सुचविलेल्या संशोधन समस्यांचा दोलामुद्रित विषयामध्ये आवड असणाऱ्या संशोधकांना व अध्यापकांना बहुमुल्य उपयोग होईल.

संदर्भसूची

मराठी संदर्भग्रंथ:

१) औलिअरी, झीना (२०१७) संशोधन प्रकल्प कसा करावा, नवी दिल्ली : सेज प्रकाशन.

२) करमरकर,द.बा. (१९७५) महाराष्ट्रातील ग्रंथालय कायदा, मुंबई : समाविष्ट वाचनालय.

३) कर्वे, आर.पी. (१९४९) हिंदुस्थानातील ग्रंथालयाची चळवळ, सत्यकथा मासिक.

४) कानडे, रामचंद्र गोविंद (१९३८) प्राचीन व अर्वाचीन ग्रंथालये, पुणे : समर्थ भारत प्रकाशन

५) कायंदे–पाटील, गंगाधर (२००५) संशोधन पद्धती, नाशिक : चैतन्य पब्लिकेशन्स.

६) कोण्णूर, एम.बी. (२००८) डायमंड ग्रंथालय व माहितीशास्त्र कोश, पुणे : डायमंड पब्लिकेशन्स..

७) कर्णिक, प्रदीप (२००५–०६) ग्रंथ, ग्रंथालये आणि ग्रंथसंस्कृती, मुंबई : नवचैतन्य प्रकाशन.

८) कुलकर्णी, र.अ. (१९४९) मराठी दोलामुद्रिते, मुंबई : महाराष्ट्र ग्रंथ भांडार.

९) गावस्कर, सु.आ. (१९६१) मराठी दोलामुद्रिते, मुंबई : मराठी ग्रंथ संग्रहालय

१०) गोगटे, शरद (२००८) मराठी प्रकाशनाची दोनशे वर्ष, पुणे : राजहंस प्रकाशन.

११) चुनेकर, सु.रा. (१९८३) सूचीशास्त्र उपयोग संशोधन स्वरूप आणि पद्धती, संगमनेर : शिक्षण प्रसारक संस्था.

१२) जैन, प्रकाश (२००१) सुलभ ग्रंथालयशास्त्र, नागपूर : विश्व पब्लिशर्स ॲन्ड डिस्ट्रीब्युटर्स.

१३) जोशी, लक्ष्मणशास्त्री (१९७६) मराठी विश्वकोश खंड १२, मुंबई : म.रा.म. विश्वकोश निर्मिती मंडळ.

१४) थोरात, लक्ष्मण (२००७) ग्रंथालय आणि माहितीशास्त्र, पुणे : डायमंड पब्लिकेशन्स.

१५) दाते, शंकर गणेश (१९६१) मराठी ग्रंथसूची १८०० ते १९५० मुंबई : शं.ग.दाते प्रकाशन.

१६) दडकर, जया (१९९८) संक्षिप्त मराठी वाङ्.मयकोश मुंबई : जी.आर. भटकळ फाऊंडेशन.

१७) देवधर, विजय (२०१३) ग्रंथालय व माहितीशास्त्र कोश, पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन.

१८) देवकुळे, च.ग. (१९५६) मुद्रण व्यवस्थापन, पुणे : व.ग. देवकुळे प्रकाशन.

१९) काळे, दिनकर बी. (१९६६) प्रियोळकर अ.का. लिखीत लेखसंग्रह.

२०) धांडोरे, किरण गं. (२०१६) अंतर्गत अर्थसहाय्याच्या विविध योजनांची माहिती पुस्तिका.

२१) धायुगडे, य.ए. (१९६०) मुद्रित शोधन, पुणे : दि पुना प्रेस ओनर्स असोसिएशन.

२२) नाईक, बापूराव (२००५) अ.का. प्रियोळकर आणि मुद्रण संशोधन : अक्षर प्रतिरूप प्रायव्हेट लिमिटेड.

२३) नरगुंदे, रेवती (२००२) ग्रंथालये आणि सामाजिक विकास, पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन.

२४) निकोसे, सत्यप्रकाश (२००७) ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पद्धती, नागपूर : प्रज्ञा प्रकाशन.

२५) पाटणकर, जयश्री (२०१०) संशोधनाची क्षेत्रे आणि पद्धती श्रीरामपूर : शब्दालय प्रकाशन.

२६) पाटील रविंद्र (२०१४) महाराष्ट्र सूची शतायू दालने कबनूर : नाग–नालंदा प्रकाशन.

२७) पाटील, आर.आर. (२०१४) इचलकरंजी आपटे वाचन मंदिरातील दुर्मिळ ग्रंथांची सूची इचलकरंजी : ज्योती प्रकाशन.

२८) पाटील सी.श्री. (२००५) विश्व महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालये देवगड : स्नेहल एजन्सी.

२९) पारखी, गंगाधर र. (२००८) ग्रंथालयशास्त्र परिचय, पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन.

३०) प्रियोळकर, अ.का. (१९६३) ग्रंथालय गौरव ग्रंथ, मुंबई : मराठी ग्रंथ संग्रहालय.

३१) प्रियोळकर, अ.का. (१९६९) मराठी ग्रंथाचे आदर्श संग्रहालय, मुंबई : मराठी साहित्य संघ.

३२) प्रियोळकर, अ.का. (१९४६) पंचारती, मुंबई : मराठी ग्रंथालय संघ.

३३) प्रियोळकर, अ.का. (१९४९) मराठी दोलामुद्रिते, मुंबई : मराठी संशोधन मंडळ.

३४) प्रियोळकर, अ.का. (१९६६) भारतीय ग्रंथ संरक्षणाची शताब्दी, मुंबई : मराठी ग्रंथ संग्रहालय.

३५) भांडारकर, पु.ल. (१९७६) सामाजिक संशोधन पद्धती नागपूर : महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ.

३६) भागवत, शशिकला गं. (२०१३) ग्रंथालय व्यवस्थापन, पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन.

३७) महाजन, शा.ग. (१९८९) मराठी दोलामुद्रितांची तालिका, पुणे : जयकर ग्रंथालय.

३८) मराठे, ना.रा. (१९७५) भारतीय ग्रंथालयाचा इतिहास, मुंबई : अभिनव प्रकाशन.

३९) मालशे, स.ग. (१९७५) शोध निबंधाची लेखन पद्धती, पुणे : सुविचार प्रकाशन.

४०) मोरजे, गंगाधर (१९९५) मराठी दोलामुद्रिते, गोवा : गोमंतक मराठी अकादमी.

४१) विद्यासागर, अमोल (२०१३) उपयोजित इतिहास : पुणे महाराष्ट्र विद्यापरिषद मंडळ.

४२) लेले रा.के. (१९७३) ग्रंथवर्णन व ग्रंथसूची, पुणे : जोशी लोखंडे प्रकाशन.

४३) शर्मा के.के. (२००५) संदर्भ महाराष्ट्र खंड १, भोपाळ : इंटलेक्चुअल बुक ब्युरो.

४४) सोहनी, शं.कृ. (१९९३) शैक्षणिक टिपा कोश, पुणे : सोहोनी सुधा प्रकाशन, इंग्रजी ग्रंथ.

इंग्रजी संदर्भग्रंथ:

1) Busha, C.H.S. & Harter S.P. (1980) Research Methods in Librarianship, New Delhi : Academic Press.

2) Daleh, Hoiberg (2013) Britannica Reference Encyclopedia, New Delhi : EncyBriatannica Inc.

3) Kent, Allen (1974), Ency of Library & Information Science Newyork : Marcel Dekker Inc.

4) Kumar Girija (1976), Bibliography, New Delhi : Vikas Publication House.

4) Murty A.T. (1979), Document Bibliography, New Delhi : Metropolitan Book Co. Ltd.

5) Parmar, P.P. (1989) Ency. Dictionary of Library Information Science, New Delhi, Anmol Publication.

6) Sharma, Pandey, S.K.(1987) Libraries & Society, New Delhi : ESS Publication.

7) Simpson, J.A.(1989) The Oxford English Dictionary Oxford : Clarendon Press.

8) Tomlinson Norman(1963) Target For Careers Librarianship London : Robert Hale Limited.

मराठी नियतकालिके :

१) कर्वे, आर.पी. (१९४९) हिंदुस्थानातील ग्रंथालयाची चळवळ, सत्यकथा.

२) कर्णिक, प्रदीप (२००४) १८६७ चा ग्रंथसंरक्षण कायदा आणि अ.का. प्रियोळकरांचे संशोधन ज्ञानगंगोत्री नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

३) कर्णिक, प्रदीप (२००५–०६) मराठीतील आद्यमुद्रितांची ग्रंथसूची : स्थिती आणि संरक्षण ज्ञानगंगोत्री नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

४) कर्णिक, प्रदीप (२००४) भिवंडीचे वाचनमंदिर आणि त्यांच्या संग्रहातील मराठी दोलामुद्रिते, मुंबई : मराठी संशोधन पत्रिका.

५) कुंटे, दि.रा. (२००४) सार्वजनिक वाचनालये दशा व दिशा, ठाणे : ग्रंथसौरभ मराठी ग्रंथसंग्रहालये.

६) कोल्हटकर, वा.मू. (१९५६) महाराष्ट्र ग्रंथालये आणि मराठी दोलामुद्रिते मुद्रण प्रकाशन.

७) टिकेकर, श्री.दा. (१९६९) मराठी ग्रंथाचे संग्रहालय, साहित्य सहकार.

८) नाईक बापूराव (२००५) प्रा.अ.का. प्रियोळकर आणि मुद्रण संशोधन, ज्ञानगंगोत्री यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

९) बेलसरे, व. भि. (१९५८) दुर्मिळ ग्रंथाचे संरक्षण समाविष्ट साहित्य सहकार

१०) शेकोकार, रमेश (२००५) आधुनिक मुद्रणकलेचा भाष्यकार, ज्ञानगंगोत्री यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

पीएच.डी. शोध प्रबंध :

१) गजबे पी.एम. (१९९५) महाराष्ट्रातील विदर्भाच्या सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचा इतिहास १८७० ते १९८० एक चिकित्सक अभ्यास : अमरावती, संत गाडगेबाबा विद्यापीठ.

२) फरांडे सी.पी. (१९९७) भारतातील विशेषत: महाराष्ट्रातील मराठी हस्तलिखितांची रचना आणि व्यवस्थापन पुणे : सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पीएच.डी. शोध प्रबंध.

३) Balkrishna P (2015) Preservation and Organization of Manuscript in the Libraries of Andhra Pradesh A Study : Shri Krishn Devray University Liab. & Infor. Science. http://shodhganga.inflibent.ac.in

४) Muzumdar N.R. (2015), Management of Manuscript Collection in Assam In Digital era; a Practical Approach using I.C.T. Tools Guvahati : Guvahati University Ph.D. Thesis. http://shodhganga.inflibent.ac.in

५) Sharma Aarti (2011) Conservation and Digitization of Manuscripts in Univeristy Libraries in India & Punjab : University. http://shodhganga.inflibent.ac.in

६) Saraswati P. (2016), Preservation and Conservation of Rare Materials in Select Libraries in Karnataka Study, Mysore : University. http://shodhganga.inflibent.ac.in

७) Sakhare, Rajendra Ramakant (2017) Assigning of Subject heading to Sanskrit and Marathi Manuscripts, Pune : Savitribai Fule University, http://shodhganga.inflibent.ac.in

८) Thiyam Satyati (2015), Manuscripts of Manipur : Study in the Modern Perspective Manipur : University. http://shodhganga.inflibent.ac.in

एम्.फिल. लघुशोध प्रबंध :

१) आडाव, रविंद्र पांडुरंग (२००८-०९) कोल्हापूर जिल्ह्यांतर्गत येणाऱ्या शतकोत्तरी सार्वजनिक ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रिते : नाशिक (यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, एम.फिल. पदवीसाठी)

२) थोरात निलीमा (२०१०-११) सातारा जिल्ह्यातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालये व वेदशास्त्र विद्यासंवर्धन मंडळ कराड : नाशिक (यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, एम.फिल. पदवीसाठी)

एम्.लिब. संशोधन प्रकल्प :

१) शिंदे संदीप बबनराव (२०१३-१४) कोल्हापूर येथील करवीर नगर वाचनालयातील दुर्मिळ वाचन साहित्याचे जतन व संवर्धन एक अभ्यास : नाशिक (यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, एम.लिब. पदवीसाठी)

२) शिंगाडे चंद्रकांत सुखदेव (२००५-०६) मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे वाचन मंदिर भिवंडी यांच्या संग्रही असणाऱ्या मराठी दोलामुद्रितांचा शोध : नाशिक (यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, एम.लिब. पदवीसाठी)

संकेतस्थळे :

1) https//www.technopedia.com
2) www.maharashtratimes
3) https://en.wikipedia.org/wiki
4) http://wwwnamami.gov.in
5) http://wwwthwink.org
6) http://www.nedccorg.
7) www10c90v/rr/amed/pdf/Hebred Incunabula
8) www.webwiki.com/Incunabulaorg.
9) Wwwpsymon.com/Incunabula
10) Wwwhistoric.com/incunabula

परिशिष्ट १

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

विद्यावाचस्पती (पीएच.डी.) साठीची प्रश्नावली

(ग्रंथालय आणि माहितीशास्त्र)

संशोधन विषय : "पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रितांचा अभ्यास"

प्रश्नावली

टीप : वस्तुनिष्ठ प्रश्नांमध्ये योग्य त्या उत्तरासाठी ☑ अशी खूण करावी. प्रश्नावलीत भरलेल्या माहितीचा फक्त संशोधानासाठीच उपयोग केला जाईल, याची संशोधक हमी देतो.

---

१. ग्रंथालयाची सामान्य माहिती :

i) सार्वजनिक ग्रंथालयाचे नांव : _____

ii) सार्वजनिक ग्रंथालयाचा पत्ता : _____

iii) दूरध्वनी (Phone No.) :

iv)कामकाजाची वेळ :

v)संकेतस्थळ (Website) : _____

vi)ई–मेल (E-mail) : _____

vii) सार्वजनिक ग्रंथालयाचे स्थापना वर्ष :

viii)सार्वजनिक ग्रंथालयास 'अ' वर्ग मानांकन मिळालेले वर्ष :

ix)सार्वजनिक ग्रंथालयाची स्वत:ची इमारत आहे का?

होय ☐ नाही ☐

x) दोलामुद्रिते म्हणजे काय हे आपणांस माहित आहे का?

होय ☐ नाही ☐

(१८०० ते १८६७ मध्ये प्रकाशित झालेल्या ग्रंथांना दोलामुद्रिते असे म्हणतात.)

xi) असेल तर दोलामुद्रितांसाठी वेगळा विभाग आहे का?

होय ☐ नाही ☐

२. सार्वजनिक ग्रंथालयीन कर्मचारी :

i) ग्रंथपालाचे नांव : _____

ii) शैक्षणिक पात्रता : _____

iii) नेमणूक वर्ष : ☐

iv)नेमणुकीचा प्रकार अ) कायमस्वरूपी ☐ ब) हंगामी ☐

ग्रंथालयात इतर किती कर्मचारी आहेत? ☐

दोलामुद्रितांसाठी विशेष कर्मचारी नेमलेला आहे काय?

होय ☐ नाही ☐

३. सार्वजनिक ग्रंथालयाची ग्रंथसंपदा : एकूण ग्रंथसंख्या ☐

अ) छापील पुस्तके (Print Books)

अ.क्र.	वर्ष	पुस्तके	नियतकालिके	हस्तलिखिते	दोलामुद्रिते	इतर	एकूण
१.	२०११–१२						
२.	२०१२–१३						
३.	२०१३–१४						
४.	२०१४–१५						
५.	२०१५–१६						

ब) **विशेष वाचन साहित्य**(Special Material)

अ.क्र.	वर्ष	सूक्ष्मपट	सूक्ष्मफीत	चुंबकीय पट्टी	चित्रफीत	इतर	एकूण
१.	२०११–१२						
२.	२०१२–१३						
३.	२०१३–१४						
४.	२०१४–१५						
५.	२०१५–१६						

क) **ई–माहिती स्त्रोत :**

अ. क्र.	वर्ष	ई–कागदपत्रे E-Documents	ई–बुक्स E-Books	ई–जर्नल्स E-Journals	Online Data Base	इतर	एकूण
१.	२०११–१२						
२.	२०१२–१३						
३.	२०१३–१४						
४.	२०१४–१५						
५.	२०१५–१६						

ड) **सार्वजनिक ग्रंथालयामधील प्रत्येक भाषेतील दोलामुद्रितांची संख्या नमूद करा.**

दोलामुद्रितांची भाषा	दोलामुद्रितांची संख्या
मराठी	
इंग्रजी	

हिंदी	
संस्कृत	
इतर भाषेतील	
एकूण दोलामुद्रिते	

४. ग्रंथालयाचे सभासद/वाचक :

अ) ग्रंथालयाची एकूण वाचक/सभासद संख्या किती आहे? ☐

ब) सभासदत्व किती वर्षाकरिता दिले जाते? ☐

क) ग्रंथालयाचे सभासद होण्यासाठी किती फी द्यावी लागते? रुपये ☐

ड) ग्रंथालयाचा वाचक वर्ग

१. विद्यार्थी ☐ २. शिक्षक ☐ ३. व्यावसायिक ☐

४. मुले ☐ ५. स्त्रिया ☐ ६. प्रौढ व्यक्ती ☐

७. संशोधक ☐ ८. सामान्य माणूस ☐ कामगार ☐

१०. इतर ☐

इ) दोलामुद्रितांसाठी वेगळा असा वाचक वर्ग आहे का?

होय ☐ नाही ☐

असेल तर कोणत्या प्रकारचा

१. विद्यार्थी ☐ संशोधक ३. शि☐ ☐

४. व्यावसायिक ☐ ५. इतर ☐

ई) सभासद/वाचकांना अभ्यासासाठी ग्रंथालयात अभ्यासिकेची सोय आहे काय?

होय ☐ नाही ☐

असेल तर वेळ नमूद करा. ☐

५. ग्रंथालयीन सेवा

५.१ तांत्रिक सोपस्कार

१. दोलामुद्रितांना दाखल नोंद अंक दिले आहेत का?

होय ☐ नाही ☐

२. दोलामुद्रितांचे वर्गीकरण केले आहे का?

होय ☐ नाही ☐

असेल तर वर्गीकरण पद्धती कोणती वापरली आहे?

DDC ☐ CC ☐ Other ☐

३. दोलामुद्रितांचे तालिकीकरण केले आहे का?

होय ☐ नाही ☐

तालिका संहिता कोणती वापरली?

AACR I ☐ AACR II ☐ CCC ☐ इतर ☐

५.२ देवघेव सेवा

१. सार्वजनिक ग्रंथालयाने कोणती पद्धत अवलंबली आहे?

अ) मुक्तद्वार ☐ ब) बंदिस्त ☐ क) इतर ☐

२. मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब केला असेल तर पुस्तकांच्या संरक्षणाची कोणती उपाययोजना केली आहे.

_____

३. दोलामुद्रितांची देवघेव केली जाते का?

होय ☐ नाही ☐

केली जात असेल तरकिती कालावधी करिता

अ) आठवडा ☐ ब) पंधरवडा ☐ क) महिना ☐

इ) इतर ☐

४. एका वाचकास जास्तीत जास्त किती पुस्तके दिली जातात? ☐

५.३ संदर्भ सेवा :

१. वाचकांना ग्रंथालयात दोलामुद्रितांची माहिती पुरविली जाते काय?

होय ☐ नाही ☐

२. वाचकांना दोलामुद्रिताबाबत संदर्भ सेवा पुरविली जाते का?

होय ☐ नाही ☐

५.४ माहिती सेवा :

१. ग्रंथालयात दोलामुद्रिताविषयी कोणत्या माहिती सेवा दिल्या जातात?

अ) प्रचलित जागरूकता सेवा (CAS) ☐ ब) निवडक माहितीचे प्रसारण ☐

क) सार आणि निर्देशन सेवा ☐ ड) ग्रंथ शोध सेवा ☐

इ) संदर्भ सेवा : १. लघुसेवा ☐ २. दीर्घ सेवा ☐

फ) भाषांतर सेवा ☐ उ) इतर ☐

५.५ ग्रंथालयीन विस्तार सेवा :

अ) १. दोलामुद्रितांचे प्रदर्शन ☐ २. सांस्कृतिक कार्यक्रम ☐

३. दोलामुद्रितांच्यावर व्याख्याने ☐ ४.नवीन पुस्तके काच फलकात लावणे ☐

५. फिरते ग्रंथालय ☐ ६.इतर ☐

ब) दोलामुद्रितांची अंतर ग्रंथालयीन देवघेव सेवा पुरविली जाते का?

होय ☐ नाही ☐

५.६ रेफरल सर्व्हिस/सेवा :

अ) दोलामुद्रितांसाठी रेफरल सेवा दिली जाते का?

होय ☐ नाही ☐

असेल तर ही सेवा कोण देते?

१. ग्रंथपाल ☐ २. उप ग्रंथपाल ☐ ३. क्लार्क ☐

४. इतर कर्मचारी ☐

५.७ ऑनलाईन सर्व्हिस :

१. ओ–पॅक (OPAC) ☐ २. ई–प्रचलित जागृतता सेवा (CAS) ☐

३. ई–निवडक माहितीचे प्रसारण ☐

४. ई–संदर्भ सेवा : ☐

अ) ई–मेल रेफरन्स सर्व्हिस ☐ ब) रिअल टाईम डिजिटल रेफरन्स सर्व्हिस ☐

६. जतन आणि संवर्धन

i) ग्रंथालयामध्ये जतन आणि संवर्धन विभाग आहे का?

होय ☐ नाही ☐

असल्यास या विभागातील कामासाठी कर्मचारी वर्ग प्रशिक्षित आहे का?

होय ☐ नाही ☐

ii) आपल्या ग्रंथालयातील दोलामुद्रितावर खालील प्रक्रिया केल्या जातात का?

अ)	दोलामुद्रितांची बांधणी	होय ☐	नाही ☐	
ब)	दोलामुद्रितांची दुरूस्ती	होय ☐	नाही ☐	
क)	फाटलेल्या पानांची दुरूस्ती	होय ☐	नाही ☐	
ड)	इतर	होय ☐	नाही ☐	

iii) दोलामुद्रितांच्या जतन व संवर्धनासाठी कोणत्या यांत्रिक वस्तूंचा वापर केला जातो?

अ) Vacuum Cleaner ☐ ब) Spray ☐

क) Lamination ☐ ड) Heater ☐

इ) Warner ☐

iv)ग्रंथालयामध्ये खालील सुविधा व साधने असतील तर☑खूण करा.

अ) जतन प्रयोगशाळा ☐ ब) पेपर लॅमिनेशन ☐

क) बांधणी यंत्र ☐ ड) धुरी चेंबर ☐

इ) इतर ☐

v) दोलामुद्रितांच्या जतन व संरक्षणासाठी डेटाबेस तयार केले आहे का?

होय ☐ नाही ☐

केला असेल तर त्याबाबत माहिती द्या.

_____

_____

_____

७. सार्वजनिक ग्रंथालयाचा अर्थसंकल्प (२०११–२०१६)

बजेट वर्ष	एकूण बजेट रु.	पुस्तके रु.	नियतकालिके रु.	दुर्मिळ ग्रंथरु.	दोलामुद्रिते रु.	इतर रु.
२०११–१२						
२०१२–१३						
२०१३–१४						
२०१४–१५						
२०१५–१६						

८. डिजिटायझेशन

i) ग्रंथालयामध्ये डिजिटायझेशन केले आहे का?

होय ☐ नाही ☐

ii) डिजिटायझेशनसाठी निधी मिळाला आहे का?

होय ☐ नाही ☐

नसेल तर कोणत्या एजन्सीकडून डिजिटायझेशन करून घेतले ते नमूद करा.

_____

iii)वाचक दोलामुद्रित ग्रंथालयाचा वापर करतात काय?

होय ☐ नाही ☐

iv)वाचक दोलामुद्रितांचा नेटवर्कद्वारे वापर करू शकतात का?

होय ☐ नाही ☐

v)सार्वजनिक ग्रंथालयाचा वापर सभासदाशिवाय इतर व्यक्ती करू शकतात का?

होय ☐ नाही ☐

vi) कृपया काही वेगळ्या सूचना असतील तर द्याव्यात.

_____

_____

_____

पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रितांचा अभ्यास

दोलामुद्रित पुस्तकांची माहिती

ग्रंथालयाचे नांव	:	
स्थापना वर्ष	:	
दोलामुद्रित पुस्तकांची संख्या	:	
लेखकाचे नांव	:	
शीर्षक	:	
प्रकाशक	:	
प्रकाशन स्थळ	:	
प्रकाशन वर्ष	:	
शके	:	
इ.स.	:	
पृष्ठ संख्या	:	
दाखल अंक (Call No.)	:	
बोधांक (Call No.)	:	
किंमत	:	
महत्वाचा मजकूर	:	

परिशिष्ट २

पश्चिम महाराष्ट्रातील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयाची यादी

अ.नं.	ग्रंथालयाचे नाव	ठिकाण
	कोल्हापूर :	
१.	आपटे वाचन मंदिर	इचलकरंजी
२.	करवीर नगर वाचन मंदिर	कोल्हापूर
३.	कविवर्य मोरोपंत ग्रंथालय	पन्हाळा
४.	क्रांतीवीर रत्नाप्पाण्णा कुंभार सार्वजनिक वाचनालय	गंगानगर
५.	नगर वाचनालय	कुरूंदवाड
६.	पूज्य सानेगुरूजी सार्वजनिक मोफत वाचनालय	गडहिंग्लज
७.	प्रबोधन वाचनालय	इचलकरंजी
८.	महात्मा गांधी वाचनालय	कागल
९.	रसिक रंजन वाचनालय	घुणकी
१०.	राजर्षि शाहूनगर वाचन मंदिर	शिरोळ
११.	सार्वजनिक वाचनालय	मलकापूर
१२.	हुतात्मा तुकाराम वाचनालय	मुरगूड
१३.	श्री छत्रपती शिवाजी वाचनालय	सावर्डे
१४.	श्री दत्त सार्वजनिक वाचनालय	नृसिंहवाडी
१५.	श्री भास्करराव जाधव वाचनालय	कोल्हापूर
१६.	श्री शारदा वाचन मंदिर	वारणानगर

अ.नं.	ग्रंथालयाचे नाव	ठिकाण
१७.	श्री शाहू वाचनालय	गारगोटी
१८.	श्री सरस्वती वाचनालय सांस्कृतिक मंडळ	मडिलगे
१९.	श्री श्रीमंत गंगामाई वाचन मंदिर	आजरा
	पुणे :	
१.	आर्य समाज मोफत वाचनालय	पिंपरी
२.	इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ तालुका वाचनालय	इंदापूर
३.	इंदिरा सार्वजनिक ग्रंथालय काँग्रेस भवन	पुणे
४.	ए.आर.एस. इनामदार पब्लिक लायब्ररी ॲन्ड फ्री रिडींग रूम	पुणे
५.	कविवर्य मोरोपंत वाचनालय	बारामती
६.	कै.आण्णासाहेब पांढरे सार्वजनिक वाचनालय	कुरावली
७.	गुरूदत्त वाचनालय	निरगुड
८.	गुरूजी वाचनालय	हडपसर
९.	ग्रामपंचायत वाचनालय	मंचर
१०.	चंद्रकांत दांगट सार्वजनिक वाचनालय	वडगांव बु।।
११.	जयहिंद वाचनालय	धामणी
१२.	जवाहर वाचनालय	जुन्नर
१३.	जुन्नर नगर वाचनालय	जुन्नर
१४.	धर्मगंगा सार्वजनिक वाचनालय	चिंचवड, पुणे
१५.	भारत वाचनालय	राजुरी
१६.	मराठी ग्रंथालय	नारायण पेठ, पुणे

अ.नं.	ग्रंथालयाचे नाव	ठिकाण
१७.	महाराष्ट्र गांधी स्मारक विधी ग्रंथालय	पुणे, कोथरूड
१८.	रविंद्रनाथ टागोर सार्वजनिक ग्रंथालय	निगडी, पुणे
१९.	सेवाधाम ट्रस्ट ग्रंथालय व मोफत वाचनालय	तळेगांव स्टेशन
२०.	साई मित्र मंडळ वाचनालय	जुने सांगवी
२१.	सार्वजनिक वाचनालय	राजगुरूनगर
२२.	सन्मित्र तरूण मंडळ मोफत वाचनालय	सांगवी
२३.	सरस्वती ग्रंथालय	पडवी
२४.	सिद्धार्थ वाचनालय आणि ग्रंथालय कॅम्प	शिवाजी मार्केट, पुणे
२५.	संगमवाडी सार्वजनिक वाचनालय	संगमवाडी
२६.	श्री गणेश मोफत वाचनालय व ग्रंथालय	तळेगांव दाभाडे
२७.	श्री गीता ग्रंथालय	भवानी पेठ, पुणे
२८.	श्री सोमेश्वर वाचनालय	सोमेश्वरनगर
२९.	श्री मामासाहेब देशपांडे ग्रंथालय	आनंदनगर
३०.	श्री कान्होबा सार्वजनिक वाचनालय	चांडोली बु।।
३१.	श्रीमंत सौ.गंगूबाई पंत सचिव वाचनालय	भोर
३२.	त्वष्टा कासार समाज संस्था वाचन मंदिर	कसबा पेठ, पुणे
	सांगली :	
१.	आष्टा जनरल लायब्ररी	आष्टा
२.	कै.ईश्वराप्पा उर्फ तात्यासो वाले नगर वाचनालय	नांद्रे
३.	गांधी ग्रंथालय, महावीरनगर	सांगली
४.	जत वाचनालय	जत

अ.नं.	ग्रंथालयाचे नाव	ठिकाण
५.	तरूण मित्र मंडळ वाचनालय	शिराळा
६.	द नगर वाचनालय	विटा
७.	नगर वाचन मंदिर	डिग्रज
८.	बायसिंगर मेमोरियल लायब्ररी गांधी चौक	मिरज
९.	भारतीय सार्वजनिक मोफत वाचनालय	पेठनाका
१०.	मिरज विद्यार्थी संघ, खरे वाचन मंदिर वाचनालय	मिरज
११.	यशवंतराव चव्हाण सार्वजनिक ग्रंथालय शांतिनिकेतन	सांगली
१२.	राजमती सार्वजनिक ग्रंथालय नेमिनाथनगर	सांगली
१३.	वि.स.खांडेकर वाचनालय राम मंदिर चौक	सांगली
१४.	व्या.मो.ज्ञा.मं. महात्मा गांधी ग्रंथालय	सांगली
१५.	सांगली (जिल्हा) नगर वाचनालय	सांगली
१६.	सार्वजनिक वाचनालय	साखराळे
१७.	स्वामी विवेकानंद वाचनालय	पलूस
१८.	श्री शिवाजी सार्वजनिक वाचनालय	मांगले
१९.	श्रीमंत बाळासाहेब ज्युबिली लायब्ररी मार्केट	मिरज
	सातारा :	
१.	नगरपालिका नगर वाचनालय	कराड
२.	पद्मश्री डॉ.ग.गो. जाधव सार्वजनिक मुक्तद्वार ग्रंथालय	वाई
३.	महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालय	मेढा
४.	लोणंद नगर पंचायत वाचनालय	लोणंद

अ.नं.	ग्रंथालयाचे नाव	ठिकाण
५.	लोकमान्य टिळक ग्रंथालय	वाई
६.	हिंद वाचनालय	रहिमतपूर
७.	व्यंकटेश्वर वाचनालय	साखरवाडी
८.	श्री छत्रपती प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनाय	सातारा
९.	श्री नागोजीराव पाटणकर स्मारक वाचनालय	पाटण
१०.	श्री शिवछत्रपती वाचनालय	सातारा
	सोलापूर :	
१.	ओम सच्चिदानंद वाचनालय	सोलापूर
२.	नगर वाचन मंदिर	मंगळवेढा
३.	नगर वाचन मंदिर	सांगोला
४.	नगर वाचन मंदिर	पंढरपूर
५.	पूर्वविभाग सार्वजनिक वाचनालय	सोलापूर
६.	व्यापारी मोफत वाचनालय	मोहोळ
७.	शिवलाल रामचंद्र वाचनालय	माढा
८.	श्रीमंत शहाजीराजे भोसले वाचनालय	अक्कलकोट
९.	श्री हनुमान सार्वजनिक वाचनालय	वासूद
१०.	श्री हिराचंद नेमचंद वाचनालय	सोलापूर
११.	श्री रामलिंगेश्वर वाचनालय	तिर्थ
१२.	श्री संतसेवा वाचनालय	सोलापूर
१३.	श्री ज्ञानेश्वर वाचन मंदिर मुक्तद्वार वाचनालय	करमाळा

अ.नं.	ग्रंथालयाचे नाव	ठिकाण
१४.	श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालय	बार्शी
१५.	सदुभाऊ सार्वजनिक वाचनालय	अकलूज
१६.	सार्वजनिक वाचनालय	बार्शी
१७.	स्वातंत्र्यवीर सावरकर वाचनालय	पंढरपूर
१८.	हनुमान सार्वजनिक वाचनालय	वसूद
१९.	ज्ञानदान सार्वजनिक मोफत वाचनालय	भुरीकवठे